आमचा नगर जिल्हा.

लेखक.

हरि गणेश पारखे.

B. A. L. L. B.

चेअरमन, डिस्ट्रिक्ट स्कूलबोर्ड, अहमदनगर.

[१९३१]

किंमत १२ आणे.

आमचा नगर जिल्हा.

लेखक.
हरि गणेश पारखे.
B. A., L. L. B.
चेअरमन, डिस्ट्रिक्ट स्कूलबोर्ड, अहमदनगर.

[१९३१]

किंमत १२ आणे.

प्रकाशकः—
विद्याधर हरि दामले,
नवीन किताबखाना, बुधवार चौक, पुणें.

मुद्रकः—
लक्ष्मण भाऊराव कोकाटे, हनुमान प्रेस,
३०० सदाशिव पेठ, पुणें शहर.

प्रस्तावना.

हल्लींच्या शिक्षणक्रमांत स्वधर्म, स्वदेश किंवा स्वभाषा यांचें योग्य ज्ञान होऊन यांविषयीं प्रेम उत्पन्न होईल अशी नाहीं. इतिहासभूगोलांच्या बाबतींत हा दोष प्रामुख्यानें दिसतो. भूगोलाच्या शिक्षणांत अमेरिका–आफ्रिकांमधील शहरें, नद्या, पर्वत पाठ होतात. परंतु स्वःच्या जिल्ह्यांतील अगर गांवचीच नदी असेल तिची मुलांना माहिती नसते. सातवीच्या विद्यार्थ्याला गव्हर्नर जनरलांची लांबलचक यादी, त्यांच्या तारखा, त्यांच्या लढाया व तह यांची माहिती होते, परंतु आपल्याच तालुक्यांत किंवा जिल्ह्यांत होऊन गेलेल्या थोर पुरुषांचीं नांवें माहीत नसतात.

आधुनिक शिक्षणपद्धतींत गांवचा भूगोल व गांवचा इतिहास यांच्या पायावरच राष्ट्रीय व जागतिक इतिहासभूगोलांची इमारत बांधतात. या नवीन अभिनंदनीय उपक्रमाला थोडाफार हातभार लावावा, नगरजिल्ह्यांतील मुलांना आपल्या जिल्ह्याचा भूतकाल किती उज्ज्वल होता याची थोडीबहूत कल्पना यावी व त्यांनीं पुढें आवडीनें जिल्ह्याच्या ऐतिहासिक साधनांचा शोध व अभ्यास करावा या हेतूनें प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे. याचा योग्य तो परामर्ष घेणें शिक्षकांच्या, पालकांच्या व विशेषतः विद्यार्थ्यांच्या हातीं आहे. इतर हौशी वाचकांनाहि या पुस्तकांत बरीचशी नवीन व मनोरंजक माहिती, मिळेल असें वाटतें.

हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं अहमदनगर गॅझेटिअर, शिवभारत, राधामाधवविलासचंपू, खरेकृत मालोजी व शहाजी, ब्राह्मणी राज्याचा जुना ग्रंथ,, रा. ब. पारसनीसकृत मराठा सरदारांच्या कैफियती, नानासाहेब मिरीकरकृत नगर शहरचा इतिहास या ग्रंथांचा उपयोग केला आहे याबद्दल या सर्व ग्रंथकर्त्यांचा मीं फार आभारी आहे. तसेंच जिल्ह्यांतील निरनिराळ्या ठिकाणांची माहिती पुरविण्याचे कामीं जिल्ह्यांतील शिक्षकांनीं व ती माहिती व्यवस्थित स्वरूपांत जुळवून देण्याचें कामीं नगरजिल्हा स्कूलबोर्डाचे सुपरवायझरांनीं जी मदत केली तीबद्दल त्यांचेही आभार मानणें जरूर. शेवटीं पुस्तकाची हस्तलिखित प्रत समग्र वाचून पाहून योग्य त्या सूचना केल्याबद्दल अहमदनगर जिल्हा स्कूलबोर्डाचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर श्रीयुत विठ्ठलराव घाटे, एम्. ए; बी. टी. टी. डी. (लंडन) यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

अहमदनगर,
कृष्णाष्टमी शके १८५२. — हरि गणेश पारखे.

आमचा नगर जिल्हा.

अनुक्रमणिका.

प्रकरण १ लें.

स्थानिक इतिहासाचें महत्त्व.

अहमदनगर जिल्ह्याच्या इतिहासाचें हिंदुस्थानच्या इतिहासांत बरेंच महत्त्व आहे. प्राचीन काळीं आर्य व द्राविड संस्कृतींचा मिलाफ याच भागांत झाला व श्रीरामाचें कार्य बरेंचसें या प्रदेशांत घडलें. आर्यांच्या वसाहती दक्षिणेंत वसाविणारे आर्यांचे पहिले पुढारी ऋषि अगस्त्य याच जिल्ह्यांत वास्तव्य करीत होते. त्यानंतर सांस्कृतिक दृष्टीनें पाहिलें तर दक्षिणेचें काशीक्षेत्र जें पैठण तें याच जिल्ह्यांत मोडतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. धार्मिक व वाङ्मयिक दृष्टीनें विचार केला तर हिंदूंचा मराठी आद्य ग्रंथ श्रीज्ञानेश्वरी याच जिल्ह्यांत निर्माण झाला.

मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश होऊन त्यांची राज्यस्थापना व सत्तेची वाढ होत असतां ज्या घडामोडी झाल्या त्यांत या जिल्ह्यानें महत्त्वाचा भाग घेतला आहे. मराठ्यांचें मुसलमानांशीं पहिलें मोठें युद्ध—भातवडीची लढाई—व शेवटचें मोठें युद्ध—खर्ड्याची लढाई—दोन्ही याच जिल्ह्यांत झालीं.

भोंसले घराण्याचीं वतनाचीं गांवें याच जिल्ह्यांतील व मालोजीनें आणि त्याच्या वडिलांनीं नांगर हातीं धरिला असेल तर तो या जिल्ह्यांतील शेतावरच. श्रीशिवछत्रपतीचें बालपण या भागांतच गेलें. मराठशाहींतील व मोंगलाईतील अनेक नामांकित सरदार याच जिल्ह्यातील पाटिलक्या उपभोगिण्यांत भूषण मानीत.

भूगोलानें इतिहासाला सांथ द्यावी म्हणूनच कीं काय जगांतील सर्वांत मोठें असें भंडारदरा येथील धरण याच जिल्ह्यांत आहे.

प्रस्तुत पुस्तकांत निजामशाही, मराठशाही, पेशवाई व आंगलाईमधील नगर जिल्ह्याचा इतिहास क्रमानें दिला आहे व पुढें नगर शहराची ऐतिहासिक माहिती दिली आहे. यापुढील भागांस ऐतिहासिक म्हणणें कांहीं वाचकांना आवडणार नाहीं. परंतु पुराणात ऐतिहासिक सत्य ठिकठिकाणीं आढळतें हें आतां सर्वमान्य झालें

आहे, व स्थलांच्या नांवांवरून कधीं कधीं महत्त्वाचे ऐतिहासिक शोध निघण्याचा संभव असतो. दंतकथा या बहुधा अनैतिहासिक, पण त्यांच्या उत्पत्तींत कांहींतरी ऐतिहासिक अंश असतो. त्या एकत्रित करणें इतिहासभक्तांस अवश्य आहे. त्यांचा पुढेंमागें काय उपयोग होईल कोणीं सांगावें ? याच दृष्टीनें वाचकांनीं त्यांच्याकडे पहावें.

प्रकरण २ रें.

निजामशाही.

मध्ययुगीन कालांत दख्खन किंवा दक्षिणापथमध्यें अनेक हिंदु राजे राज्य करीत होते. देवगिरीचे यादव, विजयानगरचे राजे वगैरे राजे प्रसिद्ध आहेत. उत्तर हिंदुस्थानांत राज्य करणाऱ्या मुसलमानांचा आरंभीं दक्षिणेंत प्रवेश इ. स. १२९४ त अल्लाउद्दीन सुलतानाच्या कारकीर्दीत झाला.

हळू हळू हिंदु राज्यें पादाक्रांत करून मुसलमानांनीं दक्षिणेंत अंमल बसविला. आरंभीं ते दक्षिणेंत सुभेदार पाठवून त्यांच्याकडून राज्यकारभार चालवीत. पुढें महमद तखलघ या बादशहानें दक्षिणेंत देवगिरी येथें राजधानी करण्याचा पहिला प्रयत्न केला व तिला दौलताबाद हें नांव दिलें. दक्षिणेंत पाठविलेल्या हसन गंगू या सरदारानें दिल्लीच्या राजसत्तेचें जूं झुगारलें व दक्षिणेंत स्वतंत्र राज्य सुरू केलें. हाच दक्षिणेंतील पहिला मुसलमान राजा. याच्या घराण्याला बहामनी घराणें म्हणत. या घराण्यानें दीडशें वर्षें राज्य केलें. यांची राजधानी प्रथम गुलबुर्गा व नंतर बेदर येथें होती.

बहामनी राज्याच्या स्थापनेच्या वेळीं अहमदनगर जिल्ह्यांतील पश्चिम भागांतील कोळी लोकांनीं पुष्कळ स्वातंत्र्य मिळविलें. त्यांपैकीं पापेरा नांवाच्या कोळ्याला उत्तर कोकणांतील जव्हार प्रांताचा सरदार करण्यांत आलें. जव्हार संस्थानांत नगर जिल्ह्याचा बराचसा भाग समाविष्ट केलेला होता. त्यांत २२ किल्ले असून ५ लाखांचें उत्पन्न होतें. जोंपर्यंत हे कोळी लोक शांततेनें रहात होते

तोंपर्यंत बहामनी राजांनीं त्यांचे कारभारांत कोणत्याहि प्रकारें हात घातला नाहीं. नगर जिल्ह्याचा पश्चिम भाग व पुणें जिल्हा यांचे ५२ भाग किंवा मावळ केलेले असून वंशपरंपरा प्रत्येक कोळी सरदाराकडे एकेक भाग असे. या सरदारांना नाईक म्हणत असत व या सर्वांचा अधिकारी एक मुसलमान होता. त्याला सरनाईक म्हणत असत. तो जुन्नर येथें राहून या सर्व मावळांचा कारभार पाहात असे.

इ. स. १३५७ त हसनचा वंशज अल्लाउद्दीन गंगू यानें आपल्या राज्याचे चार भाग केले व प्रत्येक भागावर एकेक सुभेदार नेमला. त्यास तरफदार म्हणत. प्रत्येक भागास तरफ म्हणत. अहमदनगर हा मुख्य भाग होता, म्हणून तो राजाचे पुतण्याकडे दिलेला होता. इ. स. १३६६ मध्यें राजा वारल्याची अफवा पसरली व अनेक सरदार या राज्याकरितां धडपड करूं लागले. त्या सरदारांपैकीं, बहरामखान हा बलाढ्य होता. परंतु त्याचा शेवटीं मोड झाला.

महंमदशहाचे कारकीर्दीत दरोडेखोरांचा नायनाट झाला व त्यामुळें व्यापार वाढून लोकांची भरभराट झाली. यानंतर १३९६ ते १४०७ दुर्गादेवीचा दुष्काळ पडला व बारा वर्षांत या देशाची अत्यंत हानी झाली व तो जवळ जवळ ओसाड झाला. लोक व गुरें वगैरे हजारांनीं मरण पावलीं. १४६० त दक्षिणेकडे दामाजीपंताचा दुष्काळ पडला. नंतर १२ वर्षांनीं २ वर्षे इतकें अवर्षण पडलें कीं तिसऱ्या वर्षी पाऊस पडल्यावर जमीन करण्यास मनुष्यच शिल्लक राहिला नाहीं. त्या वेळच्या महमदगवान नांवाच्या कर्तृत्ववान् दिवाणास सरदारांच्या कारस्थानीपणामुळें फाशी दिलें व इ. स. १४८१ नंतर बहामनी राज्यास उतरती कळा लागली. याचा अर्थ असा कीं, मध्यवर्ती सत्ता डगमगून त्या सत्तेचीं शकलें बाहेर पडूं लागलीं. ही उतरती कळा म्हणजेच अनेक शाहींचा उदय होय. बहामनी राज्यांतलि निरनिराळे सरदार आपापल्या परीनें महत्त्वाकांक्षी असल्याकारणानें राज्याची तृष्णा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होऊन राजे बनण्याच्या मार्गास ते लागले, व ज्याप्रमाणें एकाद्या पेढीचा मालक नादान व निर्बल झाल्यानंतर त्या मालकाचे दिवाण स्वतंत्र पेढी स्थापन करण्याकरतां आपल्या पूर्वीच्या मालकाच्या संपत्तीचा व त्याचप्रमाणें वजनाचा उपयोग करून घेण्याकरतां अनुचित मार्गांचा अवलंब करितात, त्याचप्रमाणें या बहामनी राज्यांतील सरदारांनीं निरनिराळे प्रदेश आपण स्वतः घेण्याचें ठरविलें व त्या उद्योगास ते लागले व त्याप्रमाणें

अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, बेदरची बरीदशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही व खानदेशकडील इमादशाही अशीं पांच निरनिराळीं राज्यें बहामनी राज्याच्या नाशापासून उत्पन्न झालीं व या निरनिराळ्या शाह्या आपापल्या परीनें सर्वांत पहिला मान मिळविण्याचे खटपटीस लागल्या. दुसऱ्यापेक्षां आपण कोणत्या साधनांनीं प्रबल होऊं व आपल्यापेक्षां दुसरा निर्बल आपणास कसा करतां येइल, याच एका प्रमुख विचारानें प्रेरित होऊन प्रदेश जिंकणें, संपत्ति मिळविणें व जास्त फैलाविणें या तिन्ही गोष्टींचा इतिहास म्हणजेच या निरनिराळ्या शाह्यांचा इतिहास होय.

मागें सांगितल्याप्रमाणें महंमद गवाननंतर ' निजाम उल्मुल्क बहिरी ' हा बहामनी राज्याचा दिवाण झाला. महमदशहानें हसनला दिलेला निजाम उल्मुल्क हा किताब आहे व बहिरी हें त्याच्या बापाच्या बहिरव नांवाचें मुद्दाम अपभ्रष्ट केलेलें रूप आहे. त्याचें ठेवलेलें नांव हसन व मूळ नांव तमाभट वा॥ बहिरूभट. हा मूळचा हिंदु-ब्राह्मण असून पाथ्री येथील कुळकर्णी होता. त्याचें नांव तिमाप्पा व त्याच्या बापाचें नांव बहिरव. कर्नाटकांत असतां याला मुसलमानी सैन्यानें पकडलें व मुसलमानी दीक्षा मिळाली. त्याचा राजदरबारीं प्रवेश होऊन मलिक हसन हें नांव त्यास मिळालें होतें. तो आपल्या कर्तबगारीनें पुढें आला. महमद-शहानें त्यास निजामउल्मुल्क बहिरी हा किताब दिला. इ. स. १४८५ चे सुमारास बीड, अहमदनगर जिल्हा व इतर आणखी कांहीं जिल्हे त्याचे खाजगी जिंदगींत सामील करण्यांत आले व या जिल्ह्यांचा कारभार त्यानें आपला मुलगा अहमद याजकडे दिला व तोच निजामशाहीचा संस्थापक झाला.

निजामशाहीमध्यें एकंदर ११ बादशहा झाले. त्यांचीं नांवें खालीलप्रमाणें आहेत.

१ अहमद निजामशहा.	१४८५	ते	१५०८
२ बुऱ्हाण निजामशहा.	१५०८	ते	१५५३
३ हुसेन निजामशहा.	१५५३	ते	१५६५
४ मूर्तीझा निजामशहा.	१५६५	ते	१५८८
५ मिरान हुसेन निजामशहा.	१५८८		
६ इस्माईल निजामशहा.	१५८८	ते	१५९०

७ दुसरा बुऱ्हाण निजामशहा. १५९० ते १५९४
८ इब्राहिम निजामशहा. १५९४
९ दुसरा अहमद १५९४ ते १५९५
१० बहादूर निजामशहा. १५९६ ते १५९९
११ दुसरा मूर्तीझा निजामशहा. १५९९ ते १६३९

ज्या वेळेस दक्षिणेंत निरनिराळ्या शाह्या अस्तित्त्वांत आल्या, त्या वेळेस उत्तरहिंदुस्तानांत लोदी घराण्याचा नाश होऊन पहिला मोंगल बादशाहा बाबर यानें आपला हिंदुस्तानांत प्रवेश करून मोंगल बादशाही दिल्ली एथें सुरू केली. दक्षिणेंत निजामशाही व उत्तरेस मोंगलशाही सुरू असतां मूर्तिझा निजामशहाचे अमदानींत ज्या वेळेस मालोजी भोंसले निजामशाहीमध्यें नौकर म्हणून राहिला, त्या वेळेसच मराठशाहीचें बीज निजामशाहीक्षेत्रांत पेरलें गेलें. त्या बीजाचा स्वराज्यस्थापनेचा वृक्ष श्रीछत्रपतीमहाराजांच्या काळांत जगाला दिसून आला, व निजामशाहीचें रूपांतर मराठेशाहींत झालें.

अहमदनगरचा पहिला बादशाहा अहमद निजामशहा होता. त्याचें राज्य १४८५ ते १५०८ पावेतों होतें. त्याचें पूर्वीचें नांव मलिक अहमद होतें. त्यानें जुन्नर ही प्रथम आपली राजधानी केली होती. त्यानें शिवनेरी किल्ला जिंकल्यानंतर त्यांत महाराष्ट्राची ५ वर्षांची जमीनमहसूलाची रक्कम मिळाली. त्या द्रव्यामुळें त्यानें पुण्याचा पश्चिमभाग व नैर्ऋत्येकडील भाग घेतला. इ० स० १४८६ मध्यें निजाम उल्मुल्काचा खून झाला, व त्याचे जागीं मलिक अहमद याची नेमणूक झाली. पुढें या मलिक अहमदाचें प्रस्थ फार वाढलें व तो डोईजड झाला. परंतु त्याचा स्वभाव अतिशय उत्तम असल्याकारणानें इतर सरदारांना त्याचेवर स्वारी करण्याचें धैर्य होईना. बहामनी राजानें तीन वेळां सरदार पाठविले परंतु त्यानें युक्तिप्रयुक्तीनें त्यांना परत लावले. शेवटीं मौलर्वाद अरब नांवाच्या सरदारानें अहमद निजाशहाचा बीमोड करण्याचें कार्य अंगिकारलें.

बहामनी सैन्य चाल करून येत असतां मध्येंच अहमद निजामनें पुण्याचे उत्तरेस असलेलें चाकण गांव काबीज केलें. पुढें बहामनी सैन्याचा पराभव झाला. अहमद निजाम हा आपलें सर्व सैन्य घेऊन जुन्नरांत परत येऊन मुलकी कारभार व्यवस्थित रीतीनें करूं लागला. पुन्हां १८००० सैन्य घेऊन एक बहामनी

सरदार चाल करून आला, परंतु अहमद निजामनें शत्रूच्या स्त्रियांस चांगल्या तऱ्हेनें वागविल्यामुळें शत्रू लढाई करण्यास तयार होईना. पुढें तो परांड्यास गेला. जहांगीरखान नांवाच्या बहामनी सरदारानें पैठण काबीज केल्यावर अहमद निजाम हा जेऊर घाटांत दबा धरून बसला. जहांगीर यानें तीसगांव जवळच्या देऊळगांव घाटांतून भिंगारनजीक छावणी घातली. अशा रीतीनें हीं दोन्हीं सैन्यें एकमेकांपासून सुमारें १२ मैल अंतरावर एक महिना होतीं. पावसाळ्यांत जहांगिर हा चैनींत गुंग असतां अहमद निजामनें छापा घालून बरेचसे सरदार ठार केले. अशा प्रकारें बहामनी सैन्याचा पूर्ण पराभव करून अहमद जुन्नरास परत आला व इ० स० १४९० मध्यें कोंकणांतील दंडा राजापूर नांवाचा किल्ला घेतला.

अहमद निजामच्या बापानें मलिक वजीर व मलीक असराफ यांना दौलताबादेवर नेमलें होतें. याचें व अहमद निजामचें सख्य होतें. हें सख्य कायम टिकविण्याकरितां अहमदनें आपली बहिण मलिक वजिराला दिली. पुढें त्याला मुलगा झाल्यावर मलिक असराफनें त्या दोघांचाही खून केला. अहमद निजामनें बहिणीची बाजू घेऊन असराफवर स्वारी केली. दौलताबादेस २ महिने वेढा दिल्यावर तो जुन्नरला परतला. भिंगारास येत असतांच त्यानें तेथेंच राजधानी वसविण्याचें ठरविलें. इ० स० १४९४ मध्यें सीना नदीचें दक्षिणाकिनाऱ्यावर अहमद निजामनें एक शहर वसविलें तेंच अहमदनगर होय. ह्या ठिकाणाहून वर्षांतून दोन वेळेस तो दौलताबादेवर स्वारी करीत असे. इ० स० १४९८ त विजापूरचा यूसफ आदिलशहा, अहमदनगरचा अहमद निजामशहा व वऱ्हाडचा इमादशहा मुलक यांनीं आपसांत दक्षिण प्रांत वांटून घेण्याचें ठरविलें. त्या वांटणींत अहमद निजामशहाकडे दौलताबाद, अंतोर व गाळणा इतके प्रांत आले. नंतर एकदोन लढायांनंतर मलिक असराफ मरण पावला, व त्याच्या सैन्यानें दौलताबाद अहमद निजामशहाच्या ताब्यांत दिलें. खानदेशच्या राजाला त्यानें मदत केली होती, परंतु महंमद बेगड ह्याच्याशीं लढण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें तो नगरास आला व इ० स० १५०८ मध्यें मृत्यु पावला.

हा राजा फार शूर होता. लाठी व कुस्ती शिकविण्याकरितां शहरांत ठिकठिकाणीं शाळा उघडण्यांत आल्या. यानें द्वंद्व युद्धास प्रोत्साहन दिलें होतें. या द्वंद युद्धास ' एकंग बझी ' असें म्हणत असत. पाश्चिमात्य देशांतही ही चाल फार लोकप्रिय होती. या शहरांत इतर परदेशी लोकांचा भरणा फार असे. कारण या

शहराचा व्यापार परदेशांशीं बराच असे. विशेषतः इराण, अरबस्तान, या देशांशीं असून पोर्तुगीज लोकांनीं आपल्या वसाहती पश्चिमकिनाऱ्यावर केल्या असल्यामुळें त्यांचाही व्यापाराचा संबंध बराच होता. चौल नांवाचें जें बंदर अरबी समुद्रावर आहे तें निजामशाही राजांचे ताब्यांत होतें. यामुळें परदेशांतून येणारा माल या राज्यांत येई व मग पुढें त्याची व्यवस्था लागत असे. व्यापाराकरितां परदेशांतून पुष्कळ मुसलमान येऊन त्यांनीं इकडेच आपलें वास्तव्य केल्याचें दिसून येतें, व त्यामुळें निजामशाहीचे राज्यांत दक्षिणी मुसलमान व परदेशी मुसलमान असे पक्ष-भेद निर्माण होऊन त्याचा परिणाम निजामशाहीवर बराच झाला असें आपणांस दिसून येईल. पहिल्या राजाची कारकीर्द फक्त २३ वर्षें झाली.

यानंतर दुसरा निजामशाहींतील बादशहा म्हणजे बुऱ्हाण निजामशहा होय. यानें १५०८ पासून १५५३ पर्यंत राज्य केलें. बुऱ्हाण निजाम हा अज्ञान असल्यामुळें मुकामीलखान हा आपल्या मुलासह कारभार पाहत असे या बापलेकांचें वर्चस्व सहन न झाल्यामुळें सुमारें १५११ त बुऱ्हाणास पदभ्रष्ट करून त्याचा भाऊ राज्जू याला गादीवर बसविण्याचा कट झाला व शेवटीं मुकामीलचे शत्रूंना नगर सोडून जाणें भाग पडलें. पुढें त्यांनीं वऱ्हाडच्या इमाद–उल-मुलुकच्या पदरीं राहून त्याला नगरावर स्वारी करण्यास चिथावलें. राजूरीनजीक इ० स० १५१० मध्यें इमादउलमुलुक याचा पूर्ण पराभव झाला. नंतर पाथरीचा किल्ला मोठ्या युक्तीनें घेऊन तो कामीलखानाच्या ताब्यांत दिला. यानंतर बुऱ्हाणनें एका नायकिणीशीं लग्न लावलें व तो दारू पिण्यास शिकला. आपलें वजन कमी होत आहे असें पाहून मुकामीलखान यानें सर्व कारभार बुऱ्हाण निजामकडे सोंपविला व मरेपर्यंत पुन्हां तो राज्यकारभारांत पडला नाहीं. इ० स० १५२३ मध्यें बुऱ्हाण निजामनें विजापूरच्या आदिलशाहाच्या बहिणीशीं लग्न लावलें परंतु बुऱ्हाणची लाडकी राणी अमिना इचें वर्चस्व तिला असह्य झाल्यामुळें तिनें भावाकडे तक्रार नेली. शिवाय आंदण म्हणून देऊं केलेला सोलापूर जिल्हा बुऱ्हाणास मिळाला नाहीं. म्हणून विजापूर व अहमदनगर यांचें युद्ध सुरू झालें. बुऱ्हाणनें सोलापुरावर स्वारी केली परंतु तेथील उष्णता त्याला सहन न झाल्यामुळें परतावें लागलें. नंतर बुऱ्हाणनें पाथरीचा किल्ला जमीनदोस्त केला व आसपासचा प्रदेश ब्राह्मणांस दिला.

इमादनें खानदेशची मदत घेऊन पुन्हां बुऱ्हाणावर स्वारी केली. परंतु त्याचा

पराभवच झाला. शेवटीं गुजराथच्या बहादूरशाहाची मदत त्यानें मिळविल्यावर बुऱ्हाण घाबरला व बाबर, बेदरचा अमीर बेरीद यांना पत्रें लिहिलीं. त्यांपैकीं, बेरीदनें मदत केली व त्यामुळें बहादूरशाहा व त्याचे दोस्त यांचा पराभव बीड-नजीक झाला. यामुळें चिडून बहादूरशाहानें २०००० घोडदळानें पुन्हा बुऱ्हाण यास अडविलें व तिसरी फौज आल्यानंतर बुऱ्हाणास जुन्नरकडे जावें लागलें.

गुजराथचा बहादूरशाहा सुमारें ४० दिवस बुऱ्हाणचे मदतीस राहिला. शेवटीं मदत मिळवून बुऱ्हाणचें राज्य परत मिळविण्याचे प्रयत्न निष्फळ झाल्यावर आपसांत तह झाला. या सुमारास दिल्लीस हुमायून आपल्या राज्याचा विस्तार करीत होता. व त्यामुळें बुऱ्हाण निजाम व गुजराथचा बहादूरशाहा यांचें फारच सख्य झालें, व सर्व दक्षिणप्रांत बुऱ्हाणास मिळाला.

कावरसेन या नांवाचा प्रधान अत्यंत धोरणी व कुशल असल्यामुळें राज्य-विस्तार करण्यास बुऱ्हाण यास सवड मिळाली. परंतु इस्माईल आदिलशाहा व बुऱ्हाणशाहा यांची लढाई होऊन त्यांत बुऱ्हाणचा पराभव झाला.

नंतर १५३२ मध्यें बुऱ्हाणनें वऱ्हाडावर व आदिलशाहानें तैलंगणावर स्वारी करावी असें ठरलें. परंतु आदिलशाहा मरण पावल्यामुळें हा बेत फोल ठरला.

बुऱ्हाण निजामशाहा हा विद्वान् राजा होता व त्यानें शिक्षणाच्या शाळा नगर येथें स्थापन केल्या. त्यानें परदेशच्या विद्वानांस योग्य रीतीनें वागवून त्यांचा योग्य तो सन्मान केला. त्याच्या राज्यांत शिया व सुन्नी पंथांचे धर्मभेद पडले. बुऱ्हाणचा कल शियाकडे वळल्यामुळें विजापूर, बेदर, खानदेश व अहमदनगरच्या राज्यांत यादवी सुरू झाली. मागें बुऱ्हाणनें आपला मुलगा आजारांतून उठला तर शियापंथ स्वीकारीन असें वचन दिल्याची हकीकत आलीच आहे.

बुऱ्हाणनें विजयानगरच्या राजाशीं संगनमत करून इ० स० १५४६ त विजा-पूरच्या आदिलशाहाविरुद्ध युद्ध पुकारलें. परंतु त्याला त्यांत यश आलें नाहीं. शेवटीं बुऱ्हाणनें बेदरच्या राज्याची मदत मागितली, व त्यानें नाकारल्यामुळें रागावून त्यानें बेदरच्या राज्यांतील औसा किल्ल्यास वेढा दिला. यानंतर आदिलशाहा व बेदर यांनीं एकत्र होऊन औसाचा वेढा उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा पराभव होऊन औसाचा किल्ला बुऱ्हाण यास मिळाला.

यानंतर बुऱ्हाणनें शत्रूचे एकदोन किल्ले घेऊन तो १५४८ त अहमदनगरास परत आला. वाटेंत त्याला अशी बातमी लागली कीं, विजापूरच्या इब्राहिम आदिलशाहावर प्रजा असंतुष्ट आहे व त्याचे धाकट्या भावास गादीवर बसविण्याचा प्रयत्न करतात. ही संधि साधून त्यानें गोवळकोंड्याच्या राजाची मदत घेतली व बेळगांव घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा पराभव झाला. नंतर रामराजाचे मदतीनें इ० स० १५४९ त सोलापूर घेतलें व इ० स० १५५३ त त्याचेच मदतीनें विजापुरावर स्वारी केली. त्यांत इब्राहिम आदिलशाहा हा कोल्हापुराजवळील पन्हाळा येथें पळून गेला. विजापूरला वेढा दिला असतांना मध्यंतरीं बुऱ्हाण आजारी पडला व तो तेथून आपल्या राजधानीस आल्यावर वयाचे ५४ वे वर्षी मरण पावला.

यानंतर तिसरा बादशहा म्हणजे हुसेन निजामशाहा हा होय. यानें इ० स० १५५३ ते १५६५ पर्यंत राज्य केलें. बुऱ्हाणास चार मुलें होतीं. त्यांपैकीं हुसेन निजाम यास त्याचे वयाचे १३ वे वर्षी गादीवर बसविण्यांत आलें. बाकीच्या तीन मुलांना निरनिराळ्या राजांनीं मदत केल्यामुळें त्यांचे आपसांत तंटे झाले. ही संधि साधून इब्राहिम आदिलशाहानें १५५९ त सोलापुरास वेढा दिला व रामराजाची मदत घेऊन अहमदनगरावर स्वारी केली. हुसेन निजाम हा पैठणास पळाला त्यानें तेथून वऱ्हाडचे राजाची मदत मागितली. परंतु त्यानें शत्रूस मदत करून नगरास वेढा दिला. शेवटीं हुसेन निजामनें रामराजाशीं तह केला. या वेढयांत शत्रूशीं निकरानें लढणारा जहांगीर याचा हुसेननें शिरच्छेद केला व रामराजाचें स्वामित्व कबूल केलें. हुसेन अहमदनगरास परत आल्यावर त्यानें पूर्वीचा मातीचा किल्ला पाडून त्या ठिकाणीं दगडाचा किल्ला बांधिला. पुढें रामराजाशीं विश्वासघात करून कल्याणीला हुसेननें वेढा दिला. रामराजा, अलि आदिलशाहा व वऱ्हाड व विजापूरच्या राजांनीं हुसेन अहमदचे विरुद्ध युद्ध सुरू केलें. पुढें हुसेनला वादळाचा अतिशय त्रास झाला तरी अहमदनगर किल्ल्यांत अन्नाचा पुरवठा करून तो जुन्नरला पळून गेला. पुढें या दोस्त राजांनीं अहमदनगरला वेढा दिला. त्यांत रामराजानें अतिशय क्रूरपणा केला. यानंतर रामराजानें नगरचा वेढा उठवून हुसेन निजामचा जुन्नरास पाठलाग केला. हुसेन डोंगरांत पळून गेला. साबाजी कोळी वगैरे लोकांनीं या वेळीं जाळपोळ करून शत्रूला पुढें येऊं दिलें नाहीं व हुसेनचे मदतनिसानें कान्हूरजवळ विजापूरच्या सैन्यावर छापा घालून आदिल-

शाहाचे चुलत्यास ठार करून सैन्याची धूळधाण केली. परंतु विजापूरच्या सैन्यानें एकत्र होऊन रुस्तुमखान व त्याचें ९००० सैन्यास ठार केलें. पावसाळा लागण्याचे सुमारास पुन्हां रामराजानें अहमदनगरास वेढा दिला. परंतु सीना नदीस भयंकर पूर आल्यानें त्याची अतिशय नुकसान होऊन त्याचे मोठमोठाले सरदार पुरांत वाहून गेले. त्यामुळें रामराजानें वेढा उठवून कर्नाटककडे आपला मोर्चा वळविला. विजापूरकरांनीं सोलापूरावर हल्ले कण्याचा क्रम चालूच ठेविला होता. शेवटीं त्यांचा सरदार मूर्तजखान यास पकडून हुसेननें अहमद-नगरला आणिलें.

सन १५६४ त विजापूर, गोवळकोंडा व बिदार या राजांशीं संगनमत करून हुसेननें रामराजावर स्वारी केली. रामराजाचें सैन्य अतिशय असल्यामुळें या दोस्तसंघानें रामराजाशीं तहाचें बोलणें लाविलें, परंतु त्यानें तें नाकारलें. शेवटीं मुसलमानांनीं मरेपर्यंत लढण्याचा निश्चय केला. दोन्ही पक्षांत तुमुल युद्ध होऊन खुद्द रामराजा शत्रूच्या गराड्यांत सांपडला. त्यास कैद करून हुसेनपुढें आणलें. हुसेननें त्याचा शिरच्छेद केला व तो अहमदनगरास परतला. पुढें लौकरच अति-शय दारू प्याल्यानें हा मरण पावला.

हुसेन वारल्यावर त्याचा मुलगा मूर्तिजा निजाम हा–अज्ञान होता तो–गादीवर बसला व त्याची आई त्याचे नांवानें स्वतः राज्यकारभार पाहूं लागली. त्यानें इ० स० १५६५ ते १५८८ पर्यंत राज्य केलें, व याच्याच राज्यांत मराठे-शाही उदयास आली.

रामराजाचा भाऊ व्यंकटाद्री यास विजापूरच्या राजानें त्रास दिल्यामुळें त्यानें मूर्तिजा निजामची मदत मागितली व त्याचे मदतीनें आदिलशाहाला विजया-नगरांतून हांकून दिलें. मध्यंतरीं मूर्तीजाला मारण्याचा विजापूरचे राजानें बेत केला परंतु ही बातमी अगोदर कळल्यानें त्याचे आईनें त्याला सुरक्षितपणें नगरला आणिलें. राजाची आई खुंजा सुलताना इचेविरुद्ध कट झाला. त्यांत अज्ञान राजाही सामिल झाला होता. परंतु त्याला ताब्यांत घेऊन त्यानें कट उघडकीस आणला व कट करणारे इसमास शासन केलें. यानंतर आईची सत्ता झुगारून देऊन मूर्तीझ स्वतः राज्यकारभार पाहूं लागला. त्यानें धारूरचा किल्ला हस्त-गत केला. विजापूरकरांशीं तह करून त्यानें पोर्तुगीज लोकांचे ताब्यांत अस-

लेल्या रेवदंड्यावर चाल केली. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. इ० स० १५७२ त वऱ्हाडवर मूर्तिजानें स्वारी केली. वऱ्हाडचा तुफालखान हा डोंगरांत पळून गेला. त्याला खानदेशच्या राजानें मदत करण्याचे नाकारल्यामुळें त्यानें दिल्लीचा बादशहा अकबर याची मदत मागितली. अकबरानें तुफालखान यांस आनंदानें मदत केली व मूर्तीझा यास तुफालखानाचें राज्यांतून निघून जा असें फर्माविलें. अकबराच्या फर्मानाला न जुमानतां मुर्तिजानें किल्ले घेण्याचा सपाटा चालविला. व वऱ्हाडचा राजा तुफालखान यास कैदेंत टाकलें. पुढें त्यानें बिदारवर स्वारी केली परंतु खानदेशच्या राजानें एका तोतयास मदत करण्याकरितां पुष्कळ सैन्य पाठविलें. असें ऐकून मूर्तिजा गडबडीनें परतला, व त्यानें तोतयाचा बीमोड केला. मूर्तिजाच्या विरुद्ध कट करण्यांत आला व त्याची बातमी चेंगीझखानानें दिली. साहेबखान नांवाच्या आवडत्या सरदारानें चेंगीझच्या विरुद्ध मूर्तीझचें मत करून दिल्यामुळें चेंगीझ याला राजाचें सांगण्यावरून विषप्रयोग झाला. चेंगीझचे मरणानंतर राजास फारच पश्चात्ताप झाला. नंतर साहेबखानाचें खरें स्वरूप राजास दिसलें तरी त्याच्याशिवाय मूर्तीझचें चालणें अशक्य होतें. पुढें सलाबतखान याला दिवाण नेमलें. सलाबतखानाचा कारभार अगदीं लोकप्रिय झाला. सलाबतखानाचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें एक कट झाला, व ज्या दिवशीं मूर्तीझच्या भावाला म्हणजे बुऱ्हाणास गादीवर बसवावयाचें होतें त्याच दिवशीं सलाबतखानानें हा कट उघडकीस आणून बुऱ्हाणास कोंकणांत पळावयास लाविलें. नंतर बुऱ्हाणनें अकबराची मदत मिळविली परंतु त्याची डाळ शिजली नाहीं.

साहेबखानानंतर एक नाचकाम करणारा फत्तेशहा हा मूर्तीझचा आवडता झाला. या फत्तेशहावर राजाची इतकी बहाल मर्जी होती कीं, रामराजाकडून अत्यंत मौल्यवान् असे ८ मौक्तिकहार मिळविलेले त्याला द्या असा हुकूम फर्माविला. सलाबतखानास तें न आवडून त्यानें त्या हारांच्या ऐवजीं नकली हार ठेविले. हे मूर्तिजा यास कळल्यावर तो चिडला व त्यानें सगळे हार विस्तवांत टाकून दिले. तेव्हांपासून लोक त्याला ' दिवाणा ' म्हणूं लागले.

आपला मुलगा स्वतःची गादी मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे अशी दृढ समजूत झाल्यामुळें मुलाचा शिरच्छेद करण्याचा विचार मूर्तीझनें ठरविला. परंतु

सलाबतखान हा राजकुमाराचे जीविताची काळजी घेत होता. एका क्षुल्लक कारणावरून सलाबतखान यास मूर्तिझनें कैदेंत टाकलें. नंतर मिराज महंमद ताकी याला दिवाण नेमून युवराज मिरानचें लग्न विजापूरच्या राजकन्येशीं लावलें. पण पुन्हां मिरानचा संशय येऊन मिरान झोपेंत असतां त्याचे खोलीला मूर्तीझानें आग लावून दिली. परंतु मिरान वांचला. सर्व सरदार मुलाचे बाजूनें आहेत अशी शंका आल्यामुळें त्यांना काढून दुसरे नेमिले. तरी मूर्तीझच्या विरुद्ध सर्व लोक असल्यामुळें ४०००० सैन्य घेऊन मिराननें राजास ताब्यांत घेतलें. सर्व सरदारांचा खून केल्यानंतर बापाला एका स्नानगृहांत कोंडून खालून विस्तव पेटविला. सर्व दारें बंद असल्यामुळें मूर्तीझ आंत गुदमरून मेला.

याच्यानंतर मिरान हुसेन निजामशाहा यानें राज्य करण्यास सुरवात केली. इ० स० १५८८ मध्यें तो गादीवर बसला, व त्याची कारकीर्द फक्त १० महिने ३ दिवसांची झाली. तो स्वभावतःच क्रूर व माथेफिरू असल्यामुळें याच्या कारकीर्दीला दडपशाही व छळ यानें प्रारंभ झाला. मुख्य प्रधान मिर्झाखान याच्या सल्ल्यानें जेवढे वारस पुरुष होते तेवढे म्हणजे १५ वारस पुरुषांला त्यानें एका दिवसांत कापून काढिलें. मिर्झाखानाचें व राजाचें न पटून एकमेकांचा नाश करण्याची ते संधि पाहात होते. इ०स०१५८८ मध्यें एका मेजवानीचे वेळीं मिर्झाखान यास मारून टाकण्याचा मिरानचा बेत फसून उलट तो स्वतः मिर्झाखानाचा कैदी झाला. पुढें लोहगडच्या किल्ल्यांत अटकेंत असलेले मिरानचे भाऊ इब्राहिम व इस्माईल यांना तेथून आणण्यांत आलें. इतक्यांत जमालखान नांवाच्या लष्करी पुढाऱ्यानें मिरानची बाजू घेऊन सैन्य उभारलें व शहरांत गडबड उडाली. इकडे मिर्झाखाननें मिरानचा शिरच्छेद करून त्याचें डोकें एका काठीला लावून ती किल्ल्याचे एका बुरुजावर रोंविली. जमालखानानें किल्ल्यास आग लाविली. हजारों लोक कापले गेले परंतु मिर्झा निसटला. पुढें त्याला जुन्नरनजीक पकडून अहमदनगरास परत आणविलें. प्रथम गाढवावर बसवून मिर्झाची धिंड काढिली, व नंतर त्याला तुडवून मारून टाकलें. शहरांतील कत्तल ७ दिवस चालू होती. मिरानची कारकीर्द १० महिने व ३ दिवसांची झाली.

यानंतर इस्माईल निजामशहा हा सन १५८८ पासून १५९० पर्यंत राजा झाला. जमालखानानें त्यास गादीवर बसविलें. मेहदवी पंथाचा अनुयायी बनून त्यानें बऱ्याच लोकांचा छळ केला. वऱ्हाडच्या राजानें बरेच दिवस कैदेंत अस-

लेल्या सलाबतखानाची सुटका केली. लगेंच सलाबतखान यानें लढाईची तयारी केली. परंतु पैठणनजीक जमालखानापुढें त्याचा टिकाव न लागल्यामुळें तो तळेगांव एथें गेला व त्यानें आपलें राहिलेले दिवस तेथेंच घालविले. तो इ० स० १५८९ मध्यें मरण पावला. त्याची कबर ज्याला चांदबिबीचा महाल म्हणतात त्या ठिकाणीं आहे. अहमदनगरास चाललेल्या भानगडी ऐकून अकबरानें अहमद निजामशाहाचे बापास म्हणजे बुऱ्हाण निजामशाहा यास सैन्यासह पाठविलें. त्यानें इतर राजांची मदत घेऊन मुलास कैद केलें. जमालखान हा लढाईत मारला गेला.

नंतर उतारवयांत बुऱ्हाण निजामशाहा गादीवर बसला. त्यानें इ० स० १५९० ते १५९४ पर्यंत राज्य केलें. मेहदवी पंथाचा तो अनुयायी नसल्या कारणानें त्याच्या कारकीर्दीत शिया पंथाची भरभराट झाली. स० १५९२ मध्यें त्यानें विजापुरावर स्वारी केली. या स्वारींत विजापुरचा राज्यकारभार पाहणारा दिलावरखान याचें अंग होतें तें सर्व उघडकीस आल्यावर विजापूरच्या राजानें दिलावरखानास परत कामावर बोलाविलें. तेथें गेल्यावर त्याचे डोळे काढण्यात आले व त्याला सातारच्या किल्ल्यांत कैद करून ठेविलें. नंतर इब्राहिम (विजापूरचा राजा) यानें १०००० घोडेस्वार व ३००० पायदळ पाठवून बुऱ्हाणावर हल्ला केला. दुष्काळ व इतर रोग यांनीं बुऱ्हाणच्या सैन्याची धूळधाण होऊं लागली. या सर्व गोष्टींमुळें त्रस्त झाल्यामुळें त्यानें इब्राहिमशीं तह केला. नंतर बुऱ्हाणनें रेवदंड्यावर स्वारी केली. कुलवीस फरादखानाच्या नेतृत्वाखालीं ४००० सैन्य पाठविलें. परंतु पोर्तुगीज लोकांना बरीचशी मदत मिळाल्यामुळें मुसलमानांचें कांहींच चालेना. शेवटीं युद्ध होऊन १२००० मुसलमान मदताला आले व किल्ला पडला. यानंतर बेळगांव व विजापूर यांच्याशीं लढून ता. १५ मार्च १५९४ रोजीं बुऱ्हाण मरण पावला, व त्यानंतर इब्राहिम निजाम हा गादीवर बसला. बापाचें सांगण्यावरून त्यानें मिया मंजू यास मुख्य प्रधान नेमलें. एकालासखान व मियान यांचेमधील वैमनस्य वाढून यादवी सुरू झाली. इब्राहिम आदिलशाहा याचें म्हणणें होतें कीं, सर्व सैन्यें एकत्र करून अकबरास तोंड द्यावें. परंतु इब्राहिम निजामशाहानें तें न ऐकता विजापुरावर स्वारी केली. लढाईत अहमदनगरचा राजा इब्राहिम मारला गेला. याचें राज्य चार महिने टिकलें.

यानंतर गादीवर कोणाला बसवावयाचें यासंबंधीं भवति न भवति होऊन अहमद नांवाच्या हुसेन निजामशाहाच्या पुतण्याला १५९४ त गादीवर बसविलें.

त्यानें १५९४ ते १५९५ पर्यंत राज्य केलें. हा दुसरा अहमद बादशाहा निजामशाहींत होऊन गेला. इब्राहिमच्या लहान मुलाला एका किल्ल्यांत ठेविलें. शेवटीं असें आढळून आलें कीं, अहमद हा निजाम राजघराण्यांतील नाहीं. तेव्हां एकालासखान व मिया मंजू यांच्यामध्यें लढाई झाली. त्यांत अहमद मारला गेल्याची अफवा पसरली व एकालासखानानें भलताच एक लहान मुलगा गादीवर बसविला. या भानगडीमुळें संतप्त होऊन मियानमंजूनें अकबराचा मुलगा मुराद याला बोलाविलें. मुराद हा दक्षिणेंत स्वारी करण्याची संधि पहातच होता. त्यानें लगेच मोठें सैन्य घेऊन अहमदगरास जाण्याची तयारी केली.

इकडे एकालासखानाच्या लष्करांत बेबनाव होऊन त्याच्या विरुद्ध कांहीं लोक उठले. या संधिचा फायदा घेऊन मियान मंजूनें नवीन राजाला हस्तगत करून घेतलें. इतक्यांत ३००० सैन्य घेऊन मुराद आला. आपण फारच घाई केली याचा पश्चात्ताप मियानमंजूला झाला. पण उपयोग काय ? शेवटीं काय होईल तें होवो मुरादला विरोध करावयाचा हें त्यानें ठरविलें आणि विजापूर व गोवळकोंडा यांची मदत मागण्यास तो गेला. इकडे किल्ल्यांत अन्नाचा भरपूर सांठा केला होता, व चांदबिबीकडे कारभार सोंपविला होता. अहमदनगरास तीन पक्ष झाले होते. मुरादनें लोकांस छळूं नये म्हणून सक्त ताकीद दिली होती. तथापि शहाबाजखान नांवाच्या एका मोंगल सेनापतीनें अहमदनगर व बुऱ्हाणनगर हीं दोन्हीं शहरें लुटलीं. लोक घाबरले व रात्रींतून सर्व पळून गेले. दौलतखान लोदीनें एकालासखानाचा पैठणानजीक पूर्ण पराभव केला, व त्या गांवांत लुटालूट केली. नेहागखान हा चांदबिबीच्या मदतीकरितां किल्ल्यावर जाण्याचा प्रयत्न करूं लागला परंतु तो फसला. पुढें मियानमंजू, एकालासखान व नेहागखान वगैरे एकत्र झाले. विजापूरच्या राजानें ही मोठें सैन्य पाठविलें. परंतु मुरादनें हुकूम सोडला कीं, किल्ला ताबडतोब हस्तगत करा. त्याप्रमाणें दारूगोळ्याची तयारी झाली. पांच सुरूंगांपैकीं दोन सुरुंग चांदबिबीनें आपल्या हुशारीनें काढून टाकले. तिसऱ्या सुरुंगांतील दारू काढून टाकीत असतां सुरुंग उडवा असें मुरादनें सांगतांच तो सुरुंग उडाला व त्या सरशी किल्ल्यांतील बरेच लोक मारले गेले व बरीचशी भिंत पडली. हें भगदाड पडल्याबरोबर आंतील लोकांनीं लढण्याची तयारी चालविली. चांदबिबी स्वतः चिलखत घालून लढाईस सज्ज

झाली. आंतून लोकांनीं दारूगोळ्याचा मोंगल सैन्यावर सारखा वर्षाव केला. त्यामुळें खंदक प्रेतांनीं जवळ जवळ भरून गेला. किल्ल्यांत शिरण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. रात्रींतून चांदबिबीनें ७८ फूट भिंत बांधून तयार केली. दुसरे दिवशीं तिनें मदतीकरतां खलिते पाठविले. परंतु ते शत्रूच्या हातीं पडले. मुरादनें या दोस्त राजांनीं लौकर यावें असें पत्र त्यांत घालून तें पुढें पाठविलें. शेवटीं वऱ्हाड प्रांत सोडून दिल्यास तह होईल असें बोलणें मुरादनें लावलें, व तें चांदबिबीनें दूरवर विचार करून कबूल केलें.

मुराद परत गेल्यावर दोस्त राजे सैन्य घेऊन आले व गादीवर कोणाला बसवावयाचें यासंबंधीं वाद सुरू झाला. बराच कलह झाल्यावर बहादूर निजामशहाला त्यांनीं गादीवर बसविलें, व महंमदखान यास मुख्य प्रधान नेमिलें. बहादूर निजाम शाहाची कारकीर्द इ० स० १५९६ पासून १५९९ पर्यंत झाली. आरंभीं कांहीं दिवस बरें चाललें. परंतु पुढें सर्व सत्ता महमदखानाच्या हातीं गेली. पुन्हां चांदबिबीनें विजापूरच्या राजाला ही हकीकत कळवून मदत मागितली. सोहीलखान विजापूरकराकडून सैन्य घेऊन आल्याबरोबर महंमदखानानें वऱ्हाडांतील मोंगल सेनापती खानखानान यास पाचारण केलें. ही विश्वासघाताची बातमी लोकांस कळल्याबरोबर त्यांनीं महंमदखानाला पकडलें, व चांदबिबीच्या स्वाधीन केलें. नंतर नेहाजखान यास मुख्य प्रधान केलें. पाथरीचा किल्ला मोंगलांनीं घेतला म्हणून सोहलखान व खानखानान यांचें गोदावरीकांठीं युद्ध झालें. या युद्धांत सोहलखानाचा जवळ जवळ पराभव झाला, व तो विजापुराला परत गेला. नंतर नेहागखान व चांदबिबी यांचें न पटून त्यांच्यांत बेबनाव सुरू झाला. थोडेसें सैन्य घेऊन त्यानें मोंगलांचें बीड शहर हस्तगत केलें. अकबरानें डानियल मिर्झा खानखानान यास परत अहमदनगरावर स्वारी करण्यास पाठविलें. किल्ल्यास वेढा दिल्यास आपली धडगत नाहीं असें पाहून चांदबिबीनें तहाचें बोलणें लावण्याचा विचार ठरविला. ही बातमी हमीदखानानें शहरभर पसरविली व लोकांचीं मनें आपलींशीं करून घेऊन चांदबिबीच्या खोलींत जाऊन तिला ठार मारलें. त्यानंतर किल्ल्यास वेढा पडला व १५९९ मध्यें अहमदनगरचा किल्ला मोंगलांच्या ताब्यांत गेला. राजघराण्यांतील सर्व इसमांना पकडून कैद केलें व बहादूर निजामशहा यास ग्वालेरच्या किल्ल्यांत ठेवलें व अहमदनगर व खानदेश हे दानियाल याला देण्यांत आले.

इ० स० १६०० मध्यें अहमदनगरच्या पतनानंतर अकबरानें ख्वाजा बेग मिर्झा याचेकडे कारभार दिला. जरी अहमदनगरचा किल्ला मोंगलांच्या ताब्यांत गेला, तरी सर्व राज्य गेलें होतें असें नाहीं. कारण मलिकंबर, मियान राजू वगैरे सरदारांनीं लहान लहान राज्यें स्थापिलीं व **दुसरा मूर्तीझ निजामशहा** याचें स्वामित्व कबूल केलें. त्यानें १५९९ ते १६३१ पर्यंत राज्य केलें. या दोन्ही सरदारांचे व इतर सरदारांचे नेहमीं तंटे चालत व आपसांत लढाया होत. पुढें व्यंकटराव कोळी वगैरे अनेक सरदारांनीं मलिकंबराचे विरुद्ध का·स्थान केलें. परंतु त्यांचा पराभव झाला. अकबराचा मुलगा दानियाल याचें लग्न पैठणास झालें व तो बऱ्हाणपुरास गेला. त्याचे मागोमाग खानखानान हा जालन्यास गेला. मध्यंतरीं दानियाल यास वाटलें कीं, मलिकंबराप्रमाणें मियान राजू हाही आपलें वर्चस्व कबूल करील पण तसें न करतां मियान राजूनें उलट मोंगलास बराच त्रास दिला. मियान राजूवर मूर्तीझची अधिक मर्जी बसली व लगेंच मलिकंबर व मियान राजू यांच्यांत परांड्यानजीक युद्ध झालें. मलिकंबरानें खानखानानची मदत घेऊन मियानचा पूर्ण पराभव केला. परंतु पुढें याच खानानें मलिकंबराच्या विरुद्ध मदत केली. सरतेशेवटीं दोघांत सन १६०७ त तह झाला. मलिकंबरानें जुन्नर घेऊन तेथें मूर्तीझचें सरकारी ठाणें केलें. नंतर खडकी एथें नवीन राजधानी वसविली. मोंगल सैन्यांत फाटाफूट झाल्याची संधि साधून, मलिकनें अनेक वेळां त्यांचा पराभव केला. शेवटीं अहमदनगरास शह दिला. मोंगल सैन्यानें शिकस्त केली. कुमक पाठविली परंतु मलिकंबराच्या कुशलतेपुढें त्यांची डाळ शिजेना. शेवटीं किल्ल्यांतील सैन्य शरण आलें व बऱ्हाणपुरास निघून गेलें. इ० स० १६१२ मध्यें जहांगिरनें गुजराथ व खानदेशमधून सैन्य पाठवून मलिकंबराचा पाडाव करण्याचा बेत केला. गानिमी काव्यानें लढून मलिकंबरानें गुजराथकडील सैन्याची दाणादाण केली. नंतर खानदेशचें सैन्य बऱ्हाणपुरास एकत्र झालें होतें. इ० स० १६२० मध्यें अहमदनगरच्या उत्तरेस मलिकंबराचा एक मोठा पराभव झाला. लगेंच मराठे सरदार मोंगलास मिळाले. यामुळें हताश होऊन अहमदनगरचा किल्ला व बाकीचा सर्व प्रदेश मोंगलास परत केला. शहाजाद्यानें पाठ फिरविल्याबरोबर मलिकंबरनें तह केला, क्षमा मागितली व तो मोंगलाचा मांडलिक बनला. इ० स० १६२४ त दक्षिणेचा कारभार आपल्या हातीं रहावा, म्हणून मलिकंबर व विजापूरचा इब्राहिम आदिल-

शहा यांनीं खटपट केली. त्यामुळें त्यांचें वांकडें येऊन कांहीं सरदारांची मदत घेऊन पुन्हां आपसांत लढाया झाल्या. मोंगल सेनापतीला यामुळें राग येऊन त्यानें मलिकंबरवर स्वारी केली. आरंभीं मलिकंबर घाबरला, विजापूरचा वेढा उठविला व आपलें राज्यांत तो गेला. तथापि मोंगल सैन्य त्याचा पाठलाग करीतच होतें. मोंगल सैन्य बेसावध पाहून मलिकंबरानें एक-दम छापा घातला व मोंगल सेनापती महमद लोदी याला ठार केलें. यानंतर विजापूरचे लष्करांत गडबड उडाली. बरेच अधिकारी कैदेंत पडले. अशा रीतीनें अपेक्षेबाहेर यशस्वी झाल्यामुळें कैद केलेलें सरदार दौलताबादेस पाठवून मलिकंबरानें अहमदनगरास वेढा देण्याचें ठरविलें; परंतु त्यांत यश येण्याचें चिन्ह दिसेना म्हणून त्यानें विजापुरावर व सोलापुरावर हल्ला करून तें सर्व राज्य हस्तगत केलें. वयाच्या ८० व्या वर्षी मलिकंबर अमरापूर येथें मरण पावला. सेनानायक या दृष्टीनें हा तर अत्यंत यशस्वी होता. परंतु जमीनमह-सुलाचे बाबतींत त्याची पद्धति चिरस्मरणीय होऊन राहिली आहे. मलिकंबर हा इ० स० १६२६ मध्यें मृत्यु पावला. त्याचे मरणानंतर निजामशाही राज्याचा कारभारी याचा मुलगा फत्तेखान झाला. निजामशाहानें मोंगलाशीं लढाई चालू ठेवली. मोंगलांचा सेनापति खानजहान यास पैसे देऊन वश करण्यांत आलें. त्यानें मोंगलांच्या ताब्यांत असलेला बराच मुलूख निजामशाही राजाला परत द्या असा हुकूम सोडला. पण अहमदनगरचा किल्लेदार सिवधारखानानें तो हुकूम नाकारला. सरतेशेवटीं खानजहानला बडतर्फ होऊन गोवळकोंड्याकडे पळून जावें लागलें. इ० स० १६२९ त २ रा मूर्तीझ निजामशाहा वयांत आला. याचें पहिलें काम म्हणजे फत्तेखानास कैदेंत टाकणें हें होय. राज्यकारभार चालविण्याचें सामर्थ्य याचे अंगीं नसल्यामुळें राज्यांत गोंधळ माजला व त्यामुळें परकीयांस शिरकाव करून घेणें सोईस्कर झालें. या सर्व संधींचा फायदा घेऊन शहाजहान स्वतः सैन्यासह दक्षिणेकडे निघाला. मूर्तीझनें लढाईची तयारी केली. पण बादशाही सैन्यापुढें त्याचा टिकाव लागेना. दोस्त राजे सोडून गेले, सैन्यांत फितुरी माजली व इ० स० १६२९ च्या दुष्काळानें कळसच केला. हजारों लोक मृत्यूमुखीं पडले, देश ओसाड झाला, व सुमारें ४० वर्षेपर्यंत सुधारणा होणें अशक्य झालें. ह्या संकटांत सांपडल्यामुळें मूर्तीझनें फत्तेखानास सोडलें; परंतु फत्तेखान हा मोंगलांस मिळाल्यामुळें व मूर्तीझ निजामखान व प्रमुख सरदारांचा त्यानें खून केल्यामुळें

स्वतः इ० स० १६३१ त राज्यकारभार हातीं घेतला. मोंगल बादशहाच्या सर्व अटी कबूल केल्यावर त्या पुन्हां मोडण्याचा प्रयत्न फत्तेखानानें केला. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. इ० स० १६३२ त दक्षिणचा कारभार मोहबतखानाकडे सोंपवून शहाजहान दिल्लीस गेला. इकडे मोहबतखानानें फत्तेखानास दौलताबादच्या किल्ल्यांत शरण यावयास भाग पाडलें. व इ० स० १६३२ मध्यें नामधारी राजास कैद करून ग्वालेर येथें ठेवण्यांत आलें. इ० स० १६३४ त मोहबतखानास परत बोलाविलें व तेव्हांपासून मोंगलांचा कारभार थोडा कमकुवत झाला. मोंगलाच्या स्वामित्वास कंटाळून शहाजी भोंसले यांनीं विजापूरच्या दरबारीं आश्रय मिळवून अहमदनगरचें राज्य पुन्हा संघटित केलें. ही बातमी शहाजहानास कळतांच तो दक्षिणेंत आला व निजामशाहीचा पाडाव करून विजापूरच्या राजास खंडणी देणें भाग पाडलें. शहाजीनें विजापूरच्या दरबारीं नोकरी धरावी असें ठरलें, व अशा रीतीनें इ० स० १६३६ मध्यें निजामशाहीचा शेवट झाला.

निजामशाहीमध्यें जेवढे बादशाहा झाले त्यांच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन केल्यास आपणांस असें दिसून येईल कीं, राज्य लयाला जाणाऱ्या कारणांची उत्पत्ती, राज्यांतील व्यवस्थेमध्यें व त्यांतील घडणाऱ्या गोष्टींमध्यें दिसून येतें. राजे लोकांचा नादानपणा, कमकुवतपणा, चैनबाजी, दुर्व्यसनें, राज्यांतील पक्ष, त्या जातींतील तंटे, बेबनाव व राज्याबद्दल लोभ असल्यामुळें, कत्तल, खून, कैदेंत पडणें अगर बंदिवान होणें व राज्यांतील सत्ता आपल्या हातीं असावी अशा रीतीनें राज्यांतील सरदारांना, दिवाणांस वाटणारा मोह व त्यायोगें मत्सर होऊन, प्रसंगोपात्त युद्धें होऊन मनुष्यवध करण्यापर्यंत पाळी येणें इत्यादि गोष्टींचा संबंध राज्याचा नाश करण्यास कारणीभूत होतो, व याची साक्ष इतिहास आपणांस प्रत्येक काळाला देत आहे, असें दिसून येईल. राज्यतृष्णा, वैभवाची हौस व आसुरी सत्ता या तीन रंगांनीं राजनीतीचें चित्र रेखाटलेलें असतें व तीन रंगाच्या होणाऱ्या संमिश्रणापासून अनर्थ, कत्तल, खून, कारागृहवास इत्यादि अन्यायकारक गोष्टींचे उग्र व भयंकर दिसणारे डाग या चित्रांत कुठे ना कुठें तरी पडलेले दिसतात. एका राज्याचें रूपांतर दुसऱ्या राज्यांत होतांना वरप्रमाणें कमीजास्त प्रसंग हे घडलेले असावयाचेच असें इतिहास आपली पुनरावृत्ति करून आपणांस बजावून सांगत आहे, असेंच इतिहासांच्या वाचकांना दिसून

येईल. ज्या कारणांनीं निजामशाही नष्ट झाली, त्याच कारणांनीं मराठेशाही, पेशवाई नष्ट झालेली आहे. इतकेंच नव्हें तर मोठमोठालीं राष्ट्रें देखील या कारणांचे अनर्थपरंपरेंतून सुटलीं नाहींत, असेंच आपणांस आढळून येईल. मुत्सद्दी, राजकारणी व सेनानी या लोकांच्या कांहीं काळ चकाकणाऱ्या यशाला याच कारणांचा कृष्ण डाग पडलेला दिसून येईल. तेव्हां निजामशाहीच इतिहासाच्या प्रखर कायद्याच्या अम्मलबजावणींतून कशी सुटली जाईल याचा वाचकांनीच विचार करावा.

प्रकरण ३ रें.

निजामशाहींतील सामाजिक परिस्थिति.

निजामशाहीच्या वेळेस सामाजिक स्थिति कशी होती याचा विचार प्रस्तुत प्रकरणांत करणें आहे. त्याकाळीं सध्यांच्याप्रमाणें वर्णाश्रमभेद असून, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अतिशूद्र असे पांच वर्णभेद होते. व्यापार व शेतकी ही जी वैश्यवृत्ती ती व्यापारी व शेतकरी या दोन वर्गांत वांटलेली होती. शेतकी धंदा वैश्यांनीं सोडून दिल्यामुळें तो **शूद्रांच्या** हातीं गेला व **कुणबी** म्हणून नवीन वर्ग अस्तित्वांत आला. त्या वर्गांतील लोक मोलमजुरीचीं क्षुद्र कर्में करुन कधीं वाणिज्यादि वैश्यकर्म करीत होते व कधीं शिपाईगिरीचें क्षात्रकर्म करीत होते. सैन्यांत जो सामान्य शिपायांचा भरणा होत असे, तो ह्या सुप्रज, बहुअज, कुणबी **उर्फ कुलपती** यांच्या वर्गांतूनच होत असे. मोसमांत शेतकाम करून बाकीच्या काळांत शिपाईगिरीवर पोट चालविण्याची धमक ह्या कुणबी लोकांत होती. जो जास्त पोटगी देईल त्याची शिपायगिरी करावयाची; मग तो धनी यवन असो कीं हिंदू असो, नवा असो वा जुना असो, देव फोडणारा असो कीं देव जोडणारा असो, शिपायगिरीची धामधूम करून लढाऊ राज्ययंत्राचा तो भाग होता. कशाकरतां लढावयाचें व कदाचित् लढून मरावयाचें तर केवळ पोटाकरतां अशांतलाच हा वर्ग होता. मराठ्यांत दोन धंदे करणारे लोक होते. देशमुख्या, पाटीलक्या, चौगुलक्या, मोकदमक्या, पटवाऱ्या, मोकाश्या वगैरे करणारा वृत्तिवंत मराठ्यांचा एक वर्ग व केवळ शेती-

वर निर्वाह करणारा गरीब मराठ्यांचा दुसरा वर्ग. हा दुसरा वर्ग आपणांला मराठा कुणबी म्हणवून घेत असे. मराठ्यांप्रमाणें ब्राह्मणहि हिंदूंच्या किंवा मुसलमानांच्या राज्यांत नोकरी करीत. ब्राह्मण मुत्सद्दी व मराठे सरदार दख्खनच्या मुसलमानी राज्यांत मोठमोठ्या अधिकारावर असत. मुलकीखातें सर्वस्वी ब्राह्मणांच्या ताब्यांत होतें म्हटलें तरी चालेल. एक भाऊ पातशाही नोकर तर दुसरा भाऊ शिवशाही नोकर असलीं उदाहरणें बरींच आढळतील. मुसलमान किंवा हिंदू धन्याची सेवा करण्यांत ते सारखेच राजी असत.

आतां मुसलमान समाजाबद्दल विचार करतां आपल्याला असें दिसून येईल कीं, इराण, तुराण, अरबस्थान व अफगाणिस्तान यांतून येणाऱ्या मुसलमानांना अस्सल समजत, व त्यांच्यापासून शूद्रातिशूद्र स्त्रियांच्या ठायीं झालेल्या मुसलमानांचा दुसरा वर्ग व बाटलेल्या लोकांचा तिसरा वर्ग असे यांच्यांत भेद होते. इराण, तुराण, अरबस्थान इकडून जे नवीन मुसलमान येत त्यांना परदेशी ही संज्ञा असे. व जे मुसलमान स्थाईक होऊन त्यांच्या कित्येक पिढ्या झाल्या होत्या त्यांना दक्षिणी किंवा दख्खनी असें म्हणत असत. ह्या दक्षिणी व परदेशी मुसलमानांतून निजामशाही व आदिलशाही राज्यांत मुत्सद्दी व लष्करी अंमलदार मिळत, व ह्यांच्याच कर्तबगारीवर राज्याची स्थिरस्थावरता अवलंबून असे. निजामशाही व आदिलशाही रियासतीच्या प्रारंभींच्या पन्नास शंभर वर्षांत दक्षिणी परदेशी असा भेद उद्‌भवला नव्हता. सर्वच मुसलमान परदेशी होते. पुढें जीं घराणीं ह्या देशांत पिढ्यान्‌पिढ्या कायम होऊन राहिलीं त्यांना दक्षिणी म्हणत असत. त्यांचे एथें कायमचे हितसंबंध निर्माण झाले आणि त्यांच्या हितसंबंधाची व पातशाही हितसंबंधाची तेढ पडूं लागली. ह्या तेढीला तोड म्हणून पातशाहा परदेशी नवीन मुसलमानांना आपल्या दरबारीं सदा बोलावीत असत. कारण नवीन लोकांचे हितसंबंध उद्भवले नसल्यामुळें कांहीं काळपर्यंत पातशाही हितसंबंधाशीं ते संलग्न झालेले असत. दक्षिणी व परदेशी असे हे दोन पक्ष एकमेकांचे विरुद्ध चालत व बादशहा आपल्या हाताखालील अंमलदारांना दाबांत ठेवण्याचा प्रयत्न करीत. मनुष्याला वागविण्याची करामत ज्या बादशहाला साजे त्याचे हातीं हा प्रयत्न फलप्रद होई. परंतु एकादा सुलतान कमअक्कल किंवा दुर्बल अथवा पोरसवदा असला म्हणजे हे दोन्ही पक्ष उर्मट होऊन सुलतानाच्या कह्यांत राहत नसत, व त्याच्यावर कुरघोडी करीत. अशा वेळीं एकच मार्ग उरे तो हा कीं, तिसरा पक्ष उभा करून दोन्ही पक्षांना

दाबांत ठेवावयाचें. मराठशाही यामुळेंच निर्माण झाली. शहाजी राजे यांच वेळेस दरबारांत दक्षिणी व परदेशी यांचें बंड ऐनरंगांत होतें. निजामशाही गादीवर मूर्तिजा हा तरुण, चैनी व कर्ता सुलतान होता. त्यानें मिरराजूचा त्रास असह्य झाला म्हणजे मलिकंबराची कांस धरावी. त्याला सोडून पुन्हा राजूची मनधरणी करावी. अशा रीतीनें त्यानें कित्येक वर्षे काढिल्यानंतर ह्या दोन्ही पक्षांच्या पीडेंतून मुक्त होण्याकरितां तिसरा एक पक्ष म्हणजे मराठ्यांचा पक्ष निर्माण झाला. मूर्तिजानें मालोजी भोंसले यास जवळ केलें व त्याच्या मुलाचें लग्न जाधवरावाच्या मुलीशीं लावून देण्यांत मूर्तिजाचें बरेंच अंग होतें. याच पक्षानें पुढें प्रबल होऊन दक्षिणेंत परत हिंदुपदपादशाही निर्माण केली.

प्रकरण ४ थें.

मराठेशाही.

निजामशाही राज्यांतील सामाजिक स्थिति वर्णन केली, त्यावेळेस मराठे हे निजामशाहींत नोकर म्हणून होते असें सांगितलेलें वाचकांना आठवत असेलच. लुकजी जाधव व इतर मराठे त्यावेळेस निजामशाहींत नोकर होते. परंतु ज्यांच्या योगानें मराठेशाही निर्माण झाली त्या मराठेशाहीचा मूळपुरुष मालोजी भोंसले यानें जेव्हां निजामशाहीकडे चाकरी पत्करली, त्यावेळेपासूनच तिचा उदय झाला असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. तेव्हां त्या मूळपुरुषापासूनच इतिहास सांगणें श्रेयस्कर होणार आहे. भोंसल्याचे मूळ पुरुष बाबाजी भोंसले वेरूळकर धरतात. इतर प्राचीन मराठे कुळांप्रमाणें भोंसले हेही, उत्तरेकडून आलेले रजपूत होत. भोंसले हे स्वतांस राजकुलोत्पन्न शिसोदे घराण्यांतील वंशज म्हणवून घेतात.

त्या काळच्या अंदाधुंदीमध्यें मालोजी हा पुणेंप्रांतांत भीमेच्या कांठीं फौजफाट्यासह राहून आपली सत्ता वाढवीत होता. निजामशहा व आदिलशहा यांच्या युद्धांत त्यानें निजामशहास मदत केल्यानें त्याला निजामशाहींत जहागीर मिळाली. नंतर शंकराची आराधना केल्यावरून मालोजीला मुलगा झाला. त्याचें नांव शहाजी . हा वेरूळ येथें जन्मला, व पुढें दोन वर्षांनीं दुसरा मुलगा झाला.

त्याचें नांव शरीफ असें ठेविलें. शाह व शरीफ हीं नांवें एका सिद्ध पुरुषाच्या नांवावरूनच ठेविलीं होतीं. शहाजीला पांचवें वर्ष लागलें असतां, मालोजी निजामशहाच्या आज्ञेनें आपलें सैन्य घेऊन इंदापुरच्या स्वारीवर गेला व तेथें शत्रु सैन्याशीं लढत असतां मरण पावला.

मालोजी मरण पावल्यानंतर विठोजीनें सर्व जहागिरीची व्यवस्था केली. शहाजी वयांत आल्यानंतर जाधवरावानें आपली मुलगी जिजाबाई हिचें लग्न शहाजीशीं केलें. त्याप्रमाणें विश्वासराजाची मुलगी दुर्गा हिचें लग्न शरीफजीशीं झालें, आणि हे दोघे भाऊ निजामशहाच्या पदरीं सरदारीचें काम करूं लागले. यानंतर विठोजी स्वर्गवासी झाला. शहाजीनें कारभार आपल्या हातीं घेतला तेव्हां शहाजी व शरीफजी आणि विठोजीचे आठ मुलगे (१ संभाजी, २ खेळोजी, ३ मालोजी, ४ मंबाजी, ५ नागोजी, ६ परसोजी, ७ त्र्यंबकजी, ८ कक्काजी) हे सर्व मलिकंबराच्या तंत्रानें वागत असत.

जाधव व भोंसले या घराण्यांत वितुष्ट येण्यास खालील प्रकार घडला. एकदां निजामशहास मुजरा करून जाधवराव आदिकरून सरदार आपापल्या घरीं परत जाण्यासाठीं घाईनें बाहेर पडत असतां दाराबाहेर एकच गर्दी झाली. ती मोडण्यासाठीं भालदारांनीं बरीच खटपट केली. परंतु हत्ती, घोडे, पालख्या इत्यादि वाहनांवरून जाणाऱ्या व पायीं जाणाऱ्या लोकांची गर्दी झाली, त्यांत खंडागळे नांवाच्या सरदाराचा हत्ती बेफाम होऊन अनेक लोकांना मारूं लागला. हें पाहून जाधवरावाचा मुलगा दत्ताजी यानें त्या हत्तीस शस्त्रांनीं जर्जर करून वठणीस आणिलें. तेव्हां विठोजीचे वडील मुलगे संभाजी व खेळोजी हें खंडागळ्याच्या मदतीस धावून आले. त्यामुळें भोंसले व जाधव यांच्यांत मारामारी जुंपून संभाजीच्या हातून दत्ताजी मारला गेला. यावेळीं जाधवराव बराच दूर गेलेला होता. परंतु आपला मुलगा दत्ताजी हा मारला गेला ही बातमी ऐकतांच तो परतला, आणि त्यानें आपल्या मुलास मारणाऱ्या भोंसल्याच्या सैन्यावर हल्ला केला. त्या मारामारींत जाधवरावाच्या हातून शहाजी जखमी झाला, व संभाजी ठार झाला. शेवटीं ही मारामारी निजामशहानें मध्यें पडून थांबविली. या प्रसंगीं जाधवरावांचें वागणें, अन्यायाचें होतें असें वाटून निजामशहानें जाधवरावाविषयीं कांहीं कपट योजिलें होतें. तें ओळखून जाधवराव निजामशाही सोडून दिल्लीकरांच्या आश्रयास गेला.

जाधवरावासारखा बलाढ्य सरदार निजामशाही सोडून गेला हें ऐकून आदिल-

शहास मोठा आनंद झाला. कारण निजामानें आदिलशहाचा अनेक वेळां पराभव केला होता. त्याचा सूड घेण्यास अनुकूल अशी परिस्थिति जाधवराव गेल्यामुळें निर्माण झाली. आदिलशहानें मोंगलाशीं तहाचें बोलणें लाविलें. मोंगलाच्याही मनांत निजामाविषयीं आढी होतीच. तेव्हां त्यांनीं आदिलशहाची बाजू पत्करली. अशा रीतीनें जहांगिरानें इब्राहिम आदिलशहाच्या मदतीस सैन्य पाठविल्यामुळें आदिलशहास निजाम कस्पटाप्रमाणें वाटूं लागला. मोंगलाचा सेनापति लष्करखान व आदिलशाही सैन्याचा मुल्लामहंमद हे निजामशाही मुलखावर चालून आले. पण मलिकंबराच्या हाताखालीं असणाऱ्या निजामशाही सैन्यानें मोठा पराक्रम करून शत्रूची दाणादाण उडवून दिली. या युद्धांत भोंसल्याची एका मोंगल सरदाराशीं गांठ पडली, व त्यांत शरीफजी ठार झाला. परंतु शहाजी वगैरेंनीं मोंगली सरदाराचा पराभव केला. व कित्येकांना कैद केलें. शेवटीं आदिलशाही व मोंगली सैन्यावर पुरा विजय मिळवून मलिकंबर व भोंसले मंडळी असे सर्व निजामशहाकडे मुजरा करण्यास गेले. या युद्धास भातवडीचें युद्ध असें म्हणतात, व या युद्धापासून खेळोजी वगैरे भाऊ व शहाजी यांच्यांत असणारी भाऊबंदकीची भावना स्पष्टपणें दिसून आली. व शहाजीच्या भावांनीं मलिकंबराचा आश्रय धरिला. त्यामुळें या दरबारांत राहणें सुरक्षितपणाचें नाहीं, असें पाहून शहाजी आपल्या जहागिरीकडे गेला. निजामशाहींतील मुत्सद्यांनीं त्याचें मन वळविलें परंतु व्यर्थ ! ही संधि साधून आदिलशहानें शहाजीस बोलाविलें व आपल्या पदरीं ठेविलें. शहाजीनें मलिकंबराचा व निजामशाही सैन्याचा पराभव केल्यामुळें आदिलशहा संतुष्ट झाला. शहाजीस मोठी जहागीर दिली. नंतर मुधोजी फलटणकर यानें बंड केलें होतें त्याचा शहाजीनें बंदोबस्त करून दाखविला. आणि कर्नाटक व केरळ प्रांत जिंकून इब्राहिम आदिलशहाच्या खजिन्यांत भर टाकिली.

शहाजी आदिलशाही दरबारांत असतां निजामशाही वजीर मलिकंबर व विजापूरचा बादशहा इब्राहिम हे दोघेहि मरण पावले. त्यानंतर विजापूरच्या गादीवर आलेला महमूदशहा गर्विष्ठ आहे व मलिकंबरच्या मागून निजामशाही दरबारांत कर्ता मुत्सद्दी नाहीं हें पाहून शहाजहानचें सैन्य दक्षिण काबीज करण्याच्या ईर्षेनें चालून आलें. अशा वेळीं निजामशाहीविषयीं शहाजीच्या अंतःकरणांत कळवळा आल्यामुळें तो विजापूर सोडून निघाला. त्याच वेळीं

जाधवराव मोंगलांची बाजू सोडून निजामाचे दरबारीं देवगिरी येथें येऊन पोहोंचला. या सुमारास विश्वासराजाच्या वंशांतील सिधोजीचा मुलगा विजयराज यानें आपली मुलगी जयंती ही शहाजीचा मुलगा संभाजी यास देऊं केली. शहाजीला देखील ही सोयरीक करणें इष्ट वाटलें. भोंसले व विश्वासराव यांच्या घराण्यांतील हा बेटीव्यवहार शिवनेरी किल्ल्यावर मोठ्या समारंभानें घडून आला. नंतर हा समारंभ आटोपल्यावर व्याह्यांच्या संमतीनें आपल्या गरोदर पत्नीस (जिजाबाईस) तेथें ठेऊन शहाजी दर्याखानावर स्वारी करण्यासाठीं गेला. नंतर शके १५५१ फाल्गुन वद्य ३ रोजीं शुभलग्नावर शिवाजीमहाराजांचा जन्म झाला. शिवनेरी किल्ल्यावर जन्म झाल्यामुळें मुलाचें नांव शिवाजी असें ठेविलें. दर्याखानाचा पराभव करून शहाजी शिवनेरीवर आला. तेथें पुत्रमुखावलोकन करून त्यानें आनंदानें मोठा दानधर्म केला.

जाधवराव निजामशाही वांचविण्याच्या हेतूनें देवगिरीस आला असून त्याच्याविषयीं भलतीच शंका घेण्यांत आली. दारूनें बेहोष बनलेल्या निजामास दुष्ट मंत्र्यानीं खोट्यानाटया गोष्टी सांगून भर दरबारांत जाधवरावांचा अपमान करविला. तेव्हां तो रागानें बेफाम झाला. अशा वेळीं हमीरखान वगैरे सेनापतींनीं त्याला घेरून ठार केलें. सासऱ्याची ही अवस्था ऐकून शहाजीनेंही निजामशाहीचा पक्ष सोडिला. इतर निजामशाही सरदारांना देखील हमीदखानाचें वागणें न पटल्यामुळें त्यांपैकीं कित्येक आदिलशहाकडे गेले, कित्येक मोंगलाकडे गेले, कित्येकांनीं बंडें उभारलीं, आणि कित्येक तटस्थ राहिले. या सुमारास मोठा दुष्काळ पडून लोकांना शेरभर रत्नें देऊन देखील शेरभर कुळीथ मिळण्याची मारामार पडूं लागली. अशा वेळीं मोंगलांच्या सैन्यानें दौलताबादेस वेढा दिला. हें पाहून आदिलशहानें दौलताबाद घेण्यासाठीं आपलें सैन्य पाठविलें.

यामुळें शहाजहानच्या व महमुदाच्या सैन्यांत दौलताबाद घेण्यासाठीं दररोज लढाई होऊं लागली. त्यांत मोंगलांनीं आदिलशाही सैन्याचा पराभव केल्यानें शेवटीं निजाम व त्याचा मंत्री फत्तेखान हे मोंगलाच्या हस्तगत झाले व निजामशाही राज्य बुडालें. अशा प्रकारें मोंगलांचें ठाणें दौलताबादेस बसलेलें पाहून आदिलशहास तेथून पाय काढावा लागला.

देवगिरी हस्तगत झाल्यामुळें मोंगलाचें सैन्य आनंदानें व विजापूरचें सैन्य

दुःखानें निजामशाही मुलुखांतून निघून गेल्यावर शहाजीनें शिवनेरीप्रभृति निजामशाही किल्ले आपल्या ताब्यांत घेतले. त्याचप्रमाणें गोदावरी, प्रवरा, भीमा यांच्या कांठचा व सह्याद्रिनजीकचा प्रदेश त्यानें हस्तगत केला. अशा रीतीनें दिल्लीपतीविरुद्ध शहाजीनें हा नवा डाव मांडलेला पाहून घाटगे, काटे, घोरपडे वगैरे अनेक मराठे सरदार त्याला मिळाले. तेव्हां हें नवें प्रस्थ वाढूं लागलेलें पाहून शहाजहानानें आदिलशहाशीं तह करून भीमानदी ही दोघांच्या राज्याची सरहद्द ठरविली. आणि शहाजी यावनी सैन्याविरुद्ध तीन वर्षें लढला. शेवटीं शहाजीनें आपला जहागिरीचा प्रदेश वगळून राहिलेल्या निजामशाही मुलुखांतील कांहीं भाग दिल्लीपतीस व कांहीं आदिलशहास दिला. मोंगल सैन्याचें सामर्थ्य बघून, आदिलशहास भय पडलें व त्यानें शहाजीस आपल्या पदरीं ठेवण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें शहाजी विजापुरकराकडे गेला.

फरादखानाचा मुलगा रणदुल्लाखान याच्याबरोबर शहाजी कर्नाटकच्या स्वारीस निघाला. तेथें विंदुपर वृषपत्तन, कावेरीपट्टण, श्रीरंगपट्टण, तंजावर, जिंजी, मदुरा, पीलगोंडा, विद्यानगर, हंसकूट येथील अनेक राजांना शहाजीनें जिंकिलें. तेव्हां किंपगौडापासून घेतलेलें बंगळूर शहर रणदुल्लानें शहाजीस बक्षीस दिलें. शहाजी बंगळुरास राहूं लागला. शहाजीस अनेक स्त्रिया असून त्याचें जिजाबाईवर अत्यंत प्रेम होतें, व शिवाजी हा मुलगा त्याला अतिशय आवडत होता. त्याच्या जन्मापासून शहाजीस जय व मोठें ऐश्वर्य प्राप्त होऊन तें वाढत चाललें होतें. शिवाजी ७ वर्षांचा झाला तेव्हां शहाजीनें त्याला लिहिणें, वाचणें शिकविण्यासाठीं गुरूच्या स्वाधीन केलें. शिवाजीस १२ वें वर्ष लागलें तेव्हां त्याबरोबर अमात्य, हत्ती, घोडे व विपुल द्रव्य देऊन, त्याची रवानगी पुणेंप्रांताकडे केली.

इकडे शहाजीनें सर्व कर्नाटक आपल्या ताब्यांत आणिला. कावेरीपट्टण, मदुरा, म्हैसूर येथील राजे शहाजीच्या अंकित झाले. रणदुल्लाखानानें पळवून लावलेल्या वीरभद्रास शहाजीनें पुन्हा अधिकारावर प्रस्थापित केलें. पुष्कळ राजांनीं शहाजीच्या प्रभावानें यवनांची भीति टाकिली. रणदुल्लाखान व विजापुराहून पाठविलेले सर्व सेनापति देखील शहाजीच्याच तंत्रानें वागूं लागले. तेव्हां महमूदशहानें शहाजीस कैद करण्यासाठीं मुस्तफाखानाची रवानगी केली. पुढें एके दिवशीं मध्यरात्रीं मुस्तफानें आपल्या सेनानायकांना एकांतांत बोलावून “ शहाजीस कैद करा असा आज मला महमूदशहानें निरोप पाठवून कळविलें आहे. त्याअर्थी आज

पहांटे तो उठण्यापूर्वी त्याला कैद केलें पाहिजे " असें सांगितलें. त्याप्रमाणें पहांटे मुस्तफाखानाच्या सैन्यानें शहाजीच्या शिबिराभोंवती वेढा दिला. सर्व लोक निजले आहेत अशा स्थितींत घोरपडे, मालोजी पवार वगैरे विजापूरचे सरदार शहाजीच्या शिबिरांत शिरले. खंडोजी पाटील हा घोरपडे याच्या हातून मारला गेला. नंतर शहाजी बराच वेळ लढून थकल्यानंतर मूर्च्छित झाला, व त्यास बाजी घोरपड्यानें कैद केलें. मुस्तफाखानानें शहाजीस विश्वास पटावा म्हणून आपला मुलगा आतबखान याची शपथ घेतली होती, व कुराणही उचलिलें होतें. तरी शेवटीं विश्वासघात केला.

शहाजीस कैद केल्यानंतर बंगळूर घेण्यासाठीं संभाजीवर तानाजी डुरे, विठ्ठल गोपाळ व फरादखान यांची मुस्तफानें रवानगी केली. आणि शिवाजीवर महमूद-शहानें फत्तेखान, अश्रफशहा, बाजी निंबाळकर वगैरे सरदार पाठविले होते. त्यांनीं बेलसरगांव हस्तगत करून तेथें तळ दिला. त्याचप्रमाणें हैबतरावाचा मुलगा बल्लाळ यानें शिरवळ गांठिलें. विजापूरकरांच्या हालचाली पाहून शिवाजीनें पुरंदरगडावर लढण्याची तयारी केली.

फत्तेखान व बल्लाळ हे विजापूरकरांतर्फे सैन्य घेऊन आले तेव्हां शिवाजीमहाराजांनीं प्रथम शिरवळ येथें आणि नंतर पुरंदर येथें शत्रूशीं तोंड देण्याचें ठरविलें. जगताप, वाघ, काटे, इंगळे वगैरे सरदारांना कावजीच्या हाताखालीं देऊन त्यांनीं शिरवळास पाठविलें. कावजीनें शिरवळावर हल्ला करून बल्लाळाच्या सैन्याचा धुव्वा उडविला. बल्लाळास रणांगणांत ठार केलें आणि शत्रुसैन्यास लुटून तो परत पुरंदरास आला. बल्लाळ ठार झाल्याचें ऐकुन फत्तेखान व मुसेखान हे पुरंदरावर चालून गेले. परंतु हें सैन्य गड चढून जाऊं लागलें तेव्हां जी मारामारी झाली तिच्यांत मुसेखान ठार झाला. व फत्तेखानावरही रणांगणांतून पळून जाऊन जीव वांचविण्याची पाळी आली. त्याचप्रमाणें संभाजीकडून फरादखानाचा बंगळूराकडे पराभव झाला. हें पाहून महंमूदशहानें सिंहगड व बंगळूर हे दोन किल्ले शहाजीनें द्यावेत या अटीवर शहाजीस कैदेतून मुक्त केलें. सिंहगडासारखा महत्त्वाचा किल्ला द्यावा लागला म्हणून शिवाजीमहाराजांनीं चिडून जाऊन विजापूरकरावर चालून जाण्याचा विचार केला होता. परंतु सोनोपंत नांवाचा मंत्री त्यांना म्हणाला , पित्याची सुटका होण्यासाठीं एकादा गड द्यावा लागला तरी सौदा महाग पडला

असें वाटण्याचें कारण नाहीं. किल्ल्याचा स्वामी अजिंक्य असणें ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे.'

यानंतर दंडाराजापूरच्या हबशाशीं शिवाजीमहाराजांना मारामारी करावी लागली. त्यावेळीं महमूदशहानें हबशाचा पाठपुरावा केला. पुढें चंद्रराव मोऱ्यांस जिंकून जावळी पूर्णपणें ताब्यांत घेतली. तेव्हां प्रतापराव मोरे हा विजापूरकराच्या आश्रयास जाऊन राहिला. महमूदाच्या मृत्यूनंतर औरंगजेबानें विजापूरकरांचा जो मुलूख हस्तगत केला होता, त्यांत शिवाजीमहाराजांनीं ढवळाढवळ केली. व विजापूरकरांच्या राज्यांत धुमाकूळ माजविला. मोंगलाच्या राज्यांतीलही कित्येक गांव घेऊन त्यांनीं अहमदनगरचें शासन केलें. सारांश, निजामशाही राज्य मोंगलांनीं बुडविलें होतें तें शिवाजीमहाराज आपल्या ताब्यांत घेणार असा रंग दिसूं लागला. तेव्हां अल्ली आदिलशहानें महाराजांच्या राज्यावर स्वारी करण्याचा व त्यांना जिवंत पकडून आणण्याचा हुकूम सोडला. अफझुलखानानें 'शिवाजीला पक्केपणीं बांधून तुमच्यापुढें आणितों' अशी प्रतिज्ञा केली. अफझुलखानाबरोबर अंबर, याकूत, मुसेखान, हसन, रणदुल्लाखान, अंकुशखान, हिलाल वगैरे मुसलमान सरदार व घोरपडे, पांढरे, खराटे, यादव, मवाजी भोसले, घाटगे, काटे वगैरे मराठे सरदार होते. शिवाजीमहाराज पुणेंप्रांतीं होते व जावळी घेतल्यावेळीं चंद्रराजाच्या सर्व नातेवाईकांना त्यांनीं कापून काढिलें, तेव्हां चंद्ररावाचा भाऊ प्रतापराव हा आदिलशहाकडे पळून गेला होता. खानाचा विचार प्रथम जावळी घेण्याचा होता म्हणून तो वांईकडे आला. महाराजही स्वतः पायदळासह जावळीस आले. खानानें निरोप पाठविला कीं, "हे राजा, तूं तह करून सिंहगड, लोहगड, पुरंदर, चाकण व नीरा भीमा यांमधील प्रदेश दिल्लीश्वरास दे व जावळी आदिलशहास दे." महाराजांनीं निरोप पाठविला कीं, 'आपण मागत आहां ते किल्ले व जावळी देखील मी देतों. आपण येथें आल्यास मी निःशंक होऊन माझी तलवार आपणापुढें करीन.' अफझुलखानाच्या सल्लागारांनीं महाराजांवर विश्वास ठेवण्यास सांगितलें महाराजांनीं आपल्या सेनापतीला शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन राहण्यास सांगितलें. दुंदुभीचा ध्वनी होतांच खानाची सेना कापून काढावी असें सांगितलें. अफझुलखानाचा विचार महाराजांना गुप्त कट्यारीच्या सहाय्यानें ठार मारण्याचा होता. म्हणून त्यानें आपल्याबरोबर गुप्त कट्यार घेतली होती व ती महाराजांच्या

पोटांत खुपसण्याचा त्याचा विचार होता. नंतर भेटीसंबंधानें दोघांत करार ठरला होता तो असा.— " आपलें सैन्य तळावर आहे तेथेंच ठेवून एकट्या अफझुलखानानें स्वतां सशस्त्र निघावें आणि पालखींत बसून पुढें यावें. त्यांच्या सेवेसाठीं २।३ सेवक असावेत. त्यानें प्रतापगडच्या पायथ्याजवळ स्वतां येऊन सभामंडपांत वाट पहात राहावें. आणि शिवाजीनें सशस्त्र येऊन त्या पाहुण्याचा यथाविधी आदरसत्कार करावा. दोघांच्याही रक्षणार्थ १०।१० सैनिकांनीं बाणाच्या टप्यावर येऊन मागें उभें राहावें आणि दोघांनींही भेटल्यावर गुप्त बोलणें करावें " खानानें महाराजांना विश्वास वाटावा म्हणून आपली तलवार सेवकाच्या हातीं दिली, व स्नेहाचा आव आणून म्हणाला ' मी तुला मोठें वैभव मिळवून देतों, तूं भीति टाकून मला आलिंगन दे. ' असें म्हणून त्यानें महाराजांची मान डाव्या हातानें धरून उजव्या हातानें कुशींत कट्यार खुपसली. तेव्हां महाराजांनीं तो वार चुकवून आपल्या तलवारीचें टोंक त्याच्या पोटांत खुपसलें. त्याच्या सेवकांनीं महाराजांवर तलवारीचा वार केला परंतु तो वार अडवून दुसऱ्या हातांतील पट्ट्यानें खानाच्या डोक्याचीं दोन शकलें केलीं. त्याबरोबर गडावर विजयसूचक दुंदुभिध्वनि झाला. तो ऐकून शिवरायाच्या सैन्यानें शत्रुसैन्यास चोहोंकडून घेरिलें तेव्हां खानाचें सैन्य सैरावैरा पळूं लागलें. मुसेखानानें त्या सैन्यास थोपवून धरून कांहीं वेळ युद्ध चालविलें परंतु शेवटीं त्याला पळ काढावा लागला. खानाचा वडील मुलगा आपल्या घाबरलेल्या दोन भावांना सोडून वेषांतर करून पळून गेला. मंबाजी भोंसले लढतां लढतां ठार झाला. रणदुल्लाचा पाडाव झाला. अंबरखान शरण आला व राजाजी घाटगे कैद झाला. शत्रूकडील अनेक लोक कैद झाले. व मराठ्यांना मोठी लूट मिळाली.

यावेळीं मराठ्यांच्या सेनापतीनें शत्रूचे प्रांत हस्तगत केले, व नगरें उध्वस्त केलीं. खानानेंही आपले सरदार पाठवून मराठ्यांच्या राज्यांत दंगा उडविला होता. जाधवानें सुपेंप्रांत, घांडरे यांनीं शिरवळ, खराड्यांनीं सासवड, हिलालानें पुणें-प्रांत, आणि सैफखानानें तळ कोंकण हें प्रांत घेतलें. तेव्हां ह्यांना घालवून देण्यासाठीं नेताजी परत स्वराज्यांत आला. खान मारला गेल्यावर नेताजी पालकरानें वांईवर हल्ला केला. नंतर चंदन वंदन वगैरे किल्ले घेतले. खटाव, औदुंबर, पाली, कऱ्हाड, कोल्हापूर वगैरे गांवावर हल्ले करून पुष्कळ खंडणी वसूल केली. पन्हाळ्यास अचानक वेढा देऊन तोही हस्तगत केला.

खान मारला गेल्यावर आदिलशहानें फरादखानाचा नातू रुस्तुमजमान यास सेनापतित्व देऊन विजापुराहून पाठविलें. शिवाजीमहाराजांनीं थोडेसें सैन्य पन्हाळ्याच्या रक्षणार्थ ठेवून रुस्तुमजखानाशीं लढण्यास निघाले. दोन्हीं सैन्यें निकरानें लढलीं. शेवटीं फाजलानें पळ काढण्यास सुरवात केली. रुस्तुमनें आपलें शस्त्र टाकिलें. तेव्हां विजापुरी सैन्य गोंधळून गेलें. रुस्तुम पळून गेला. या युद्धांत कित्येक हत्ती मराठ्यांना सांपडले.

रुस्तुमजमानाचा पराभव झाल्यानंतर नेताजीनें महाराजांच्या आज्ञेवरून कवठें, मिरज, कागल, रायबाग, अथणी, तिकोटें वगैरे मुलूख उध्वस्त केला. या अडचणीचे वेळीं विजापूरकरांनीं दिल्लीकरांची मदत मागितली. परंतु मोंगलांचें सैन्य लौकर येऊन पोहोंचलें नाहीं. यामुळें आदिलशहानें कर्नूलचा अधिपति शिद्दी जौहर यास बोलावून महाराजांना पकडण्यासाठीं पन्हाळ्याकडे पाठविलें. रुस्तुम व फाजल हेंही त्याला मिळाले. सर्वांनीं मिळून पन्हाळ्यास चोहोंकडून वेढा दिला. स्वतः जौहर वगैरे किल्ल्याच्या पूर्वेस, घोरपडे वगैरे पश्चिमेस व इतरांनीं दक्षिणोत्तर आपापलीं सैन्यें ठेविलीं. कित्येक महिनेपर्यंत जौहर लढला पण त्याला यश आलें नाहीं. विजापूरकरांच्या विनंतिवरून औरंगजेबानें आपला मामा शास्ताखान यास दौलताबाद येथील आपल्या सैन्यासह मराठ्यावर चालून जाण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यांनीं भीमा नदी गांठली. या सैन्यांत पठाण सरदार कारतलबखान, रजपूत राजे, गौड राजे, शिसोदे, भोंसले, काकडे, खंडागळे, पवार, उदारामाची बायको रायबागीण, घाटगे, गाढवे, कोकाटे वगैरे सरदार होते. या सैन्यानें मुलूख उध्वस्त करून चाकण किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां आसपासचे लोक घाबरले; व्यापारी पळाले; सासवड लुटलें गेलें; सुप्यास वेढा पडला. शत्रूनें पुणें घेऊन इंदापुरही काबीज केलें. अशा प्रकारें मराठी राज्यावर मोठा प्रसंग गुदरला.

यावेळीं जिजाबाईचा मुक्काम राजगडास होता. नेताजी पालकर व हिलाल यांनीं विजापूरजवळचें शहापूर जाळलें आणि शत्रूस पराभूत करून ते शिवपट्टणास आले. जिजाबाईनें त्यांना उपरोधिक भाषण केल्यानंतर नेताजीनें उत्तर केलें कीं, 'आम्हीं महाराजांच्याच आज्ञेवरून विजापुराकडे गेलों होतों, आतां मोंगलाशीं युद्ध करण्यासाठीं परत आलों आहोंत. पण आतां येथील सैनिक मोंगलाशीं लढतील, आम्हीं जौहराशीं लढण्यास जातों.'

नेताजी व हिलाल पन्हाळ्याकडे येत आहेत असें पाहातांच जोहरानें आपलें सैन्य त्यांच्यावर पाठविलें. त्यांत हिलालाच्या मुलाला शत्रूनें कैद केलें. ही बातमी समजतांच त्यांना जोहाराचा फार संताप आला. महाराजांना यावेळीं तुळजाभवानीचें दर्शन झालें. तिच्या आज्ञेनुसार महाराजांनीं त्र्यंबक भास्कर यास सांगितलें कीं, मी मोंगलांशीं लढण्यास जातों हा गड तुझे हाताखालीं असूं दे. याप्रमाणें सांगितल्यावर महाराज रात्रीचे पहिले प्रहरीं पन्हाळ्याहून पालखींत बसून निघाले. त्यांचे मागून ६०० लोक गेले. महाराज जवळून गेले तरी शत्रूस समजलें नाहीं, व ते विशाळगडास पोहोंचले. महाराज गेल्याची बातमी शिद्दीस लागतांच त्यानें मसूदखानास त्यांचा पाठलाग करण्याचा हुकूम दिला. मसूद, पालीचा जसवंतराव, आणि शृंगारपुरचा सूर्याजीराव यांनीं महाराजांना अडविण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण उपयोग झाला नाहीं. उलट मराठ्यांच्या सैन्याचा मारा सहन न झाल्यामुळें त्यांच्या सैन्याची पांगापांग झाली. व स्वतः मसुदास मराठ्यांनीं सोडलें म्हणून तो जीव घेऊन परत जाऊं शकला.

मसूद परत गेल्यानंतर महाराज विशाळगडाहून निघून राजगडास गेले व जिजाबाईस भेटले. तेथून त्यांनीं त्रिंबक भास्कर यांस निरोप पाठविला कीं, ' किल्ला आदिलशहाच्या स्वाधीन कर, आणि तूं निघून ये. ' त्याप्रमाणें त्यांनीं पन्हाळा आदिलशहास देऊन टाकिला. त्र्यंबक भास्कर आपलें सर्व सैन्य घेऊन सुरक्षितपणें राजगडास आला. इकडे आदिलशहाला जोहराच्या वर्तनाचा संशय आला, व त्यानें त्याला निरोप पाठविला कीं, शिवाजी राजे यांनीं तुला दिलेलं धन दे नाहींतर माझ्या हातून तुझा नाश होईल. ' या निरोपास जौहर भ्याला नाहीं. त्यानें आदिलशहाशीं युद्ध आरंभिलें. परंतु त्याला पिछेहाट करावी लागली. तो कर्नूलास गेला. तेथें आदिलशहानें त्याला युक्तीनें विषप्रयोग करविला, व त्यामुळें जौहर मरण पावला.

महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यांत सांपडले या संधीचा फायदा घेऊन शास्ताखानानें संग्रामदुर्गासह चाकण शहर ताब्यांत घेतलें व पुण्यापर्यंतचा मुलूख हस्तगत केला. महाराजांनीं यावेळेस ' पैसा मिळविणें व मोंगलाचा सह्याद्रि उतरण्याचा मार्ग बंद करणें ' या दोन गोष्टी करण्याचें ठरविलें. शास्ताखानानें पुण्यास ठाणें दिलें. कारतलबखान नांवाच्या सरदारास सह्याद्रि उतरून चौल, कल्याण

भिवंडी, पनवेल, नागोठाणें वगैरे स्थळें हस्तगत करण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणें हें सैन्य लोहगडच्या दक्षिणोत्तर मार्गानें सह्याद्रि उतरूं लागलें. मोंगलसैन्य घाऊलवाटेनें जात असतां मराठ्यांचें सैन्य डोंगराच्या पायथ्याशीं होतें. परंतु दाट झाडी असल्यामुळें मराठ्यांचें सैन्य मोंगलांना दिसलें नाहीं. यामुळें मोंगलीसैन्य सह्याद्रीच्या कडयावरून बरेंच दूर चालून आलें. व आयतेंच मराठ्यांच्या कोंडींत सांपडलें. कारतलबाचें सैन्य 'उंबरखिंडी'शीं येतांच, मराठ्यांनीं आपल्या रणभेरी वाजविल्या व पुढें येऊन मोंगली सैन्यांतील बरेच लोक मारिले. मोंगली सैन्याचा धीर खचला. उन्हाचा ताप असह्य झाला. या वेळेस रायबागीण म्हणाली ' शिवाजीस शरण जाणें ' हा एकच मार्ग जीव वांचविण्यास मोकळा आहे. ' हें तिचें बोलणें कारतलबखानास सयुक्तिक वाटलें. त्यानें निरोप पाठविला कीं, ' आम्हीं तुमच्या प्रांतांत शिरलों ही आमची चूक झाली. आम्हांस जीवदान द्यावें. आपले वडील शहाजीराजे यांचा मजवर अतिशय लोभ होता. पण तो विसरून भलत्याची नौकरी पतकरली, हें वाईट केलें. आम्हीं तुम्हांस शरण आलों आहों.' महाराजांनीं त्यांच्या विनंतीस मान देऊन त्याच्या सैन्यास निघून जाण्याची परवानगी दिली व कारतलबानेंही महाराजांकडे खंडणी पाठविली. मोंगल मोठया कष्टानें व घाईघाईनें निघून गेले. तेव्हां पुष्कळ द्रव्य, हत्ती, घोडे, सोन्यारुप्याचीं भांडीं वगैरे बहुमोल लूट मराठ्यांस मिळाली.

मोंगलाचें सैन्य पराभूत होऊन गेलें तरी तें परत येण्याचा संभव असल्यामुळें त्यांना अडविण्यासाठीं त्या ठिकाणीं सैन्य ठेवून महाराज कोंकण प्रांतावर चालून गेले. त्यांचें सैन्य पाहतांच पुष्कळ गांवच्या अधिकाऱ्यांनीं आपण होऊन मराठ्यांचें स्वामित्व मान्य केलें. दाभोळ बंदर घेतल्यामुळें पालीचा राजा भयभीत होऊन शृंगारपूरच्या राजाच्या आश्रयास गेला. शृंगारपूरचा सूर्यराव व पालीचा जसवंत यांच्याविषयीं महाराजांना फारसें वाईट वाटलें नाहीं. कारण ते दोघे आदिलशहाचे मांडलिक होते. नंतर महाराजांनीं चिपळूणास परशुरामाचें दर्शन घेऊन संगमेश्वर व देवरुख हीं गावें ताब्यांत घेण्याचें काम नीळकंठरावाचा मुलगा (पिलाजी निळकंठ) व तानाजी मालुसरे यांजकडे सोपविलें. संगमेश्वरास गेलेल्या या मराठ्यांच्या सैन्याशीं भांडण उकरून काढूं नये असा निरोप प्रभावळीच्या राजाकडे शिवाजीमहाराजांनीं पाठविला. राजापूर येथें

अनेक फिरंगी व्यापारी होते. त्यांच्यापासून व इतर व्यापाऱ्यांपासून अनेक प्रकारची संपत्ति खंडणी म्हणून महाराजांना मिळाली. मराठ्यांचा बंदोबस्त करण्याचें काम आदिलशहानें सूर्याजीरावाकडे दिलें. यामुळें त्यानें मराठ्यांच्या सैन्यास अचानक वेढा दिला. मराठ्यांचा सेनापति पिलाजी निळकंठ पळून जाण्याच्या विचारांत होता, हें पाहून तानाजी मालुसऱ्यानें त्याचा धिःकार केला व त्याला दोरखंडांनीं दगडाला बांधून ठेवून सूर्याजीरावाच्या सैन्यावर मोठ्या आवेशानें हल्ला चढविला. आणि सकाळ होण्यापूर्वी शत्रु–सैन्याची दाणादाण उडवून दिली. ही बातमी समजतांच सूर्य-रावाच्या उद्धटपणाचा महाराजांना राग आला. त्यांनीं असें कळविलें कीं, 'तुम्ही अक्षम्य अपराध केला आहे. तथापि तुम्ही भेटीस या म्हणजे अभयदान मिळेल. आला नाहीं तर पालीच्या राजाच्या सारखी तुमची स्थिति होईल?' हें ऐकून सूर्यरावानें भेटीस जाण्याचें कबूल केलें. पुढें महाराजांनीं पालीचें राज्य जिंकून तेथील लोकांना अभयदान दिलें. चिरदुर्गाभोंवतीं तट बांधून मंडनगड हें नांव गडास दिलें. तरीही शृंगारपूरचा राजा भेटीस आला नाहीं. यामुळें त्याच्या राज्यावर चालून जाण्यावांचून महाराजांना गत्यंतर राहिलें नाहीं. सूर्यरावावर चालून जाण्याच्या कामीं इतकी चालढकल करण्याचें कारण असें होतें कीं, जाव-ळीचें राज्य महाराजांनीं घेतलें तेव्हां प्रभानवल्लीच्या सूर्य राजानें त्यांच्याकडे गुप्तपणें मी तुमचा क्रीतपुत्र आहे असा निरोप पाठवून अभयवचन घेतलें होतें. तेव्हांपासून त्यानें कित्येकवेळां महाराजांना मदतही केली होती. परंतु पुढें त्याची बुद्धि फिरली व तो महाराजांच्या भेटीस आला नाहीं. तेव्हां महाराज १५ हजार सैन्य घेऊन एकाएकीं प्रभानवल्लीवर चाल करण्यास निघाले. ते सार-वरापर्यंत येऊन पोहोंचले. हें ऐकून सूर्यराव पळून गेला. यावेळीं त्यास पळून जाण्याचें कारण असें होतें कीं, त्याचेंजवळ सैन्य नव्हतें व त्याच्या कल्पनेबाहेर गोष्टी घडल्या. महाराज सैन्यासह शृंगारपुरांत शिरले. नंतर सर्वच प्रभानवल्ली प्रांत हस्तगत करून त्यावर त्र्यंबक भास्कर याची नेमणूक महाराजांनीं केली. आणि शृंगारपुराजवळ असलेल्या गडास प्रतीतगड असें नांव दिलें.

इ० स० १६५० त शिवाजीमहाराजांनीं अहमदनगर जिल्ह्यांतील देशमुख वतनावर आपला हक्क आहे अशी मागणी केली यावेळीं औरंगजेब याला अह-मदनगरचे सुभेदार नेमलें होतें. त्याचें राहावयाचें ठिकाण खडकी होतें. पुढें या शहराला त्यानें औरंगाबाद असें नांव दिलें. आपला हक्क शाबीत करण्या-

करतां शिवाजीनें अहमदनगरावर १६५७ त स्वारी केली व १६६२ च्या पावसाळ्यांत शिवाजीनें जुन्नरच्या उत्तरेकडील कांहीं किल्ले हस्तगत केले. नंतर नेताजी पालकरानें मोंगल राज्यांत बरीच लुटालूट केली. इ० स० १६६३ मध्यें शाइस्तेखानास त्याच्या बंदोबस्ताकरितां नेमिलें. नेताजीचा पाठलाग झाला पण तो विजापूरकरांच्या मदतीनें सुरक्षितपणें निसटला. इ० स० १६६४ त व १६६५ त नेताजीनें पुनः लुटालूट केली, व शिवाजीनें इ० स० १६६५ त अहमदनगर लुटून औरंगाबादेवर हल्ला चढविला.

इ० स० १६७१ त औंढा व पट्टा हे किल्ले शिवाजीचा मुख्य प्रधान मोरोपंत यानें घेतले. परंतु मोंगलांचा सेनापति मोहबतखान यानें हे किल्ले लगेच पावसाळ्यांत परत घेऊन इतर तऱ्हेनें मराठ्यांशीं लढण्यास सुरवात केली. स्वतां सुभेदारांनीं मराठे घोडेस्वारांचा पाठलाग केला व पेडगांवनजीक बहादूरगड नांवाचा किल्ला बांधिला. इ. स. १६७५ त मोंगलांनीं पुरदरच्या तहांतील अटी मोडल्यामुळें औंढा व पट्टा हे किल्ले परत घेण्यांत येऊन बऱ्हाणपुरापर्यंत मराठे लोकांनीं लुटालूट चालविली. हंबीरराव व शिवाजी यांचें मोंगल प्रदेशांत स्वाऱ्या करण्याचें काम चालू होतें. विजापुरास मोंगलांनीं वेढा दिला. तो उठविण्याचें कामीं शिवाजीनें मदत केली. परंतु त्यांत यशाचें चिन्ह दिसेना, तेव्हां एकदम मोंगलप्रांतावर स्वारी केली. लूट घेऊन पट्टा किल्ल्याकडे जात असतां संगमनेरनजीक रणमस्तखानानें शिवाजीस अडविलें. परंतु जातीनें अत्यंत शौर्यानें लढून शिवाजी त्या कठीण प्रसंगांतून निभावला. पुढें लवकरच दुसरें एक मोंगल सैन्य त्याला भेटलें. परंतु एका वाटाड्यानें जवळची एक खिंड दाखवून शिवाजीस पट्टा किल्ल्यावर पोहोंचविलें. तेव्हांपासून या किल्ल्यास विश्रामगड असें नांव मिळालें. मोंगलसैन्य औरंगाबादेस परतलें. इकडे शिवाजीनें पट्टानजीकचे २७ किल्ले घेऊन मोरोपंताकडे कुमक पाठविली, व आपण पट्टा किल्ल्यांत राहिला.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराज वारल्यानंतर इ० स० १६८४ मध्यें दक्षिणेंत जिझिया कर औरंगजेबानें बसविला. पावसाळ्यानंतर त्याच वर्षी औरंगजेब औरंगाबादेहून अहमदनगरास नेहमींपेक्षां अधिक थाटानें लवाजम्यासह निघाला. हत्ती, घोडे, उंट, तंबू, चैनीचें साहित्य वगैरेवर खर्च इतका होत असे कीं, लष्करी किंवा इतर राजकीय दृष्ट्या आवश्यक अशा बाबीकरितां खर्च करणें अडचणीचें होऊं लागलें. स्वतां जरी थाटमाटाच्या विरुद्ध असला तरी लोकांचे मनावर परिणाम

व्हावा म्हणून औरंगजेब अशी उधळपट्टी करावयास अप्रत्यक्ष परवानगी देत असे. शिवाजीमहाराजानंतरचीं शेवटचीं १५ वर्षें म्हणजे १७ व्या शतकांतील शेवटचीं वर्षें, अहमदनगर राज्यांतील प्रदेशांत मराठ्यांनीं खूप लुटालूट केली. गंगथडीवरील प्रदेशांत चौथाई व सरदेशमुखीची मागणी होत असे. क्वचित् ठिकाणीं घासदाणा वसूल केला जाई. हैबतराव, धनाजी जाधव आणि घोरपडे हे या कामांत प्रमुख होते. महाराजांच्या मरणानंतर संभाजीमहाराजांनीं मराठी राज्याकरितां केलेला अपूर्व स्वार्थत्याग म्हणजेच महाराष्ट्राच्या सुंदर वृक्षाला, त्यांनीं आपल्या देहाच्या रक्तजलाच्या सिंचनानें, कांहीं वेळ, थोरल्या महाराजांनीं लावलेल्या स्वराज्य-वृक्षाला दिव्यशक्तीनें फोफावयास लावलें खास ! परंतु राजाराममहाराजांची कारकीर्द म्हणजे मराठी इतिहासांतील बेबंदशाहीचा इतिहास होय. त्याच वेळीं मराठे सरदारांत पडलेली फूट, आपसांतील वैमनस्य व राजघराण्यांतील पक्ष या सर्व आपत्तींनीं मोंगल आमदानीच्या प्रचंड वृक्षाच्या पडण्याबरोबरच, महाराष्ट्रांतील स्वराज्यवृक्षास त्या मोठया वृक्षाचा आघात होऊन, स्वराज्यवृक्षांतील जोर व सत्त्व कमी झालें खास !

इ० स० १७०६ मध्यें झुल्फिकारखानाच्या नेतृत्वाखालीं सिंहगडापासून अहमदनगरकडे जाणाऱ्या सैन्यावर मराठे हल्ला करूं लागले. मोंगलसैन्य इतक्या कचाट्यांत सांपडलें कीं, जर मराठ्यांनीं त्यांना मिळालेल्या संधीचा योग्य उपयोग केला असतां तर औरंगजेबास कैद करतां आलें असतें. अहमदनगर येथें छावणी घालतांना औरंगजेब म्हणाला, “ माझ्या स्वाऱ्या संपल्या; हा माझा शेवटचा ऐहिक प्रवास संपला ! ” वयाच्या ८९ व्या वर्षी ता. २१ फेब्रुवारी १७०७ या दिवशीं औरंगजेबानें देह ठेविला. व त्याच वेळेस दिल्लीच्या मोंगल पादशाहीचा चकाकणारा राजमुगूट निस्तेज होऊन मोंगली सत्ता वैधव्यांत सांपडली असें म्हणावयास हरकत नाहीं. औरंगजेबानंतर जरी दुसरे राजे गादीवर बसले, तथापि त्यांची कारकीर्द म्हणजे वैधव्यांत सांपडलेल्या विधवेच्या राहिलेल्या आयुष्याच्या इतिहासाप्रमाणें होय.

शाहू हा औरंगजेबाच्याजवळ होता. त्याचें त्यानें प्रेमानें व काळजीनें संगोपन केलें होतें. मरणापूर्वी औरंगजेबानें त्याला शिवाजीची भवानी तलवार व नेवासाप्रांत आंदण म्हणून दिला. आपण तोतये नाहींत हें सिद्ध करण्याकरितां तो सैन्य घेऊन निघाला. परंतु ताराबाईची बाजू घेऊन धनाजी व पंतप्रतिनिधी

यांनीं शाहूला विरोध केला. एका खेड्यानें शाहूच्या फौजेवर हल्ला केला. त्यावर शाहूनें खेड्यांतील लोकांना चांगलीच तंबी दिली. हें चालू असतांना एका बाईनें आपला मुलगा शाहूच्या सेवेस अर्पण केला. त्याला आपल्या मुलाप्रमाणें शाहूनें वाढविलें. हाच मुलगा अक्कलकोटचें घराणें स्थापन करणारा फत्तेसिंग होय.

औरंगजेबाच्या मरणानंतर झालेल्या अंत:कलहामुळें मोंगलाची दक्षिणेंतील सत्ता कमकुवत झाली. दाऊदखान व खंडेराव दाभाडे, यांच्याशीं खानदेश व अहमदनगरनजीक मोंगलांना लढावें लागलें. मोगलांचा जवळजवळ पराभव झाला. शेवटीं इ० स० १७२० त बाळाजी विश्वनाथाच्या कर्तृत्वामुळें दक्षिणेंत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार मराठ्यांना मिळाला. अशा रीतीनें पेशवाईच्या कालाचा उदय झाला.

प्रकरण ५ वें.

पेशवाई.

या प्रकरणांत पेशवाईतील नगर जिल्ह्याच्या इतिहासाचा विचार करावयाचा आहे. पेशवा म्हणजे प्रधान. बहामनी राज्यापैकीं घैसासउद्दीनशहा यानें इ० स० १३९७ मध्यें अहंमदबेग काझावेनी यास पेशवा हा किताब दिला होता, व त्यामुळें मुख्य प्रधानास पेशवा किताब देण्याची चाल याच राज्यांत सुरू झाली. अहमदनगरचे राजेही आपल्या प्रधानास पेशवा हा किताब पुढें देत असत व त्यांजपासून सातारच्या राजांनीं हा किताब आपल्या राज्यांत सुरू केला. व शाहूनें बाळाजी विश्वनाथ यास हा किताब दिला.

इ० स० १७२० त बाळाजी विश्वनाथाच्या कर्तृत्वामुळें दक्षिणेंत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार मराठ्यांना मिळाला. लौकरच माळव्याचा सुभेदार चिंकिलीजखान यानें बंड उभारलें व अशा तऱ्हेनें मोंगलांची दक्षिणेंतील सत्ता पार लयाला गेली.

याच चिंकलीजखानाकडे इ० स० १७४८ पर्यंत अहमदनगर होतें. इ० स० १७४८ त हा मरण पावल्यानंतर जो गोंधळ माजला त्याचा फायदा मराठ्यांनीं

घेऊन खानाचा वारस सलाबतजंग याच्यावर हल्ला केला. इ० स० १७५१ त बऱ्हाणपुराहून खान नगरास आला. फ्रेंच जनरल बुसी यानें श्रीगोंदें येथील घोडनदीवर राजापुरच्या नजीक मराठ्यांच्या छावणीवर अचानक छापा घातला. निजामच्या सैन्यानें पारनेरमधील रांजणगांव व पुण्यांतील तळेगांव ढमढेरे यांना उध्वस्त केलें. या ठिकाणीं मराठ्यांनीं निजामच्या सैन्याचा पराभव केला. तथापि त्यांत आघाडी साधली नाहीं. इकडे मराठ्यांनीं ' त्रिंबक ' वर हल्ला करण्याची बातमी येतांच सर्व कांहीं पालटलें. सलाबतजंगाचा भाऊ गाजीउद्दीन यानें मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. या सर्व कारणांवरून शेवटीं सलाबतजंगानें मराठ्यांशीं तह केला, व नाशिक आणि खानदेश खेरीजकरून अहमदनगरांतील गंगथडीचा सर्व प्रदेश मराठ्यांना दिला.

इ० स० १७५९ त निजामचा सेनापति कविजंग यानें लांच खाऊन अहमदनगरचा किल्ला पेशव्यांचे हवालीं केला. निजाम व पेशवे यांत युद्ध सुरू झालें. मराठ्यांनीं पेडगांवचा किल्ला घतला, व इ० स० १७६० मध्यें निजामचा उदगीर नजीक पराभव केला. यानंतर अहमदनगर राज्याचा बराचसा भाग मराठ्यांना मिळाला. पुढील वर्षी म्हणजे १७६१ मध्यें पानिपतच्या अनर्थानंतर निजामानें टोकें, -ता. नेवासें येथील देवळें जाळलीं, पुण्यावर स्वारी केली व उदगीरच्या तहांत दिलेला कांहीं भाग परत मिळविला.

इ० स० १७६० त कोळी नाईक हिराजी वारला. हिराजीचा मुलगा जावजी यानें पेशव्यांची नोकरी पतकरली होती. जुन्नरच्या सुभेदारानें जावजीच्या बापाची इस्टेट देण्याचें नाकारल्यावरून त्यानें नोकरी सोडून देऊन दरोडेखोरांची टोळी बनविली पेशव्यांची आज्ञा मोडली म्हणून जावजीच्या कुटुंबाला पेशव्यांनीं अटकेंत ठेविलें. या जावजीचा जुन्नर येथें रामजी नांवाचा शत्रु होता. त्याच्या कारस्थानामुळें जावजीचा भाऊ व पुतण्या मारला गेला. रामजीनें जावजीचा सूड घेण्याकरितां सैन्य जमवून तें टोळ्याटोळ्यांनीं जावजीवर पाठविलें. जावजीनें पण रामजीप्रमाणें आपल्या सैन्याच्या टोळ्या करून त्या सबंध प्रांतभर पसरविल्या. एका चकमकींत रामजी मारला गेला व त्याचा मुलगा बापाचे जागीं सैन्याचा मुख्य झाला. त्यानें जावजीचा पाठलाग केला परंतु तोही मारला गेला. नानाफडणविसानें दाजी कोकाटे या नांवाचे इसमास जावजीस पकडून आणण्याबद्दल सक्त हुकूम दिला. जावजीची व दाजीची गांठ पडली. तेव्हां दाजी हा त्याच्याशीं

स्नेहानें वागूं लागला. परंतु नाना फडणविसानें दिलेला हुकूम जावजीच्या नजरेस येतांच त्यानें दाजी व त्याच्या तीन मुलांचे रात्रीं गळे कापून त्याचा प्राण घेतला. यानंतर पेशव्यांनीं त्यास पकडण्याचा फारच जारीनें प्रयत्न केला तेव्हां जावजीनें रघुनाथरावाची मदत मागितली परंतु ती त्यानें नाकारल्यानें नाशिकच्या सुभेदाराच्या सल्ल्यानें त्यानें आपले सर्व किल्ले तुकोजीराव होळकर यांच्या स्वाधीन केले. तुकोजीरावानें राजूरनजीक त्याला ६० गांवांची सुभेदारी दिली. त्यानें या सुभेदारीचा कारभार इ० स० १७८९ पर्यंत केला. त्याच सालीं त्याचे स्वत:चेच पक्षांतील मनुष्यानें त्यास जखम केल्यानें तो मरण पावला. त्यानंतर त्याचें काम हिराजी हा त्याचा मुलगा पाहूं लागला. जावजी हयात असतांना कोळी लोकांची जामीन सांखळी होती परंतु कोळी लोकांनीं लवकरच पुन्हां धुमाकूळ घालण्यास सुरवात केली, व त्यांचा हिराजीनें पाठलाग करून बींमोड केला.

पानिपतचे लढाईनंतर निजामाचे जे प्रांत मराठयांकडे राहिले होते ते त्यास परत देऊन रघुनाथरावानें माधवराव पेशव्याचे विरुद्ध निजामाकडून मदत मिळविण्याबद्दलचा करार केला. पण इ० स० १७६३ त माधवराव व रघुनाथराव यांचेमधील तंटा मिटल्यानें निजामच्या मदतीची जरूरी राहिली नाहीं, व कराराप्रमाणें निजामास प्रांत मिळाले नाहींत. यामुळें रागावून निजामानें पुण्यावर चाल करून पुणें जाळलें व तो परत फिरतो न फिरतो तोंच मराठयांनीं त्याचेवर हल्ला केला, व त्याचा पराभव करून त्याचे सैन्य कापून काढिलें. यामुळें निजाम जेरीस येऊन त्याला तह करणें भाग पडलें व उद्गीरच्या तहाप्रमाणें सर्व प्रांत मराठयांकडे आले.

इ० स० १७६७ त माधवराव व रघुनाथ यांचेमध्यें पुन्हा भांडणें होऊन तीं सालपेच्या तहानें मिटलीं व रघुनाथराव कोपरगांव येथें जाऊन राहिला व तेथेंच मरण पावला. त्याचे कुटुंब आनंदीबाई ही इ० स० १७९२ पर्यंत कोपरगांवींच होती. व त्यानंतर त्या नाशिकजवळ आनंदवली येथें राहण्यास गेली.

ज्याप्रमाणें विजयानगरच्या हिंदुराजाचा नाश करण्याकरितां सर्व मुसलमानी राजांनीं एकी करून त्यांचा नाश केला, त्याचप्रमाणें सर्व मराठे सरदारांच्या एकीचें चित्र खडर्याच्या प्रसिद्ध लढाईत झालेलें दिसून येतें. त्यानंतर ऐक्याचा स्फोट होऊन मराठी राज्याला उतरती कळा लागली. पेशव्यांच्या अमर्याद मागणीमुळें

निज़ाम व पेशवे यांच्यांत तेढ उत्पन्न झाली. नाना फडणविसानें सर्व मराठे राजे, सरदार, मानकरी, वगैरे एकत्र करून निजामावर चाल करून जाण्याचे हेतूनें १३०००० सैन्य उभारलें. पेशव्यांचे छत्राखालीं सर्व मराठे एकत्र जमले. ही मराठ्यांच्या इतिहासांत शेवटली महत्त्वाची गोष्ट होय.

निजामानें नागपूरकर भोंसल्यांस वऱ्हाडची वांटणी देण्याचें टाळलें. पुण्यास मराठी फौजेंत फितुरी करण्याचा प्रयत्न केला. आपले पदरीं कवायती, पलटणें नवीन तयार केलीं. महादजी शिंदे व हरिपंत तात्या फडके वारल्यामुळें निजामाला जोर आला, व त्यानें चढाई करण्याची तयारी चालविली; परंतु आपला हेतु उघड न करतां पुणें दरबारीं सभेट करण्याची तयारी आहे असें तो वरवर दाखवूं लागला.

निजामाचा बेत मराठ्यांस समजतांच त्यांनींही तयारी चालविली. मराठ्यांचे सेनापती दौलतराव शिंदे. ते त्यावेळीं हिंदुस्तानांत होते. त्यांना पेशव्यांनीं बोलाविलें आणि नागपूरकर भोंसले, होळकर, गोविंदराव गायकवाड, रास्ते, पटवर्धन, विंचूरकर, मालेगांवकर, राजेबहाद्दर, घोरपडे, पाटणकर, निंबाळकर, प्रतिनिधि वगैरे सरदार आपापल्या सैन्यासह दाखल होऊं लागले.

निजामअल्लीनें प्रथम आरंभ केला. त्याचीं पलटणें मुसारेमू यानें तयार केलीं होतीं व तो त्यांसह बेदरहून निघाला व परांड्याचे रोखानें पुढें आला. इकडे पेशवेही नगरपर्यंत आले. मराठे विंचरणेपर्यंत गेले इतक्यांत निजामानें तहाचें बोलणें लावलें. तेव्हां मशीरउल्मुल्कला ताब्यांत द्या म्हणजे बाकी कलमांचा कसा तरी निकाल करूं असें मराठ्यांनीं कळविलें परंतु निजाम तयार होईना. म्हणून अघाडीची फौज बाबा फडके यांचे हाताखालीं होती, तिनें ७ मार्च १७९५ ला निजामाला तोंड दिलें व तोफांचा मारा करून त्याला परतवलें. तारीख ११ पर्यंत किरकोळ हल्ले चालले होते. ११ ला बाबा फडक्याचा पराभव झाल्यानें निजामाला जोर आला, व तारीख १२ मार्च १७९५ ला खडर्याजवळच्या टेंकडीजवळ मोठी लढाई झाली. ही लढाई सकाळीं ८ वाजल्यापासून रात्रीं १० वाजेपर्यंत चालली होती. मराठ्यांनीं निजामाचा पूर्ण मोड केला. यामुळें त्यास सुलतानदुर्गाचा आश्रय करावा लागला. तथापि मराठ्यांनीं गढीस वेढा दिला व तोफा लावल्या तेव्हां निजाम कोंडला गेला. त्याला धान्य व पाणीही मिळण्याची पंचाईत पडली, व त्यानें तह करण्याचें कबूल केलें.

मराठ्यांना जय मिळाल्यामुळें त्यांनीं आपल्याला सोईचा असा तह करून घेतला. १७६० पासून १७९५ पर्यंत ३५ वर्षांत परांड्यापासून तापीपर्यंतचा मुलूख जेवढा निजामाकडे परत आलेला असेल तो सोडून द्यावा असें ठरलें. ज्यासाठीं लढाई झाली ती चौथसरदेशमुखीची बाकी निजामानें दिली.

इ० स० १७९७ त बाजीरावास शिंद्यांनीं मदत केल्यामुळें त्यांस अहमदनगरचा बराचसा भाग मिळाला. व त्याच वर्षी नाना फडणवीसास अहमदनगरचे किल्ल्यांत कैदेंत ठेवलें. मध्यंतरी शिंद्यांची आपसांत यादवी झाली, व त्याचे प्रतिस्पर्धी मेवाडकडे निघून गेले. इ० स० १७९८ त नाना फडणवीस याला सोडण्यांत आलें. व तो पुढें लौकरच म्हणजे इ० स० १८०० मध्यें मरण पावला.

इ० स० १८०२ मध्यें यशवंतराव होळकरानें पुण्यावर स्वारी केली व बाजीराव महाडास पळून गेला. पुढें इंग्रजांच्या मदतीनें तो पुन्हां पुण्यास आला. त्यानें इंग्रजांशीं वसई येथें तह केला. हा तह शिंदे व इतर कांहीं मराठे यांस पसंत पडला नाहीं. शिंद्यांनीं आपली छावणी निजामाचे सरहद्दीजवळ ठेविली. तेव्हां हें वसईच्या तहाविरुद्ध होतें असें इंग्रजांचा सेनापति जनरल वेलस्ली यानें शिंद्यास पत्र लिहिलें व आपलें सैन्य निजामाचे हद्दीपासून न हलविल्यास आपण अहमदनगरावर स्वारी करूं असें कळविलें. शिंद्यानें तें मान्य केलें. परंतु आपलें सैन्य न हालवितां त्यानें वेलस्लीला निरोप पाठविला कीं, तुमचें सैन्य कर्नाटकांत घेऊन जा. हें पाहून जनरल वेलस्लीनें अहमदनगरावर स्वारी केली.

वेलस्लीनें तहाचें बोलणें केलें; परंतु दोस्त राजांनीं युद्धाची तयारी केली. वेलस्लीनें वाळकीजवळ तळ दिला. लगेच स्वारी करावी हा त्याचा बेत फारच पाऊस पडल्यानें तहकूब राहिला. तथापि १८०३ आगस्टच्या ८ तारखेला त्यानें नगरच्या किल्लेदाराला किल्ला देऊन टाका अशी मागणी केली परंतु किल्ला देणें कोणत्याही अटीवर कबूल न केल्यामुळें वेलस्लीनें शहरावर तीन ठिकाणीं हल्ला केला. बराच वेळ लढाई झाल्यानंतर शहर इंग्रजांच्या हातीं आलें. पुढें किल्ला घेण्याची जय्यत तयारी करून हल्ला चढविला. व ता. १२ रोजीं किल्लेदार शरण आला. अशा रीतीनें अहमदनगरचा किल्ला इंग्रजांच्या हातीं ता० १२-८-१८०३ ला पडला.

वेलस्लीनें ता. २३-९-१८०३ रोजीं शिंद्यावर असईचा मोठा जय संपादन केला अहमदनगराजवळील सर्व प्रदेश इंग्रजांना मिळाला. होळकरांच्या विरुद्ध कांहीं दिवस लढाई चालून इ० स० १८०५ मध्यें होळकरांचा प्रदेश शेवगांवसुद्धां त्याला परत मिळाला.

इ० स० १८०२ मध्यें लढाईचा व लुटालुटीचा कहर व १८०३-४ मध्यें दुष्काळ यामुळें लोक अगदीं त्रस्त होऊन गेले. वेलस्लीच्या सैन्यास व जनावरांस अन्न मिळणें कठीण झालें. या सर्व गोष्टींचा फायदा घेऊन भिल्ल लोकांनीं टोळ्या जमवून खून व लुटालूट करण्यास प्रारंभ केला. हा भिल्लांचा त्रास बंद करण्याकरितां खानदेशचे सरसुभेदार यास बाजीरावानें हुकूम दिला. मनोहरगीर गोसावी यांच्या सांगण्यावरून बरेचसे भिल्ल कोपरगांवास मुलाखतीस बोलाविले. त्यांना विश्वासघातानें पकडून विहीरींत ढकलून दिलें. यापुढें कांहीं दिवस शांतता होती.

परंतु १८०६ मध्यें त्रिंबकजी डेंगळे यानें शेवगांव तालुक्यांतील घेवरी चांदगांव येथें भिल्लांची कत्तल केली. शिवाय करंभा येथील नारोबा नाकाट याचेकडूनही बऱ्याचशा भिल्लांची कत्तल झाली. एकंदर १५ महिन्यांत १५००० भिल्ल मारले गेले असें म्हणतात.

पेशवाईंत शेतसारा वसूल करण्याची पद्धति वाईट होती. न्याय मिळणें कठीण होतें. भिल्ल किंवा पेंढारी यांच्यापेक्षांही अधिकारी लोकांचें वागणें अधिक जुलुमाचें वाटत होतें. बडोद्याचा वकील गंगाधर शास्त्री याचा खून केला म्हणून (अर्थात् हें कारस्थान गायकवाड सरकारचें होतें याची माहिती त्रिंबकजीबद्दल यापुढें जी हकिकत येईल त्यावरून समजेलच) त्रिंबकजीला तुरुंगांत ठेविलें होतें. परंतु तुरुंगांतून निसटून संगमनेरच्या आसपासच्या डोंगराळ प्रदेशांतील रानटी जातींच्या लोकांना हाताशीं धरून या त्रिंबकजीनें धुमाकूळ चालविला होता. ४ जून १८१७ मध्यें पुण्याच्या तहांत अहमदनगरचा किल्ला इंग्रजांकडे आला.

इ० स० १८१७ मध्यें खडकीची लढाई झाली. त्यानंतर पेशवा जुन्नरजवळून ओतूरला व तेथून अकोलें तालुक्यांतील ब्राह्मणवाड्यास आला. तेथून तो लिंगदेवास गेला त्याचे मागोमाग जनरल स्मिथ येत आहे असें पाहून नाशिककडे न जातां राजूरहून कोल्हनकडे पेशव्यांनें मोर्चा फिरविला, व तेथून परत ओतूरला गेला.

ता. २० मार्च १८१८ ला सोलापुरांत अष्टीनजीक पराभव पावल्यामुळें बाजीराव नेवाशाहून कोपरगांवाकडे गेला, व तेथून नाशिकमधील चांदोरगांवीं जाण्यास निघाला. परंतु हिस्लापचे आगमनाची वार्ता ऐकून कोपरगांवीं तो परत आला. शेवटीं ३-६-१८१८ रोजीं धोलकोट येथें इंग्रजांना शरण आला.

होळकर व पेंढारी यांचाहि पराभव झाला, व जानेवारी १८१८ मध्यें केलेल्या मंडलेश्वराच्या तहानें होळकरानें सातपुड्याच्या दक्षिणेकडील–शेवगांव-सुद्धां–सर्व प्रदेश इंग्रजांच्या हवाली केला. हरिश्चंद्रगड व हुंजारगड हे किल्ले घेतले व अशा रीतीनें बाजीरावाच्या कारकीर्दीचा शेवट लागून पेशवाई सूर्य मावळला. यापुढील इतिहास म्हणजे इंग्रजशाहीचा इतिहास होय.

प्रकरण ६ वें.

इंग्रजशाहीचा काल.

इंग्रजांनीं अहमदनगर शहर कसें घेतलें याचें वर्णन मागील प्रकरणांत आलेलेंच आहे. त्यानंतर मराठे सरदारांनीं बरीच धडपड केली. परंतु त्यांना त्यांत यश आलें नाहीं. व शेवटचे बाजीरावास आपली राजधानी पुणें शहर सोडून भटकावें लागलें.

इ० स० १८१८ च्या २७ एप्रिल रोजीं कांहीं घोडेस्वार नेवाशास गेल्यामुळें लोक घाबरले. तीन दिवसांत सर्वांना परत फिरविलें. गोदावरीच्या दक्षिणेकडे धर्मजी प्रतापराव हेच काय ते सैन्यासह मधूनमधून हल्ले करीत होते. त्यांनीं शेगांवांत बरीच गडबड केली. परंतु जनरल स्मिथनें त्यांचा पक्का बंदोबस्त करून टाकला. पेशवे व होळकर यांचा सर्व मुलूख इंग्रजांनीं ताब्यांत घेतला.

श्रीगोंदे परगणा व शेवगांवाचा निमा भाग शिंद्याच्या ताब्यांत होता. कोर्टी परगणा व हल्लींचा कर्जत तालुका इ० स० १८२१ पर्यंत रावरंभा निंबाळकर यांचेकडे होता. इंग्रजांनीं जिंकलेल्या मुलुखांत शांतता स्थापन केली व कोळी, भिल्ल व नाईक यांना बोलावून त्यांचीं पेन्शनें किंवा वतनें कायम केलीं.

यानंतर कोळी लोकांचे दंगे या जिल्ह्यांत झाले. कोळी लोकांचा बंदोबस्त करण्यास सुमारें २० वर्षें लागलीं. रामजी भांगरे या नांवाच्या कोळी जमादाराचें

व सरकाराचें एका किरकोळ बाबतींत न पटून त्यानें बंड उभारिलें. रतनगडचा कोळी किल्लेदार गोविंदराव खारी याची मदत मुख्यत्वेंकरून रामजीस मिळाली. अकोल्याकडे यांची गडबड चालली असतां मॅन्किटॅश यास सशस्त्र पोलीस घेऊन तिकडे पाठविण्यांत आलें. त्यानें त्याची सर्व माहिती घेऊन, वाटा व चोरवाटा यांची चांगली बातमी काढून तीनचार मार्गांनीं लोकांचा एकदम पाठलाग केला व सुमारें दोन महिन्यांत ८० कोळी व त्यांचें पुढारी यांना नगरास पकडून आणिलें. हे दंगे इ० स० १८२८ ते १८३० मध्यें झाले.

या तऱ्हेनें जरी कांहीं पुढारी पकडले तरी या दंग्याचा शेवट झाला नाहीं. इ० स० १८३० मध्यें राया किरवा या नांवाच्या कोळ्यानें भिल्लांची मदत मिळवून सह्याद्रीच्या माथ्यावर व पायथ्याकडे धुमाकूळ माजविला. क्याप्टन् ल्यूकिन् यानें त्याचा बंदोबस्त करून रामा किरवा यास कैद केलें व त्याला देहांत शासन दिलें.

इ० स० १८४५ त कोळ्यांनीं पुनः त्रास देण्यास प्रारंभ केला. नाशिक जिल्ह्याचा एक कोळी पुढारी राघोजी भांगरे यांनीं मारवाडी लोकांवर दरवडे घालण्यास सुरवात केली. त्याचा बराच पाठलाग केला. इ० स० १८४७ त याला पंढरपुराजवळ पकडून फांशीं दिलें.

इ० स० १८५७ च्या बंडाचे वेळीं अहमदनगर येथें बरीच खळबळ उडाली सुमारें ७०० भिल्ल बंडखोर एकत्र झाले. त्यांचा पुढारी भागोजी नाईक हा होता. ले. हेनी यानें कांहीं पोलीस व सैन्य बरोबर घेऊन भागोजीला पकडण्याचा प्रयत्न केला. एका चकमकींत हेनी मारला गेला. त्याचा दुय्यम थाचर यानें भिल्लांचा पाठलाग करून त्यांना माघार घेण्यास लाविलें. पाथर्जी या नांवाच्या भिल्लानें राहुरीनजीक सुमारें १०० भिल्ल जमवून पुन्हा त्रास देण्यास आरंभ केला. परंतु भांट गामोरी यानें त्याचा बंदोबस्त केला.

पुढें अकोलें तालुक्यांतील समशेरपूरनजीक भागोजी नाईक यानें ले. ग्रॅहॅम व चॅपमन यांना जखमी केलें. हा गोंधळ चोंहीकडे माजला असतां शेवटीं जनरल न्यूटनें भिल्लांचे प्रतिस्पर्धि कोळी यांची पलटण बनविण्याचें ठरवून त्यांना जादा सवलती दिल्या. ही कोळी पलटण सुमारें ६०० लोकांची बनविली. जावजी नाईक बोमला यास पलटणीचा मुख्य बनविलें व राघोजी भांगरे व इतर कोळी यांना अम्मलदाराच्या जागा दिल्या.

इ० स० १८५९ त भागोजी व हरजी नाईक यांच्या नेतृत्वाखालीं पुन्हा भिल्लांनीं गडबड आरंभिली. आंभोरदरानजीक भिल्लांचा पाडाव जनरल न्यूट यानें केला. ६ महिन्यांनीं भिल्ल लोक गडबड करीत आहेत असें पाहून सरहद्दीवर एक घोडदळ जय्यत तयार ठेविलें.

आक्टोबर २६ सन १८५९ ला कोपरगांव तालुक्यांतील कोऱ्हाळें गांवावर भागोजीनें दरोडा घातला. व सुमारें १८००० रुपयांचा माल लांबविला. त्याचा बराच पाठलाग करून शेवटीं सिन्नरनजीक भिठसागरगांवीं याची व सोरनच्या सैन्याची गांठ पडली. त्यांत भागोजी व इतर बरेच लोक मारले गेले. निजामच्या सरहद्दींतील भिल्लांचा तेथील सैन्यानें पाडाव केला. तसेंच सोनईहून कांहीं भिल्ल भागोजीच्या मदतीस निघालें. परंतु त्यांना खानदेशांत पकडण्यांत आलें. यापुढें त्यांचीं बंडें झालीं नाहींत. कालांतरानें अत्याचार करणें सोडून हे लोक शांतपणें शेती करूं लागले.

इ० स० १८७३ त होन्या भागूजी हा जांबूरी पुणें येथील वजनदार कोळी पुढारी सावकारांच्या त्रासामुळें चिडला व त्यांचेवर दरवडे घालूं लागला. त्यानें पुणें, नगर, नाशिक, ठाणें वगैरे जिल्ह्यांतून दरवडे घातले. परंतु सरतेशेवटीं इ० स० १८७६ मध्यें याला पकडण्यांत आलें.

प्रकरण ७ वें.

अहमदनगर शहर.

अहमदनगर हें नांव कसें पडलें.— अहमदनगर हें नांव निजामशाहीचा संस्थापक अहमदशहा याचे नांवावरून दिलें हें प्रसिद्ध आहे. परंतु याशिवाय त्याजबद्दल एक मनोरंजक आख्यायिकही पण आहे. एका शुक्रवारीं अहमदशहा आपला वजीर सलाबतखान किरची व परिवार यांसह सीनानदीचे कांठीं आला. त्यावेळीं सलाबतखानानें विचारलें कीं, ' हुजूर या शहराचें नांव काय ?' त्यावर अहमदशहा म्हणाला कीं, या शहराचें नांव ठेवण्याचा अधिकार मी तुलाच देत आहे. तूं जें नांव सांगशील तें नांव मी पसंत करीन. त्यावेळीं सलाबतखानानें सांगितलें कीं, गुजराथेंतील ' अहमदाबाद ' हें नांव तेथील बादशहाचें नांव

शहाअहमद, वजिराचें नांव अहमद, काजीचें नांव अहमद अशा रीतीनें चौघांचें नांव अहमद असल्यानें, अहमदाबाद असें नांव ठेवण्यांत आलें होतें. सध्यां या ठिकाणीं 'अहमद' या नांवाचे तीन इसम हजर आहेत, हुजूरचें नांव अहमद आहे. काजीचें नांव अहमद आहे कोतवालाचें नांव अहमद आहे परंतु दुर्दैवानें माझें नांव अहमद नाहीं. परंतु आपला सेनापती सिद्धी अहमद आहे तरी त्याला वजीरी द्यावी. म्हणजे बादशहाचें, वजिराचें, कोतवालाचें व काजीचें हीं चारीं नांवें सारखीं होतील. म्हणजे अहमदाबादेप्रमाणें 'अहमदनगर' हें नांव यास दिल्यास योग्य होईल. त्याप्रमाणें बादशहानें, सेनापतीस वजिरी देऊन अहमदनगर हें नांव या शहरास दिलें.

पूर्वी अहमदनगर हा परगणा होता, व या परगण्यांत एकंदर १७ गांवें होतीं. तीं पुढीलप्रमाणें— १ भिंगार, २ निंबोडी, ३ वाकोडी ४ कापूरवाडी, ५ सावेडी ६ नालेगांव, ७ माळीवाडा, ८ मोरचुद नगर, ९ चाहुराणा बुद्रुक, १० चाहुराणा खुर्द ११ बागरोजा, १२ भिस्तबाग, १३ फराबाग, १४ जालीमखानी, १५ शहापूर, १६ नागरदेवळे व १७ वारुळाची वाडी (दरेवाडी). ह्या सर्व ठिकाणीं निजामशाहीचें राज्य असतांना इमारती वस्ती असल्याकारणानें अहमदनगर शहराचा विस्तार होता. परंतु सध्यां ह्यांपैकीं, कांहीं गांवें शहरापासून निराळीं असल्यामुळें त्यांचा ह्या शहराच्या क्षेत्रांत समावेश होत नाहीं हें उघड दिसतें.

अहमदनगर शहर वसविण्यापूर्वी भिंगार व त्याच्या चार वाड्या व सीनानदी जवळील चार गांवें इतकेंच अस्तित्वांत होतीं असें आपणांस माहितिवरून आढळून येतें.

अहमद निजामशहानें स्वतंत्र झाल्यावर आपलें मुख्य ठिकाण जुन्नर हें सोडून देऊन अगदींच नवीन व दूर अशा ठिकाणीं आपली राजधानी कां केली हा एक प्रश्न उद्भवतो. परंतु याचें उत्तर असें कीं, अहमदशहाचें या जागेवर प्रेम होतें. कारण इ० स० १४८९ सालीं बेदरचा सेनापती जाहगीरखान याचा, अहमदशहानें इमामपूरच्या घाटांत आपल्या सैन्याचा तळ देऊन व बादशाही सैन्यास तोंड देण्यास सामर्थ्य नसतांनाहि सावधगिरीनें व अडचणीच्या प्रसंगीं योग्य वेळ येतांच बादशाही सैन्यावर हल्ला करून पुरा नाश केला. त्यामुळें या यशस्वी जागेबद्दल त्याला प्रेम वाटणें अगदींच साहजिक होतें. या यशस्वी जागेवर त्यानें सुंदर राजवाडा बांधिला व एक बगीचा तयार केला. त्यालाच बाग-निजाम

म्हणतात व तेथेंच किल्ला बांधिला गेला. हीच शहर वसविण्याची पूर्वतयारी होती. याशिवाय इ० स० १४९४ त ही राजधानी करण्याचें कारण स्वतः उत्तम सेनापती असल्याकारणानें दौलताबादेच्या वेढ्यांत त्याला अपयश आल्याकारणानें व परत यश मिळविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा असल्यानें दौलताबाद व जुनी राजधानी जुन्नर यांच्या मध्यभागीं राजधानी केल्यास पुढेंमागें दौलताबाद सर करणें सुलभ होईल, हें होय. ही जागा जुन्नरपेक्षां सर्व प्रकारें उत्तम आहे असें त्याला वाटलें. चारपांच कोसांच्या अंतरावर चारी बाजूंनीं लहान मोठे डोंगर असल्यानें ही जागा नैसर्गिकरित्याच सुरक्षित होती. याशिवाय बेदर, निजामपूर, खानदेश, वऱ्हाड व समुद्रकिनारा व त्याचप्रमाणें दौलताबाद, परांडे किल्ले या सर्व गोष्टींचा विचार करून ही मध्यवर्ती जागा अतिशय महत्त्वाची आहे, असें त्यास वाटलें. ज्या जागेनें त्यास स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें, जिनें त्याला विजयी बनविलें अशा या पवित्र जागेवर त्याचें प्रेम बसणें अपरिहार्य होतें. ही एक जरी गोष्ट असली तथापि दुसरी अशी आख्यायिका आहे कीं, अहमदशहा आपल्या छावणींत फिरत असतां एक ससा निघाला असें पाहून छावणींतील एक कुत्रा त्याचा पाठलाग करूं लागला, बराच वेळ झाला तरी कुत्र्यास तो दाद देईना. शेवटीं सशानें कुत्र्यावर उलट खाल्ली हें पाहून कुत्रा पळून गेला. ही गोष्ट राजानें बघितली व त्या वेळेस तो म्हणाला " ज्या जागेवर ससा देखील कुत्र्याचा पराभव करतो, ती जागा काय करणार नाहीं "

एथेंच यशस्वी जागेवर त्यानें आपली राजधानी करण्याचा हुकूम दिला व शेवटीं अशा रीतीनें इ० स० १४९४ मध्यें अहमदनगर शहराची स्थापना केली. अहमदशहानें व त्याचे लोकांनीं दोन वर्षें अविश्रांत श्रम करून, सुंदर इमारती बांधून अहमदनगरची इतकी भरभराट केली कीं, तें शहर वैभवांत बगदाद व कैरोसारख्या शहरांशीं स्पर्धा करूं लागलें. शहराभोंवतालचा जो तट आहे तो शहाजहान बादशहाचा सुभेदार सर्जेखान यानें सुमारें १६३१ सालीं बांधला. निजामशाहीच्या धामधुमीच्या काळांत शहरांतील इमारतींची बरीच नासाडी झाली. चांदबिबीचे वेळेपर्यंत शहर चांगल्या स्थितींत होतें व पुढें सर्जेखान यानें शहरास तट बांधून अकरा वेशी तयार केल्या व लोकांस भरंवसा देऊन शहराची सुधारणा केली.

निजामशाहीच्या कारकीर्दीमध्यें अनेक इतिहासप्रसिद्ध रत्नें निर्माण झाली. सर्व भरतभूमीस ललामभूत झालेली सुलताना चांदबिबी या अमलांत उदयास आली. मुकमीलखान दक्षिणी, सलाबतखान, चंगीझखान, मलिकंबर, यांच्यासारखे राजनिष्ठ मुत्सद्दी व सेनापती; शहा–ताहीरसारखे विद्वान् व महत्त्वाकांक्षी मंत्री; कुवरसेन, गोपाळराव, संभाजी चिटणवीस, राजे शहाजी भोंसले यांचेसारखे शूर व स्वामिभक्त हिंदू प्रधान व मंत्री; शहाशरीफ, मिरावती यांचेसारखे साधू या निजामशाहीच्या राज्यांत उदयास आले. त्यांचा इतिहास पर्यायानें या पुढील भागांत येणारच आहे. परंतु अहमदनगर शहरांत ज्या इतिहासप्रसिद्ध गोष्टी आहेत त्यांचा उल्लेख या ठिकाणीं करणें जरूर आहे.

अहमदनगरचा किल्ला–यास पूर्वी ' कोटबाग निजाम ' असें म्हणत असत. दौलताबादच्या निजामशाहींतील पहिला सुलतान मलिक अहमद बहिरी यानें हा किल्ला इ० स० १४९४ चे सुमारास बांधला. या किल्ल्यास २४ बुरूज आहेत व त्यास निजामशाहींतील प्रसिद्ध मुत्सद्दी, प्रधान व सेनापती ह्यांचीं नांवें दिलेलीं आहेत. ह्या किल्याचे मागील बाजूस जो झुलता पूल आहे तो इंग्रजी अमदानींत झालेला आहे. ह्या किल्ल्यांत ऐतिहासिक महत्त्वाचे अनेक प्रसंग घडून आलेले आहेत. अकबराचा मुलगा मुराद ह्यानें सन १५९६ मध्यें ह्या किल्ल्यास वेढा दिला असतांना चांदबिबी ह्या शूर स्त्रीनें त्याच्याशीं युद्ध करून किल्ल्याचा बचाव केला. मुरादच्या मृत्यू नंतर १५९९ त दानियालनें हा किल्ला जिंकून घेतला. चांदबिबीचें अद्भूत शौर्य व तिचा खून हे प्रसंग याच वेळीं घडून आले. औरंगजेबानें १६४० च्या सुमारास या किल्ल्याची दुरुस्ती केली. सदाशिवराव भाऊ पेशव्यानें हा किल्ला १७५९ त घेतला. पुढें हा किल्ला मराठ्यांचे ताब्यांत होता त्यावेळीं तुळाजी आंग्रे, मोरोबा दादा, नाना फडणवीस व सखारामपंत ह्यांसारखे प्रसिद्ध पुरुष ह्या किल्ल्यांत कांहीं काळ कैदी म्हणून होते. इ० स० १७९७ त हा किल्ला शिंद्याच्या ताब्यांत गेला व सन १८०३ मध्यें जनरल वेलस्ली ह्यानें भिंगारचा रघुनाथरावबाबा देशमुख याच्या मदतीनें सर केला. याठिकाणीं एक तोफ असून त्याखालीं पुढीलप्रमाणें इंग्रजी मजकूर आहे.

Duke of Willington breakfasted here after taking this fort 1803 A. D.

ह्या किल्ल्याचा उपयोग गेल्या शतकांत देखील ब्रिटिश साम्राज्याचे शत्रूंना कैदी म्हणून या ठिकाणीं आणून ठेवण्यांत झालेला आहे. बोअर युद्धाचे वेळेस किंवा गेल्या जर्मन युद्धाचे वेळेस, बोअर व जर्मन लोकांना कैदी म्हणून याठिकाणीं ठेविलें होते. राज्यकर्त्यांच्या शत्रूंना ह्या किल्ल्याची हवा भोगण्याचा योगायोग प्राप्त होतो, हा ह्या किल्ल्याचे ठिकाणीं विशेष दैवी लीलेचा प्रकार आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्या या निजामशाहीच्या राज्यांतून मराठ्यांचें स्वराज्य निर्माण झालें किंवा महाराष्ट्राचा इतिहास उत्पन्न झाला, त्याच या भूमीवर देखील मोंगलांच्या साम्राज्याचा राजवैभवाचा मुकूट, याच ठिकाणीं चिरकाल पडून धुळीस जाऊन मिळाला. ही दैवी चमत्काराची गोष्ट नाहीं असें कोण म्हणेल ? मोंगल बादशाहीचें शेवटचें साम्राज्यसुख भोगणारा महत्त्वाकांक्षी औरंगजेब बादशहा, ह्याला आपली महत्त्वाकांक्षा याच भूमीच्या उदरांत दडपून टाकण्यास भाग पाडून, अखिल जगताला शेवटचा नमस्कार करण्याची पाळी याच ठिकाणीं यावी ही गोष्ट किती बोधप्रद आहे याचा वाचकांनीं विचार करावा.

अहमदनगरापासून पूर्वेस ३ मैलांवर औरंगजेबाचें मृत्युस्थान आहे. त्या ठिकाणीं एक दर्गा बांधलेला आहे. त्यावरून आपणांस असें दिसून येईल कीं, मोंगल साम्राज्याचा माध्यान्ह व सायंकाळ पाहणारा हिंदुस्तानचे इतिहासांतील अतिप्रसिद्ध मोंगल बादशहा औरंगजेब हा सन १६८३ सालीं दक्षिण हिंदुस्तान जिंकण्याकरतां म्हणून दिल्ली सोडून आल्यानंतर प्रथम यशाचा सुखमय वारा घेऊन मराठ्यांचे पुढें हतबल होऊन, अहमदनगर एथें आजारी पडून इ० स० १७०७ सालीं मरण पावला व आपल्या आयुष्याचीं ९१ वर्षें पूर्ण सुखानें जगांत राहून शेवटीं त्या ठिकाणीं नश्वर देहाचा त्याग केला. जरी तो एथें मरण पावला होता, तरी त्याचें प्रेत मोंगलाईत वेरूळजवळ रोझें एथें नेऊन पुरण्यांत आलें व तेथेंच त्याची मुख्य कबर आहे. अहमदनगर एथें फक्त त्याचें शवास स्नान घातलें व त्या जागेवर एक कबर बांधण्यांत आली आहे. ह्या कबरस्थानाभोंवतीं एक मोठा तट आहे. कबरीच्या पश्चिमबाजूस एक मशीद आहे व तिच्या दोन्ही बाजूंस मौलवी, फकीर वगैरे लोकांस राहण्याकरतां जागा बांधलेली आहे तीस ' हुजरा ' असें म्हणतात. कबरीच्या पूर्वेस बारदरी नांवाची इमारत आहे. एथील व्यवस्था उत्तम असून,

प्रतिवर्षी औरंगजेबाचे मृत्युदिवशीं उरूस भरत असतो. (तारीख २०।२।१७०७ शुक्रवार रोजीं सकाळीं त्याचा अंत झाला)

अहमदनगरचा पहिला बादशहा अहमदशहा याची कबर जेथें आहे त्याला बागरोजा म्हणतात. ती जागा नालेगांव वेशीपासून सुमारें अर्ध्या मैलाच्या आंत आहे. ह्या कबरेभोंवतीं दगडी तट असून मध्यभागीं ही इमारत आहे. तटाच्या बाहेर बहुतेक कबरस्थानेंच आहेत. उजव्या बाजूस तीन घुमटांची हत्तीच्या अंबारीसारखी एक टुमदार व सुबक इमारत आहे ही इमारत व हा चबूतरा गुलामअली नांवाच्या एका हत्तीचें थडगें आहे. गुलामअली निजामशाहीचा हत्ती होता, व त्यानें इ० स० १५६५ सालीं इतिहासप्रसिद्ध तालिकोटचे लढाईंत विजयानगरचा राजा रामराजा यास आपल्या सोंडेनें पकडून आणिलें व त्यास सोंडेनें धरून उभें चिरून त्याची दोन शकलें केलीं. रामराजाचें शीर कापून तें नगरच्या वेशीवर टांगण्यांत आलें होतें व त्याची एक दगडी प्रतिमा करून ती विजापूरच्या वेशीस लटकविण्यांत आली. दक्षिणेंतील मुसलमानी राजांनीं एक होऊन विजयानगरच्या हिंदू राज्याचा नाश केला व रामराजाचा वध केला त्याचें बरेंच श्रेय अहमदनगरचा हुसेन निशामशहा यास आहे. मुख्य इमारतीस चारी दिशेस चार भव्य कमानी आहेत, व मध्यभागीं अहमद निजामशहाची व त्याच्या राणीची कबर आहे. अहमद निजामशहा हा १५०८ सालीं मरण पावला त्या सुमारास ही इमारत झाली. असो, जगांतील राष्ट्रें, समाज, देश अगर व्यक्ति या काळाच्या तडाक्यांत सांपडून नाहींशा झाल्या. काळाला दृश्य वस्तू नाहींशी करतां येईल परंतु अदृश्य वस्तूवर काळाचा परिणाम होणें शक्य नाहीं. जगांतील थोर व्यक्ति, आपणांस मूर्तिमंत पुन्हां दिसणार नाहींत परंतु त्या व्यक्ति इतिहासाच्या पानांत आपल्याला दिसून येतील. दगड, माती यांच्या साहाय्यानें केलेलीं दृश्य स्मारकें व भव्य इमारती काळाच्या तडाक्यांत सांपडून त्यांचा नाश होणें शक्य आहे; परंतु त्या दगडी स्मारकांतील इतिहासाचे अमोलिक बोल जगाच्या अंतापर्यंत ऐकूं येणार यांत शंका नाहीं. ज्याप्रमाणें आत्मा अमर आहे, त्याप्रमाणें इतिहास हा अमर आहे. हिंदुस्तानांतील प्रसिद्ध ताजमहाल, काल-शत्रूच्या दृष्टींत एखादे वेळेस खुपून त्याचें सौंदर्य कमी होईल, परंतु ताजमहालाचें इतिहासाचें सौंदर्य व त्यांतील दिव्य काव्य काळाला हरण करतां येणार नाहीं; त्याला त्यांत हारच खावी लागणार. त्याप्रमाणें निजामशाहीतील दगडमातीचें स्मारक आतां जरी छिन्नविच्छिन्न

व विपन्नावस्थेंत दिसत असलें तथापि त्याच्या आंतील इतिहासाचे उज्वल बोल अंतःकरणातील आत्म्याला व मनाला जागृत केल्याशिवाय राहणार नाहींत व अशा रीतीचा बेहस्तबाग या नांवाचा जो संस्थापक अहमदशहा यानें स्वतःकरितां तयार केला होता त्याची स्थिति आहे. हा बाग इ० स० १५०६ मध्यें तयार झाला. अहमदशहाचा मुलगा बुऱ्हाणशहा यानें या बागेचा विस्तार करून त्यास हस्तबेहस्त हें नांव दिलें, याचा अर्थ " स्वर्गांतील सात नंदनवनें व पृथ्वीवरील हें आठवें नंदनवन आहे " असा आहे. बेहस्तबाग निजामशाही बादशहांचें विश्रांति-स्थान होतें. अकबराचा मुलगा मुराद यानें इ० स० १५९५ सालीं नगर शहरावर स्वारी करण्याचे वेळीं याच ठिकाणीं तळ दिला होता. पूर्वींच्या इमारतींपैकीं, फैजबक्षमहाल, लकडमहाल व दोन हमामखानें (स्नानगृह) इतक्या इमारती एथें दृष्टीस पडतात.

अशाच प्रकारची दुसरी एक सुंदर इमारत आहे. तिचें नांव फराबाग आहे. तो महाल आहे. निजामशाहीच्या बादशहांनीं आपल्याकरतां जे खास महाल तयार केले होते, त्यांपैकीं हा एक आहे. हा इ० स० १५७६ मध्यें चांगतखानानें तयार केला. सौंदर्य व उत्तम हवा यावरून या जागेचें नांव फरा–बक्ष म्हणजे सुख देणारा असा आहे. सुलताना चांदबिबी ही ह्याच महालांत मधून मधून राहात असे. तिच्या वेळीं हा महाल फारच उत्तम रीतीनें शृंगारिलेला होता. शके १६७९ मध्यें निजाम अल्लीखानावर स्वारी करण्यास सदाशिवराव भाऊ-साहेब निघाला तेव्हां फराबागेंत त्यानें मुक्काम केला. अशा रीतीनें हा फराबाग हिंदुस्थानाला आपल्या पराक्रमानें लाजविणाऱ्या स्त्रीरत्नांपैकीं पराक्रमी सुलताना चांदबिबी हिच्या वास्तव्यानें पवित्र झालेला आहे. परंतु कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें ह्या इमारतीस देखील एकदा श्रीमंत पण आतां निर्धन अशा मनुष्याच्या दैवाप्रमाणें कर्मभोग भोगण्याची पाळी आली आहे हा दैवदुर्विलास म्हटला पाहिजे. चांदबिबीचा महाल म्हणून संबोधिली जाणारी इमारत वास्तविक चांदबिबीचा महाल नसून सलाबतखानाचा महाल म्हणून नांव ठेवणें योग्य होतें. हा सलाबतखानाचा महाल नगरपासून ६ मैलांच्या अंतरावर शहाडोंगरावर आहे.

हा महाल उंचवटयावर असल्याकारणानें त्यावरून आसपासचा दूरपर्यंत देखावा दिसतो. हा महाल सलाबतखानानें आपल्या हयातींतच तयार केला, परंतु या महालांतच त्याच्या मृत्यूनंतर त्याची कबर या ठिकाणीं झालेली आहे. मूर्तिजा-

निजामशहा याचे कारकीर्दीत हा मुख्य वजीर होता. हा पुण्याजवळील दाभाड्याचें तळेगांव एथें इ० स० १५८९ त मरण पावला व त्याचें प्रेत प्रस्तुतच्या महालांत पुरण्यांत आलें. निजामशाहीच्या काळांत जे स्वामिभक्त व राजनिष्ठ असे वजीर होते, त्यांत याची प्रामुख्यानें गणना करणें योग्य आहे. सलाबतखानाच्या मनांत ह्या महालावरून दौलताबाद दिसावें असें होतें, व त्याप्रमाणें तो महाल उंच बांधणार होता, परंतु तें काम तसेंच अपुरें पडलें. महालाचे बाहेर मोडकळीस आलेलीं दोन थडगीं आहेत. त्यांपैकीं एक सलाबतखानाच्या बायकोचें असून दुसरें त्याच्या कुत्र्याचें आहे असें म्हणतात. यासंबंधीं एक आख्यायिका अशी आहे कीं, सलाबतखानानें तीन विषाचे पेले तयार केले. व आपल्या दोन्ही बायकांना एक एक घेण्यास सांगितलें. एकीनें घेण्याचें नाकारलें म्हणून तिचें थडगें बाहेर आहे व जिनें घेतलें तिचें थडगें त्याच्या कबरेजवळ आंतील बाजूस आहे. कुत्र्यानें विषाचा पेला चाटला असतां तें मरण पावलें म्हणून त्याचेंहि थडगें बाहेर आहे. ज्या वेळेस किल्ल्यांतून गुप्त वाटेनें चांदबिबी निघून गेली असें सांगण्यांत येतें, त्या वेळेस चांदबिबीनें या ठिकाणीं येऊन ' जितानुहार ' म्हणजे आत्महत्त्या केली असल्यास, या महालास तिचें नांव मिळालें असावें असा समज आहे. निजामशाही बखरींत चांदबिबीनें किल्ल्यांतील तेजाबाचे रांजणांत उडी टाकून आत्महत्त्या केली असें लिहिलें आहे. फेरिस्ता म्हणतो कीं, नगर किल्ल्यांत तिचा खून झाला. चांदबिबीचें थडगें पारनेरजवळच्या दसाबाई डोंगरावर आहे अशी दंतकथा आहे. असो, या प्रकारें या सलाबतखानाचे महालाबद्दल निरनिराळ्या इतिहासाच्या गोष्टी आहेत. व त्या मनोरंजक असल्यामुळें एथें दिल्या आहेत.

निजामशाहींतील पहिल्या चार बादशहांचे कारकीर्दीमध्येंच इमारती बांधण्याचे कामीं लक्ष्य दिलें जात असे. सरदारांनीं लढायांत संपत्ति लुटून आणल्यानंतर तिचा विनियोग त्यांनीं आपले महाल बांधण्यांत केला असावा. कारण त्या त्या इमारतींना त्यांचीं नांवें दिलीं आहेत. यावरून वरील गोष्टीचा बोध होतो. जे महाल एके काळीं विलासाच्या रम्य जागा होत्या त्याच आतां भीषण काळाच्या चक्रामध्यें दैवाच्या दुर्विलसीत जागा झाल्या आहेत. कासीमखानी महाल, चंगीझखानी महाल, सर्जेखानाचा महाल व मेंगनीमहाल हे चार महाल अद्याप अस्तित्वांत आहेत. खानजहानचा महाल, शाहाताहीरचा महाल व न्यायतखानाचा महाल हे तीन महाल पडलेले आहेत. कविजंगचा महाल मोंगल कारकीर्दीत कवि-

जगांनीं तयार केला होता. तो अद्याप चांगल्या स्थितींत आहे. कासमखानीमहाल ज्याला म्हणतात, ती जागा म्हणजे कलेक्टरसाहेबांचा बंगला होय. कासीमखान हा दक्षिणी सरदारांपैकीं एक होता. त्यानें हा महाल इ० स० १५०० ते १५०८ याचे दरम्यान तयार करविला. चंगीझखानी महाल म्हणून जी इमारत आहे तिचा उपयोग डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्ट म्हणून केला जातो. ज्याप्रमाणें साताऱ्याच्या नवीन राजवाड्याच्या इमारतींत कोर्टकचेऱ्यांचा हल्लीं देखावा दिसतो, त्याच-प्रमाणें ह्या महालाच्या इमारतींत न्यायासन असून अनेक दुर्दैवी प्राण्यांना देहांत शिक्षा ऐकण्याचा कुयोग प्राप्त झालेला आहे व होत आहे. सर्जेखानी महालाची हल्लींची जागा म्हणजे फर्स्टक्लास सब जज्ज कोर्टाची होय. याच्याजवळ दोबोटी चिऱ्याची म्हशीद म्हणून जी इमारत आहे त्या ठिकाणीं सर्जेखानाची कबर आहे. हा महाल इ० स० १५६१ मध्यें बांधला गेला. ज्या ठिकाणीं एके काळीं अनेक तरुण युवतींच्या विलासलीला दृष्टीस पडत होत्या, त्याच ठिकाणीं आतां कैद्यांच्या पायांतील लाखंडी शृंखलेचा नाद व त्यांच्या दीन आरोळ्या ऐकूं येतात. ही जागा म्हणजे पूर्वींचा मेंगनीमहाल व हल्लींचा फौजदारी तुरुंग होय. हा न्यायतखान दख्खनी नांवाच्या सरदारानें चांदबिबीच्या लग्नाचे वेळीं तयार केला; तो इ० स० १५७० मध्यें तयार झाला असें सांगतात. हल्लींचें म्युनिसिपालिटीचें जें ऑफिस आहे त्याला लगतच एक मशीद आहे व त्या मशिदीचे दोन भाग असून एकांत न्यायतखान व त्याची बायको यांच्या कबरा आहेत. न्यायतखानाच्या महालापैकीं एक भव्य कमान रस्त्यावरच दिसत आहे. त्याचप्रमाणें ज्या ठिकाणीं आतां अमेरिकन मिशन हायस्कूल आहे त्याठिकाणींच पूर्वी कविजंगाचा महाल होता. हा शहराच्या मध्यवस्तींत आहे. तो हैदराबादच्या निजामाचे किल्लेदार पहिले कविजंग यांनीं इ० स० १७५७ सालीं बांधला असें म्हणतात.

ज्याप्रमाणें हिंदूंच्या काळांत कांहीं अप्रतिम देवालयें बांधण्यांत आलीं, त्याचप्रमाणें मुसलमानी राज्यामध्यें धर्माची भावना जागृत ठेवण्याकरतां म्हणून ठिकठिकाणीं मशिदी बांधण्यांत आल्या आहेत. निजामशाही राज्यामध्यें मशिदीं-चाच जास्त भरणा असणार याबद्दल वाचकांना आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. त्याकरतां ज्या साधारण इतिहासप्रसिद्ध मशिदी आहेत व ज्या जुन्या काळच्या स्मृति पुनरुज्वल करितात त्यांचाच फक्त या ठिकाणीं उल्लेख करणें जरूर वाटल्यावरून त्याप्रमाणें पुढें त्यांची माहिती दिली आहे.

' संहति कार्यसाधिका ' अथवा ' थेंबें थेंबें तळें सांचें ' या म्हणीप्रमाणें ज्याला आपण रोजच्या व्यवहारांत यकश्चित् म्हणून समजतों अशा यकश्चित् वस्तूपासून, मनुष्याच्या बुद्धीला लाजविणाऱ्या कशा गोष्टी जगांत घडून येतात याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे दमडी मशीद होय. ह्या मशिदीच्या नांवावरूनच ही मशीद कोणत्या साधनांनीं व सहाय्यानें झालेली आहे याची यथार्थ साक्ष पटते. ही मशीद किल्ल्याचे उत्तरेस सुमारें अर्ध्या मैलाच्या अंतरावर आहे. किल्ल्यावर काम करीत असलेल्या मजुरांनीं रोज एक एक दमडी देऊन त्यापासून उत्पन्न झालेल्या रकमेनें ही मशीद निर्माण झाली. हा दमडी फंड जमविण्याचें काम किती वर्षें चाललें होतें याचा जरी निश्चित काल ठरवितां आला नाहीं, तथापि तो जमा करण्याचें काम ज्यानें केलें असेल त्याची कळकळ व चिकाटी ही प्रशंसनीयच समजली पाहिजे. निश्चयाचे बलावर जगांत फलाची निष्पत्ती झालीच पाहिजे, याच सिद्धांताची ही इमारत साक्ष पटवीत आहे. ज्यावेळीं किल्ल्याचें तटाचें काम सुरू झालें त्यावेळीं या मशिदीचे जागेवर एक फकीर रहात असे. किल्ल्याचे कामावरील लोक सायंकाळीं घरीं जातांना त्याच्या हातावर एक एक दमडी टाकीत असत. ही रक्कम जेव्हां बरीचशी झाली. त्यावेळीं त्याला ही मशीद बांधण्याची कल्पना सुचली.

या मशिदीस सहेलखानी मशीद म्हणतात, व ती १५६७ च्या सुमारास सहेलखान या नांवाच्या इसमानें तयार केली असावी असा समज आहे. या मशिदीवर नक्षीकाम फारच अप्रतिम आहे यांत शंका नाहीं

त्याचप्रमाणें **जुम्मामशीद** या नांवाची एक मशीद कोर्टाचे पश्चिमेस आहे. ती औरंगजेब बादशहाचे कारकीर्दीत अबदूल रसूल या नांवाच्या काजीनें बांधिली. सरकारांत गोपाळ खत्री या नांवाचा इसम मयत झाला होता त्याची बिनवारसी इस्टेट सुमारें २० हजार रुपये होती तिचा विनियोग ही मशीद बांधण्याकडे कराच असें सांगितल्यावरून ती तयार झाली असें समजतें.

या मशिदीवरून विजापूर व दिल्ली एथील जुम्मामशीद वाचकांच्या डोळ्यांसमोर राहण्याचा संभव आहे. परंतु त्या मशिदी व यांच्या नांवांत मात्र साम्य आहे. यापेक्षां जास्त वर्णनीय असें कांहीं नाहीं.

हुसेन मशीद मदरसा या नांवाची पोलीस लाईनजवळ इमारत आहे. इ० स० १८१८ मध्यें तिचा उपयोग तुरुंग म्हणून करण्यांत आला होता. ती बुऱ्हाण

निजामशहाचे वेळीं सय्यद हुसेन मशाहदी यानें शियापंथाचा प्रसार करण्याकरितां बांधली व तिच्यामध्यें एक शाळा स्थापन केली.

असल्याच प्रकारचा शियापंथाचा प्रसार करण्याकरितां म्हणून जी दुसरी इमारत आहे तिला **बारा इमामचा कोठला** असें म्हणतात. महंमद पैगंबरानंतर मुसलमानी धर्माचे जे बारा गुरु होऊन गेले, त्यानांच बारा इमाम असें म्हणतात. इमाम याचा अर्थ धर्मगुरु असा आहे. जो दरवर्षी मोहरम भरतो त्याचा अर्थ म्हणजे मुसलमानी धर्मांत जे दोन पंथ आहेत कीं ज्यांना शियापंथी लोक व सुयापंथी लोक असें आपण समजतों. त्यांचा भेद पडण्याचें कारण कीं, महंमद पैगंबरानंतर तीन खलीफ झाले. त्यांनाच गादी मिळावी असें जें म्हणत होते ते सुनीपंथाचे लोक व महंमद पैगंबराचा जांवई अली यालाच गादी मिळावी अशा मताचा पुरस्कार करणारे लोक शियापंथाचे होत. अली, हसन व हुसेन या तिघांचे प्राण धर्माकरितां खर्ची पडले त्यामुळें त्यांच्याबद्दल भक्ति करणें हें अगदीं स्वाभाविक आहे. मोहरमचा सण ज्याला आपण समजतों तो म्हणजे हुसेनच्या मृत्यूचा दिवस दुःखाचा पाळणें असा अर्थ आहे. करबिल्याचें ' रणक्षेत्र ' पुण्यभूमि होऊन गेली व हजारों मुसलमान तेथील साधुवीरांच्या कबरींचें दर्शन घेण्यास जाऊं लागले. तैमूरलंगाचा प्रतिवर्षी हसन व हुसेन यांच्या कबरीच्या दर्शनास जाण्याचा नेम होता. परंतु एकदां त्यास उशीर झाला त्यावेळीं त्यास हसनहुसेननीं दर्शन देऊन आमच्या कबरस्थानाच्या प्रतिमा करून त्यांचें दर्शन घेत जा असें सांगितलें. त्याप्रमाणें हसनहुसेनच्या कबरीप्रमाणें ताबूत करण्याचा प्रघात पडला.

मुख्य जो बारा इमामाचा ताबूत होतो तो तलवारींचा असतो. ह्या तलवारी हुसेनला तलवारींनीं जखमा झाल्या त्याचें द्योतक आहेत. नगरच्या बादशहांनीं इ० स० १५५६ च्या सुमारास शियापंथाचा स्वीकार केला व कोठल्याची स्थापना केली. त्यावेळेपासून हा प्रघात एथें सुरू झाला आहे. अहमदनगरचे बादशहा सुनीपंथाचे होते. परंतु दुसराच बादशहा बुऱ्हाणशहा यानें शिया-पंथाची स्थापना केली. शहा ताहीर हा त्यावेळीं एक मुत्सद्दी होता, व तो शियापंथाचा होता. त्या पंथाचा प्रसार करण्याची त्याची तीव्र इच्छा होती. बुऱ्हाणशहाचा मुलगा अब्दुल कादर हा आजारी असतांना, कसलेंही औषधोपचार केले असतां बरा न झाल्याकारणानें शहा ताहीर यानें बादशहास असें सांगितलें कीं, ' आज शुक्रवार आहे. आपण हजरत रसुल्लिल्ला व बारा इमाम यांच्या नांवानें दानधर्म

करावा व जर त्यांच्या कृपेनें शाहाजाद्यास आराम वाटला तर शियापंथाचा स्वीकार करीन ' असा नवस व अभिवचन घेतलें. पुढें ' नवसाप्रमाणें ' घडल्यामुळें बादशहानें शिया-पंथाची दीक्षा घेतली. कोठल्याचा मुख्य हेतु शिया-पंथाचा प्रसार करण्याचा असल्याकारणानें येथें शियापंथाची शाळा स्थापन झाली. इराण वगैरे दूरदूरच्या देशाहून शियापंथांतील प्रसिद्ध विद्वानांना आग्रहानें बोलावून आणून येथेंच ठेवून घेतलें. त्यांच्यामार्फत शिया-पंथाचें शिक्षण देण्यांत येत होतें. याप्रमाणें ही प्रसिद्ध शिक्षणसंस्था अहमदनगर येथें उदयास आली.

अहमदनगर शहराच्या इतिहासामध्यें विशेष महत्त्वाची वाटणारी गोष्ट म्हणजे छत्रपति शिवाजीमहाराज यांचे वडील शहाजी राजे भोंसले यांचा जन्म ज्या सत्पुरुषाच्या प्रसादानें झाला व ज्यांचें नावही या सत्पुरुषानें आपल्या नांवावरून ठेवलें, त्या सत्पुरुषाची कबर आपणांस किल्ल्याचे उत्तरेस सुमारें अर्ध्या मैलांवर **' शहाशरीफचा दायरा '** म्हणून प्रसिद्ध असून ती तेथें पाहिल्यास मिळेल. शहाशरीफचा संबंध मराठ्यांच्या इतिहासाशीं येत आहे. कारण राजे मालोजी भोंसले यांची या सत्पुरुषाचे ठिकाणीं पूर्ण श्रद्धा होती.

शहाशरीफ हे मूळचे गुजराथेंतील राहणारे होते. त्यांचा जन्म इ० स० १५२६ मध्यें गुजराथेंत झाला व आपल्या बहिणीस बरोबर घेऊन (बीबी अच्छीमासाहेब हें तिचें नांव होतें) ते नगरास बुऱ्हाण निजामशहाचे कारकीर्दींत आले. लहानपणापासून त्यांची साधुवृत्ति असे. त्यांनीं लग्न केलें नाहीं. त्यांची साधुत्त्वाची कीर्ति चोहोंकडे पसरली होती. राजे मालोजी भोंसले यांस पुत्रसंतति होत नव्हती. त्यांनीं शहाशरीफची प्रार्थना केली. त्यावेळीं साधूनें आपल्या तोंडांतील विडा काढून तो मालोजींच्या राणीस खावयास दिला. या प्रसादानें तिला दोन मुलें झालीं तीं पुढें दर्शनास आणल्यानंतर त्या सत्पुरुषानें एकाचें नांव शहाजी व दुसऱ्याचें नांव शरीफजी असें ठेवलें.

राजे मालोजी यांची भक्ति या सत्पुरुषावर कशा रीतीनें बसली याबद्दल अशी आख्यायिका आहे कीं, राजे मालोजी भोसले स्वारीस निघाले असतां त्यांनीं ही रमणीय जागा पाहून डेरे देण्याचा हुकूम केला. त्यावेळीं शहाशरीफ ओढयाच्या कांठीं ध्यानस्थ बसले होते. त्यांस चोपदारांनीं तेथून जाण्यास सांगितलें. त्यांनीं तें ऐकलें नाहीं म्हणून चोपदारांनीं चिडून त्यांच्या दंडाला धरून जबरदस्तीनें दूर नेऊन ठेवलें. तेव्हां त्यांनीं एक लिंबाची काडी तोंडापुढें धरली व तोंडानें

बंदुकीच्या आवाजाप्रमाणें आवाज काढला. त्या सरसें त्या काडींतून दोन गोळ्या निघून, त्यांनीं ते दोन चोपदार मरण पावले. ही गोष्ट मालोजी राजे यांस समजल्यावर व त्यांनीं साधूची प्रार्थना केल्यावर ते चोपदार पुन्हां जिवंत झाले. या चमत्कारामुळें राजांनीं बुऱ्हाणनगर येथें ४० दिवस मुक्काम केला, व ह्या सत्पुरुषाला पुत्राचा प्रसाद मागितला.

या चमत्काराप्रमाणेंच दुसरा चमत्कार असा घडला कीं, औरंगजेब बादशहा नगरास आला त्यावेळेस म्हणजे १७०६ मध्यें शहाशरीफच्या दर्ग्यापुढें चौघडा वाजत आहे असें त्यास समजलें. व फकिराच्यापुढें मुसलमानी धर्माप्रमाणें चौघडा वाजणें निषिद्ध आहे म्हणून त्यांनीं तो बंद केला. त्यावेळीं औरंगजेबास एक दृष्टांत होऊन त्यास एक वृद्ध फकीर दिसला, व त्यानें बादशहास तुझी ही नौबत आजपासून दोन महिन्यांनीं बंद होईल असा शाप दिला. औरंगजेबास पश्चात्ताप झाला. त्यानें चौघडा पुन्हां सुरू केला. परंतु साधुवचन खरें ठरून दोन महिन्यांनीं त्याचा अंत झाला. शहाशरफि हे १६१७ च्या सुमारास मरण पावले शहाशरीफ हे ज्या घरांत राहात होते त्या घरास हल्लीं ' हुजरा ' असें म्हणतात. त्यांनीं आपल्या बहिणीचें लग्न फिरोज महंमद नांवाच्या कुलीन गृहस्थाशीं लावून दिलें. तिला लाड महंमद नांवाचा एक मुलगा व बीबी मानकती नांवाची एक मुलगी अशीं दोन अपत्यें झालीं. त्या दोन्ही मुलांस शहाशरीफ ह्यांनीं दत्तक घेतलें. त्यांचा वंश अद्यापि चालू आहे. याप्रमाणें या सत्पुरुषाच्या स्मृतीबरोबरच श्रीछत्रपतीच्या परमपूज्य वडिलांची स्मृति ही पवित्र जागा देत आहे. अशीच आणखी एक जागा अहमदनगर शहरांत आहे. राजे मालोजी भोंसले हे निजामशाहीचे प्रमुख सरदार होते व ते मधूनमधून नगरास राहत असत. नवी पेठ व तिच्या पूर्वेचा भाग येथें मालोजीचा तळ असे. अमृतेश्वराचें देवालय, त्या समोरील कारंजें हें मालोजींनीं बांधलें. त्याच्या उत्तरेस असलेला सरकारवाडा हा मालोजीचा वाडा होता. शहाजीराजे भोंसले हे याच ठिकाणीं राहत असत व त्यावरून शहराच्या या भागास पूर्वी शहाजी मोहला असें नांव मिळालें होतें. छत्रपति शिवाजीमहाराजांनीं अहमदनगरवर स्वारी केली त्यावेळीं त्यांचा मुक्काम याच ठिकाणीं होता. सरतेशेवटीं अहमदनगर हे पेशव्यांचे ताब्यांत कसें गेलें याबद्दल उल्लेख करून हें प्रकरण बंद करणें योग्य होईल.

अहमदनगरची निजामशाही दिल्लीच्या राज्यांत सामील झाल्यानंतर तेथील

मुसलमान सरदारांत दिल्लीच्या बादशहाच्या सलगीचा कविजंग सरदार होता. त्याचे ताब्यांत किल्ला व शहर होतें, व शेवटीं शहर व किल्ला कविजंगाचे ताब्यांत असतांना नानासाहेब पेशव्यास मिळाला. यावरून कविजंगाची मुखत्यारी दिसून येते. सरदार कविजंग (थोर योद्धे) हे दिल्लीश्वराचे नात्यानें आपणांस जांवई म्हणवीत असत व आपणांस बादशाही देणगी म्हणून किल्ल्याची कुलमुखत्यारी आपणांकडे आहे असें म्हणवीत होते. अशा स्थितींत त्यांच्याशीं संधान बांधल्या-शिवाय पेशव्यांस इलाज नव्हता. इ० स० १७६० पावेतों किल्ल्याची मालकी कविजंगाकडे होती. त्यापूर्वी ५।१० वर्षे पेशव्यांचा नगरावर डोळा होता. लढाई करूनही त्यांना तें घेतां आलें असतें. परंतु १७६० तील उदगीरच्या लढाईनंतर हल्लींचा नगराजिल्ह्या पेशव्याचे ताब्यांत हैदराबादकराकडून आला होता. आणि अहमदनगरवाले कविजंग स्वतंत्र आणि जोरकस असल्यामुळें नाना-साहेब पेशव्यानें त्यांच्याशीं वेगळें राजकारण सुरू केलें, व कविजंगानें परिस्थिति ओळखून किल्ला बिनशर्त पेशव्यांचे ताब्यांत दिला व आपला भरपूर फायदा करून घेतला. पेशवेही कविजंगला दिलेल्या वचनाप्रमाणें अखेरपर्यंत वागले. त्यास स्वराज्यांतील जहागिरी दिल्या. त्याच्या इस्टेटीस हैदराबादकरांकडून उपद्रव लागूं दिला नाहीं. कविजंग पुढें कोणासच न मिळतां व सैन्य न ठेवितां जहागिरीचा उपभोग घेत स्वस्थ बसला. पानिपत व खर्डे या लढायांत तो कोणी-कडेच नव्हता. नानासाहेब पेशव्याचें राजकारणांत कविजंगांनीं नगर देण्याबद्दल जो खलिता पाठविला त्यावर तो मान्य केल्याबद्दल श्रीमंत पेशवे यांनीं पाठविलेल अहदनामा किंवा शपथपत्र खालीलप्रमाणें आहे.

श्री.

अहदनामा.

शाहामत व बसालित व मतलबत कविजंगबहादूर सलेमहू आज आजीब बाळाजी बाजीराव प्रधान व सदाशिव चिमणाजी अहदनामा लिहला ऐसाजे तुमचे मतलबीचे कलमे बारा अलाहिदा बंदावर कलमे करून दिलीं आहेत. ती गोळी न वाजवितां किल्ला सरकारचे स्वाधीन झाल्यावर वंशपरंपरेनें चालतील ये बाबे वसवसा न धरावा. राघो बुकदेव याजबरोबर बेलभंडारा पाठविला आहे हा घेऊन किल्ला बे वसवसा सरकार लोकांचे हवाली करणें. सर्व गोष्टींची खातरजमा असुं

देणें. तुमचे सर्व प्रकारें लेकराचे लेकरीं चालविलें जाईल. तुमचे आमचे दरम्यान ईश्वर आहे. कराराप्रमाणें सरकारांतून चालेल. सदवर स्थळ हवाला करणें.

द० १६ रबिलावल सनसीतैन ज्यादा क्या लिहण.

श्री

राजाराम नरपती

हर्ष निधान पंत बाळाजी बाजीराव प्रधान.

बारा कलमी सनद जी आहे तींत १ गोळागोळी न वाजतां किल्ला ताब्यांत देणें. २ कोणाकडलि प्राणहानी न होऊं देणें. ३ पेशव्यांनीं कविजंगाचे लेकराचे-लेकरीं उत्पन्न चालविणें. ४ त्यांच्या इस्टेटीस मोंगलांकडून व निजामाकडून उपद्रव न होऊं देणें. वगैरे कविजंगाचे मतलबी १२ कलमें तींत आहेत. सनदेच्या एका बाजूस श्रीमंत नानासाहेब, श्रीमंत सदाशिवराव, श्रीमंत विश्वासराव या प्रत्येकांच्या प्रत्येक कलमापुढें ' करार केले, करार केले ' असें लिहून खालीं सह्या केल्या आहेत.

कविजंगांना राशीनगांव सवाई रावसाहेब पेशवे यांचे कारकीर्दीत इनाम मिळालें. (सन १७७५) पुढें नगर शहरपैकीं, भाग चांदुराणा बुद्रूक, मेहेकरी व आगडगांव याबद्दल करमाळे तालुक्यांतील कुंभेज विटरगांव व पाटेगांव (कर्जत) हीं गांवें इंग्रजी अमलांत त्यांस मोबदल्यानें मिळालीं व तीं अद्याप त्यांचे वंशजांकडे चालू आहेत. नगरास कविजंगाची हवेली प्रसिद्ध आहे.

प्रकरण ८ वें.

पौराणिक इतिहास.

दंडकारण्य–रामक्षेत्र–महाराष्ट्र.

चित्रकूट पर्वतावर राम असतां तेथें दक्षिणेकडून अनेक ऋषि त्यांचे भेटीस आले होते. त्यांच्या तर्फे जाबाली ऋषीनें रामचंद्रास सांगितलें कीं, " जनस्थानांत राक्षसांनीं फार अनर्थ केला आहे. त्यांचे मुख्य त्रिशिर, खर व दूषण यांनीं चौदा हजार सैन्य जनस्थानांत आणून ठेवलें आहे. त्यांच्या भयानें बरेच

ऋषि तुजकडे आले आहेत; पण नवी बातमी अशी आहे कीं, हे तिघे येथें येऊन हल्ला करणार आहेत व ताटका आणि मारिची यांच्या वधाचा सूड घेणार आहेत त्यामुळें ऋषिमंडळी फार घाबरलेली आहे." रामानें ऋषिमंडळीस आश्वासन दिलें. परंतु या बातमीनें त्यांना भय वाटून ते रामाचें न ऐकतां निघून गेले.

राक्षसांचें जनस्थानांत फार प्रस्थ माजलें, त्यांचें निर्दलन समूळ केलें पाहिजे म्हणून रामांनीं चित्रकूट पर्वत सोडला व ते दंडकारण्याकडे निघाले. वाटेंत अत्रि ऋषींचा आश्रम लागला, तो आनंदगिरी नांवाचा होता. (हें स्थान माहूर असावें.) तेथें त्रिरात्र राहून दंडकारण्याकडे चालले. या आश्रमप्रांतास वनस्थळ हें नांव होतें. त्यांत बरेच आश्रम होते. त्यांत कोठें एक दिवस, कोठें सात दिवस असा मुक्काम करीत करीत त्यांचा प्रवास चालला होता. पुढें एक दुर्गम वन लागलें. त्यांत विराध असूर होता. रामलक्ष्मण पुढें व सीता मागें असे चालले असतां विराधानें सीतेस पकडलें. पण रामलक्ष्मणांनीं तिला सोडवून विराधास ठार केलें. मरतांना त्याला पश्चाताप होऊन त्यानें रामाची क्षमा मागितली. व शरभंगाच्या आश्रमाकडे जाण्यास सांगितलें. यावरून अत्रीचें वनस्थान व दंडकारण्याचें जनस्थान यांचेमध्यें विराधाचें जंगल होतें, तें जंगल ओलांडून राम दंडकारण्यांत शिरले व शरभंगाचे आश्रमांत आले. शरभंग दंडकारण्याच्या कोपऱ्यावर राहात असावे असें दिसतें.

याच वनांत सुतीक्ष्ण महर्षि राहातो, त्याकडे जाण्यास शरभंगानें रामास सांगितलें. शरभंगांत रामास भेटण्यास बरेच तपस्वी आले होते. व त्यांनीं राक्षसांनीं चालविलेल्या छळाची हकीकत रामास सांगितली. हा त्रास मिटावा व खरदूषणांचें निर्दलन करावें म्हणून मी इकडे आलों आहें, असें रामानें त्यांस आश्वासन दिलें व राम सुतीक्ष्णाचे आश्रमांत गेले.

सुतीक्ष्णाच्या आश्रमांतील जलानें श्रम निवारण होत असे. हा आश्रम दंडकारण्यांत सुरक्षित जागीं होता. तेथें राक्षसांचा उपसर्ग होणें शक्य नाहीं असें त्यांनीं रामास सांगून तेथें सहा महिने ठेवून घेतलें. पुढें रामलक्ष्मण व सीता दंडकारण्यनिवासी ऋषींच्या आश्रमांचें दर्शन घेण्यास निघाले एथपासून चालतांना सीतेस मागें न घालतां रामलक्ष्मणाचे मधें ठेवीत असत. यावरून राक्षसांचें भय बरेंच असावें असें दिसतें. त्यांच्याबरोबर बरेच तापसी होते. त्यांच्यासह त्यांनीं दंडकारण्यांत संचार केला. सुतीक्ष्णाचे आश्रमापासून राम मांडकिर्णी ऋषींच्या

आश्रमांत गेले. त्यास मंदकर्णी हेंही नांव होतें. तेथें पंचाप्सर नांवाचा गुप्त तलाव होता. हें स्थान मांडवगण असावें. तेथें रामाचा कांहीं वर्षें मुक्काम होता, व तेथून ते दंडकारण्यांत संचारास निघाले व तो पुरा झाल्यावर पुन्हां सुतीक्ष्णाचे आश्रमांत आले. यावरून सुतीक्ष्णाचा आश्रम हा दंडकारण्याच्या मध्यभागीं असावा असें वाटतें, व दंडकारण्य त्याभोंवतीं पसरलें असावें व सुतीक्ष्ण हा त्यांतील आश्रमांचा कुलपती असावा.

रामानें अगस्तीच्या आश्रमाकडे जाण्याचें ठरविलें व रस्ता विचारला आगस्तीच्या आश्रमाच्या मार्गावर दाट अरण्य आहे व त्यांतून मार्ग सांपडणें कठीण आहे म्हणून रामानें वाट सांगण्याची विनंती केली. सुतीक्ष्णांनीं सांगितलें कीं, अरण्य गहन असल्यानें अगस्तिस्थान सांपडणें कठीण आहे म्हणून त्याचा धाकटा भाऊ महामती याचे आश्रमांत प्रथम तुम्ही जावें. तुम्ही आज संध्याकाळीं तेथें पोहोंचाल. रात्रीं तेथें मुक्काम करा व नंतर पुढें जा. त्यांनीं महामतीच्या आश्रमाची खूणही सांगितली. तेथें न पेरतां साळी व केळीं उगवतात, पिंपळीचीं व सुपारीचीं झाडें व नागवेली तेथें आहेत. शिवाय वनें व उपवनें तेथें आहेत. राम तिकडे निघाले व महामतीच्या आश्रमीं आले. तेथें मुक्काम करून पुढची वाट विचारली.

या सर्व माहितीवरून राम अत्रिऋषींचा आश्रम सोडून विराधाचें जंगल ओलांडून दंडकारण्यांत शिरले, त्यावेळीं आर्यांची वस्ती गोदावरीच्या दोन्ही तटांस ठिकठिकाणीं झालेली होती. व ऋषींचे आश्रम पसरले होते. आश्रम म्हणजे ऋषींचें वसतीस्थान इतकाच अर्थ नसून त्यांच्या आश्रयाखालीं असलेला प्रदेश असा अर्थ अगस्ती व सुतीक्ष्ण यांच्या आश्रमांच्या वर्णनावरून दिसतो. टोकें ते नांदेड, या गोदावरीच्या दोन्ही तटांस हे आश्रम होते. शरभंगाचा आश्रम दंडकारण्याच्या (गोदावरी ही दंडकारण्यास मध्यवर्ती होती) पूर्वेच्या कोपऱ्याकडे असावा. तेथून राम सुतीक्ष्णाच्या मध्यवर्ती आश्रमास आले. हा सुरक्षित ठिकाणीं होता. पैठणच्या दक्षिणेस गर्भागिरीवर काशीकेदारनजीक हा आश्रम असावा, तेथें धौमऋषींचा आश्रम होता, अशा दंतकथा आहेत. ही जागा मध्यवर्ती असून सुरक्षित आहे व तेथून रामानें अगस्तीकडे जाण्याच्यापूर्वी दंडकारण्यांत संचार केला. सुतीक्ष्णाच्या आश्रमांत कंद, मूळ, फळें विपूल होतीं असा रामायणांत दाखला आहे व अद्यापही काशी केदारच्या डोंगरांत थोडाबहुत तशीच परिस्थिति आहे. येथें राम आले होते असा दाखला मिळतो. तेथें रामकुंड व लक्ष्मण-कुंड अशीं तीर्थें आहेत.

सुतीक्ष्णाकडून राम महामतीकडे गेले. तो आश्रम डोंगरगण येथें असावा. या ठिकाणीं रामाचे पुष्कळ दाखले आहेत. येथूनच पश्चिमेस अगस्तिआश्रमाची मर्यादा सुरू होते. त्याकाळीं इकडे दाट जंगल असून त्यांत मधूनमधून आश्रम होते. पर्जन्य फार पडत असल्याकारणानें महामतीच्या आश्रमाचें वर्णन डोंगरगणास लागू पडण्यासारखें आहे. सहाशें वर्षांपूर्वीं देखील इकडे आतिशय झाडी होती असा उल्लेख सांपडतो. सुतीक्ष्णाश्रमासभोंवतालच्या प्रदेशापेक्षां अगस्तिआश्रमाभोंवतीं अरण्य जास्त दाट असावें असें दिसतें. त्यांत रस्ता चुकण्याची भीति होती; इतर ठिकाणीं ती नव्हती असें रामाच्या उद्गारावरून दिसतें.

रामास अगस्तीच्या आश्रमाचा रस्ता महामतीनें सांगितला. त्यांत ज्या मार्गदर्शक खुणा सांगितल्या त्या महत्त्वाच्या असून त्यांचा विचार केला पाहिजे. शिवादिदेवांनीं निर्माण केलेल्या ठिकाणीं अगस्तीचा आश्रम असून ज्या देवांचे भूमीस पाय लागणें कठीण त्यांचें वास्तव्य तेथें आहे असें महामति सांगतो. या देवस्थानावरून अगस्ति जेथें राहतात तिकडे जाण्यास मार्ग आहे असें सांगून त्या स्थानाचा त्यानें निर्देश केला आहे. अर्थात् या स्थानावरून अगस्तिआश्रमास जाण्याचा त्यानें मार्ग सांगितला हें उघड दिसतें. (अशीं स्थानें म्हणजे १ सौब्रह्मण्य ब्रह्मस्थान, २ शिवस्थान (येथें शिवशक्ति आहे), ३ इंद्र, ४ चंद्र. ५ कुबेरस्थान, ६ अग्निस्थान, ७ भृगुस्थान, ८ यमस्थान, ९ धर्मस्थान, १० वायुस्थान, ११ कार्तिकस्वामीचें स्थान). रामायणांत वर्णन पुढीलप्रमाणें आहे.

स तत्र ब्रह्मणः स्थानं शिवस्थानं तथैव च ।
अग्नेः स्थानं महेंद्रस्य स्थानं चैव विवस्वतः ॥
स्थानं धातुविधातुश्च वायुस्थानं तथैव च ।
कार्तिकेयस्य च स्थानं धर्मस्थानं तथैवच ॥

यांत १ ब्रह्मदेवाचें, २ शिवाचें, ३ अग्नीचें, ४ इंद्राचें, ५ सूर्याचें, ६ धामाचें, ७ वायूचें, ८ कार्तिकेयाचें, ९ धर्माचें अशीं नऊ स्थानें सांगितलीं आहेत. श्रीएकनाथांनीं अनेक ग्रंथांचे आधारें जें भावार्थ रामायण लिहिलें, त्यांत हीं स्थानें दर्शविलीं आहेत व थोडी अधिक माहिती ध्वनित केली आहे. त्यांनीं दिलेलीं स्थानें १ सौब्रह्मण्य ब्रह्मस्थान, २ शिवस्थान–शिवशक्ति, ३ इंद्रस्थान, ४ चंद्रस्थान, ५ कुबेरस्थान, ६ अग्निस्थान, ७ भृगुस्थान, ८ यमस्थान, ९ धर्मस्थान, १० वायुस्थान, ११ कार्तिकेयस्थान इतकीं स्थानें आहेत. या स्थानांचा शोध करतां प्रवरानदीच्या

कांठीं तीं सर्व असून त्या त्या ठिकाणच्या दंतकथा अद्याप उपलब्ध आहेत व स्कंदपुराणांतही या स्थानांचा उल्लेख आला आहे. अगस्ति-आश्रमास जाणाऱ्या रस्त्यावर हीं होतीं हें लक्षांत घेतलें म्हणजे प्रवरानदीच्या कांठानें राम अगस्ति ऋषीच्या आश्रमास जाऊन पोहोंचले असें उघड दिसतें.

रामायण, स्कंदपुराण व दंतकथा यांच्या आधारें या स्थानांचा विचार करतां सौब्रह्मण्य-ब्रह्मस्थान हें सोनई ब्राह्मणी येथें असावें असें दिसतें. जरी हें प्रवरेच्या कांठीं नाहीं तथापि महामतीच्या डोंगरगण येथील आश्रमांतून प्रवराकांठीं जाण्यास मध्यंतरीं हें स्थान असल्यानें त्याचा येथें उल्लेख असावा. सौब्रह्मण्य अथवा सुब्रह्मण्येश्वर याचेंच अपभ्रष्टरूप सोनेश्वर आहे. सोनई ब्राह्मणी हें प्रचारांत असलेलें जोडनांव व ब्राह्मणी हे ब्रह्मवनी याचें अपभ्रष्ट स्वरूप, यावरून हें ब्रह्मस्थान असावें असें दिसतें. शिवस्थान शिवशक्ति हें नेवासें होय व तेंच कुबेराचें स्थान आहे. कुबेराचे निधीवरून याचें निधिनिवास हें नांव पडलें, व अर्धनारी नटेश्वर अथवा मोहनीराज हें शिवशक्तीचें स्वरूप आहे. कुबेरानें स्थापन केलेला नलिकेश्वर (ज्यास हल्लीं नारदमुनी हें नांव आहे) नेवासें बुद्रुक येथें आहे. पाचेगांव हें अग्निस्थान असावें व चतुर्विध अन्न पचविणारा अग्नि (पावक) याचें एखादें देवस्थान तेथें असण्याचा संभव आहे. पाचेगांव हें पावकग्रामाचें अपभ्रष्टरूप आहे. हें ध्यानांत घेतां वरील अनुमानास बळकटी येते. त्यापुढें भेरडापूर ऊर्फ भार्गवपूर हें भृगुस्थान असून तेथें भृगुऋषीचा आश्रम होता. तेथें भृगूची समाधि पहावयास मिळते. याच भृगूनें दंडक राजास शाप दिल्यानें त्याचें राज्य लयास गेलें व तेथें दंडकारण्य झालें. चांदगांव हें चंद्रस्थान आहे व चंद्रस्थापित चंद्रेश्वर तेथें आहे. पुढें बेलापूर (बन) हें इंद्राचें स्थान असून त्यानें स्थापन केलेल्या बिल्वेश्वरावरून बेलापूर नांव आलें. यमस्थान अगर रामायणाप्रमाणें विवस्वानाचें स्थान हें कोल्हार असावें. कालस्वरूप धारण करणारी भगवती काली तेथें आहे. कोल्हार हें नांव कालघर अगर कालधरा अशाच एखाद्या शब्दाचें अपभ्रष्ट रूप असावें. यापुढें धाता विधाता हें रामायणांत सांगितलेलें जोडस्थान आहे. या जोडस्थानास अश्विनौ या नांवानें संबोधिलें जात असल्यानें त्या ठिकाणास अश्वी हें नांव मिळालें असावें. यानंतर वायुस्थान म्हणजे जोर्वे, कार्तिकेयस्थान म्हणजे मंगळापूर व धर्म-स्थान म्हणजे धांदरफळ अशीं असावींत असें वाटतें. धांदरफळ येथें पूर्वी ऋषिआश्रम होता अशी दंतकथा आहे. धांदरफळ हें धर्मधरपल्लि या

नांवाचें अपभ्रष्टरूप असल्यानें तें धर्मस्थान असणें संभवनीय आहे. कार्तिकेयास मंगल हें नांव असल्यास नकळे परंतु तसें असल्यास मंगलपूर हें कार्तिकेयाचें स्थान होईल. जोर्वे हेंही पुरातन स्थान असल्याच्या दंतकथा आहेत.

यापुढचें स्थान म्हणजे आगर येथें अगस्तिऋषींचा आश्रम होता. तेथें अगस्तींची समाधि असून रामासंबंधीं बरेच दाखले आहेत. त्यांचा विचार करण्यापूर्वी महामतीनें रामास अगस्तिआश्रमाची जी वाट सांगितली त्या वरील स्थानाचा विचार करतां प्रथम ब्रह्मस्थान म्हणजे सौब्रह्मण्य अगर सोनई ब्राह्मणी, दुसरें शिवस्थान (नेवासें), तिसरें अग्निस्थान (पाचेगांव), चौथें महेंद्रस्थान (बेलापूर), पांचवें विवस्वतस्थान (कोल्हार), सहावें धातुविधातुस्थान (अश्वी), सातवें वायुस्थान (जोर्वे), आठवें कार्तिकेयस्थान (मंगळापूर) व नववें धर्मस्थान (धांदरफळ) हीं क्रमानें सांगितलीं आहेत, व त्यापुढें अकोलेंनजीक आगर येथें आगस्तीचा आश्रम सांगितला. या मार्गावरील सोनई, नेवासें, बेलापूर, कोल्हार हीं निश्चित करतां येत असल्यानें बाकीचीं स्थानें निश्चितपणें प्रमाण मानण्यास हरकत नाहीं. यावरून डोंगरगणवरून राम निघून सोनईवरुन नेवाशें येथें आले व प्रवरेच्या कांठानें अकोल्याकडे अगस्तिआश्रमांत गेले असें निर्विवाद दाखवतां येतें.

डोंगरगण तें नेवासें यांमध्यें एक रेषा कल्पिली तर तिच्या पश्चिमेस दाट जंगल असून त्यांतून जाण्यास रस्ताही नव्हता व रामाच्या वेळीं प्रवरानदीच्या कांठींच आर्यांची थोडीशी वस्ती होती. दंडकारण्याचा हा भाग अरण्यस्वरूपच होता. वरील रेषेच्या पूर्वेस मात्र दंडकारण्याची झाडी बरीच तुटली असून मधूनमधून ऋषींचे आश्रम होते हें दिसून येतें. त्या आश्रमांपैकीं, डोंगरगणास महामतीचा व काशीकेदारास सुतीक्ष्णाचा असे दोन आश्रम पाहिले. यांस हल्लीं वाल्मिकीचा व भरद्वाजाचा (अगर धौमाचा) अशीं दंतकथेवरून नांवें आढळतात. कदाचित् हीं नांवें कुलावरून हीं पडलीं असावींत व वाल्मीक व भरद्वाज हीं नांवें कुलपतींची व महामति व सुतीक्ष्ण हे ऋषि त्यांच्याच कुळांतील असावेत असें वाटतें. या नांवाचा कांहींतरी संबंध असावा यापेक्षां जास्त सांगणें कठीण आहे. परंतु महामति हे अगस्तीचे धाकटे बंधु (अगर गुरुबंधु) होते असा उल्लेख रामायणांत आहे त्याचा उल्लेख करणें अवश्य आहे. त्यावेळीं आणखीही कांहीं आश्रम होते. हल्लीं देवदैठण येथें दधीतीचा, संवत्सर येथें बिभांडक व शृंग ऋषींचा, भिंगार येथें भृंग ऋषीचा, मांडवगण येथें मांडव्याचा, अर्वी मुद्गलेश्वर येथें मुद्गल,

मौद्गल, जाबाली, विष्णु व भागीरथी या ऋषिपंचकाचा (ही मंडळी गाणपत्य होती. अष्टविनायकांपैकीं, सिद्धटेक येथील सिद्धिविनायक यांचें स्थान या आश्रमांतील अद्याप आहे) पारनेर येथील पाराशरांचा अशा कांहीं ऋषींच्या आश्रमांचा दाखला मिळतो व ते सर्व रामाच्या कालीं अस्तित्वांत असणें शक्य आहे. दंडकारण्यांत संचार करतांना या आश्रमासही रामानें भेट दिली असावी. याशिवायही आणखी आश्रम त्या काळीं असतील परंतु त्यांची माहिती मिळाली नाहीं. जामखेडनजीकचें रामेश्वराचें स्थान असाच एखादा आश्रम असावा.

रामलक्ष्मणसीता अगस्तीऋषींच्या आश्रमांत आल्यावर कांहीं दिवस राहिलीं. तेव्हां दंडकारण्याचा इतिहास अगस्तीनें रामास सांगितला. विंध्याद्रिपासून रामेश्वरापर्यंत पूर्वी इकडे दंडक राजाचा प्रदेश होता. तो एकदां शिकारीस गेला असतां त्याच्या हातून भृगुकुलोत्पन्न च्यवनऋषीचा अतिशय अपमान झाला. त्यामुळें त्यास ऋषीनें शाप दिला कीं, स्वराज्यासह तूं भस्म होशील. त्याप्रमाणें दंडक राजा भस्म झाला व त्याचें राज्यही भस्म झालें व मुलूख उजाड झाला. कालांतरानें तेथें अरण्य झालें व राक्षसांनीं वस्ती केली म्हणून देवांनीं अगस्तीऋषीस वस्ती करण्यास पाठविलें. अगस्ती बरीच मंडळी बरोबर घेऊन वाराणशीहून निघाले व विंध्याद्रि ओलांडून दंडकारण्यांत आले व तेथें त्यांनीं वसाहती करण्यास सुरवात केली. हा आर्यांचा दक्षिणेंत वसाहती करण्याचा प्रारंभ होय. त्यांनीं ठिकठिकाणीं आश्रम स्थापन केले, व गोदावरीच्या दोन्ही तटांस वसाहत केली. उत्तरतटास ऋग्वेदी आर्य राहिले व दक्षिणतटास यजुर्वेदी आर्य राहिले. ही स्थिति अद्यापही पहावयास मिळते. आर्यांच्या वसाहती झाल्या पण इकडे कोणी आर्यराजा नसल्याकारणानें राक्षसांचा (अर्थात् अनार्यांचा) त्यांना फार त्रास होत असे. अशा दोन राक्षसांस—वातापि व आतापि यांस अगस्तीनेंच ठार मारलें. राम आल्यावर अगस्तीनें राक्षसांनीं चालविलेल्या धुमाकुळाची हकीकत सांगितली व राक्षसांचा नाश करण्याविषयीं त्यास विनंती केली. ‘ तूं आल्यानें ह्या दंडकारण्यांतील वस्ती सुखरूप होऊन या दंडकारण्यास रामक्षेत्र असें नांव मिळेल ’ असेंही सांगितलें. प्रत्येक धार्मिक कृत्यांत या रामक्षेत्राचा अद्याप उल्लेख होत असतो.

अगस्तीनें रामास अस्त्रविद्या सांगून नाशीकनजीक पंचवटींत आश्रम करून राहण्यास सांगितलें व निरोप दिला. त्याच भागांत पद्मपूर येथें खरदूषणादि

राक्षस चौदा हजार सैन्यासह राहिले होते हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे. परंतु रामचंद्राचा नाशिक येथील मुक्काम व तेथील हकीकतही प्रस्तुत नगरप्रांताच्या इतिहासाच्या बाहेरील असल्यानें त्याबद्दल विचार करणें विषयातिक्रम होईल. एक मुद्याची गोष्ट मात्र विचारांत घेणें जरूर आहे. रामांनीं अगस्तींचा आश्रम सोडल्यानंतर त्यांची व जटायूची गांठ पडली. जटायूला रामचंद्राची ओळख पटल्यावर आपली व दशरथाची मैत्री व दशरथाबरोबर एका युद्धांत असल्याची हकीकत जटायूनें रामास सांगितली व पंचवटीस स्वत: पोहोंचतें केलें. इतकेंच नव्हें तर रामाचा तेथें मुक्काम असेपर्यंत त्यास मदत देण्याचें कबूल केलें. जटायू हा गृधांचा राजा. त्याची व दशरथाची मैत्री व एका स्वारींत दोघांनीं बरोबर असणें यावरून या गृधांचा व आर्यांचा प्रेमभाव होता असें दिसतें. जटायूचें राज्य सह्याद्रि पर्वताच्या डोंगरी प्रांतावर व खालच्या प्रदेशांतही पसरलें असावें. असें रामास त्यानें पंचवटीस असेंपर्यंत सीतेच्या संरक्षणाचे कामीं काळजी नको असें कबूल केलें होतें त्यावरून दिसतें. रावणानें सीतेस नेलें त्यावेळीं जटायूनें त्यास अडविलें. परंतु दोघांच्या युद्धांत जटायू मारला गेला. ही गोष्ट पट्टाकिल्ल्याजवळ झाली. कदाचित् पट्टाकिल्ला हीच त्याची राजधानी असावी. त्याच्याजवळ केळीगांवीं रामाचा जो उल्लेख सांपडतो तेथें जटायू व राम यांची पहिली भेट झाली असावी. जटायूचे गृध हे डोंगरी लोक असावेत व त्यावरून त्यांना गृध हें नांव पडलें असावें. असें लोक अद्याप इकडे आहेत. कदाचित् हे गोंड अगर कोळी लोक असावेत. कोळी लोकांत अगस्तीला फार मान आहे. ते अद्याप अगस्तीची उपासना करतात. अगस्ती याच लोकांचे जवळ आश्रम करून राहिले होते.

परंतु नाशीक येथील हकीकत सोडून दिली तरी पुढें रामाचा नगरप्रांताशीं विशेषत: गोदातटाशीं पुन्हां प्रत्यक्ष संबंध येत आहे. राक्षसांनीं तळ दिला तें पद्मपूर हें नाशीकगांव असें समजतात. परंतु तें बरोबर दिसत नाहीं. पद्मपूर हें दिंडोरीच्या उत्तरेस असून खर, दूषण व त्रिशिर यांचे नांवावरून वसलेलीं तीन गांवें त्याभोंवतालीं आहेत. या तीन राक्षसांचा रामानें वध केल्यावर रावणानें कपटविद्येनें रामास हुलकावणी देऊन सीता चोरून नेण्याचा घाट घातला व मारिचीस पंचवटीपासून रामास दूर नेण्यास सांगितलें. सुवर्णमृगाचे रूपानें मारिची आला व राम त्याचे मागें लागला. ज्या ज्या ठिकाणीं मृगरूपी मारिची व राम यांची गांठ पडली तीं तीं स्थानें अद्याप दाखवतात व नाथांनीं आपल्या रामा-

यणांत त्यांचा उल्लेख केला आहे. शूर्पणखेचें नाक जेथें कापलें तें नाशीक. त्याच्या पूर्वेस चाटोरी गांव आहे. येथें रामाकडे पाहून मृगानें पाठ चाटली. चांदोरी येथें राम व मारिची समोरासमोर आले परंतु मृग तेथून निसटला व रामास हुलकावणी देऊन नांदूर मध्यमेश्वर येथें पुन्हां दिसला. तेथून डावीकडे झपाट्यानें निघाला व गंगातटांनीं चालला बरेंच पुढें गेल्यावर बाणाचे टप्प्यांत येतो असें रामानें पाहून बाण लावण्यास जावें तों मृगानें पळावें असें पांच ठिकाणीं झालें. तीं ठिकाणें म्हणजे कोकमठाण, मातुळठाण, नागठाण, बादामठाण व भौमठाण हीं गांवें होत. पुढें रामानें बाण सोडला तें देहगांव. मृगाचा पाय मोडला तें नेऊरगांव व मृगाचें मस्तक तुटलें तें भालगांव. भालगांव टोक्याजवळ आहे.

सुवर्णमृगकथेचा थोडासा बारकाईनें विचार केल्यास तें रूपक असून त्यांत आर्य–असुर लढाईचा इतिहास फारच खुबीनें दर्शविला आहे हें उघड दिसतें. पद्मपूर येथील राक्षसांचा बिमोड झाला, खर–दूषणादि मारले गेले व रामानें तो प्रांत आर्यांचा केला. आर्यांनीं सर्व राक्षस हांकून लावले ही ओरड लंकेस गेल्यावर रावणानें मरिचीच्या सल्ल्यानें आर्यांवर हल्ला करण्याचें ठरविलें व प्रत्यक्ष तोंड न देतां गनिमी काव्याची लढाई देण्याचें ठरवून त्याप्रमाणें तयारी केली. पंचवटीवर एकदम हल्ला न करितां मधूनमधून हल्ले करावेत व ते दोन्हीकडून-पूर्वेकडून व उत्तरेकडून करावेत असा घाट घातला. ही गोष्ट मृगयेच्या वेळीं सहज रामास कळली असावी व राक्षसांचा बीमोड करण्याचा त्यानें निश्चय करून लक्ष्मणास पंचवटींत ठेवून राक्षसांस हाकून काढण्याकरितां राम निघाले. पहिली गांठ चाटोरें येथें पडली. परंतु थोडीशी चकमक होतांच राक्षस पळाले. रामानें त्यांस चांदोरीस समोरासमोर गाठलें पण तेथूनही ते पळाले व नांदूर मध्यमेश्वरीं आले. तेथपर्यंत रामानें त्यांचा पाठलाग करून त्यांस गांठलें. परंतु राक्षसांनीं लगेंच बगल मारून पळ काढिला व कोपरगांवच्या पश्चिमेस गंगातटाकीं पांच ठिकाणीं आपलीं ठाणीं देऊन लढाईची तयारी केली. राम तेथपर्यंत येऊन त्यानें लढाई केली व कोकमठाण, मातुलठाण, नागठाण, भायठाण व बाग–ठाण या ठिकाणीं राक्षसांचा पुरा बीमोड केला. यांतून मारिच सुटला परंतु नेऊरगांव येथें रामानें त्यास जखमी केलें व शेवटीं भालगांव येथें मारिलें. कोकमठाण येथें दरवर्षीं जी गोफणधोंड्यांची लढाई होते ती या लढाईचें स्मारक म्हणून होते.

मारिचीनें रामास बरेच दिवस झुलविलें व पंचवटीपासून पुष्कळच अंतरावर आणलें. बरेच दिवस झाले, राम परत येत नाहींत असें पाहून सीतेच्या सांगण्यावरून लक्ष्मण रामाच्या मदतीस गेला परंतु यामुळें रावणास अनायसेंच फावलें. तो पंचवटीवर हल्ला करून सीतेस घेऊन पळाला. जटायूस ही बातमी लागतांच त्यानें रावणास अडविलें व त्याचा पराभव केला. सीतेस सोडवून व रावणास कैद करून त्यानें त्या दोघांस आपली राजधानी पट्टन (पट्टाकिल्ला) येथें आणिलें असावें. परंतु जटायूच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्यानें कपटानें जटायूस मारिलें व सीतेस घेऊन विमानमार्गानें तो लंकेस गेला. अशी ही थोडक्यांत दंडकारण्यांतील आर्य-असुरांच्या युद्धाची हकीकत आहे. सीतेचा शोध करीत रामलक्ष्मण पट्टाकिल्ल्यांत आले व त्यांना मरणोन्मुख स्थितींत जटायू दिसला. त्यानेंच प्रथम सीता रावणानें नेली ही बातमी रामास सांगितली हेंही येथें सांगणें अवश्य आहे. यापेक्षां या विषयासंबंधीं जास्त लिहिणें या स्थळीं योग्य होणार नाहीं. रामाचा या भागांत ज्या ज्या ठिकाणीं संबंध आला तेवढी माहिती देणें अवश्य होतें व बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी यांत येतात त्यामुळें ही रामकालीन माहिती मर्यादेबाहेर वाढली.

परंतु या ठिकाणीं आर्यानार्यांविषयीं थोडेसें लिहिणें अवश्य आहे. पुढील कालांतील इतिहासाशीं त्याचा निकट संबंध येत आहे. आर्य नाहींत ते अनार्य हें उघडच आहे. परंतु या अनार्यांत दोन महत्त्वाचे भेद दिसतात. पहिले राक्षस अथवा असुर व दुसरे इतर अनार्य. आर्य ज्याप्रमाणें मूळचे दक्षिणचे रहिवाशी नव्हत तसे राक्षस हेंही मूळचे दक्षिणचे नसून लंकाबेटांत त्यांचें मुख्य वसतीस्थान होतें. लंकाबेट हल्लीं जरी लहान दिसत असलें तरी रामाच्या कालीं तें बरेंच मोठें असून त्यावर राक्षसांचें बलाढ्य साम्राज्य पसरलें होतें व रावण हा त्यांचा अधिपति होता. विंध्याद्रीच्या उत्तरेस आर्य व रामेश्वराचे दक्षिणेस राक्षस या दोन्ही राज्यांच्या मध्यें दक्षिणप्रांतांत इतर अनार्यांचीं लहानमोठीं राज्यें होतीं. त्यांत पंपासरोवराचे दक्षिणेस वानरांचें राज्य (वानर-म्हणजे माकड नसून एक जातीविशिष्ट नांव आहे) होतें व त्याच्यावर शरभ, प्रबंध, गृध, विराध वगैरे लहानमोठीं अनार्यांचीं राज्यें असल्याचा रामायणांत उल्लेख आहे. ह्या इतर अनार्यांच्या राज्यावर आपलें वर्चस्व असावें असा आर्यांचा व राक्षसांचा डाव चालला होता व त्याप्रमाणें अगस्ती ऋषीच्या नेतृत्वाखालीं दंडकारण्यांत आर्यांची तुकडी ज्या

वेळेला प्रथम आली त्यापूर्वींच तो प्रदेश आपला व्हावा ह्या हेतूनें राक्षसांनीं आपला तळ तेथें दिला होता. त्यामुळें अगस्ती ऋषींना त्यांच्याशीं सामना करण्याचा प्रसंग आला हें वातापि व आतापि ह्यांच्या वधाच्या कथेवरून उघड दिसून येतें. अगस्ती ऋषींनीं जरी दंडकारण्यांत वसाहत केली तरी तेथील राक्षसांचा पक्का बंदोबस्त त्यांच्याकडून झाला नाहीं. तथापि तेथील मूळचे राहणारे जे अनार्य ह्यांना मात्र त्यांनीं आपलेसें करून घेतलें व त्यांच्या सहाय्यानें दंडकारण्याचा बहुतेक भाग आर्यसंस्कृतिखालीं आणून ठिकठिकाणीं ऋषींचे आश्रम स्थापन केले. त्यावेळेचे मूळचे अनार्य हेही शूर, धाडशी व इमानी होते. परंतु थोडेसे भोळसर होते हें जटायूच्या उदाहरणावरून दिसतें.

आर्यांनीं त्यांच्यावर आपलें स्वामित्व गाजविण्याऐवजीं त्यांच्यांतच मिसळून त्यांच्यांतील दोष नाहींसे करून आपली संस्कृति मात्र त्यांच्यांत पसरावी व अशा रीतीनें आर्यानार्यांचा मिलाफ व्हावा असा जारीचा प्रयत्न चालू ठेवला होता. उलट राक्षसांचा हेतु अनार्यांस पूर्णपणें जिंकून त्यांना आपले ताब्यांत आणण्याचा होता व त्याप्रमाणें त्यांनीं अनार्यांशीं विरोध केला. यामुळें साहजीकच अनार्यांचा ओढा आर्यांकडे होऊन त्यांच्यांत प्रेमभाव उत्पन्न झाला. यामुळें राक्षस जास्त चिडून त्यांनीं आर्यांस जास्तीच त्रास देण्यास सुरवात केली. व राम दंडकारण्यांत येतो हें कळल्याबरोबर चौदा हजार सैन्यासह खरदूषण वीरांची रवानगी केली व पद्मपूर येथें रामास विरोध करण्याच्या हेतूनें आपला तळ दिला. रामानें दंडकारण्यांतील सर्व राक्षसांचा ह्या सैन्यासह बीमोड केला व दंडकारण्य हें तेथील आर्यानार्यांना त्यांचा प्रेमभाव वृद्धिंगत होण्यासाठीं सुरक्षित केलें. यामुळेंच दंडकारण्यास रामक्षेत्र हें नांव पडलें. रामानें वानरांच्या सहाय्यानें राक्षसांच्या राज्यावर स्वारी करून रावणदिकांचा वध केला व बिभीषणाची तेथें स्थापना केली. त्यामुळें साहजीक दंडकारण्यांतील राक्षसांचा उपद्रव अगदीं नाहींसा होऊन आर्यानार्यांचा प्रेमभाव वाढत वाढत दोघांचा उत्तम प्रकारें मिलाफ होऊन आर्यसंस्कृतीचा पगडा अनार्यांवर बसला. आर्यांनीं आपल्या समाजव्यवस्थेंत अनार्य गोंवून घेतले व धर्माचीं उच्च तत्त्वें त्यांना शिकविलीं. त्याबरोबरच अनार्यांच्याही कांहीं चालीरीति त्यांनीं स्वीकारल्या. या रीतीनें रामक्षेत्रांतील आर्यानार्यांच्या मिलाफानें एक मोठें राष्ट्र निर्माण झालें, व त्यांत परस्पर सलोखा असणारीं अशीं कांहीं राज्यें तयार झालीं. अशीं राज्यें पांडवकालीं इकडे भरभराटीस आलेलीं आढळतात. त्यांपैकीं

मणीपूर येथील बभ्रुवाहनाचें, रत्नपूर येथील मकरध्वजाचें व कुंतनपूर येथील चंद्रहासाचें हीं तीन प्रबळ असून पांडवांनीं अश्वमेध केला त्या प्रसंगीं त्यांचा उल्लेख जैमिनीअश्वमेधांत सांपडतो.

मणिपूर याचें हल्लींचें नांव मानूर असून पाथर्डीपेट्यांतील टाकळीनजीक हें गांव आहे व तें मानूरटाकळी या नांवानें ओळखलें जातें. तेथें पांडवकालीं बभ्रुवाहन नांवाचा नागवंशीय राजा राज्य करीत होता. हा अर्जुनाचा मुलगा अर्जुन तीर्थयात्रेच्या निमित्तानें दक्षिणेंत संचार करीत असतां मणिपुरास आला व तेथील राजकन्या उलुपि इच्याशीं त्यानें गांधर्व पद्धतीनें विवाह केला. ती नागवंशीय असल्यानें तिला नागकन्या म्हणतात. तिच्यापासून अर्जुनास बभ्रुवाहन नांवाचा मुलगा झाला. परंतु आपली बायको व मुलगा तेथेंच ठेवून अर्जुन इंद्रप्रस्थास गेला. पुढें मणिपूरच्या गादीवर दुसरा वारस नसल्यानें बभ्रुवाहन बसला व त्यानें उत्तम प्रकारें राज्य चालविलें. हा शूर व सत्यनिष्ठ होता. भारतीय युद्ध संपल्यानंतर धर्मराजानें अश्वमेधयज्ञ सुरू केला व अश्वमेधाचा घोडा सोडला त्याबरोबर अर्जुनादि वीर होते. घोडा बभ्रुवाहनाच्या राज्यांत शिरतांच त्याच्या सैनिकांनीं पकडून राजधानीस नेला. परंतु तो आपल्या बापाचा आहे असें समजतांच आईच्या आज्ञेवरून बभ्रुवाहन सैन्यासह अर्जुनास सामोरा गेला व दोघांची गांठ पाथर्डी येथ पडली. त्यांत अर्जुनानें बभ्रुवाहनाचा अत्यंत अपमान केला त्यामुळें चिडून बभ्रुवाहनानें युद्ध पुकारलें व पांडवांच्या सैन्याचा पराभव करून कर्णाचा मुलगा वृषकेतु यास ठार मारलें. या पराभवामुळें अर्जुनास फार वाईट वाटलें व त्यावरून पार्थ रडला म्हणून पाथर्डी हें नांव त्या स्थानास पडलें असें सांगतात. अर्जुनानें परत जोराचा हल्ला करण्याचें ठरविलें व दोन्ही सैन्याची लढाई पुन्हां मणिपूरपासून तीन कोसांवर असलेल्या तीनखडी या गांवीं झाली व तींत अर्जुन मारला गेला. या लढाईचें स्मारक म्हणून अद्याप तेथें एक रणस्तंभ आहे. अर्जुनाच्या मृत्युमुळें बभ्रुवाहनाच्या आईस फार वाईट वाटलें व तिनें मुलाची फार निर्भर्त्सना केली. पुढें बभ्रुवाहनानें एका मण्याच्या योगानें अर्जुन व वृषकेतु यांस जिवंत केलें व श्रीकृष्णांनीं येऊन दोघांचा समेट केला अशी ही कथा आहे. बभ्रुवाहन व त्याच्या नागवंशाचे दाखले मानूर येथें आढळतात व तेथील नदीला नागस्तला हें अद्याप नांव आहे. हे नागलोक आर्य नव्हते तरी ते आर्यांइतके तेजस्वी होते

व त्यांचा आणि आर्यांचा शरीरसंबंध होत असे, हें वरील कथेवरून दिसून येईल. त्यामुळें आर्य व हे मिसळून गेले होते हें उघड आहे.

अश्वमेघाचा घोडा बभ्रुवाहनाचे राज्यांतून बाहेर पडला व मयुरध्वज अथवा मकरध्वज याच्या राज्यांत शिरणार तोंच मयुरध्वजाचा मुलगा ताम्रध्वज यानें सरहद्दीवर पकडला व तेथें पांडवांची आणि ताम्रध्वजाची लढाई होऊन पांडवांचा पराभव झाला. ही लढाई मिरीनजीक माकें येथें झाली व स्मारक म्हणून अद्याप तेथें एक रणस्तंभ उभा आहे. श्रीकृष्णांनीं पुढें युक्तीनें मकरध्वजाचा व अर्जुनाचा समेट घडवून आणला. मकरध्वजाची राजधानी रत्नपूर याच प्रांतांत होती. असेंच एक प्रबळ राज्य चंद्रहासाचें होतें. व अर्जुनास त्याच्याशींही तहच करावा लागला. चंद्रहासाची राजधानी कुंतलपूर यास हल्लीं कोतूळ असें म्हणतात

बभ्रुवाहन, मकरध्वज व चंद्रहास यांचीं वर्णनें पुराणग्रंथांत जीं दिलीं आहेत त्यावरून हे अत्यंत धर्मनिष्ठ, सत्यव्रत व परोपकारी होते. तसेच शूर व युद्धशास्त्र आणि राजनीति यांतही पक्के मुरलेले होते असें दिसून येतें. त्यांची प्रजाही तशीच असली पाहिजे व त्यावेळचे आर्य जरी त्यांस कमी लेखीत असत तरी ते आर्यांच्या तोडीचे, थोडेसें कांकणभर जास्त म्हटलें तरी चालेल, असे होते.

दंडकारण्यांत रामांनीं सुरक्षितपणा आणल्यावर आर्यानार्यांच्या सख्यानें मिलाफानें रामक्षेत्राची उत्तरोत्तर भरभराट होत होत तेथें प्रबळ राजे व सुसंस्कृत प्रजा यांचा दाखला पांडवकालीं आढळतो. व या संस्कृतिमुळेंच रामक्षेत्रास महाराष्ट्र म्हणजे बुद्धिमंतांचें राष्ट्र हें नांव मिळालें. व तेथील शूर वीरांस महारथी हें नांव मिळालें. याचेंच रूपांतर मराठे ह्या शब्दांत होऊन त्यांची भाषा ती मराठी भाषा या नांवानें प्रसिद्धीस पावली. रामक्षेत्राची वस्ती जसजशी वाढत चालली तसतसें त्यास विशेष महत्त्व प्राप्त होऊन ठिकठिकाणीं विद्यापीठें स्थापन होत गेलीं. व ऋषींच्या आश्रमांत विद्यादानाचें कार्य चालू असतां इतर ठिकाणीं विद्येचा प्रसार होण्यासाठीं लहान लहान पीठें स्थापन झालीं. रामांनी ज्या ठिकाणीं मारिचाचा पुरा मोड केला तीं कोकमठाण, मातुलठाण, नागठाण, भामठाण व बादाठाण हीं प्रथम विद्यापीठें बनलीं व गोदावरीचे कांठीं विद्यादानाचें कार्य सुरू झालें. या स्थानास पुराणांत मातृकास्थान असें नांव आहे, व जसजसा रामक्षेत्राचा उत्कर्ष होत होत त्याचें महाराष्ट्र बनलें, तसतसें एका मध्यवर्ती विद्यापीठाची आवश्यकता अधिक वाटून पैठण ऊर्फ प्रतिष्ठान हें मध्यवर्ती

विद्यापीठ निर्माण झालें. वरील पांच मातृकास्थानांतील मातृकांची प्रतिष्ठा पैठण येथें झाल्यामुळें त्यास प्रतिष्ठान हें नांव मिळालें, असा पौराणिक आधार आहे. उत्तरेस आर्यांची पवित्र नदी जशी भागीरथी तशी दक्षिणेस गोदावरी. वरील प्रसिद्ध विद्यापीठ जसें काशी तसें दक्षिणेंत गोदावरीवरील पैठण असा दृढ समज होऊन पैठण दक्षिण काशी या नांवानें महत्त्वास चढलें व महाराष्ट्राचें मुख्य केंद्र बनलें, व गोदावरी ही महाराष्ट्राची मध्यवर्ती रेषा बनली. त्र्यंबकेश्वरापासून तों नांदेडपलीकडे असणाऱ्या बासरगांवापर्यंत गोदावरी महाराष्ट्रांत आहे व बासरगांवीं जी सरस्वती देवी आहे तिच्या पश्चिमेस महाराष्ट्र व पूर्वेस तैलंगण असा पौराणिक उल्लेख आहे. या गोदावरीच्या उत्तरतटास शेषाद्रि पर्वतापर्यंत व दक्षिणतटास भीमानदीपर्यंत महाराष्ट्राची हद्द मानण्यांत येते. पूर्वेस प्रणिता अथवा पेनगंगा व पश्चिमेस सह्याद्रि अशी मर्यादा पौराणिक ग्रंथावरून दिसतें. महाराष्ट्राचा उदय व मध्यवर्ती पैठणची स्थापना या एकाच काळीं घडून आलेल्या गोष्टी आहेत, व तेवीसशें वर्षांपूर्वीच्या अशोकाच्या शिलालेखांत पैठणाचा उल्लेख आहे. परंतु तो ऐतिहासिक काल मानण्यांत येत असल्यानें त्याबद्दल उल्लेख करणें व पौराणिक माहिती एथेंच संपविणें योग्य होईल.

या प्रांताविषयीं आणखी जी पौराणिक माहिती उपलब्ध आहे तिचा थोडक्यांत विचार करणें इष्ट आहे. ही माहिती गोदावरी, प्रवरा व भीमा या नद्यांच्या कांठीं जीं स्थानें आहेत त्यांविषयींची आहे. त्यांपैकीं, गोदावरीविषयीं बरीच माहिती वर आलेलीच आहे. गोदावरी हल्लींच्या अहमदनगर जिल्ह्यांत बखतपुराजवळ प्रवेश करते. एथें भृगुकुलोत्पन्न शुक्राचार्य राहत असत व त्या शेजारीं वडगांव एथें आंगिरसाचा आश्रम व कुंभारी येथें वृद्ध गौतमऋषींचा आश्रम होता. तेथें गौतमेश्वराचें पुरातन मंदीर अद्याप आहे. ह्या वृद्ध गौतमांनीं पाथर्डी पेट्यांतील श्रीवृद्धेश्वरक्षेत्रीं तपश्चर्या केली व तेथून येथें राहण्यास आले. त्यांच्या सांगण्यावरून शुक्राचार्यांनीं तपश्चर्या करून संजीवनीमंत्र प्राप्त करून घेतला तें स्थान कोपरगांवनजीक शुक्रेश्वर होय, व तेथेंच कचानें शुक्राचार्यापासून संजीवनीमंत्र मिळविला. त्या स्थानास कचेश्वर म्हणतात कचेश्वराजवळ विष्णुमंदिरानजीक जो पार आहे तेथें शुक्राचार्यानें कचास संजीवनीमंत्र दिला असें सांगतात. संवत्सर येथें नारदकुलांतील साठ ऋषी राहत असत, त्यांचीं स्थानें दाखवतात. यांच्या नांवावरून साठ संवत्सरांचीं नांवें पडलीं अशी दंतकथा आहे. कोकमठाण

येथून जवळच आहे व रामानें मारिचीवर हल्ला केल्याचें वर्णन मागें आलेंच आहे व पुढें मातृकास्थान होऊन विद्यापीठ बनल्याचा उल्लेखही आला आहे. राम-मारीच यांच्या लढाईचें स्मारक अद्याप प्रतिवर्षी येथें करतात. मारिची सुवर्ण-मृगाचा वेष घेऊन पंचवटीस गेला त्यावरून मृग म्हणजे हरीण नसून मृग जातीचे लोक असावेत व यांची वस्ती गोदावरीकांठीं असावी असा संशय येतो. कोक-मठाण व संवत्सर येथें जें स्मारकयुद्ध होतें तें वैशाख शुद्ध तृतीयेपासून पांच दिवस चालतें. संवत्सरानजीक विभांडकऋषीचा आश्रम होता व त्याचा मुलगा शृंग याचें देऊळ गांवाजवळ आहे. यापुढील प्रसिद्ध क्षेत्र पुणतांबें अथवा पुण्यस्तंभ आहे. यास गोदावरीचें मुख मानतात व जातवेद अग्नीमुळें या स्थानास महत्त्व आहे असें सांगतात. येथून मातुलठाण जवळ असून तेंही मातृकास्थान होतें. त्या-वरून पुणतांबें तें मातुलठाण हा गोदाकांठ एक विद्यापीठच होतें. हा पुण्यप्रदेश थेट बांजरगांवापर्यंत पसरला होता व त्यांत सरस्वती, श्रद्धा, मेधा, गायत्रि व सावित्रि या पांच नद्या आहेत. श्रद्धेस हल्लीं कात हें नांव असून ती पुणतांब्यापाशीं गंगेस मिळाली. मेधा पुरणगांवाजवळ, गायत्रि नाऊरजवळ, सावित्रि बाभुळगांवा-जवळ व सरस्वती मातुलठाणाजवळ अशा या पांच नद्या गोदावरीस मिळाल्या. ह्या पांच नद्यांचीं नांवें वैदिक आहेत व त्यांच्या पुण्यप्रदेशाचें अग्रस्थान तें पुण्य-स्तंभ होय यावरून हें बरेच विस्तृत असें विद्यापिठ होतें हें उघड दिसून येतें. यापुढील मातृकास्थानें म्हणजे, नागठाण, भामठाण व बादवण हीं होत. हीं गांवें हल्लीं मोंगलाईत आहेत व त्यांच्या आसपास गोदातटीं बरींच पुरातन देवांचीं व ऋषींचीं स्थानें आहेत. पिंपळगांवांत अश्वत्थरूपी विष्णु, सराळें येथें वटरूपी शंकर, चांदगांवांत पळसरूपानें चंद्र, सुरेगांवांत रुईच्या रूपें सूर्य, तसेंच वडगांवांत बहि-रव, खानापुरांत ब्रह्मदेव, अमरापुरांत प्रियव्रत, नेवरगांवांत वशिष्ट, बेलपांढरींत अश्विनीकुमार वगैरे देवर्षींचीं ठिकाणें या मातृकास्थानांभोंवतीं पुराणांत सांपडतात. जामगांव येथेंही शूनशेषऋषि राहत होते. सारांश कुंभारीपासून टोक्यापर्यंत दोन्ही बाजूंचा गोदातट प्रथम आर्यांनीं गजबजलेला होता असें पौराणिक वर्णना-वरून दिसतें. त्यांत पांच विद्यापीठें (मातृकास्थानें) असून पुणतांबें हें त्या प्रदे-शाचें मुख्य स्थान होतें, व आर्यसंस्कृति जसजशी पसरत गेली तसतसें पुणतांब्याचें महत्त्व कमी होऊन पैठणचीं प्रतिष्ठा झाली व तें महाराष्ट्राचें केंद्र बनलें. गोदातटा-विषयीं आणखी दोन गोष्टी नमूद करण्यासारख्या आहेत. या तटाकीं नरसिंहाचीं

स्थानें बरींच आढळतात व पुराणांतही त्यांचा उल्लेख आला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे डोणगांव, कमालपुरीं या गांवीं गोदावरीचें स्नान कोणीं करीत नाहीं तें निषिद्ध मानलें आहे व यज्ञाचे विध्वंसक तेथें राहतात, म्हणून ती जागा पवित्र नाहीं असा पौराणिक कथेचा झोंक आहे.

गोदावरीच्या खालोखाल प्रवरानदीस महत्त्व आहे. दक्षिणेंत प्रथम वसाहत करणारे अगस्तीऋषि यांनीं रासक्षभुवन येथें आतापि व वातापि यांचा वध करून तेथें कल्याणदायी शनिदेव (शंभो देव) याची स्थापना केली व ठिकठिकाणीं आश्रम स्थापून प्रवरेच्या उगमापासून जवळ अ लेल्या अकोलें येथें आपला आश्रम स्थापन केला. रामलक्ष्मण व सीता प्रवराकांठानें त्या आश्रमाकडे गेले हें मागें आलेंच आहे. प्रवरा हें नांव ह्या नदीस अगस्तीनें दिलें. विष्णूच्या अंगुष्टपर्वापासून निघाली म्हणून पर्वरा असें मूळचें नांव होतें असें सांगतात. परंतु वैदिकपद्धतीनें वर (श्रेष्ठ जिल्ह्यांत एकवटलें ती प्रवरा असा सरळ अर्थ होत असून अमृतत्त्व सर्वांत श्रेष्ठ असल्यानें प्रवरेस अमृतवाहिनी हें नांव मिळालें. अमृताशीं प्रत्यक्ष संबंध येत असणारी एक कथा या नदीकांठीं घडल्याचा पौराणिक दाखला आहे. देवदानवांनीं समुद्रमंथन केल्यावर त्यांतून अमृतकलश निघाला व त्यासंबंधीं दोघांचा वाद सुरू झाला. त्यावेळीं विष्णूनें मोहिनीचें रूप धारण करून दानवांस भुलविलें व त्यांस अमृताऐवजीं सुरा पाजली व देवास अमृत वाढलें त्यावेळीं दानवांपैकीं राहू हा युक्तीनें देवांच्या पंक्तीस बसला व त्यानें अमृत प्राशन करण्यास आरंभ केला. परंतु तें त्याच्या घशाखालीं उतरण्यापूर्वींच चंद्रानें ही गोष्ट विष्णूच्या नजरेस आणिली व विष्णूनें तत्काळ सुदर्शन फेंकून राहूचा शिरच्छेद केला अशी पौराणिक कथा आहे. अमृत वाढलें ती जागा नेवासें होय, व शिरच्छेदामुळें राहूचें शीर जेथें उडून पडलें ती राहूरी होय. मोहिनीरूप धारण करणाऱ्या विष्णूचें स्थान नेवासें हें असून तेथें मोहनीराज अद्याप आहे. त्यांस अर्धनारीनटेश्वर मानतात. मोहनीराजास पूर्वीं महालया अथवा म्हाळसा असें नांव होतें व शके १२१२ मध्यें नेवासें एथें ज्ञानेश्वरांनीं ज्ञानदेवी लिहिली, त्यांत त्यांनीं जगाचें जीवनसूत्र श्रीमहालया एथें आहे असा निर्देश केला आहे. नेवासें खुर्द हें गांव पूर्वीं म्हाळसापूर ह्या नांवानेंच प्रसिद्ध होतें व हल्लीं त्या गांवीं जो जुना कोट दाखवतात त्याच्या आंतच ह्या म्हाळसापुराची वस्ती असे व नेवासें बुद्रुक यास निवास म्हणत असत. महालया व मोहनीराज हे एकच हें निर्विवाद आहे. परंतु ज्ञानेश्वर-

कालीं मोहनीराज हें नांव प्रचारांत नव्हतें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अमृताची वांटणी करण्याचें स्थान नेवासें व त्याची वांटणी करणारा मोहनीराज ही कथा ज्ञानेश्वरकालीं प्रचारांत असल्यास तसा उल्लेख ज्ञानदेवींत येणें अवश्य होता. तो नसल्यामुळें व महालया हें नांव आल्यामुळें अमृताची वांटणी व राहूचा वध या दोन गोष्टींचा संबंध या स्थळीं ज्ञानेश्वरकालानंतर लागला असावा असा संशय येतो.

तथापि समुद्रमंथनामुळें प्राप्त झालेल्या अमृताची व सुरेची देवांना व दानवांना प्राप्ती झाली या कथेंत अध्यात्मिक सिद्धांत जरी खुबीनें गोंवला गेला असला तरी त्याच्या मुळाशीं एकादी ऐतिहासिक गोष्ट असल्यास ती पाहणें अवश्य आहे. प्रवरा ही अमृतवाहिनी आहे. तिच्या ठिकाणीं अमर व आहे व देव हे अमर असल्यानें देवांची नदी ती प्रवरा हें उघड दिसतें. तसेंच राहूच्या शरिरापासून सुरेचा प्रवाह वाहूं लागला तो सुराप्रवाह म्हणजे मुळा अशी पौराणिक कथा आहे. राहू हा दानव होता, व मुळा ही त्याच्या शरिरांतून निघाली अर्थात् मुळा ही दानवाची नदी हें मानण्यास हरकत नाहीं व प्रवरेस जें धार्मिक महत्त्व आहे तें मुळेस नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. अमृताकरतां देवदानवांची लढाई लागली तें अमृत म्हणजे अमृतवाहिनी प्रवरेचा प्रांत होय. त्या युद्धांत मोहिनीनें दानवास सुरा पाजली म्हणजे देवाचें सैन्यानें दानवांस युक्तीनें घुलवून मुळाकांठाकडे पिटाळलें. परंतु दानवांचा राहू याच्या डोक्यांत फसवणुकीचा प्रकार शिरला व त्यामुळें त्यानें देवांवर हल्ला केला व त्यांत राहूचा वध झाला. ही गोष्ट नेवासें येथें झाली राहूचें वास्तव्य मुळाकांठीं असल्यानें त्याच्या नगरीस राहुपुरी (राहुरी हें नांव असावें असेंच सुसंगत, ऐतिहासिक सत्य या पौराणिक कथेच्या मुळाशीं असावें असें वाटतें. ही देवदानवांची लढाई म्हणजे अगस्तीची दक्षिणेंत आल्यावर अगस्तीप्रमुख आर्य व दंडकारण्यांतील दानव जातीचे अनार्य यांचेमधील असून तिच्यांत यश आल्यानंतर अगस्ती अकोल्यास वास्तव्य करून राहिले असावे. मूळ रहिवाशांची ती मुळा व आर्यांनीं वस्ती केली ती प्रवरा असा नद्यांच्या नांवावरूनही बोध निघण्यासारखा आहे.

प्रवरेच्या कांठीं असलेल्या देवांच्या स्थानांचा उल्लेख रामाच्या अगस्तीआश्रमाकडील प्रवासाच्या वेळीं आलाच आहे. त्यांत रामायणकालानंतर बेलापूर या स्थानास बरेंच महत्त्व आलें होतें. बेलापूर हें महेंद्रस्थान असून इंद्रानें स्थापन

केलेल्या बिल्वेश्वरावरून बेलापूर हें नांव पडलें हें मागें आलेंच आहे. त्याच स्थानाचा पुढें उत्कर्ष होऊन त्यास हरिहरेश्वरक्षेत्र हें नांव मिळालें व त्यांत निरनिराळ्या देवांची स्थापना झाली. त्यांत इंद्रस्थापित केशव (सृष्टि कर्तृत्वात्) विष्णुस्थापित गोविंद (वृषभारूढत्वात्) हे दोन प्रमुख होत. कालांतरानें या स्थानांचें महत्त्व कमी होत गेलें व त्यामुळें कलीयुगांत केशवगोविंद लिंगें गुप्त झालीं असें मानण्यांत आलें. परंतु एका शूद्राच्या भक्तीनें त्यास दृष्टांत झाला व दोन स्थाणू (खांब) प्राप्त होऊन त्यांत आम्ही प्रगट होऊं, त्यांची भक्ति कर असें केशवगोविंदांनीं येऊन सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं केल्यामुळें या भागांत केशवगोविंदउपासना पुन्हां सुरू झाली व ती भोंवतीही पसरली. केशवगोविंदाचें एक स्थान मिरीनजीक शिंगवें केशव येथें पुरातन आहे. परंतु तो स्थाणू नसून मूर्ति आहेत. प्रवरेच्या कांठीं बरींच पुरातन देवस्थानें आहेत.

तिसरी पवित्र नदी म्हणजे भीमा. श्रीक्षेत्र पंढरीमुळें हिला अद्याप फार महत्त्व आहे. तिच्या कांठीं नगर जिल्ह्यांत अर्वी मुद्गलेश्वर व सिद्धटेक हीं स्थानें आहेत. वास्तविक हीं मिळून एक ऋषिआश्रम होता व तेथें मुद्गल, मौद्गल, जाबाली, विष्णु व भागिरथी या पांच ऋषिवर्यांचें वास्तव्य होतें. अर्वी येथील अश्वत्थ व सिद्धटेक येथील सिद्धिविनायक हे दोन अद्याप त्या स्थानांचें अवशेष आढळतात. पेडगांवचाही याच आश्रमांत समावेश होत असून पुढें तें गांव क्षेत्र म्हणून प्रसिद्धीस आलें. सिद्धटेक हें क्षेत्र अद्याप प्रसिद्ध असून पेशव्यांचा सुप्रसिद्ध सेनापति हरिपंत फडके याची समाधि तेथेंच आहे. बदामीच्या लढाईत यश मिळाल्यामुळें पेशव्यांनीं त्यांना जें बक्षिस दिलें तें त्यानें देवास अर्पण करून त्याच्या खर्चांतून देवाचा नगारखाना चालू केला आहे. याच भागांत राशीन हें एक पुरातन स्थान आहे. सीता चोरून नेल्यावर राम सीतेचा शोध करीत हिंडत असतां या ठिकाणीं पार्वतीनें सीतेचें रूप घेऊन रामास चकविण्याचा प्रयत्न केला परंतु रामानें ओळखून " ये मायी " अशी पार्वतीस हांक मारली. ही पार्वती यमाईच्या रूपानें राशीन येथें आहे. याच क्षेत्रीं पुढें नाथपंथी प्रसिद्ध संत होऊन गेले.

येथपर्यंत या प्रांताचा पौराणिक इतिहास पाहतां मूळ दंडकारण्य त्याचें रामक्षेत्र बनलें व त्याचेंच पुढें महाराष्ट्र झाले, व आर्यांनीं केलेल्या वसाहती. अनार्यांची वस्ति, आर्यानार्यांचा मिलाफ वगैरे बऱ्याच गोष्टींचा विचार विस्तृतपणें कर-

ण्याचा उद्देश फार प्राचीन कालापासून या प्रांताचें स्थित्यंतर कसकसें झालें हें नीट ध्यानांत यावें हा आहे. पैठण हें महाराष्ट्राचें केंद्रस्थान व विद्यापीठ झाल्यानंतर अशोकानें इ. स. पूर्वी २४० मध्यें त्याचा नामनिर्देश केला, व येथून पुढें ऐतिहासिक कालास सुरवात होते. पौराणिक काल दंतकथेवर भर देऊन मांडणें भाग पडतें, ऐतिहासिक काल प्रत्यक्ष पुराव्यानिशी शाबीत करतां येतो. तथापि पौराणिक दंतकथेच्या मुळाशींही ऐतिहासिक सत्य सांपडणें शक्य आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. व म्हणूनच पौराणिक भाग इतका लांबला तो संपवून आपण ऐतिहासिक व धार्मिक भागाकडे वळूं.

प्रकरण ९ वें.

ऐतिहासिक स्थळांची माहिती.

या प्रकरणांत अहमदनगर जिल्ह्यांत जीं गांवें आहेत त्यांपैकीं ज्या गांवांचा प्रत्यक्ष रीतीनें इतिहासाच्या कालामध्यें कांहीं तरी गोष्टी घडून आल्याबद्दलचा उल्लेख आलेला आहे, अशाच गांवांच्या इतिहासाची थोडीशी माहिती येणार आहे.

अकोलें:—येथें पूर्वी ब्राह्मणवस्ती पुष्कळ असून ते फार संपन्न स्थितींत असल्याची साक्ष त्यांच्या हल्लींच्या प्रशस्त वाड्यांवरून पटते. पूर्वकालीं एथील बहुतेक ब्राह्मण पेशवाईत नोकर होते. त्याचप्रमाणें कित्येक बडोदा, ग्वाल्हेर वगैरे संस्थानांत मोठमोठ्या हुद्यावर असल्यानें तिकडील संपत्तीवर एथील हवेल्या उभारल्या गेल्या आहेत. वाड्यांचें बांधकाम म्हणजे शिल्पकलेचे चांगले नमुने आहेत. हल्लींचा भाजीबाजार ज्या ठिकाणीं भरतो तेथें पूर्वी ७ मजली इमारत होती, व तिचेवरून संगमनेरचा दिवा दिसत होता असें म्हणतात. परंतु ही इमारत फार दिवस टिकली नाहीं. याचें कारण असें सांगितात कीं, ‘ इमारतीचें बांधकाम चालू झाल्यावर एक मुसलमान आणि पेठकर उपनांवाचा एक ब्राह्मण (हल्लीं एथें पेठकर हे इनामदार आहेत) यांचेमध्यें जागेच्या मालकी हक्काबद्दल वाद उपस्थित होऊन तो इतका विकोपास गेला कीं, शेवटीं त्या मुसलमानाच्या आंगावर भिंत रचून इमारतीचें काम पूर्ण केलें. पुढें सदर मुस-

लमान पिशाचरूपानें त्या ब्राह्मणास छळूं लागला. अखेरीस एके रात्रीं ती इमारत एकदम कोसळली. नंतर त्या मुसलमानाची त्या जागेवर कबर बांधली!" ती अद्याप एथें पाहण्यास मिळते. शेवटचा बाजीराव पेशवा या ठिकाणीं कांहीं दिवस होता.

ब्राह्मणवाडें:— इतिहासप्रसिद्ध बापू गोखले याची सून या ठिकाणीं सती गेली असून तिचें स्मारक एथें अद्याप आहे.

कळस:-या ठिकाणीं श्रीशंकराचें स्वयंभू लिंग आहे. एथें सन १८९०-९१ मध्यें एका चांभारास दगडाची एक पेटी सांपडली. तींत ३ ताम्रपत्रें संस्कृतांत लिहिलेलीं आढळलीं. ताम्रपत्र २ फू लां. १॥ फू. रुं. व ३/४ तसू जाड होतें. पेटीचे कडीवर धर्मराजाची मूर्ति होती. ताम्रपत्रांत कळसेश्वराचे देवालयासंबंधानें व सोमणी कुळकर्णी यांचे जहागिरीबद्दल उल्लेख आहे.

समशेरपूर:—हें तीन लहान खेडीं मिळून झालें आहे. समशेर बहादूर या नांवाचा कोणी पट्टे किल्ल्याचा किल्लेदार होता त्यानें हें वसविलें. हें समशेरपूर या नांवानें सन १७६१ च्या पानपतच्या लढाईच्या अगोदरपासून प्रसिद्ध असावें. एथील लोक तमाशा घेऊन लढाईत सामील झालेले होते, असें पानपतच्या बखरींत लालन बैरागिणीच्या वर्णनांत आहे.

कोतूळ:—एथें एक जुनी गढी आहे. तेथें पेशव्यांचे वेळीं महालकचेरी होती. इंग्रजांचे वेळीं ५० वर्षांपूर्वी महालकचेरी असून या महालाखालीं डांगणांतील ३०-४० खेडीं होतीं, व त्यानंतर कोतूळमहाल मोडून अकोलें तालुक्यांत सामील झाला. गढींतील इमारतींचा नाश होऊन हल्लीं तेथें नुसतें तटबंदी आवार आहे.

वीरगांव:—शूर पुरुषांचा गांव म्हणून यांस असें नांव पडलें आहे. थोरात घराण्याकडे हा गांव जहागीर आहे. यांचे मूळपुरुष शकोजीराव थोरात हे श्रीमंत महाराज राजे शाहुछत्रपति यांचे पदरीं सरदार होते त्या वेळेस ... ... बादशहावर छत्रपती महाराज यांची स्वारी होऊन मोठी लढाई झाली. त्या वेळेस महाराज छत्रपति यांचा मोड झाला. छत्रपती महाराज यांजला आपल्या बसत्या घोड्यावर पाठीशीं घेऊन थोरात रातोरात सातार्‍यास किल्ल्यावर चढले. तोंच दिनकरउदय झाला. सबब महाराजांनीं यांना दिनकरराव अशी पदवी दिली. याच घराण्याचे पुरुष हल्लींचे जिल्हा लोकल बोर्डाचे प्रेसिडेंट

सरदार शिवराव भवानराव थोरात हे होत. या त्यांच्या पूर्वजाच्या कृत्यामुळें त्यांना हा गांव जहागीर मिळाला आहे.

मांडवगण:--पूर्वीचा गांव मांडवगण. सन १५०६ मध्यें अहमदनगरच्या बहिरी निजामशहाचा भाचा कादरशहा यानें हल्लींचें कात्राबाद (कादिराबाद), गांव वसविलें. १८६८ मध्यें हीं दोन्हीं गांवें होळकर सरकारकडून इंग्रज सरकारकडे गेलीं. तेव्हांपासून दोन्ही गांवांस मिळून मांडवगण अथवा कसबा व पेठ असें म्हणतात. सन १५०६ मध्यें बहिरी निजामशहापासून हल्लींचे देशमुखांचे पूर्वज म्हलोजा यादव यांनीं देशमुखी व पाटीलकी हीं दोन्हीं वतनें संपादिली. या देशमुखांस भूपतिराव ही पदवी होती.

अश्वी:- अश्वीबुद्रुक गांवाचें जुनें नांव विरेवाडी असें होतें. अश्वी खुर्दच्या ठिकाणीं श्रीमंत पेशवेसरकारनीं घोडयाची पागा ठेवली होती. घोडा-अश्व-यावरून अश्वी हें नांव पडलें असावें.

अश्वीबुद्रुकच्या नैर्ऋत्येस माळेवाडी नांवाचें खेडें आहे. त्याच्या दक्षिणेस थोडया अंतरावर माळेवाडी नांवाचें कसब्याचें गांव होतें. पेशवाईचे काळांत हें गांव फार भरभराटींत होतें. एथें श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे सरदार श्री. थोरात हे राहत असत. श्री. थोरातांचा वाडा एथें होता. या गांवावर पेंढाऱ्यांनीं एकामागून एक असे तीन हल्ले केले, श्री. थोरात यांचा वाडा जाळला. त्यामुळें लोक तेथून पळाले. कांहीं लोक गांवाचे आग्नेयीस पानेवाडी ऊर्फ पानाडे एथें गेले. व कांहीं लोक विरेवाडी-हल्लीं अश्वीबुद्रुक-एथें आले. जुनी माळेवाडी ओस पडली. हल्लीं जुन्या माळेवाडीच्या ठिकाणीं जुन्या इमारतींचे चौथरे, भिंतीचे पाये व त्यावेळची बारव हीं दिसतात.

श्रीमंत दुसरे बाजीराव यांचा उजवा हात जो त्र्यंबकजी डेंगळे यांच्या पदरीं हरी भगवत या नांवाचा गोवर्धन ब्राह्मण, घरांतील कामें करण्यास होता. एकदां त्र्यंबकजी व दुसरे परकी वकील बोलत बसले असतां वकीलसाहेबांच्या आंगरख्याची मागील बाजू खांबापर्यंत पसरली होती. हरी भगवंतानें त्यांना नकळत खांबाखालील दगडी खुर्ची उचलून तिचेखालीं आंगरख्याचा मागील भाग अडकविला व आपण उद्यागाकरितां निघून गेला. बोलणीं संपल्यावर वकीलसाहेब उठूं लागले. पण त्यांना उठतां येईना. खरा प्रकार कोणीं केला ? याची चौकशी सुरू झाली. शेवटीं ' हरी भगवंतनें हें कृत्य केलें ' असें समजलें. नंतर त्यास बोलावून आणून

झालेली हकीकत कबूल करून त्यानें आंगरखा काढून दिला. तेव्हांपासून हरी भगवंत यास त्रिंबकजी डेंगळे नेहमीं बरोबर ठेवीत. हरी भगवंत यानें अश्वीबुद्रुक एथें मोठा वाडा, हल्लीं असलेला, बांधला. त्र्यंबकजी डेंगळे व पेशवे यांचे प्रयत्न फसले व पेशवाई खालसा झाली तेव्हांपासून तो आपला काळ धार्मिक कृत्यांत घालवूं लागला. तो शूर, उदार व धार्मिक होता अश्वी खुर्द या गांवाचे पूर्वेस सुमारें ५०० ७०० एकरांचें मोठें कुरण आहे. यालगतच आणखी चराईचें डोंगराळ रान आहे प्रवरेचें पाणी व तेथील हवा प्राण्यांना विशेषत: घोड्यांना मानवणारी असल्यामुळें श्रीमंत पेशवेसरकारांनीं आपली घोड्याची पागा एथें ठेवली होती. तीवर देखरेख करण्याकरितां रा० गुणे यांना नेमलें होतें. या पागेंतील घोडे ज्या कुरणांत चरत होते; त्याच कुरणांत प्रसिद्ध बायजाबाई शिंदे यांचें लष्कर होतें, असें सांगतात.

संगमनेर:—एथें इ.स. १६७७ मध्यें शिवाजी आणि दिल्लीचा शहाजादा यांचेमध्यें लढाई झाली होती. शहाजाद्याबरोबर रणमस्तखान, असदखान वगैरे मोठमोठे सरदार होते. या लढाईत सिधोजी निंबाळकर पडला व संताजी घोरपडे पराभव पावून परत फिरला. शिवाजीमहाराजांनीं कांहीं निवडक स्वारांनिशीं जोराचा असा हल्ला केला कीं, मोंगलांच्या सैन्यांत फाटाफूट होऊन तें चोहोंकडे फांकलें. त्या लढाईत मिळालेली लूट शिवाजीनें अकोलें तालुक्यांतील औंधापट्टा किल्ल्यांत रवाना केली व आडवाटेनें ती रायगडास पोहोंचविली. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकीं विठ्ठल सुंदर परशरामी हे प्रसिद्ध मुत्सद्दी एथीलच राहणारे होते. संगमनेर तालुक्यांतील पिंपरणें एथील म्हस्के देशमुख हे पहिले महादजी शिंद्यांचे सासरे होते. त्यांना रहाण्याकरितां म्हणून महादजी शिंद्यांनीं संगमनेर येथें मोठा वाडा बांधून दिला होता. सदरचा वाडा अद्याप अस्तित्वांत आहे. या वाड्यापासून कसबा पेठेंतील देवीच्या देवळापर्यंत एक भुयार आहे. याच वाड्यांत कांहीं दिवस संगमनेरचे मराठा बोर्डिंग होतें.

साकूर:— सुमारें ५०–६० वर्षांपूर्वी हा गांव फार भरभराटलेला होता. त्यावेळीं हा गांव जहागिरीचा असून शिंदेसरकारचे आश्रित श्रीयुत जिनसीवाले हे एथें राहत होते. सन १८६४ चे सुमारास हा गांव खालसांत गेला. त्यानंतर वासुदेव बळवंत फडके याचे बंडाचे वेळीं जिनसीवाले हे एथून हालले. गांव डोंगराळ प्रदेशांत आहे. मेंढ्या चरण्याची सोय बरी आहे. त्यामुळें मूळची

वस्ती धनगरांची होती. एथून कर्तबगार माणसें होळकरशाहींत मोठमोठ्या हुद्यांवर होतीं व होळकरसरकारशीं एथील खिलाऱ्यांचा संबंध होता. त्याचें स्मारक म्हणजे होळकर सरकारनीं आपले मेहुण्यास (शिवाजी यशवंतराव खिलारी यांस) बांधून दिलेला वाडा व श्रीविठोबाचे देवळाभोंवतीं बांधलेला तट हीं होत. तेथील ओढ्याचें पाणी उत्तम असल्यामुळें होळकरांना पिण्यास पाणी एथून जात असे. पाणी फारच हलकें आहे. पूर्वी अहिल्याबाईचे वेळेस एथून सांडणीस्वार ओढयाचें पाणी इंदुरास नेत असे. नुकत्याच पदच्युत झालेल्या तुकोजीराव होळकरांचे हें आजोळ आहे.

माळेगांव पठार:—या गांवीं त्रिंबकजी डेंगळे २ महिने लपून राहिला होता.

सावरगांव घुलेः--येथें त्रिंबकजी डेंगळे कांहीं दिवस लपून राहिला होता. त्यास पकडण्यास इंग्रजांचें अरबी पलटणींचें सैन्य आलें तेव्हां सांवरगांव, सारोळें पठार व माळेगांव पठार एथील लोकांनीं मिळून त्या सैन्याचा पराभव केला असें एथील वृद्ध लोक सांगतात.

निमगांवजाळी:—निमगांवजाळी म्हणणारे सांगतात कीं, पूर्वी निमगांवपासून संगमनेर रस्त्याच्या कोकणगांवापर्यंत अत्यंत दाट जाळी झाडी होती. ही जाळी निमगांवापासून सुरू होत होती, म्हणून या गांवास निमगांवजाळी म्हणतात. निमगांव जाई म्हणणारे सांगतात कीं, पूर्वी कोणी जाई नांवाची शूर मर्द बाई होऊन गेली, तिच्या नांवावरून या गांवास निमगांवजाई म्हणतात, व त्याचा अपभ्रंश निमगांवजाळी असा झाला आहे. गांवांत डेंगळे, जोंधळे वगैरे आडनांवाच्या मराठ्यांचीं घरें आहेत त्यांपैकीं त्रिंबकजी डेंगळे व बयाजी नाईक जोंधळे हे दोन पुरुष पेशव्यांचे नोकरींत होते. पैकीं बयाजी नाईक जोंधळे हा पेशवाईच्या पडत्या काळांत ‘ आपलें तरी कल्याण कां करून घेऊं नये ’ अशा इराद्यानें शेवटच्या बाजीरावाच्या नोकरींतून मुक्त झाला. त्याबद्दल त्यास अळकुटीची जहागीर मिळून तिचा उपयोग त्याचे वंशज आज तागायत घेत आहेत. निंमगांवजाळी हा खालसा गांव आहे.

या गांवास जें महत्त्व आलें होतें तें विशेषतः ज्याच्या हातांत पेशवाईचीं सूत्रें कांहीं काळ खेळत होतीं व त्यामुळें जो पेशवाईच्या अंतकांना डोळ्यांतील कणाप्रमाणें सलत होता, त्या त्रिंबकजी डेंगळ्यामुळें आलें होतें. गांवाच्या पलीकडे श्रीमारुतीरायाचें देऊळ आहे तें देऊळ त्रिंबकजी डेंगळे

यांनीं बांधलें आहे. त्या मारुतीजवळ एक महंत—गोसावी साधु-राहात होता. तेथें त्यावेळीं गुरेंचराईचें जंगल होतें. महंताजवळ १०।५ गाई होत्या. गांवांतलि भिक्षेवर चरितार्थ चालवून बुवा मारुतीजवळच्या आपल्या झोपडींत राहिलेले असत.

त्या वेळीं त्रिंबकजीच्या घरांत त्रिंबकजी, त्याचा वडील भाऊ कुशाबा व त्याचीं बायकोमुलें होतीं. त्रिंबकजीचें लग्न झालें नव्हतें पण कुशाबाचा संसार वाढता होता. घरीं अठरा विसवें दारिद्र्य होतें. त्रिंबकजीचें वय २५ वर्षांचें जवळगास होतें. तो गौरवर्ण, देखणा, मोठा धिप्पाड व बळकट पुरुष होता. त्याला शेतीच्या कामाचा मनापासून तिटकारा होता. कधीं मोट हांकली नाहीं कीं कधीं नांगर हांकला नाहीं. तो महंताचे झोंपडींत सदैव पडून असे. कपडेलत्ते धुवून स्वच्छ ठेवावे, छानछोकींत राहावें, महंताच्या गाई राखाव्या व गाईचें दूध पिऊन तालीम करावी, हा त्रिंबकजीचा नित्याचा व्यवसाय होता. ज्या वेळीं त्याचा भाऊ त्याच्यावर रागावला त्या वेळेस त्यांचें भांडण व शिवीगाळ झाली. तेव्हां बुवा त्याला म्हणाले ' बेटा, तूं पुण्यास जा, तुझें कल्याण होईल. ' महंत आणि त्रिंबकजी ह्यांच्यामध्यें पितापुत्रवत् प्रेम होतें. जातांना बुवाजींनीं त्रिंबकजीस कांहीं जडीबुट्टी (विशेष प्रकारच्या वनस्पतीचा तुकडा) दिली होती व सांगितलें कीं, ' बेटा, ज्या ज्या वेळीं तुला ऊन, तहान, भूक ह्यांची पीडा होईल त्या त्या वेळीं हा वनस्पतीचा तुकडा दाढेखालीं धरीत जा. त्रिंबकजीनें तो वनस्पतीचा तुकडा पागोट्यांत बांधून घेतला व तडक पुण्याचा रस्ता धरला.

कोणत्याही विशेष गोष्टी घडून येण्यास त्यास सत्पुरुषाच्या आशिर्वादाचा आधार असावा लागतो म्हणतात या विधानाची सत्यता इतिहासांत दृष्टीस पडते. विजयानगरच्या हिंदु राज्याची स्थापना होण्यास विद्यारण्य स्वामी कारणीभूत झाले. स्वराज्याची स्थापना करणाऱ्या श्रीशिवाजीमहाराजांवर श्रीसमर्थ रामदासांची पूर्ण कृपा होती; तर पहिले बाजीराव व नानासाहेब यांचे श्रीब्रह्मेंद्र धावडशीकर हे गुरु होते. त्याप्रमाणें त्रिंबकजीस पुण्यास जातांना प्रोत्साहन देण्यास हे महंत कारणीभूत झाले.

त्रिंबकजीनें अश्वी, पानवडी गांवाहून पुण्याचा रस्ता धरला. सूर्योदयास अश्वीस पोहोंचला. तेथें नदीच्या पात्रांत त्यास अश्वीचा हरीभट जोशी गोवर्धन हा भेटला. त्यानें सांगितलें कीं, त्रिंबकजी, तूं फार उत्तम वेळेवर चालला आहेस. पालखीपदस्थ होशील. मला मात्र विसरूं नको हो ! ' त्रिंबकजीनें उत्तर दिलें कीं, जर

मी पालखीपदस्थ झालों तर तुलाच मी आपला दिवाण करीन. पुण्यास आल्यानंतर एके दिवशीं त्रिंबकजी रस्त्यानें भटकत असतां एका पागेवाल्याचें लक्ष त्रिंबकजीकडे गेलें व हा कोणीतरी घाटी मनुष्य असावा हें त्यानें ताडलें व त्यास घोड्यांची शुश्रूषा करणाऱ्या लोकांवर देखरेख करण्याचें काम दिलें. त्रिंबकजीस महिन्याचा पगार ३।४ रुपये व रोजचा कोरडा शिधा मिळे. त्रिंबकजी स्वतः स्वयंपाक करी व पैसे दूध व खुराक यांत खर्च करी.

एके दिवशीं असें झालें कीं, बाजीराव पेशवे यांचें कुटुंब डोंगराळ प्रदेशांतील दूरच्या एका किल्ल्यावर होतें. बाजीराव पेशव्यास कांहीं अपशकुन झाल्यामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा आपल्या पत्नीचें कुशल शक्य तितक्या लवकर कळावें, अशी तळमळ लागून राहिली; करितां उद्यांच्या उद्यां जाऊन येणारा कोणी जासूद शहरांतून घेऊन येण्यास त्यांनीं सेवकास आज्ञा केली. बाजीराव यांना त्रिंबकजीबद्दल माहिती मिळाली होती, व त्याला तूं हें काम करशील काय असें विचारल्यावर त्रिंबकजीनें मोठ्या उत्साहानें कबूल केलें. त्रिंबकजीचा उत्साह पाहूनच बाजीरावास आनंद वाटला. त्याजवळ पत्र दिलें तें घेऊन तो दुपारचे आंत त्यांच्या कुटुंबाजवळ जाऊन दाखल झाला, व लगेच उत्तर घेऊन बाजीराव पेशवे संध्याकाळीं शनिवारवाड्यांतील हौदावर स्नानसंध्येस बसले होते, त्यांचेजवळ दाखल झाला. तेव्हां त्यास प्रथम आपल्या खासगीकडे नोकरी दिली. आरंभीं तो बाजीरावाच्या शरीररक्षकांचें काम करीत असे. त्यानें आपल्या आंगच्या गुणांनीं बाजीरावाचा विश्वास चांगला संपादन केला, व यामुळें बाजीरावानें पेशवाईचा जवळजवळ सर्व कारभार त्रिंबकजीवर सोंपविला होता.

त्रिंबकजीस बारा बायका होत्या. त्याला बरेच दिवस मुलगा नव्हता. म्हणून पुत्रप्राप्त्यर्थ तो पंढरीच्या वाऱ्या करीत असे. एकदां त्रिंबकजीनें देवाच्या पायांवर डोकें ठेवतांच देवांच्या गळ्यांतील फुलांचा हार सुटून त्रिंबकजीच्या पाठीवर पडला. तो हार त्यानें आपल्या एका बायकोजवळ ठेवण्यास दिला व तिलाच पुढें मुलगा झाला. त्याचें नांव गणपतराव हें होतें. मुलगा झाला तरी त्रिंबकजीच्या पंढरीच्या वाऱ्या सुटलेल्या नव्हत्या. तो दर महिन्याच्या एकादशीस पंढरीस हजर असे. अशाच एका वारीस त्रिंबकजी पंढरपुरास आला असतां गायकवाडसरकारचा वकील गंगाधरशास्त्री हा गायकवाड व पेशवे यांच्यामधील खंडणीचा वाद

मिटविण्यास पंढरपुरास आला. तो दर्शन करून देवास प्रदक्षिणा घालीत असतां भर देवळांत मारेकऱ्यांनीं कापून काढिला. त्यावेळीं त्रिंबकजी गांवांत आपल्या बिऱ्हाडीं होता. त्यास हकिकत समजतांच स्वतः येऊन शास्त्रीबुवाच्या प्रेताची व्यवस्था त्यानें करविली. त्यास हा प्रकार काय आहे हें समजेना. गायकवाड-सरकार व कंपनी सरकार यांनीं त्याच्यावर खुनाचा आळ घातला व बाजीरावास त्याला ताब्यांत देण्याबद्दल सारखी निकड लावली. तेव्हां आपल्याकरितां आपल्या धन्यास त्रास होत आहे, म्हणून त्रिंबकजी आपण होऊन इंग्रजांच्या स्वाधीन झाला.

गंगाधरशास्त्र्यांचा खून म्हणजे त्रिंबकजीवर निव्वळ कुभांड होतें. कारण गंगाधरशास्त्री हा आपल्या धन्याच्या हिताहिताची विशेष पर्वा न करितां जेणेंकरून कंपनीसरकारचें मन न दुखावेल अशाच रीतीनें आपली वकिली चालवीत असे; म्हणून तो कंपनीसरकारचा प्रिय व गायकवाडसरकारचा अप्रिय झाला होता, व नाकापेक्षां मोतीं जड अशा ह्या वकिलाला दरबारांतून काढून टाकण्याची ही युक्ति गायकवाडांनीं योजिली व गंगाधरशास्त्र्याच्या जीवाची हमी इंग्रजांजवळ मागितली होती. ही फाजील सावधगिरी दाखवून त्याच्या वधाचें भविष्य अगोदरच वर्तवून ठेविलें होतें व तो परत येणार नाहीं म्हणून गायकवाड-सरकारनें त्यास अगोदरच काळा पोषाख देऊन त्याची बोळवण केली होती.

गंगाधरशास्त्र्याच्या खुनामुळें गायकवाडांनीं खंडणीचा निकाल आपल्या बाजूनें करून घेतला. शास्त्री याचा काटा दूर झाला, व इंग्रजांना बाजीरावावर झडप घालण्यास चांगलीच संधी मिळाली.

त्रिंबकजीचें चारित्र्य बघितलें तर असें दिसून येईल कीं, त्याची ब्राह्मणांवर मोठी श्रद्धा होती. तो कर्मठ हिंदू होता. तशांत तो पंढरीचा कट्टा वारकरी होता. अशा रीतीनें धर्मशील असल्याकारणानें गंगाधरशास्त्र्यासारख्या ब्राह्मणाला भर विठ्ठलमंदिरांत कापून काढण्यास मारेकरी घालील हें खरेंसुद्धां वाटत नाहीं.

त्रिंबकजी आपण होऊन इंग्रजांच्या स्वाधीन झाला. त्यास ठाण्याच्या तुरुंगांत ठेविलें होतें. त्रिंबकजी शौचकूपांतील फरशीचा दगड उखडून समुद्रांत उतरला व बारा कोस पोहत जाऊन किनाऱ्यास लागला. तेथून डांगणभागांतून अकोलें तालुक्यांतील ब्राह्मणवाड्याच्या डोंगरांत आला. बाजीराव त्रिंबकजीस गुप्तपणें द्रव्य पाठवीत होता. त्याच्या जोरावर त्रिंबकजी डांगणांतील भिल्ल, कोळ्यांचें सैन्य उभारून कंपनीसरकारास त्रास देऊं लागला. परंतु बाजीरावाचा

कोरेगांव-अष्ट्याच्या लढाईत पराभव झाला, तेव्हां त्रिंबकजीनें शस्त्र खालीं ठेवलें व अज्ञातवास पत्करिला. तो नाशिक जिल्ह्यांतील आहेराच्या लोणीस गेला. तेथें गवळी आडनांवाच्या मराठ्याकडे त्यानें त्याच्या घरीं गुप्तपणें वास्तव्य केलें. परंतु जहागिरीच्या आमिषानें त्यानें ती बातमी कंपनीसरकारच्या अधिकाऱ्यास दिली, व लगेंच सैन्यानें लोणीस गराडा दिला. गवळ्यानें आपणास दगा दिला हें समजतांच तो गवळ्याच्या घरांतून निसटला; पण पळण्यास अवसर सांपडेना म्हणून तेथेंच एका गोवऱ्याच्या हुड्यांत लपून बसला. पण तेथें त्याच्या शेल्याचा पदर एका सोल्जरानें पाहिल्यावरून त्यास तेथें पकडण्यांत आलें, व निमगांवजावळीस त्यानें आपल्या बायकोमुलाची शेवटची भेट घेतली. ' शरण जाऊन तरण मागणें ' हें माझें ब्रीद नाहीं व पुढल्या पिढीस खालीं मान घालावयास लावणारें काम माझ्या हातून कधींही होणार नाहीं; असें त्यानें बयाजी नाईक जोंधळे यास सांगितलें व शेवटीं चुनार किल्ल्यांत त्या मानी पुरुषाचा अंत झाला.

त्रिंबकजीचा वाडा मोठा भव्य आहे. राघोबा दादा पेशव्यानें कोपरगांवच्या बेटावरील शुक्रेश्वर, कचेश्वराचीं देवळें बांधण्याकरितां ज्या दगडांचा उपयोग केला तसलेच दगड वाड्याच्या दर्शनी चौकास उपयोगांत आणले होते. राघोबा दादा मरण पावल्यानंतर सर्व सामान, जामदारखान्यांतील राघोबाच्या भारी भरी किंमतीच्या जिनसा व महत्त्वाचे कागदपत्र गणपतरावानें आणले होते व त्याच खोलींत गणपतरावानें आपल्याही मूल्यवान जिनसा व महत्त्वाचे कागदपत्र ठेविले होते; परंतु वाडा जळाल्यामुळें ते नाहींसे झाले असें म्हणतात.

निघोजः—हा गांव पंतसचीव संस्थान भोर यांचेकडे श्रीशिवाजीमहाराजांचे वेळेपासून जहागीर आहे. एकदां शिवाजीमहाराज शिकारीस गेले असतां त्यांचा मुक्काम जुन्नर तालुक्यांतील एका खेडेगांवीं पडला. रात्रीची वेळ, भूक लागली व जवळ तर चाकरनोकर कोणी नाहीं, तेव्हां ते पाणी मागण्याचें निमित्तानें गाडेकरांचे घरीं गेले. गाडेकरांची घरची स्थिती गरिबीची; पण ते मनाचे थोर; तेव्हां ते शिवाजमिहाराजांस म्हणाले, आपण दमून आलेले दिसतां, आमची गरिबाची चटणीभाकर खातां काय ? का आपणासाठीं निराळा स्वयंपाक करवूं ? महाराजांना भूक लागलेली होतीच; तेव्हां ते म्हणाले, —मला तुमची शिल्लक असलेली चटणीभाकरीच द्या. तेव्हां गाडेकरांनीं मोठ्या प्रेमानें

त्यांस जेऊं घातलें. जेवण झाल्यावर शिवाजीराजे नेहमींच्या संवयीप्रमाणें बरोबर पाण्याचा तांब्या न घेतां हात धुण्याकरितां आंगणांत आले, हें गाडेकरांच्या बायकोनें पाहिलें. ती चाणाक्ष होती. तिनें ओळखिलें कीं, हें कोणीतरी थोर गृहस्थ असावेत; कारण यांना नोकरांकडून हातावर पाणी घालून घेण्याची संवय असावी. मग ती झटकन् उठून पाणी घेऊन बाहेर आली आणि महाराजांना हातावर पाणी घालून हात पुसण्याकारितां फडकें दिलें; तेव्हां महाराजांनीं सदर बाईस आपली धर्माची बहीण म्हणून मानलें. आणि सातार्‍यास आल्यावर बहिणीला आंदण म्हणून त्यांनीं वाईटगांव चोळीकरितां व निघोज लुगडें म्हणून सनद लिहून पाठविली. गाडेकरास हे राजे आहेत हें माहीत नव्हतें. पुढें त्या बाईच्या मुलाला त्यांनीं अष्टप्रधानांत पंतसचीवाची जागा दिली. तेव्हांपासून हा गांव गाडेकर म्हणजेच पंतसचीव यांचेकडे वंशपरंपरा जहागीर आहे.

भाळवणीः—या गांवचे पाटील रोहकले आहेत. त्यांच्याकडे मराठी राज्याच्या वेळीं घोडयाची पागा राहात होती, व त्यावेळीं ते लोक लढाईचीं कामें करीत असत. विशेषतः लुटालुटीचा धंदा करीत होते.

जामगांवः—पूर्वी यास जांबूतवाडी म्हणत असत. इ. स. १७५४ नंतर दिल्ली लुटल्यावर महादजी शिंदे यांनीं या ठिकाणीं वाडा बांधला, तो इ. स. १७८४–८५ मध्यें बांधला. त्याचे पूर्वेस नवें जामगांव कोटाचें आंत वसविलें. येथेंच स्वतःची राजधानी करण्याचा त्यांचा विचार होता. दरबारचें काम संपल्यानंतर महिना दोन महिने विश्रांति मिळण्यासाठीं एकांतवासांत जागा असावी व जरूर लागल्यास लवकर जातां यावें या हेतूनें हा वाडा पुण्यापासून २५।३० कोसांवर बांधला. सदर वाडयाची व्यवस्था शिंदेसरकार यांचेकडून होतें.

नांदूरपठारः—तुर्‍याचें गाणें करणार्‍या राघू धौशाचे वंशज एथें राहतात. राघू हा पोवाडे रचून ते म्हणण्यांत फार वाकबगार होता. एकदां पेशव्यांना पोवाडा म्हणून दाखविला तेव्हां त्यांनीं त्याला धौशा हा किताब दिला.

कान्हूरः—हा गांव पूर्वी ' कान्हूरमल्लाची वाडी ' या नांवानें प्रसिद्ध होता. नारो बाबाजी हे रत्नागिरी जिल्ह्यांतील गावडे आंबरे या गांवचे वतनदार जोशी होते. घरचें कुटुंब मोठें असल्यामुळें कांहींतरी उदरनिर्वाहाची सोय पहावी म्हणून देशावर आले व श्रीमंत थोरले बाजीराव ह्यांचे पदरीं प्रथम शागीर्द म्हणून

राहिले. श्रीमंत पेशवेसरकारचा असलेला शनिवारवाडा पूर्वी दोन मजली होता, त्यावर आणखी पांच मजले चढवून इमारत सात मजली केली. त्यावेळीं नारो बाबाजी यांनीं कोंकणांतील जंगलांतून सागवान आणून स्वतःचे देखरेखीखालीं व स्वतःचे कल्पनेनें वाड्याचे वरील पांच मजली इमारत पुरी केली असें सांगतात; त्यांपैकीं राहिलेला लाकूडफाटा श्रीमंतांनीं नारो बाबाजीस बक्षीस देऊन पसंत असेल त्या ठिकाणीं वाडा बांधण्यास सांगितलें; तेव्हां कसबे मजकूर या ठिकाणीं त्यांनीं वाडा बांधिला.

कर्नाटकांत कांहीं भागांत लाखों एकर जंगल पडीत होतें. तेथील जंगल लागवडीस काढून तेथें वस्ती करून तिकडील बहुतेक प्रदेश संपन्न केला. तेव्हां श्रीमंतांची मर्जी बहाल होऊन कर्नाटकाचा सुभा त्यांचे स्वाधीन केला. तेथें कांहीं वर्षें सुभेदारी केल्यानंतर दरबारी मंडळींचें व त्यांचें पटेना. तेव्हां त्यांनीं तिकडील सुभेदारीचा राजीनामा देऊन श्रीमंताजवळ दुसरीकडे नोकरी मागितली.

नारो बाबाजी याजकडे न्यायमनसुब्याचीं कामें असून त्यांनीं कठीण व भानगडीचे खटल्याचे निकाल न्यायबुद्धीनें व चातुर्यानें दिले. या कर्तबगारीमुळें श्रीमंतांची मर्जी अधिकच बहाल होऊन त्यांना सुभे अहमदनगर एथील सुभेदार नेमिलें व त्यांचे ताब्यांत अहमदनगर, रतनगड, दौलताबाद, नाशिकजवळील त्र्यंबक, हर्ष हे किल्ले देऊन खर्चाकरितां स्वतंत्र सरंजाम तोडून देण्यांत आला. पैकीं कान्हूर हा गांव श्रीमंतांनीं त्यांना पालखीपद म्हणून दिला, त्याकारितां जहागीर दिली. त्यांनीं अहमदनगर जिल्ह्यांत बरेच ठिकाणीं शिवालयें बांधून प्रत्येक ठिकाणीं दररोज पूजा व नैवेद्य वगैरेच्या खर्चाकरितां कायम जमिनी व नक्त नेमणुका करून दिल्या आहेत. त्यांपैकीं कसबे मजकूर एथिल सिद्धेश्वर महादेव, मौजे विरोळी एथील पिंपळेश्वर व तालुका पारनेर एथील संगमेश्वर, सिद्धेश्वर व विठ्ठलमंदीर व सुरेगांव एथलि देवालय व अहमदनगरच्या नजीकचें डोंगरगण एथील प्रसिद्ध शिवमंदीर हीं त्यांनीं बांधिलीं आहेत.

लोणीमावळाः—हें गांव मराठ्यांचे ताब्यांत होतें. तें मराठ्यांचेतर्फे जुन्नरपासून सुप्यापर्यंत फौजेस दाणावैरण पुरविण्याकरितां म्हणून दाभाडेसरकार यांचे ताब्यांत पेशव्यांनीं दिलें होतें. पुढें कांहीं कारणानें होळकरसरकारच्या ताब्यांत दिलें. राघोबा पेशवे यांनीं दिल्लीपर्यंत जाऊन अटकेवर मराठ्यांचा झेंडा लाविला. त्यांत होळकर व त्यांतील कांहीं सरदारांनीं कामगिरी चांगली केल्यामुळें

होळकरांनीं पेशव्याजवळ ज्यांची शिफारस केली; त्यांपैकीं हल्लीं एथें असलेल्या फडणवीस नांवाच्या जहागीरदाराच्या पूर्वजांना इकडील भागांत २० गांवें जहागीर मिळालीं; त्यांपैकीं हा एक गांव आहे.

रांधे:—हा गांव पूर्वी शिंदेसरकार यांजकडे होता. त्यांचे तर्फे इनामदार व्यंकटेश ढेरे (ब्राह्मण) होते. शिंदे सरकारचे ५०० घोडे नेहमीं या ठिकाणीं इनामदार यांचे देखरेखीखालीं राहत असत. पागा पडीत आहे. घोड्यांस पाणी पिण्याचा चुनेगची हौद आहे, तो अद्यापपावेतों दृष्टीस पडत आहे. ढेरे इनामदार यास शिंदेसरकार यांनीं जमिनी इनाम दिल्या आहेत, त्या आतांपर्यंत त्यांचे वहिवाटीस आहेत.

पारनेर:—एथील जमिनी व बऱ्याच जागा विंचूरकर, इंदूरकर, धार, देवासकर व सरकार दाभाडे यांचे वंशपरंपरेनें मालकीहक्काच्या आहेत. परंतु पारनेरचें स्वामित्त्व त्यांचेकडे नव्हतें. सरदार दाभाडे यांचें वर्चस्व या ठिकाणीं बरेंच दिसून येतें. इतकें कीं, त्यांना या ठिकाणीं सरकार ही पदवी आहे. पूर्वी या ठिकाणीं मुसलमानांची वस्ती जास्त होती.

करंदी:—इ० स० १५०० च्या सुमारास या गांवांतील जोशी घराण्याचा मूळ पुरुष जिवाजी बल्लाळ यानें प्रथम वस्ती केली. हा घोडयावर बसणारा पटाईत स्वार होता. त्यानें यावेळीं राजदरबारीं पराक्रम दाखविल्यावरून त्यास वस्ती करण्याची परवानगी मिळून मौजे विरोली, हत्तलखिंडी, पिंपळगांव ऊर्फ किन्ही, व कंदार या वाडीचें भटपण मिळालें. या गांवांतील वसुलांपैकीं फक्त स्वराज्य व नजर तिजाई अम्मल नारोराम मंत्री यास महाराज शाहू छत्रपती यांजकडून इ. स. १७१६ मध्यें देण्यांत आला. तेव्हांपासून सन १८१८ पर्यंत पेशवे यांचा जहागीरअम्मल व मंत्री यांचा स्वराज्यअम्मल चालत असे.

पळशी:—लहानपणीं श्री. महाराज मल्हारराव होळकरांच्या मस्तकावर एथील नागानें रानांत फणी धरिली होती. त्यावेळीं एथील मूळपुरुष रामाजी यादव त्याच वाटनें जात असतांना काय चमत्कार आहे म्हणून जवळ जाऊन पाहूं लागले. मल्हाररावाच्या आईने हें काय चिन्ह आहे असें रामाजीस विचारिलें तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, " हें शुभचिन्ह आहे हा लवकरच राजा होईल. " त्यावर मला भाग्य आल्यास मी तुम्हांस विसरणार नाहीं. असें मल्हाररावांनीं त्यास

आश्वासन दिलें. त्याप्रमाणें रामाजीच्या आंगच्या मर्दुमकीवर इनाम व होळकरशाहींत वंशपरंपरा दिवाणगिरी मिळाली.

कोपरगांवः—हा गांव व त्याच्या आसपासचा प्रदेश तेराव्या शतकाच्या अखेर देवगिरीचे यादव घराण्याच्या ताब्यांत होता. यादवानंतर बहामनी राज्यांत, त्यानंतर निजामशाहींत, नंतर मोंगलांकडे, पेशव्याकडे व हल्लीं इंग्रजांकडे हा प्रदेश आहे. निजामशाहींतच कोपरगांव बेटामधील मुरलीधर, कचेश्वर, शुक्रेश्वर या देवस्थानांच्या खर्चासाठीं रकमा (उत्पन्नें) मिळालीं; तीं अद्याप त्या देवस्थानांकडे चालू आहेत.

पेशवाईच्या पडत्या काळांत कोपरगांवाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें; कारण थोरल्या माधवरावांविरुद्ध लढण्यासाठीं राघोबा दादांनीं कोपरगांवच्या आसपास सैन्याची जमवाजमव केली होती. इ. स. १७८२ च्या सालपें एथील तहानंतर कोपरगांवनजीक बेटांत वाडा बांधून व स्नानसंध्येसाठीं कचेश्वर व शुक्रेश्वर यांचेमधून वाहणाऱ्या गंगेच्या प्रवाहालगत घाट बांधून राघोबा त्यांचे देहावसान होईपर्यंत म्हणजे इ. स. १७८४ पर्यंत राहिले होते. हल्लींचें बेटांतील सुंदर विष्णुमंदिर हेंच त्यांनीं गंगेच्या घाटावर बांधलेलें मंदिर होय. खुद्द कोपरगांवांत राघोबा दादांनीं त्यांची बायको आनंदीबाई हिला अस्पृश्य स्थितींत ४ दिवस राहण्यासाठीं वाडा बांधला होता; त्या ठिकाणीं हल्लीं मामलेदारकचेरी आहे. बेटांतील राघोबा दादांचा वाडा पडला असून त्याचे कांहीं दगड वारी येथें नेले आहेत. त्या वाड्याचा पुढील दरवाजा डोमेगांवच्या महानुभाव वस्तीच्या आवारास लाविलेला असून मागील दरवाजा शुक्रेश्वर मंदिराच्या पुढच्या भागास आहे.

राघोबा दादांच्या कुटुंबांतील मंडळी इ. स. १७९२ पर्यंत कोपरगांवीं राहत होती. पुढें ती नाशिकजवळ आनंदवल्ली येथें गेली. इ. स. १८०४ सालीं कोपरगांवच्या आसपासच्या भिल्ल लोकांनीं बंड केलें. तें बंड दुसऱ्या बाजीरावाचा खानदेशचा सुभेदार बाळाजी लक्ष्मण यानें आपला सेनापती मोहनगीर गोसावी याच्याकरवीं मोडिलें. इ. स. १८१८ च्या अष्टीच्या लढाईनंतर दुसरा बाजीराव पळत असतां दोन वेळां कोपरगांवीं आला होता. त्यावेळीं मद्रासटूपनें कोपरगांव घेतलें. तेव्हां लढाईत मेलेल्या युरोपियनांचीं थडगीं हल्लीं गंगाकांठीं आहेत. कोपरगांव व त्याजवळचे डाऊच, जेऊर कुंभारी एथील पाटीलकीचें

वतन देवासच्या पवारांचें असून तिन्ही ठिकाणीं पवारांचे वाडे आहेत. तिन्ही ठिकाणीं पवारांचें गुमास्ते पाटीलकी करितात; यावरून देवासकरांचें मूळ ठिकाण कोपरगांव असावें असें वाटतें.

हिंगणी:—कोपरगांवच्या पश्चिमेस तीन मैलांवर हिंगणी एथें राघोबा दादांनीं गंगेच्या कांठीं दगडी वाडा बांधण्यास इ० स० १७८२ सालीं आरंभ केला होता. त्याच्या दक्षिण, पश्चिम, उत्तरबाजूच्या भिंती सुमारें ६० फूट उंचीच्या व २० फूट रुंदीच्या अनुक्रमें ६५, ५८, ६० फूट लांबीच्या हल्लीं कायम आहेत. पूर्वेकडील गंगेच्या बाजूची भिंत बांधलेली नाहीं. त्यास घाट बांधावयाचा होता; परंतु राघोबा दादा इ० स० १७८४ मध्यें वारल्यामुळें वाड्याचें काम बंद झालें. राघोबादादा वारल्यावर त्यांच्या इच्छेनुरूप त्यांचा दहनविधि हिंगणीस झाला. हिंगणीच्या वाड्यांत मध्यभागीं राघोबादादांची समाधी व तीवर पडकी छत्री आहे. समाधीचा पुजारी ब्राह्मण असून त्यास पूजेबद्दल ७।८ एकर जमीन इनाम आहे.

राहातें:— ह्या गांवीं एक गढी व मुरलीधराचें देवालय अशा दोन ऐतिहासिक इमारती आहेत. राहातें गांव ज्या भागांत वसलें आहे तेथें मोंगल अमदानींत जंगल होतें. त्या जंगलांत गुलाबखान म्हणून एक लुटारू गढी बांधून राहिला होता. पुढें कांहीं काळानें जंगल तुटून गढीच्या आसपास वस्ती झाली, त्या वस्तींत कासार जास्त होते व वस्तीची पाटीलकी कासाराकडे होती. ती गढी पाटलाच्या ताब्यांत होती; त्यामुळें गढीस कासारपाटलाची गढी म्हणत असत.

मराठे व निजाम यांच्या सैन्याची सरहद्द कायम ठरली; तेव्हां राहातें मराठ्यांकडे आलें. मराठ्यांकडून हल्लीं तें इंग्रजांकड आलें आहे. राहातेंगांवचे कुळकर्णी अन्याबा हे दुसऱ्या बाजीरावाचे शागीर्द होते, व पुढें बाजीरावांची त्यांचेवर मेहेरनजर झाल्यानें ते कल्याणचे सुभेदार बनले. त्यानंतर त्यांनीं इ० स० १८०१ चे सुमारास राहातें एथें मुरलीधराचें देऊळ बांधून देवाची पूजानैवेद्यासाठीं धोत्रे, निमगांवखैरी या गांवीं इनामी जमिनी दिल्या आहेत.

नेवासें:— नेवासें परगणा प्रथम यादवांचे राज्यांत, त्यापुढें बहामनी राज्यांत, नंतर निजामशाहींत समाविष्ट होत होता. त्या परगण्याची प्रतबंदी प्रथम मलिकंबरानें केली. निजामशाहीनंतर हा प्रांत मोंगलांच्या ताब्यांत इ० स० १७२४ पर्यंत होता. त्या अवधींत शाहूमहाराज नजरकैदेंत

असतां त्यांच्या लग्नाचे वेळीं औरंगजेब बादशाहानें आहेरादाखल हा प्रांत त्यांच्या नांवें करून दिला होता, परंतु त्या प्रांतावर अम्मल दिल्लीचे बादशाहाचा होता. पुढें १७२४ नंतर हा प्रांत निजामउल्मुल्कच्या ताब्यांत आला. निजामच्या राज्यांत हा प्रांत असतां नगर सुभ्यांत होता. इ० स० १७६० त उद्गीरच्या लढाईपूर्वी निजामाचा नगरचा किल्लेदार पेशव्यांस वश होऊन त्यानें नगरचा किल्ला व त्याखालील सुभा पेशव्यांचे ताब्यांत देण्याचें ठरविलें. त्याच सुमारास नेवासें परगण्याची प्रतबंदी पेशव्यांचा सुभेदार नारोबा बाजी नगरकर यांनीं केली असा दाखला सांपडतो. यावरून उद्गीरचे लढाईपूर्वी कांहीं वर्षें इ० स० १७५० च्या सुमारास हा प्रांत पेशव्यांचे ताब्यांत अर्धामुर्धा गेला असावा असें वाटतें.

हंबीरराव मोहिते यांची मुलगी शिवाजीमहाराजांचा मुलगा राजाराम यास दिली होती. हंबीररावांचे वंशज हल्लीं नेवाशास असून त्यांस सरकारांतून वर्षासन चालू आहे. शिवाजीमहाराजाचे जामदारखान्याचे अधिकारी नेवाशाचे राहणारे असून त्यांचे वंशज जामदार आडनांवाचे त्यांस मिळालेल्या इनामी जमिनीचा उपभोग घेत आहेत.

पूर्वी नेवाशाची वस्ती लाडसोड टेंकडीवर होती. पुढें नदीस महापूर येऊन गांवाच्या मध्यांतून प्रवाह जाऊन प्रवाहांत सांपडलेलीं घरें जमीनदोस्त होऊन नेवाशाची वस्ती दोन ठिकाणीं दुभागून नेवासें खुर्द व नेवासेंबुद्रुक अशीं दोन गांवें झालीं आहेत.

नेवासेंबुद्रुक, रांजणी, दहिगांव इ० गांवें अहिल्याबाईनें चंद्रचूड यांस उत्तम कामगिरीबद्दल जहागीर दिलीं व हल्लींचें मोहनीराजाचें देऊळ चंद्रचूड यांनीं बांधिलें आहे.

टोकें:—हें गांव इ० स० १५७८ पूर्वी टोंकेवाडी या नांवानें प्रसिद्धीस होतें. तें पेशव्यांचे अमदानींत प्रसिद्धीस आलें. पेशवे उत्तरहिंदुस्थानांत स्वारीस जात असतां या ठिकाणीं मुक्काम करीत असत. पेशव्यांचे अमदानींत बाबूजी नाईक बारामतीकर यांचे सरदार गद्रे यांनीं तेथलि स्वयंभू दैवत सिद्धेश्वराचें देऊळ, इतर देवळें व घाट बांधले. स्वतः बारामतीकरांनीं मोठाले वाडे, गंगेचा घाट, धर्मशाळा बांधिल्या. इतर सरदार थत्ते, खरे, ओंकार यांनीं घाट बांधले. पेशव्यांच्या दरबारांतील पुष्कळ सरदारांचे जुने वाडे हल्लीं टोंकें एथें दृष्टीस पडतात. रावोबादादा पेशव्यांनीं नारायणरावाच्या खुनाबद्दल बाळशास्त्री संगमेश्वरकर यांच्या-

करवीं टोंकें एथें प्रायश्चित घेतलें; त्यावेळीं प्रवरा व गोदावरी यांच्या संगमावर सोंडघाट नांवाचा भव्य व भक्कम घाट बांधला. हल्लीं जेथें नाना फडणविसांचा वाडा आहे त्याचे समोर असलेल्या बखळीच्या जागीं पेशवेसरकारचा महाल होता, तो पुढें जळाला. राघोबा दादांचे दत्तकपुत्र अमृतराव पेशवे यांची मुंज टोंक्यास महादेवाच्या मंदिरांत झाली; त्यावेळीं हा गांव सर्व ब्रह्मवृंदांना अग्रहार दक्षिणा म्हणून जहागीर दिला. पेशव्यांनीं श्रीसिद्धेश्वराच्या प्रदोषपूजेसाठीं श्रीचे पुजारी अनंतऋषि यांस मंगळापूर गांव जहागीर दिला व फुलासाठीं जळकेंबुद्रुकच्या रानांत मळा इनाम दिला. अहिल्याबाईनें नंदादीप, चौघडा, नैवेद्य वगैरेसाठीं ७ चाहूर जमीन इनाम दिली. हा गांव शके १६०० ते १७२० पर्यंत भरभराटींत होता. त्यावेळीं एथें शास्त्री, पंडीत, कारागीर, वैदिक वगैरे गुणीजनांचा भरणा होता. वस्ती १००० वर होती. पुढें उतरती कळा लागली. या गांवीं मुसलमानांची वस्ती मुळींच नाहीं. तसेंच मुसलमानांचें धार्मिक स्थान एथें नाहीं. या गांवीं मुसलमानांची वस्ती टिकत नाहीं, अशी एथील लोकांची भावना आहे.

वरखेडें:-- चांदो विठ्ठल हे विजयानगरच्या राजाचे प्रधान. तें राज्य बुडाल्यानंतर ते निजामशाहींत दिवाण झाले. त्यांनीं ह्या गांवीं वस्ती करून गांव ब्राह्मणांस अग्रहार दिला. हल्लीं चांदो विठ्ठलच्या १३ व्या पिढीचे वंशज रंगनाथ यादव हे या गांवचे वतनदार कुलकर्णी आहेत. एथील पाटील मुसलमान होते. त्यांचा व कुळकर्ण्यांचा २०।४० वर्षें वाद चालला होता. सदर कुलकर्णी यांनीं व दाऊदखान, झुलफिकरखान यांनीं भानसहिवरें एथील खानपाटलाची गढी उध्वस्त केली. या गांवीं मुसलमानी अमदानींत सैन्याचे तळ पडत असत. वरील चांदो विठ्ठल यांनीं एक चिरेबंदी विहीर, केशवराजाचें देऊळ बांधलें व त्यांच्या वंशांतील महादजी देवजी यांनीं गंगेस घाट बांधला. शिवाय तीन कोसांवरून पाण्याचा नहर बांधून गांवांत आणला होता. वरील गढी, केशवराजाचें देऊळ व नहराचे तुकडे याचे अवशेष दृष्टीस पडतात. कुलकर्ण्यांचे शाहू छत्रपतीच्या वेळेपासून आपसांत तंटे चालू होते. त्यांचा निकाल माधवराव पेशवे यांनीं केला.

शिरसगांवः—एथें सय्यद आडनांवाच्या मुसलमानांनीं बांधलेली ऐतिहासिक गढी असून ती हल्लीं लहंगे पाटलांच्या ताब्यांत आहे.

सलाबतपूरः—दिनानाथ नांवाचा तुळजापूरचा भक्त होता. त्याचा नातू लालसिंग परदेशी यानें हें गांव इ० स० १७४२ सालीं वसविलें. त्याच्या वंशाकडे

हल्लीं गांवची पाटीलकी आहे. गांवचे पश्चिमेस कांहीं वस्ती आहे, त्या वस्तीचें नांव पूर्वी पिंपळगांव असें होतें; तें गांव हल्लीं सलाबतपुरांत समाविष्ट झालें. त्या गांवांत मुसलमानांची गढी होती ती हल्लीं जमीनदोस्त आहे. (कदाचित् या गढी बांधणाराचें नांव सलाबतखान असल्यामुळें या गांवाचें नांव सलाबतपूर पडलें असावें) या गांवाच्या पूर्वबाजूस लालसिंगाची घोड्याची पागा होती.

भानसहिवरें:—हा गांव मुसलमानी अमदानींत कविजंग यास जहागीर होता. कविजंगानें पेंढाऱ्यांपासून गांवच्या संरक्षणासाठीं गढी बांधली. हल्लीं तिचा कोट, बुरुज, आंतील दोन दिवाणखाने कायम आहेत. एका बुरुजावर कविजंगाची कबर व दुसऱ्या दोन बुरुजांवर मोडक्या २ तोफा आहेत. हा गांव जेथें वसलेला आहे त्याच्या दक्षिणेस पाव मैलावर हा गांव तुरकपूर या नांवानें वसलेला होता. कविजंगांनीं गढी बांधल्यावर तुरकपूरची वस्ती गढीजवळ आणली.

पेशव्यांच्या दरबारचा शामराव बल्लाळ नांवाचा पुरुष दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं एथें आला व त्यानें गांवच्या पूर्वबाजूस रामाचें देऊळ बांधून त्याचे आसपास वस्ती केली. पुढें पेशव्याकडून त्यास धरणें आल्यामुळें तो पळून गेला. त्यानंतर पेंढाऱ्याच्या उपद्रवामुळें ती वस्ती उठली. सदरचें देऊळ कायम आहे; पण त्यांत बसविलेल्या सोन्याच्या मूर्ती पेंढाऱ्यांनीं नेल्या.

मिरी:—हा गांव फार जुना असून तो पूर्वी हल्लींपेक्षां फार मोठा होता असें जुन्या इमारतींच्या अवशेषावरून दिसतें. ११ वे शतकांत एथें जैनधर्माचें प्राबल्य होतें. या ठिकाणचो बारव व सन १९२१ सालीं मातींतून उकरून काढलेलें मंदीर हीं राष्ट्रकूट राजांचा अस्त व चालुक्य राजांचा उदय यामधील संधिकाळांत तयार झालेलीं असावीं.

हल्लींच्या मिरीकर जहागीरदारांचे मूळ पुरुष नारो विसाजी हे मिरीचे कुळकर्णी होते. त्यांचे वंशज रामराव हे राणोजी शिंद्यांचे चिरंजीव जयाजीराव यांचे फौजेंत दाखल झाले होते. जयाजीरावांनीं त्यांचे फारशी भाषेंतील प्राविण्य पाहून त्यास मुनशीगिरी दिली. पुढें जयाजीराव शिंदे यांनीं दिल्लीवर स्वारी केली व दिल्लीचा बादशाहा अहमदशाहा व वजीर सफदरजंग यांस जर्जर केलें. त्यावेळीं बादशाहानें शरण येऊन पेशव्यांशीं तह केला. तेव्हां रामराव हे पेशव्यातर्फे दिल्लीदरबारांत वकील बनले. पुढें त्यांनीं शेवगांव परगणा दिल्लीपतीकडून शिंद्यांना जहागीर देव-

विला; त्यावेळीं बादशहाकडून रामरावांना मिरी, शिंगवें, रांजेगांव हीं गांवें जहागीर मिळालीं.

पुढें जयाजीराव शिंद्यांनीं जोधपूरच्या राज्यावर स्वारी केली; तेव्हां त्यांना रामरावाच्या सल्ल्याची जरूर भासली. त्यावेळीं रामरावांनीं आपले वडील चिरंजीव यादवराव यांस दिल्लीस वकील ठेवून आपण शिंद्याकडे गेले, व त्यांच्या सल्ल्यानें राण्याला जेर केलें. तेव्हांपासून रामराव हे जयाजी, जनकोजी व दत्ताजी शिंदे यांचे सल्लागार होते. अखेर रामराव हे पानपतच्या समरभूमीवर पतन पावले.

रामरावांचे जेष्ठ चिरंजीव यादवराव हे दिल्लीस असतांना वारले. त्यांचे धाकटे बंधू बाबूराव हे दिल्लीस त्यांच्या जागीं काम करूं लागले. पुढें महादजी शिंद्यांनीं त्यास स्वतःची दिवाणगिरी व पावगडचा प्रचंड किल्ला व कांहीं गुजराथी मुलखाची सरंजामी दिली. पुढें राघोबादादा पेशवे नारायणरावाच्या खुनानंतर पेशवाई-पदावरून भ्रष्ट होऊन इंग्रजांच्या आश्रयास चालले असतां पावगडास श्रीमहा-कलिकादेवीचे दर्शनासाठीं आगमन केलें; त्यावेळीं सरदार बाबूराव यांनीं हे आपले जुने धनी आहेत, अशी जाणीव धरून त्यास अटक केली नाहीं. त्यामुळें बाबूराव हे राघोबास फितूर आहेत, असा नानाफडणवीस यांस संशय आला; पण महादजी शिंद्यांनीं त्या संशयाची निवृत्ति केली. पुढें खडर्याच्या संग्रामानंतर ते मिरीस आले व तेथें त्यांचें देहावसान झालें. बाबूरावाचे चिरंजीव बळवंतराव हे पेशवाई बुडाल्यावर मिरीस येऊन राहिले व सद्गुरु मार्तंड यांचा उपदेश घेऊन ईश्वरभजनीं लागले. कालांतरानें त्यांनीं संन्यासदीक्षा घेतली. त्या काळांत बंडखोर लोकांच्या बंडाव्यानें मिरीच्या वस्तीची दुर्दशा झाली. पुढें इंग्रजांनीं बंडाळी मोडून मिरीगांवास धीर दिला. पुढें मिरीचे जहागीरदार यशवंतराव यांनीं इंग्रजांकडून सरदारी मिळविली. पण मुलखगिरी करून शौर्य गाजविण्याचा काळ नाहींसा झाला. यशवंतरावांनंतर त्यांचे पुत्र दाजीसाहेब, त्रिंबकराव, शामराव व ब्रह्मराव यांनीं गांवची इभ्रत व लौकिक राखला आहे. अहमदनगरचे सुप्रसिद्ध सरदार रावबहादूर यशवंतराव त्रिंबक मिरीकर सी. आय. इ. हे त्रिंबकरावचे चिरंजीव होते.

मानभावाच्या ग्रंथांत (स्थान पोथींत) लेखन शके १५६८ माघ व॥ ९ मी मिरीगांवचे पश्चिमेस महालक्ष्मीचें देऊळ, मळ्याअंतीं पूर्वाभिमुख वीस दिवस राहिले.

पूजा झाली भोजन आवारूबाहेर, दरवाजा पूर्वाभिमुख असा शके ११९१–९२ मध्यें चक्रधर मिरीस आल्याबद्दलचा उल्लेख आहे.

खरवंडी:—औरंगजेब बादशाहा नगरास वारल्यावर त्याचें प्रेत रोझें येथें नेतांना त्या गांवच्या ईशान्य भागीं तें विसांवा घेतांना ठेवलें होतें. त्या ठिकाणीं थडगें आहे. तेथें चैत्रांत उरूस भरतो. थडग्याच्या व्यवस्थेबद्दल फकिरास आठ नंबर इनाम असून त्याच्या सनदा त्याच्यापाशीं आहेत. गावची वेस फार जुनी आहे.

सोनई—पूर्वी येथील पाटीलकी सय्यद मुसलमानाकडे होती. त्यावेळीं सय्यदांनीं बांधलेली गढी हल्लीं नामशेष होत आली आहे. शिंद्यांची मुलगी शितोळ्यास दिली होती. तिला चोळीबांगडीदाखल हा गांव शिंद्यांनीं शितोळ्यास जहागीर दिला.

एथील पेठेंत शेटे मंडळींचे मोठमोठे वाडे आहेत. त्यांचे पूर्वज बानाजी शेटे हे शिंदेसरकारचे नोकर असून नगरचे किल्लेदार होते. दुसरे बाजीरावाचे वेळीं नाना फडणवीस यांस दौलतराव शिंद्यांनीं कैदेंत ठेविलें होतें त्यावेळीं नगरची किल्लेदारी बानाजी शेटे यांजकडे होती. बानाजीस शिंद्यांनीं सोनई येथील पेठेचा गांवठाण इनाम दिला. त्याची सनद हल्लीं उपलब्ध आहे. हल्लीं पेठेची पोलीसपाटीलकी शेटे यांचेकडे आहे. एथील बालाजीच्या देवस्थानास इ० स० १६९८ सालीं छत्रपति राजाराम महाराज यांनीं (करंजगाव ता०नेवासें) हा गांव जहागिरी दिला होता. पेशवेसरकारचे सुभेदार नारोबाबजी यांनीं बाख, आहाळ, नदीचे मध्यभागचें मारुतीचें देऊळ व चावडी या इमारती बांधल्या.

खेडलें परमानंद:—हा गांव साधु परमानंद बाबा यांस मुसलमानी अमदानींत जहागिरी होता. पुढें ही जहागीर बंद होऊन वसुलांतील कांहीं रकम मोकासा म्हणून मिळूं लागली ती हल्लीं तेथील मठाधिपतीस मिळत असते.

शेवगांव:—इ० स० १३९६ मध्यें बहिराम नांवाच्या बंडवाल्यानें शेवगांवाजवळ राक्षीच्या लढाईत बहामनी सैन्याचा पराभव केला. इ० स० १६१० मध्यें येथें सार्वजनिक वर्गणीनें गांवकऱ्यांनीं एक सुंदर मशीद बांधली. तिच्या खर्चासाठीं शहाजहान बादशाहानें इ० स० १६३० मध्यें ४३० बिघे जमीन इनाम दिली. सदर मशीद हल्लींही चांगल्या स्थितींत असून तिच्या खर्चाकरितां दिलेली जमीन निरनिराळ्या काजी लोकांच्या घराण्यांत चालू आहे. अठराव्या शतकांत मराठ्यांनीं शेवगांवभाग निजामापासून घेतला व तो इ० स० १७५२ मध्यें शिंदे

होळकर यांचेमध्यें विभागला गेला. ही वांटणी रामराव नारायण मिरीकर यांनीं केली. इ० स० १८१८ मध्यें धर्माजी प्रतापराव या बंडवाल्यानें शेवगांवची बरीच नासधूस केली. इ० स० १८१९ सालीं होळकरांचा भाग इंग्रजांच्या ताब्यांत आला. इ० स० १८६० सालीं शिंद्यांशीं झालेल्या तहानें सुमारें ६२ गांवें इंग्रजांस मिळालीं. शिंदेसरकारच्या दिवाणांनीं येथें एक भव्य वाडा बांधला असून तो हल्लीं भारदे यांच्या ताब्यांत आहे. गांवाबाहेर दुसरा एक किल्लेवजा वाडा होता. तो पडला असून त्याचे चार बुरूज व दरवाजा शिल्लक आहे. दरवाज्यावर तोफेचे गोळे आपटल्याच्या खुणाही आहेत. यावरून येथें लढाई झाली असावी असें अनुमान निघतें.

हातगांव—हें गांव रावराजे दिनकरराव यांना शिंदेसरकारकडून जहागीर मिळालें. येथें हत्तेश्वर म्हणून शंकराचें एक स्वयंभू स्थान आहे. त्यावरून या गांवास हातगांव असें म्हणतात. सदर देवस्थानास शिंदेसरकारकडून इनाम मिळालेला आहे. येथें दोन जुन्या गढया आहेत. त्यांपैकीं, एक सय्यदांनीं बांधली ती लाडांचे ताब्यांत आहे व दुसरी मराठे पाटील यांनीं बांधली ती त्यांचे वंशजांचे ताब्यांत आहे. दोन्ही गढया पेंढाऱ्यासारख्या लुटारूपासून गांवचें रक्षण करण्यासाठीं बांधल्या आहेत.

अमरापूर—हें गांव मुसलमानांस जहागीर आहे. निजामशाहींतील प्रसिद्ध मुत्सद्दी मलिकंबर हा ह्या ठिकाणीं वारल्यामुळें या गांवांस अंबरापूर–अमरापूर असें नांव पडलें. या गांवीं मलिकंबराची कबर व एक भव्य मशीद आहे.

बोधेगांव--हें गांव शिंदे सरकारचे दिवाण रावराजे दिनकरराव यांस जहागीर आहे. दत्ताजी शिंद्यांची बायको भागीरथीबाई हिनें येथें एक भव्य बारव बांधली आहे. तीवरील लेख श्रीज्योतीस्वरूपचरणीं तत्पर राणोजी सुत दत्ताजी शिंदे तस्य भार्या भागिरथीबाई शिंदे....चैत्र शु॥ ५ असा आहे.

राशीन-- श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांचे चुलतबंधु शरीफजी राजे भोंसले यांची माहिती खालीलप्रमाणें आहे:--

राशीनकर पाटील कै० भाऊसाहेब राजे भोसले यांजकडे एक भोंसले घराण्याची वंशावळ पाहण्यांत आली ती खानवटेकर भोसले यांजकडील होती.

उत्तरेकडून दक्षिणेकडे भोसल्याचे ४ पुरुष अगर कुटुंबें आलीं. १ मुंगीपैठणास राहिलें. २ वेरूळास राहिलें. ३ भिवरथडीस जिंती खानवटयाकडे राहिलें. ४ वाय-

देशीं (वावी जि० नाशिक) राहिलें. भोंसल्याच्या वरील ४ जमातींनीं त्या त्या प्रांतांत प्रथम पाटिलक्या व देशमुखी वतनें मिळविलें. वेरूळ जमातींतील मालोजींचे चिरंजीव शहाजी व शरीफजी होत. शरीफजीचा मुलगा त्रिंबकजी व शरीफजी हे पितापुत्र औरंगजेबाचे कृपेंत असतां औरंगाबादेस राहत असत. तेथें त्यांच्या हवेल्या होत्या. औरंगजेबाचे आश्रयानें त्रिंबकजीनें भिवरथडीचा वैराण मुलूख आबाद करून जिंतीखानवटयाकडील पुंडाई बंद केली. औरंगजेबानें राशीनचेजवळ औरंगपूर नांवाची पेठ वसवण्याचा हुकूम त्याला दिला. (हीच हल्लींची यमाईपुढील मंगळवार पेठ होय) एथें त्रिंबकजीचा सरकारवाडा होता व बाग होता. दिवाणखान्याच्या सचित्र पडक्या भिंती, कचेरीचा पडका भाग, बागेंतील विहिरीपासून वाड्यांत आणलेला नळ यांचे अवशेष अद्याप पाहण्यास मिळतात. त्रिंबकजीचा वंश पुढें खानवटेकर भोंसल्यांत सामील झाला.

त्रिंबकजी, शरीफजी व त्यांची बायको यांच्या छत्र्या हल्लीं देवीच्या देवळाचे उत्तरेस पाहण्यास मिळतात. या छत्र्यांचें बांधकाम वेरूळच्या श्रीघृष्णेश्वराचे देवळानजीकच्या भोसल्यांच्या छत्र्यांप्रमाणें हुबेहूब व मोठें आहे. भिवरथडीला कळाशीकू गांवापासून थेट उत्तरेस हिंगणीबेरडीपर्यंत गांवोगांव भोंसल्याच्या पाटिलक्या व पुंडे आडनांवाच्या ब्राह्मणाच्या जोशीकुळकर्ण्याच्या वृत्त्या दिसून येतात. जिंतीखानवटे, राशीन, भांबोरें वगैरे ठिकाणीं भोंसल्यांच्या पाटिलक्या अद्याप आहेत. पुंडापैकींच दादोजी कोंडदेव होत. हणमंत्याचीं घराणीं कुंभारगांवाकडे आहेत.

पेडगांव--हिंदु अमदानींत पेडगांव हे क्षेत्राचें ठिकाण मानेंल होतें. तेथें बाळेश्वर, लक्ष्मीनारायण मल्लिकार्जुन व रामेश्वर हीं पुरातन देवस्थानें आहेत. देवालयाचें काम प्रेक्षणीय आहे. मोंगल अमदानींत त्याची बरीच खराबी झाली. त्यावेळीं मोंगलांनीं मराठ्यास शह देण्याकरितां येथें किल्ला बांधून त्यास बहादुरगड हें नांव दिलें. इ० स० १६७२ मध्यें दक्षिणचा सुभेदार खानजहान हा शिवाजीमहाराजांवर स्वारी करीत असतां त्यानें पावसाळ्यांत येथें मुक्काम केला व हा किल्ला बांधिला. १७५९ मध्यें हा पेशव्यांच्या ताब्यांत गेला. परंतु मोंगल अमदानींतच याची भरभराट होती. पुढें याचें महत्त्व कमी झालें. औरंगजेबाचा मुक्काम या ठिकाणीं २ वेळां झाला होता.

तीसगांव:--याचें जुनें नांव किंवा दुसरें नांव हुसेनाबाद हें होय. तें हुसेन निजामशाहा याचें नांवावरून पडलें असावें. तीस गांवें म्हणजे तीस पेठा वसविण्याचा हेतु असावा. अथवा हें गांव वसविणारा सरदार सलाबतखान याला तीसगांवाची नेमणूक असण्याचा संभव आहे. सलाबनखान हा मोठा प्रमुख सरदार व चतुर मुत्सद्दी होता. त्यानें हें गांव वसवून आपलें लष्करी ठाणें केलें. सलाबतखानाचा वाडा व मशीद येथें असून कबर चांदबिबीचे महालांत आहे. या गांवची रचना लक्षांत घेतां त्याची मांडणी मोठ्या शहरास शोभेल अशा तऱ्हेची केलेली दिसते. रस्ते रुंद असून समांतर उभेआडवे आहेत. अहमदनगर राजधानी जवळ असतांना हें शहर वसविण्याचें कारण असें होतें कीं, नगर शहरावर हल्ला चढविण्यास दोन मार्ग होते. एक देऊळगांवचा घाट व दुसरा वांबोरीचा घाट. यासाठीं चांदबिबीचा महाल व मांजरसुंब्याचा किल्ला या दोन टेहळणीचौक्या प्रसिद्ध होत्या. त्यांतून देऊळगांवचा घाट विशेष रहदारीचा असल्यानें नगरच्या संरक्षणासाठीं एक लष्करी ठाणें पाहिजे होतें व त्यासाठीं सलाबत जंगानें तीसगांव वसविलें. एथें दिनकरस्वामी व वशिष्टगीर गोसावी यांच्या समाधि आहेत.

वाळकी:—सुमारें दीडशें वर्षांपूर्वी वाळकी हें गांव निजाम व मराठे यांच्या सरहद्दीवर होतें. परंतु इ० स० १७९५ च्या (खडर्याच्या) लढाईनंतर ही सरहद्द पूर्वेकडे सरकली. तसेंच इ० स० १७९५ चे पूर्वी वाळकीस निजामाचे फौजेची छावणी होती. तसेंच वाळकीस त्यांची गढी असून मोठें कबरस्थान होतें. त्याचे अवशेष म्हणून एक पडका बुरूज गांवचे मध्यभागीं आहे. निजामाचे सैन्याबरोबर सामान वाहणारे जे कवाडी लाक होते त्यांचे वंशज अद्यापि कवाडी या नांवाचे मुसलमान लोक वाळकींत आहेत.

गुंडेगांव:—हा गांव पूर्वीचे वस्तीपासून १॥ मैलावर शिंगणापूर म्हणून गांव आहे तेथें होता. तें गांव भुतोजीराव यांचेकडे निजामशाहींतलि किल्ले जिंकून दिले म्हणून जहागिर दिलें होतें. भुतोजीराव या गांवीं पागेसह राहत असत. पुढें हा गांव जळाला. शिंगणापुरास हत्तींचा बाजार भरत असे. शिंगणापूरवस्तीपासून दक्षिण दिशेकडे डोंगर असून त्या डोंगरावर पांच टेंकड्या आहेत. या टेंकडयांत भुयार असून या ठिकाणीं गुंडऋषि तपश्चर्या करीत असत. म्हणून या गांवास गुंडेगांव हें नांव पडलें.

कामरगांव:--अंताजी माणकेश्वर हे श्रीमंत नानासाहेब पेशव्यांचे वेळीं सरदार होते. यांनीं नागोरास वेढा देण्याचे बाबतींत सन १७५५ मध्यें शिंद्यास १००० सैन्यासह मदत केली. सदाशीवरावभाऊ यांचेबरोबर १७६० सालीं पानपतचे युद्धांत होते. यांनीं बांधलेला एक वाडा व त्यांचे बंधूचे पांच वाडे येथें आहेत. त्यांचा स्वतांचा वाडा ओसाड व पडीक असून त्यांत एक बारव आहे, तिला पाणी कायम असतें.

अकोळनेर:--शिवाजीमहाराज यांचीं जुन्नरपासून चाकणपर्यंत बारा मावळें होतीं. तीं-- शिवनेर, जुन्नर, मोन्नेर, घोडनेर, भीमनेर, भामनेर, जामनेर, पिंपळनेर, पारनेर, सिन्नर, संगमनेर आणि अकोळनेर. हा गांव जहागिरी असून तो तेथील जहागिरदार दाभोळकर, यांस पेशवेसरकारांतून आंदण मिळालेला आहे. या गांवांत जाधव व भोर या आडनांवाचे मराठे आहेत. जाधवांचा संबंध शिंदे-सरकारचे सरदार अकोळनेरकर यांच्याशीं आहे.

दर्गादायरा:--औरंगजेब बादशहाची छावणी इ० स० १६६० पासून १७०० पर्यंत एथें होती. दर्गादायरापासून पूर्वबाजूला औरंगजेबाचा दर्गा आहे. त्या ठिकाणापर्यंत छावणी होती. शहाशरीफ यांचा घुमट शहाजीराजे यांनीं एक लक्ष रुपये खर्चून पीर नवसास पावले म्हणून बांधला आहे. दर्ग्याच्या दक्षिणबाजूस लदावची मशीद आहे. ती अजमालखां पेशवे यांनीं एक लक्ष रुपये लावून आपल्या कारकीर्दीत बांधली आहे. मशिदीसमोर औरंगजेब बादशहाचे गुरु मौलवी अहमद व मौलवी इकाम यांचीं थडगीं आहेत. विहीर मालोजीराजे यांनीं बांधली असून चोहो बाजूंचा तट औरंगजेब बादशहानें बांधला आहे.

जेऊर:--या ठिकाणीं बायजाबाई नांवाची अत्यंत साध्वी अशी मराठ्याची स्त्री, गवळी या उपनांवाचे कुळांत जन्मास आली. तिचा विवाह म्हसके उप-नांवाच्या कुळांतील पुरुषाशीं झाला. हल्लीं जेथें जेऊर आहे, त्या ठिकाणीं तिची शेतजमीन होती. ती आपल्या सासऱ्याला दुपारची भाकरी पोहोंचविण्यास निघाली असतां कांहीं लष्करी फौज तिला भेटली व तिनें आम्हांस जेवावयास घाल म्हणून मागणी केली. तिनें आपल्या जवळच्या शिदोरींत सर्वांस पोटभर जेऊं घातलें परंतु कांहीं दुष्ट लोकांच्या वाईट इच्छेमुळें ती तेथेंच गुप्त झाली. ती जेथें गुप्त झाली त्या ठिकाणीं हल्लीं बायजाबाईचें देऊळ आहे.

देऊळगांव सिद्दी:--हें नांव पडण्याचें कारण या गांवीं एक पीर असून

त्याचें 'सिद्दी' हें नांव आहे. एथें वाबळे या आडनांवाचें प्रसिद्ध मराठे घराणें आहे. त्या घराण्यांत दौलतराव, यशवंतराव, हिंदुराव वगैरे कर्तबगार पुरुष होऊन गेले. त्यांचे वंशज हल्लीं येथें राहत आहेत.

दौलतराव वाबळे यांनीं या गांवीं सुमारें २ लाख रुपये खर्चून वाडा व १ लाख रुपये खर्चून एक तलाव बांधला आहे. परंतु दोहोंचेंही कांहीं काम अपुरें राहिलें आहे. तळ्याचे कांठींच त्यांची छत्री आहे. तलावाचें पाणी चांगलें व भरपूर आहे. त्या पाण्यावर त्यांची कांहीं शेती भिजते.

भातोडीः——या गांवांस भातोडी किंवा भातवडी असें म्हणतात. तें नांव भातेवाडी या शब्दाचा अपभ्रंश असावा असा अंदाज आहे. सुमारें ८०० वर्षांपूर्वी एथें एक वाडी होती, व त्यांत भातपुरे लिंगायत वाण्यांची वस्ती होती. त्यांचे स्वामी माजूरटाकळी येथें राहत असत. लिंगायत भातपुरे यांनीं त्यांना वाडीस बोलाविलें व लिंगस्थापना केली. त्या लिंगाचें नांव भातेश्वर——म्हणून या वाडीस भातेवाडी म्हणूं लागले. यावेळीं एथील पाटिलकी 'कोली' या आडनांवाच्या वंशाकडे होती. जमीन सुपीक असल्यामुळें येथील वस्ती वाढत चालली.

बहामनी राज्यांत जरी येथें प्रत्यक्ष ऐतिहासिक प्रसंग घडला नसला तरी हें गांव त्यावेळीं वाढूं लागलें होतें. पुढें निजामशाहीच्या पुढच्या काळांत तें पूर्ण वाढलें. निजामशाहीच्या अखेरीस या गांवाजवळ एक लढाई झाली आहे व या ठिकाणीं श्रीनरसिंहाचे देवालय असून नवनाथांपैकीं कित्येक या ठिकाणीं आलेले होते असें म्हणतात. स्वराज्याचे दृष्टीनें त्याचें थोडेंफार महत्त्व आहे.

देवळाली (प्रवरा):—येथें भिल्ल लोकांची वस्ती जास्त आहे. पूर्वी या भागांत त्यांचें बंडही झालें होतें, व भिल्लांना कामगिरीबद्दल मिळालेलें बक्षिस म्हणजे इनाम जमिनी आजही त्यांचेकडे आहेत. त्या वेळचा भिल्लांचा वाडाही पाहण्याजोगा आहे. त्यावरील नक्षीकाम वगैरेवरून वरील विधानास पुष्टि येते. पूर्वी या भिल्लांनीं सैन्यांत नोकऱ्या करून व स्वतंत्र पथकें तयार करूनही मुसलमानांना विरोध करण्याचें काम केलें आहे. औरंगजेबानें एथील मशीदीस ४ चाहूर जमीन इनाम दिली ती अद्याप चालू आहे.

गहूः— येथें एक गुहा आहे व तीमध्यें कानफिनाथ हे नाथपंथी सत्पुरुष राहत होते. ते मढीकडे जाण्यापूर्वी येथें कांहीं काळ राहिले होते. तेथें भक्त मंडळींनीं त्यांना ध्यानस्थ बसण्यासाठीं एक गुहा करून दिली, त्या गुहेच्या भोंवती भक्त मंड-

क्तींची वस्ती होऊन हें लहानसें खेडें बनलें. पुढें ते मढीकडे गेले. या भक्तमंडळींना मुसलमानी अमलांत त्रास झाला व त्यांना मुसलमानी धर्म स्वीकारणें भाग पडलें. ही भक्तमंडळी पूर्वी हिंदू-मराठे असून त्यांचें आडनांव जाधव असें होतें. ते मुसलमान झाल्यावर मुसलमानांकडून त्यांना इनाम वगैरे मिळालें.

लाख:—मिरावलीसाहेब यांना लाख रुपयांची जहागीर होती असें म्हणतात. त्यावरून ' लाख ' हें नांव पडलें असावें.

पेशव्याचे वेळीं येथें घोड्यांची पागा होती व त्या पागेवर बालेखां मीरखां व मसूदखां मीरखां या उभयता बंधूंची नेमणूक होती. बालेखां यांनीं येथें एक मशीद बांधली आहे ती कायम आहे. त्यांचे वंशज हल्लीं येथें राहत असून त्यांना पिराचे पुजेबद्दल इनाम आहे.

वांबोरी:—एथें श्रीमंत पेशवेसरकार यांची पागा होती. तिची देखरेख करण्यास ' नागोराम भागवत ' नांवाचे अधिकारी आले. त्यांनीं हल्लीं असलेला वाडा बांधिला व लगतची पेठ वसविली. त्यांना देखरेखीचे कामाबद्दल कृष्णापूर जि० औरंगाबाद हा गांव जहागीर मिळाला. तो अद्याप त्यांचे वंशाकडे चालत असून त्यांचे वंशज हल्लीं तेथेंच आहेत.

श्रीमंत धाकटे बाजीरावसाहेब ह्यांनीं नागोराम यांचे चिरंजीव बळवंतराव यास वांबोरी गांव सरंजामी जहागिर करून दिला, तो त्यांचे वंशजांकडे चालत होता, परंतु जहागीरदारांच्या आपसांतील यादवीमुळें निंमा गांव खालसा झाला. बाकीचा निम्मा गांव इंग्रजास सरंजामाची जरूर नसल्यामुळें सरकारनें सन १८७८ मध्यें खालसा केला. हल्लींच्या गांवाच्या मध्यावर सरकारवाडा आहे. त्याचा कोट भव्य असून अद्याप मजबूत आहे.

ब्राह्मणी:—एथील पाटील खंडेराव सयाजीराव जाधव हे श्री० लखुजी जाधवराव यांचे वंशांतील असून त्यांची ही सातवी पिढी आहे. यांचें वास्तव्य सातारा जिल्ह्यांत भुईंज एथें असून ते तेथील इनामदार आहेत.

मालुंजे बुद्रुक:—औटी यांचे घराण्यांत इ० स० १८०० च्या सुमारास श्री. नारो गोविंद आवटी या नांवाचे एक पुरुष श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांच्यापाशीं एक सामान्य प्रतीचे नोकर होते हे फार धाडसी होते. एके वेळीं पेशवे सरकारचा मुक्काम कोपरगांवीं असतां त्यांना शंकरास वाहण्याकरितां बेलाची फारच गरज लागली. बेलाचें झाड पलीकडे बेटांत असून नदीला महापूर आलेला होता,

त्या पुरांतून पोहून जाऊन बेल आणून देण्यास कोणाचें धाडस होईना. शेवटीं यांनीं पोहत जाऊन श्रीमंतांना बेल आणून दिला. पुढें कोंकणप्रांतांतील महाडप्रांताचा वसूल सुमारें ५ वर्षें थकला होता लोक सरकारास दाद देईनात. तेव्हां श्रीमंतांनीं ही कामगिरी यांना दिली. यांनीं कडक उपाय योजून त्यांचेकडून मागील सर्व बाकी सव्याज वसूल केली, व लोकांना वचक बसविला. या त्यांच्या कर्तबगारीमुळें पेशवेसरकारांनीं त्यांच्या गांवचे शिवारांत ५५ एकर जमीन इनाम करून दिली. पूर्वीची सनद घेऊन इंग्रजसरकारनीं नवी सनद १८६१ सालीं दिली.

सोनगांवः—शेवटचे बाजीराव यांचे हातीं पेशवाई येईपावेतों म्हणजे इ० स० १८०२ पावेतों या भागांत ४०-५० हजार पर्यंतची घोडयाची पागा असे. निजामशाहीपासूनच योग्य वाटत असलेला प्रदेश, पागांचे सोईसाठीं राखींव कुरणें म्हणून ठेवलेला असे. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांचे कारकीर्दीत या पागेवरील सरनायक श्री. केशव महादेव ओक हे येथें इ० स० १७८६ मध्यें आले व त्यांनीं वाडा बांधिला. ते इ० स० १८०२ पर्यंत पागेचे सरनायक होते. पुढें पेंढाऱ्यांचा उदयकाळ झाल्यानें ओक हे पेंढाऱ्यांकडून मारले गेले आणि पागेचाही अपकर्ष झाला.

खर्डें:—सातारकर शाहूमहाराज यांचे बाजूचे जे कांहीं मराठे सरदार निजामास जाऊन मिळाले, त्यांपैकीं हैबतराव निंबाळकर हे एक होत. ते बीड येथें राहत असत. त्यांना ५२ लाखांची सरंजामी असून ते त्या भागांतील देशमूख होते. त्यांना हणमंतराव व सुलतानराव असे दोन मुलगे होते.

खर्डेंगांवास शिवपट्टणही म्हणत असत. निंबाळकरांचे कुळदैवत जेजुरीचा खंडोबा. एके वेळीं ते बिडाहून जेजुरीस जात असतां सुर्व्याच्या वाडींत त्यांचा मुक्काम पडला. वाडी एका मोठया खोलगट भागांत बसली असून तिचेभोंवतीं किर्र झाडी होती, त्या झाडींतून एक ससा निघाला, त्यामागें सुलतान आप्पांची कुत्री लागली ती त्यावेळीं गाभण होती. थोडया अवधींत ससा कुत्र्यावर उलटला. हें त्यांचे युद्ध आप्पा पाहत होते. त्यांना आश्चर्य वाटलें व त्यांनीं ही शूरांची भूमि आहे, असें म्हटलें, व जेजुरीहून परत आल्यानंतर या भूमीवर त्यांनीं वास्तव्य करण्याचें ठरविलें व एक गढी बांधली. सुलतानरावाची ढाल व तरवार अद्याप या गढींत पहावयास मिळते. पुढें निरनिराळ्या धंदेवाल्या लोकांस आश्रय देऊन त्यांची तेथें वस्ती करवली. गांव खड्यांत वसलें म्हणून खड्डा-खर्डी असें नांव

पडलें. या गांवांत ' गूढ ' नांवाचे लिंगायत होते त्यांनीं गांवच्या भोंवतीं बारा लिंगें स्थापन केलीं. निंबाळकर हे शिवभक्त असल्यानें त्यांनीं शिवपट्टण हें नांव दिलें. त्यांनीं प्रत्येक ज्योतिर्लिंगास इनाम दिलें आहे.

या सुलतानराव आप्पांची चिरस्मरणीय कृति म्हणजे त्यांनीं बांधलेला सुलतान दुर्ग होय. हाच एथील किल्ला होय. हा किल्ला खडर्याचे दक्षिण दिशेस सुमारें १॥–२ फर्लांगांवर आहे. किल्ला भुईकोट असून ४३० फूट लांब व ४२० फूट रुंद आहे. तटाचीं उंची ५० फूट असून त्याच्या माथ्यावरून दोन गाड्या जातील इतका तो रुंद आहे. दरवाजे ३ असून मुख्य दरवाज्यावर पुढील लेख आहे.

श्री ॐकारेश्वर प्रसन्न.

स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १६६५ रुधिरोद्गारीनाम संवत्सरे अश्वीन व ५ १२ इंदु वासर ते दिनी राजश्री सुलतानजी राजे निंबाळकर देशमूख देशपांडे व मोकदम कसबे शिवपट्टण व अष्टाधिकारी पेटा कसबे मजकूर परगणे जामखेड सरकार अहमदनगर सुभे खुजत्तबुनियाद औरंगाबाद यांनीं किल्ले सुलतान दुर्गाचे रचनेस आरंभ केला ॥ सन ११५३ ॥ शुभं भवतु ॥ छ ॥

किल्याच्या मधल्या दरवाज्यावरही फारसी लेख आहे. या किल्याचे आंत एक मोठी विहीर आहे. ती सुमारें १५० फूट खोल असून जवळच एक मशीद आहे. किल्ला व गढी यांचा निकट संबंध असल्यानें किल्यांत जाण्यास जमिनींतून एक मोठें भुयार तयार केलें होतें असें म्हणतात.

या किल्याचा लढाईचे कामीं कधीं उपयोग झाला नाहीं. फक्त इ० स० १७९५ त निजाम–मराठ्यांचे झालेल्या लढाईत निजामानें कांहीं काळ किल्याचा आश्रय केला होता, परंतु पुढें त्यांच्यांत तह होऊन युद्ध बंद झालें.

जरी या युद्धाला खर्ड्याची लढाई म्हणतात तरी ती या गांवापासून ६ मैलांवर झाली. तें ठिकाण पिंपळगांवचे हद्दींत आहे. एथें एक लहानशी टेकडी असून तिजवर मराठ्यांचें निशाण होतें व सैन्य त्या टेकडीचे पश्चिम बाजूच्या उतारावर होतें.

सुलतानरावांना मुलगा नव्हता त्यामुळें त्यांनीं, हणमंतरावांचा वडील मुलगा व्यंकटराव यास दत्तक घेतलें. या व्यंकटरावास कोल्हापूरच्या राजाची मुलगी दिली होती. व्यंकटरावांची बहीण काशीबाई जनकोजी शिंद्यास दिली होती. व्यंकटरावास आणखी ३ भाऊ होते. १ भवानराव, २ शिदोजीराव ३ दौलतराव

यांचें वास्तव्य अनुक्रमें भातकुली, भाळवणी, ब्रह्मगांव या ठिकाणीं होतें. त्यांचे वंशज अद्याप तेथें आहेत. व्यंकटरावावर निजामाची इतराजी झाल्यामुळें ते १७६१ नंतर कोल्हापुरास राहण्यास गेले.

सुलतानरावांस महादेवाची भक्ति होती. त्यांनीं ओंकारेश्वर नांवाचें महादेवाचें सुंदर व भव्य देवालय १६५४ शकाचे सुमारास बांधलें. त्या देवळाजवळ समोर एक बारवही बांधिली आहे.

खर्ड्याचे पूर्वेस बेलेश्वर म्हणून एक स्थान रम्य, निवांत असें आहे. तेथें तुकारामबुवा म्हणून एक साताऱ्याकडील ब्राह्मण योग्याभ्यास करीत असे. सुलतानरावांचे ते गुरु. तुकारामबुवा भिक्षा मागून झोळी निंबाळकरांकडे ठेवीत. एकदां ती झोळी पाहुण्यांनीं पाहिली तेव्हां त्यांना (निंबाळकरांना) दोष दिला. परंतु त्यामुळें ती झोळी काढण्यानें तुकारामबुवा रागावले व त्यांनीं सांगितलें "ही जागा सत्पुरुषासाठींच राहील." सुलतानरावांनीं काशीहून येतांना नर्मदातटाकाहून एक कृष्णमूर्ति आणिली व तिची स्थापना केली तिला बेलेश्वर म्हणतात.

प्रकरण १० वें.


धार्मिक इतिहास.

नगरप्रांत म्हणजे संतांची पुण्यभूमि. तेथें अनेक संतांनीं वेळोवेळीं धर्मप्रसाराचें कार्य केलें व समाज सुसंघटित करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच परिश्रमानें मराठी भाषेचा उदय होऊन तिचें तेज प्रगट झालें व स्वार्थ व भेदवृत्ति नाहींशी झाल्यामुळें जी निष्काम कर्माची व कर्तव्यभावनेची धमक अंगांत येते, ती वाढत जाऊन मराठ्यांची शूरवृत्ति निर्माण झाली. धर्म, भाषा व शौर्य या तिन्ही गोष्टी संतांच्या परिश्रमाचें फळ होत; व या तिन्हींचें बीज याच प्रांतांत पेरलें गेलें. त्याचा विस्तारही एथेंच होत गेला. यामुळें या प्रांतास संतांची भूमि हें म्हणणें यथार्थ आहे.

नाथपंथ.

ही कामगिरी महाराष्ट्रांत प्रथम नाथपंथानें सुरू केली. नाथपंथांत नाथ व सिद्ध असे दोन प्रकारचे महात्मे होते. परम पदास पोहोंचल्यानंतर जनसेवेचें व्रत वाढ

ठेवणारे ते नाथ व मीपणाचा पूर्ण लोप करून जनसेवेविषयीं शिक्षण घेणारे ते सिद्ध. यांस पुढें संत व साधू हीं नांवें मिळालीं. नाथपंथांत नऊ नाथ होऊन गेले व चौऱ्यांशीं सिद्ध होते असें सांगतात. यांपैकीं, सर्व मंडळी नगरप्रांतांत होती. नऊ नाथांपैकीं, मच्छेंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, जालंदरनाथ व कानिफनाथ हे पांच प्रमुख नाथ इकडेच राहत असत. अहमदनगर जिल्ह्याच्या मध्यभागीं पूर्व-पश्चिम जी डोंगरांची ओळ आहे तिला गर्भागिरी अथवा गर्भाद्रि हें नांव आहे. या डोंगरांत व जवळपास नाथपंथीय संत महंतांचीं अनेक स्थानें आहेत. अकराव्या शतकाच्या सुमारास त्या पंथाच्या साधुसंतांनीं हा प्रदेश गजबजून गेला होता. प्रत्येक दहा पांच मैलांवर एकादें नाथपंथीय स्थान अद्याप आढळतें. नाथपंथाचे मुख्य प्रवर्तक आदिनाथ. त्यांची शिष्यपरंपरा नवनाथांपुरती पुढें दिली आहे:—



आदिनाथाचें स्थान घाटशिरसनजिक गर्भाद्रीच्या दरींत आहे त्यास वृद्धेश्वर हें नांव आहे. नाथपंथानें संस्कृतच्या ऐवजीं मराठीचा उपक्रम सुरू केल्यामुळें त्यास अद्याप म्हातारदेव म्हणतात, व तेंच नांव हल्लीं प्रसिद्ध आहे. सुमारें ८०० वर्षांपूर्वी आदिनाथांचें देवालयास श्रावणदेव नांवाच्या राजानें घंटा दिल्याचा लेखी दाखला सांपडतो. आदिनाथाच्या दरीच्या पलीकडच्या दरींत मच्छेंद्रनाथांचें वास्तव्य होतें. तेथें दोन लेणीं असून एकांत हल्लीं सटवाई आहे. तिला लेण्याची सटवाई म्हणतात. सटवाई हा शब्द सत्त्वाई ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. मच्छेंद्रनाथांचें सत्त्व अथवा सत्ता अद्याप त्या प्रांतांत असल्यानें तेथें जन्मलेल्या प्रत्येक मुलास ह्या सटवाईच्या पायावर घालण्याचा अद्याप प्रघात आहे. त्यामुळें

नाथग्रंथाचा या प्रांतांशीं कायम संबंध ठेवण्यांत आला आहे. मच्छेंद्रनाथाचा पूर्ण इतिहास मिळत नाहीं. धर्मप्रसारार्थ संचार करीत असतां ते सप्तशृंगीं येथें आले. व चौरंगीनाथास गुरूपदेश दिला. तेथून ते इकडे आले व येथेंच राहिले. आदिनाथासमोर त्यांनीं गोरक्षनाथास गुरूपदेश केला व त्यांना पूर्णत्वाची प्राप्ती झाल्यावर समाधि घेतली. ही समाधि त्यांच्या वास्तव्याच्या दरीच्या माथ्यावर सावरगावच्या हद्दींत आहे. मच्छेंद्रनाथांस मायबा (मायबाप) म्हणतात, व त्याच नांवानें त्यांची समाधि प्रसिद्ध आहे. पौष व॥ ३० ला त्यांनीं समाधि घेतल्यामुळें त्या दिवशीं तेथें मोठी यात्रा भरते. या समाधीचें स्मरण म्हणून दर अमावास्येस आदिनाथांची वारी करण्याचा प्रघात त्यावेळेपासून सुरू झाला, तो अद्याप चालू आहे.

मच्छेंद्रनाथांचे शिष्य चौरंगी हे खानदेशच्या बाजूस राहून त्यांनीं त्या प्रांतीं कार्य चालविलें होतें. दुसरे शिष्य गोरक्षनाथ हे फारच व्यापक कार्यकर्ते निघाले. त्यांस महाविष्णु म्हणत असत. त्यांनीं योगसाधनांत बरीच सुधारणा केली. गुरु भक्तीच्या मार्गास शुद्ध वळण दिलें. मराठी ग्रंथरचनेचा उपक्रम सुरू केला. ज्ञान व भक्ति या दोन्ही मार्गांचें वर्म समाजापुढें ठेवून त्यांची सुधारणा घडवून आणली. त्यांचा संचार सर्व हिंदुस्तानभर होता. त्यांनीं ठिकठिकाणीं ज्ञानप्रसारार्थ शिष्यांची नेमणूक केली. गोरक्षनाथांचें वास्तव्य डोंगरगणनजीक जी दरी आहे तिच्यांत होतें. तेथें रामेश्वर महादेवाचें स्थान आहे रामायणकाळीं येथें ऋषींचें वास्तव्य होतें व या ठिकाणीं राम येऊन राहिले होते याबद्दलचें वर्णन पौराणिक भागांत आलेंच आहे. रामाचे बरेच दाखले तेथें आढळतात व त्यावरून तेथील महादेवास रामेश्वर हें नांव पडलें असावें. परंतु त्यास कपिलेश्वर हें नांव होतें व नामदेवादि संतमंडळी येथें आलीं होतीं. त्यांनीं त्याच नांवानें या स्थानाचा निर्देश केला होता. कपिल महामुनी सांख्यज्ञानाचे मूळप्रर्वतक. त्यांनीं जसें कार्य केलें तसेंच व्यापक कार्य गोरक्षनाथांनींही केलें असल्यानें गोरक्षनाथाच्या आश्रमांतील महादेवास कपिलेश्वर हेंच नांव सार्थ होईल. गोरक्षनाथास गोरोबा म्हणत असत. या नांवामुळेंच एक घोटाळा झाला आहे. नामदेवाची परीक्षा पाहण्याकरितां त्याच्या डोक्यावर थापटणें मारणारे गोरोबा म्हणजे कुंभार असा हल्लीं समज आहे. परंतु ते गोरोबा म्हणजे गोरक्षनाथ होते. गोरक्षनाथ दीर्घायुषी होते. आपल्या आश्रमांतील डोंगरावरच त्यांनीं समाधि घेतली. तो

डोंगर गोरखनाथांचा डोंगर म्हणून प्रसिद्ध आहे. त्या शेजारींच एका डोंगरावर सटवाई आहे. या भागांतील अर्भकें तिच्या पायांवर नेऊन घालतात व गोरक्षनाथांचा आशिर्वाद घेतात. हिला गर्भ्याची सटवाई हें नांव असून ती गर्भ्याचे पिंपळगांवानजीक आहे. गर्भा हें गर्भागिरीचें संक्षिप्त नांव आहे. गोरक्षनाथांनीं संस्कृत, हिंदी व मराठी या तिन्ही भाषांत ग्रंथ रचले. मराठींत त्यांचा गोरक्षअमरनाथ-संवाद नांवाचा ग्रंथ असून कांहीं पदेंही सांपडतात. यांच्या नांवावर गोरक्षगीता नांवाचा एक मराठी ग्रंथ आहे. परंतु तो त्यांचा नसून त्यांचे शिष्य गहिनीनाथ यांचा असावा. गोरक्षनाथास त्यांचे नांवावरून ते मुळचे उत्तरहिंदुस्तानचे रहिवासी असावेत असें हल्लीं मानण्यांत येतें परंतु तें बरोबर नाहीं. त्यांचा जन्म खानदेशांत सुवर्णगिरी ऊर्फ सोनगिरी येथें झाला असा समज आहे, पण त्यांचें मुख्य वास्तव्य डोंगरगणच्या दरींत होतें हें निर्विवाद आहे. त्यामुळें हे महाराष्ट्रीय होते हें उघड दिसतें. नांव हें देशनिर्देशास उपयुक्त नसून सांप्रदायिक असल्यानें तत्वनिर्देशक आहे. गोरक्षनाथाचे शिष्य गहिनीनाथ यांचें खरें सांप्रदायिक नांव गायिनीनाथ आहे. त्यांना आदिनाथासमोर उपदेश झाल्यावर गोरक्षाश्रमांत त्यांनीं ज्ञानपरिपूर्ति केली व जामखेड पेठ्यांतील अमळनेरनजीक चिंचोलीच्या रानांत आश्रम स्थापन केला. गहिनीनाथाचा ज्ञानेश्वरादि भावंडांशीं प्रत्यक्ष संबंध येतो. ज्ञानेश्वराचे आजाआजी गोविंदपंत व निराबाई यांच्यावर गहिनीनाथांनीं अनुग्रह केला व विठ्ठल नामाचें संपूर्ण रहस्य सांगून विठ्ठल मंत्राचा उपदेश दिला. ज्ञानेश्वराचे वडील बंधु निवृत्तिनाथ यांना गहिनीनाथांनीं गुरूपदेश दिला व ही गोष्टही आदिनाथासमोर झाली. गहिनीनाथांच्या आज्ञेवरून निवृत्तिनाथांनीं धर्मप्रसाराचे कामास व्यापक स्वरूप दिलें व तेंच निवृत्तिनाथांचे धाकटे बंधू व शिष्य ज्ञानेश्वर यांनीं व्यवस्थित स्वरूपांत लोकांपुढें मांडून धर्मस्थापना घडवून आणली. अशा रीतीनें ज्ञानेश्वरांचे कार्याचा उगम या नाथपंथी नाथापासून सुरू होतो. निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई या चौघांच्या आपत्कालीं गहिनीनाथांची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती व त्यांचें परिपूर्ण ज्ञान हें गहिनीनाथांच्या शिक्षणाचें फळ आहे. गहिनीनाथांनीं केलेल्या गोरक्षगीता नांवाच्या मराठी ग्रंथांत जो मार्ग सांगितला, त्याचें अनुभवपूर्ण असें विस्तृत विवेचन ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत केलें आहे. गहिनीनाथांची समाधि त्यांच्या आश्रमानजिक आहे.

आदिनाथांचे दुसरे शिष्य जालंदरनाथ यांची समाधि पाथर्डी पेट्यांतील खोकर-मोहो या गांवापासून सहा मैलावर डोंगरांत आहे. त्यांचा मुख्य आश्रम या ठिकाणीं असला तरी त्यांचा बराच काळ पैठण येथें गेलेला दिसतो. पैठण येथेंच त्यांची व कानिफनाथांची गांठ पडली. गुरूपदेशानंतर कानीफनाथ त्यांच्या आज्ञेनें धर्म-प्रसाराचे कार्य करूं लागले. कानिफनाथांनीं आपला आश्रम मिरी येथें स्थापन केला व तेथें बराच काळ घालवून गर्भागिरीच्या पायथ्याशीं असलेल्या एका टेकडीवर राहण्यास गेले, व तेथेंच त्यांनीं फाल्गुन व॥ ५ ला समाधि घेतली. मच्छेंद्रनाथ व कानिफनाथ यांच्या समाधि एकमेकांपासून बऱ्याच दूर परंतु समोरा-समोर आहेत. जालंदरनाथास जानोबा व कानिफनाथास कानोबा नांवानें ओळखतात. कानोबाचें पुढें कान्होबा रूपांतर झालें. कान्होबांनीं येथें समाधि घेतली त्या ठिकाणीं मढी गांव वसला. कान्होबाची मठी ती मढी. कानिफनाथ हे मद्र देशांतील एका राजाचे पुत्र. त्यांनीं राजपदाचा मोह सोडून जालंदरनाथांचा उपदेश घेतला व धर्मप्रसारक जनसेवेचें व्रत चालविलें. त्यांचा व त्यांचे गुरु जालंदरनाथ यांचा धर्मकार्यार्थ बरेच दूर दूर संचार होत असे. गौडबंगालच्या राजाची पत्नि मैनावति हिची जालंदरनाथावर पूर्ण श्रद्धा असून तिनें त्याचा गुरूपदेश घेतला. ही गोष्ट तिचा मुलगा गोपिचंद यास पसंत न पडल्यानें त्यानें जालंदरनाथांचा बराच छळ केला. कानिफनाथांस ही गोष्ट समजल्यावर त्यांनीं गोपिचंदाची कानउघाडणी केली. त्यामुळें पश्चाताप होऊन गोपिचंद कानिफ-नाथांच्या चरणीं लागला व त्यांनीं त्याच्यावर अनुग्रह केला. जालंदरनाथ व कानिफनाथ यांच्या शिक्षणांत वैराग्यपर ज्ञानामार्गावर विशेष भर असावी असें दिसतें. कानिफनाथांची शिष्यशाखा बरीच मोठी होती व त्यांत भैरवनाथ प्रमुख होते. नवनाथांपैकीं, आदिनाथ. मच्छेंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, जालंदरनाथ व कानिफनाथ ह्या सहा नाथांचें मुख्य वास्तव्य गर्भागिरींत होतें व त्यांच्या समाधिही एथेंच आहेत. त्यांनीं जे मठ स्थापन केले व त्यांच्या उपदेशानें तयार झालेल्या सिद्धांनीं ज्या ज्या ठिकाणीं वास्तव्य केलें त्यासंबंधीं जी माहिती उपलब्ध आहे ती विस्तारभयास्तव येथें देणें शक्य नाहीं. परंतु अशीं बरींच स्थानें गर्भागिरींत व त्याच्या आसपासच्या प्रांतांत आहेत यावरून नाथपंथीयांनीं फारच व्यापक असें धर्मकार्य केलें असें निःसंशय मानण्यास हरकत नाहीं. नाथ-पंथाविषयीं हल्लीं बऱ्याच चुकीच्या समजुती पसरल्या आहेत. कालांतरानें त्या

पंथांस जें विकृत स्वरूप प्राप्त झालें, त्याच्या आधारावर त्या पंथाचें मूळ स्वरूप विकृतच असलें पाहिजे असें मानणें चुकीचें होईल नाथपंथाविषयीं अद्याप या प्रांतांत जो आदर आहे तो नाथांच्या समाधीच्या ठिकाणीं, यात्रेच्या व इतर प्रसंगीं जो जनसमूह दिसतो यावरून उघडपणें व्यक्त होतो. कालांतरानें या पंथाच्या शुद्ध स्वरूपांत जशी विकृतावस्था निर्माण झाली तसें या नाथांच्या स्थानांस कालगतीची बाधा झाली. त्यांसही विकृत स्वरूप प्राप्त झालें व समाधीचेंही रूपांतर झालें. परंतु त्यामुळें नाथपंथांचें शुद्ध स्वरूप शोधण्यास फारशी अडचण पडत नाहीं. हाच पंथ निराळ्या नांवानें आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत सुद्धां पसरला आहे व असें व्यापक कार्य करून महाराष्ट्राची सुस्थिति ज्यांनीं घडवून आणली त्यांचें आद्य प्रवर्तक जे ज्ञानेश्वर हे नाथपंथाचें मूर्तिमंत स्वरूप होतें. ही एकच गोष्ट ध्यानांत आली म्हणजे त्या पंथाचा आचार, विचार, कार्य व तत्त्वज्ञान हें पाहावयास ज्ञानेश्वराशिवाय इतर ठिकाणीं शोध करण्याचें कामच राहात नाहीं.

ज्ञानेश्वर.

महाराष्ट्रधर्ममंदिराची पूर्वतयारी नाथपंथानें केली परंतु त्याची संपूर्ण उभारणी ज्ञानेश्वरांच्या हातून झाली. त्यामुळें ज्ञानेश्वरांचें नांव सर्वतोमुखी असून प्रत्येक गांवीं त्यांच्या नांवाचा अद्याप जयजयकार होत आहे. त्यांचें चरित्रही सर्वांस पूर्ण परिचयाचें असल्यामुळें त्याबद्दल विशेष विवेचन करण्याचें कारण नाहीं. परंतु कांहीं ठळक गोष्टी देणें अवश्य आहे. पैठणनजीक आपेगांवीं यांचा जन्म झाला. त्यांचे वडील बंधू निवृत्तिनाथ हे शके ११९०मध्यें, ज्ञानेश्वर ११९३, सोपानदेव ११९६ व मुक्ताबाई ११९९ अशा तीन तीन वर्षांच्या अंतरानें जन्मास आले. त्यांचे वडील विठ्ठलपंत यांनीं संन्यास घेतल्यावर पुन्हां गुरूच्या आज्ञेवरून गृहस्थाश्रमी झाल्यामुळें ब्राह्मणसमाजानें त्यांचेवर बहिष्कार घातला होता. त्यामुळें त्यांचे फार हाल झाले, अशा आपत्कालीं हीं अधिकारी भावंडें जन्मास आलीं. समाजानें दूर लोटलें तरी गहिनीनाथादि नाथपंथी संतांनीं त्यांच्यावर पूर्ण कृपादृष्टि ठेवल्यामुळें त्यांना आपल्या आपत्तीचें विशेष वाटलें नाहीं. मुलें जशीं मोठीं झालीं तशीं विठ्ठलपंतास काळजी वाटून त्यांना जातिपावन करून घेण्याविषयीं ब्राह्मणांस विनंती केली व ब्राह्मणवर्गानें सांगितलेले अघोर असें देहान्त प्रायःश्चित्तही घेतलें. परंतु त्याचा या भावंडांस फारसा फायदा झाला नसून लहान

वयांतच घरचें व मायेचें कोणी नाहीं अशी उलट बिकट परिस्थिति मात्र त्यांच्यापुढें उभी राहिली. परंतु गहिनीनाथांचे कृपेमुळें ती मुळींच डगमगलीं नाहींत. शके ११९९ मध्यें गहिनीनाथांनीं निवृत्तिनाथांस गुरुपदेश दिला. व शके १२०१ च्या मार्गशीर्ष पौर्णिमेस निवृत्तिनाथांनीं ज्ञानेश्वरांस गुरूपदेश दिला. हे दोन्ही उपदेश नाथपंथाच्या पद्धतिप्रमाणें आदिनाथ उर्फ वृद्धेश्वर यांच्या समोर झाले व तेव्हांपासून या भावंडांचा बहुतेक काळ गहिनीनाथांच्या व इतर नाथमंडळींच्या आश्रमांत जाऊन पुढील कार्यास योग्य असें शिक्षण त्यांस मिळालें. पूर्णत्व प्राप्त झाल्यावर गहिनीनाथांनीं नाथपंथाच्या ज्ञानाच्या आधारें कलिग्रस्त समाजाची सर्व प्रकारें सुधारणा होईल असा त्यास तरणोपायाचा मार्ग दाखवावा अशी त्यांना आज्ञा केल्यापासून ही मंडळी कार्याकरितां बाहेर पडली.

समाजास कोणता मार्ग दाखवावा, त्याबद्दल निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपानदेव यांच्यामध्यें थोडासा वादविवाद झाला. परंतु पूर्वपरंपरेला धक्का न लावतां इष्ट ती सुधारणा घडून आणणें योग्य आहे, असें ज्ञानेश्वरांचें मत पडल्यामुळें प्रथम ब्राह्मणांनीं जो बहिष्कार घातला होता तो दूर करण्याची विनंती केल्यास हें निमित्त पुढील कार्यास योग्य होईल असा विचार ठरवून ही मंडळी पैठण येथें आली, तेथें त्यांचा आरंभीं उपहासच झाला. आत्मा सर्वाभूति एक आहे असा ज्ञानेश्वरांनीं मांडलेला सिद्धांत तेथें पसंत पडला नाहीं व प्रत्यक्षपणें तो शाबीत करण्याचा ब्राह्मणांनीं दुराग्रह धरल्यानें ज्ञानेश्वरांनीं आपल्या योगसामर्थ्याच्या बळावर रेड्याच्या मुखांतून प्रणव मंत्राचा उच्चार करविला. त्यामुळें तेथील समाजास त्यांचा अधिकार उघड दिसून आला. ज्ञानेश्वरांचें कार्यास येथून सुरवात झाली. पैठण येथें त्यांचा मुक्काम जालंदरनाथांच्या मठांत असे व त्याशेजारींच गंगातटाकीं, असलेल्या कालिकेच्या देवळांत ते पुराण सांगत असत. त्यांच्या उपदेशामुळें ब्राह्मणवर्गास व इतर समाजास आपले दोष दिसूं लागले व धर्माचें शुद्ध स्वरूप त्यांच्या मनांत ठसूं लागलें. बराच काळ पैठण येथें घालविल्यानंतर धर्म–पिठाच्या ठिकाणीं धर्माचे निर्मळ स्वरूपाचें बीं पक्कें रुजलें असें पाहून ज्ञानेश्वरादि मंडळी गोदावरीकांठानें नेवासें येथें आलीं व शके १२१२ मध्यें त्यांनीं ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे दोन ग्रंथ तेथें लिहिले. तेथेंही एकनाथपंथी मठ होता. हल्लीं त्यास नारदमुनी हें नांव प्राप्त झालें आहे. गोरक्षनाथाचे बंधू नाथवरद यांच्यानांवाचें पुढें नारद ह्या नांवांत रूपांतर झालें असावें असें वाटतें. परंतु ज्ञानेश्वरी

त्या मठांत लिहिली नसून नदीकाठीं निवांत स्थळीं विरेश्वराचें देवालय होतें त्यांत ती लिहिली गेली. नेवासें येथील कुलकर्णी सच्चिदानंद बाबा थावरे यांनीं ज्ञानेश्वरांचा अनुग्रह घेतला व ज्ञानेश्वरानें सांगावें व सच्चिदानंदानें लिहून घ्यावें असा तो ग्रंथ तयार झाला. ज्ञानेश्वरी सांगतांना विरेश्वराचें देवळांतील ज्या खांबास ज्ञानेश्वर टेकून बसत असत तो खांब अद्याप नेवासें येथें असून त्यावर हल्लीं मंदीर झालें आहे. ज्ञानेश्वरी हा महाराष्ट्रधर्माचा आद्य ग्रंथ आहे. धर्माचे गूढ सिद्धांत त्यांत उघडपणें प्रत्येकास समजतील अशा रीतीनें सांगितले असून, व्यक्तिमानाचे कर्तव्याचें सहाय्यानें प्रपंचच परमार्थ कसा होतो याचें सांगोपांग विवेचन त्यांत आहे. मीपणाचा लोप झाल्यानें अभेदभक्ति निर्माण होणें व निष्कामकर्मरूपी जनीं जनार्दन सेवा घडणें हेंच अंतिम साध्य आहे असें ज्ञानेश्वरी दाखविते. भाषेच्या दृष्टीनेंही याच्या तोडीचा दुसरा ग्रंथ नाहीं. अध्यात्मशास्त्र व भाषासौंदर्य या दोन्ही दृष्टींनीं या ग्रंथास अग्रस्थान प्राप्त झालें आहे. ज्ञानेश्वरी श्रावण व॥ ८ शके १२१२ रोजीं संपली व लागलींच दहा दिवसांत ज्ञानप्रधान असा अमृतानुभव ग्रंथ लिहून ज्ञानेश्वरांनीं नेवासें सोडलें, व वाटेंत ब्राह्मणी या गांवीं असलेल्या नाथपंथीं मठांत थोडासा मुक्काम करून ते डोंगरगण येथील गोरक्षनाथांच्या आश्रमांत आले.

साधारण समंजस व विचारी माणसास ज्ञानेश्वरी समजणें शक्य आहे अशा-साठींच हा ग्रंथ असून अमृतानुभव जे बरेच पुढें गेले आहेत अशांच्याच उपयोगीं पडण्यासारखा आहे. परंतु ज्ञानेश्वरांनीं सज्ञानअज्ञान अशा आबालवृद्धांस जो मार्ग आंखून दिला त्याचें सूत्ररूपानें ज्ञान करून देण्यास व त्या मार्गाचें नित्य पाठ-द्वारें स्मरण करून देणारा लहानसा ग्रंथ ज्ञानेश्वरांनीं या गोरक्षाश्रमांत तयार केला तो २७ अभंगांचा हरिपाठ होय. त्यास महाराष्ट्रधर्माचीं सूत्रें म्हणतां येईल. अद्यापही त्याचें महत्त्व कायम असून संध्येइतका त्यास मान आहे. गोरक्षनाथाच्या आश्रमांत त्यावेळीं गोरक्षनाथ होते व ज्ञानेश्वर जेव्हां आळंदीस जाण्यास निघाले त्यावेळीं ते त्यांच्याबरोबर गेले असावेत असा संशय येतो. डोंगरगणाहून ज्ञानेश्वर आळें येथें आले व भाद्रपदमासीं तेथें रेडा शांत झाला त्यास समाधि देऊन अश्विनाचे आरंभीं ते आळंदीस गेले व त्यापुढें त्यांचें वास्तव्य बहुतेक तेथेंच झालें. या हकीकतीचा संबंध या प्रांतांत येत नसल्यानें तिचें वर्णन देण्याचें कारण नाहीं. जन्मापासून शके १२१२ पर्यंतचा सुमारें १८।१९ वर्षांचा

काळ ज्ञानेश्वरांनीं नगरप्रांतांतच घालविला. त्यांचें बाळपण नाथपंथाच्या भूमींत झालें. सर्वांगपरिपूर्ण शिक्षण इकडेच पार पडलें व धर्मशिक्षणाचें केंद्र असें पैठण येथें धर्मशिक्षकांस धर्माचें उज्वल स्वरूप दाखवून तें त्यांच्या मनांत बिंबविलें व कार्यास प्रारंभ केला. तेंच उज्वल तत्त्वज्ञान सर्वांस समजणें सुलभ व्हावें म्हणून ज्ञानेश्वरीग्रंथ लिहिला व अखिल समाजास हरिनामाचा मार्ग आंखून दिला. ही त्यांनीं या प्रांतीं केलेली कामगिरी या प्रांतांत केव्हांही भूषणावहच आहे. शके १२१८ मध्यें ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतल्यावर सोपानदेवांनीं समाधि घेतली व पुणेंप्रांत सोडून गोदातिरास जाण्याची निवृत्तिनाथांस इच्छा झाली. तेव्हां निवृत्तिनाथ, मुक्ताबाई, चांगदेव, नामदेव, विसोबा खेचर, परिसाभागवत वगैरे संतमंडळी पुन्हां इकडे आलीं. त्यांनीं ज्या ज्या स्थळांस भेट दिली त्यांचा उल्लेख करणें योग्य होईल व त्यावरून सहाशें वर्षांपूर्वी कोणचीं क्षेत्रें प्रसिद्ध होतीं याचा बोध होईल. पौष शु॥ १ शके १२१८ रोजीं यांनीं गोदातिरास जाण्या-साठीं सासवडाहून प्रयाण केलें व भुलेश्वर येथें तीस दिवस मुक्काम करून पारनेर येथील पाराशरऋषींच्या आश्रमाचें स्थान सिद्धेश्वर येथें पांच दिवस राहिले. तेथून ते डोंगरगण येथील कपिलेश्वराला आले व दहा दिवस त्यांचा तेथें मुक्काम होता. काशीप्रमाणें या क्षेत्राची योग्यता आहे असा त्यांनीं त्याविषयीं उल्लेख केला आहे. त्यांनीं तेथें दहा दिवस कीर्तन केलें तेथील पवित्रतेनें त्यांना फारच आनंद वाटला. पुढें ते कोपरगांवीं कचेश्वर येथें आले व पौष महिना-अखेर तेथें राहिले. तेथून ते माघ शु॥ १ स पुणतांब्यास आले व सिद्धेश्वरीं मुक्काम केला. येथें वटेश्वर चांगदेव उर्फ चांगा वटेश्वर यांनीं माघ व॥ १२ स समाधि घेतली. हे चांगदेव तापीतीरीं वटेश्वर नांवाचें एक महादेवाचें स्थान होतें तेथें राहत असत. (हल्लीं तेथें चांगदेव या नांवाचा गांव वसला आहे) यांनीं योगसामर्थ्यानें आपलें शरीर चौदाशें वर्षें कायम ठेवलें होतें व योग-मार्गांत हे निष्णात असल्यानें त्यांना योगिराज म्हणत असत. यांना आपल्या योगसामर्थ्याविषयीं फार अभिमान होता. तो ज्ञानेश्वरांनीं उतरविला व नंतर त्यांनीं मुक्ताबाईचा गुरूपदेश घेतला. तेथून ते ज्ञानेश्वराजवळ राहात असत. हे एक प्रसिद्ध संत असून त्यांनीं बरेच अभंग केले आहेत परंतु ते बहुतेक योग-ज्ञानाविषयीं आहेत. चांगदेवाच्या समाधिनंतर फाल्गुन शु॥ ५ स संत-मंडळींनीं पुणतांबें सोडलें व जेथें ज्ञानेश्वरी पूर्ण झाली त्या म्हाळसापुरीं (नेवासें

येथें) आलीं व म्हाळसेची पूजा करून दहा दिवस तेथें मुक्काम केला व पुढें प्रवरासंगम येथें आलीं. त्यांनीं तेथील टोकेश्वराचा उल्लेख केला आहे. संगमेश्वर महादेवास पूर्वी हें नांव असावें असें वाटतें. पुढें गंगातटाकानें ह्यांनीं पैठण येथें जाण्याकरितां चैत्र शु॥ १. शके १२१९ ला प्रवरासंगम सोडलें; व पैठणांत कांहीं दिवस घालवून निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई यांची जन्मभूमि जें आपेगांव येथें येऊन राहिले, व चैत्र व॥ १० मीस आपेगांव सोडून देहूच्या यात्रेस गेले.

याच वेळीं अहमदनगरनजिक नारायणडोहो येथें चांगा केशवदास नांवाचें एक संत उदयास आले. नांवावरून यांच्या व चांगा वटेश्वर यांच्या चरित्रांचा बराच घोंटाळा झाला आहे. केशवदास हेही ज्ञानेश्वर मंडळांतच होते. त्यांच्या आईचें नांव सरस्वती व बापाचें नांव मुधोपंत. त्यावरून यांना मुधेश चांगदेवही म्हणत असत. यांचें आडनांव मरुद्रण. हे विद्वान् असून भक्तिमार्गी होते व गृहस्थाश्रमी होते. त्यांच्या मुलांची नांवें नारायण व विठोबा अशीं चांगदेवांनीं पंढरपुरीं ठेविलीं. महाद्वाराचे ठिकाणीं तयार झालेली मशीद बादशहाचे हुकूमानें काढावयास लावून महाद्वार बांधलें अशी आख्यायिका आहे. हे पुढें पुणतांबें येथें राहावयास गेले; व तेथेंच गांवांत केशवाच्या मंदिरांत शके १२२७ जेष्ठ शु॥ ७ स समाधि घेतली. यांचे कांहीं अभंग, पदें उपलब्ध आहेत. चांगदेवाप्रमाणें गोदातीरीं विसोबा खेचर, जगमित्र नागा व बहिरा पिसा हे संत या काळीं होते. विसोबा खेचर हे मुंगी येथील राहणारें खिस्तीपणाचा धंदा करून होते. आरंभीं हे फार कर्मठ होते. एकदां हे बाजारांत गेल्यावर ज्ञानेश्वरादि भावंडें त्यांच्या घरीं आलीं व स्वयंपाकाकरितां कांहीं भांडीं मागूं लागलीं. परंतु हीं बहिष्कृत संन्याशांचीं मुलें म्हणून त्यांच्या बायकोनें भांडीं देण्याचें नाकारलें, तेव्हां सोपनदेवांनीं योगबलानें तापल्या तव्यासारखी आपली पाठ गरम केली व तिच्यावर मुक्ताबाईनें पाणगे भाजले. हें पाहतांच विसोबाच्या बायकोनें त्यांना बोलावणें पाठविलें, ती हकीकत पाहतांच त्या मंडळींविषयीं आदर वाटून त्यांना ते शरण गेले. पुढें सोपानदेवांनीं त्यांना गुरूपदेश दिला. हे ज्ञानेश्वर मंडळीपैकीं असून सुप्रसिद्ध संत नामदेव यांचे गुरु होते. यांनीं शके १२३१ कार्तिक शु॥ ११ स बार्षी येथें समाधि घेतली. याच मेळ्यापैकीं, जगमित्र नागा हा संत पैठण येथें असे तो प्रथम लक्षाधिपति असून सावकारी करीत असे. परंतु

कालचक्रांत सापडल्यानें त्यास आपत्ति आली व तो परमार्थाकडे वळला. याची समाधि परळी वैजनाथ या जोतिर्लिंगाच्या ठिकाणीं असून त्यानें शके १२५२ कार्तिक शु॥ ११ या दिवशीं समाधि घेतली. विसोबा खेचर व जगमित्र नागा यांचे अभंग आहेत. व्यापाऱ्यांच्या नंदभाषेंतही विसोबांचें कांहीं अभंग आहेत. याच सुमारास पैठण येथें बहिरा पिसा नांवाचा संत होऊन गेला. तो ब्राह्मण असून त्याचें मूळचें नांव बहिरंभट होतें. हा भक्तिमार्गी असून त्यानें भागवताच्या दशम स्कंधावर टीका लिहिली आहे. याशिवाय पैठण येथें कुर्मदास, बोधेगांव-नजीक काकामडक्या, बिडशिंगवी येथें साष्ट सिद्ध उर्फ साव्या रसाळ वगैरे संत त्या वेळीं होऊन गेले, परंतु त्यांची फारशी माहिती उपलब्ध नाहीं.

महानुभाव पंथ.

ज्ञानेश्वराच्या जन्माच्या सुमारास महाराष्ट्रांत महानुभाव अगर मानभाव या नांवाचा एक स्वतंत्र पंथ स्थापन होऊं लागला. त्याचा प्रवर्तक चक्रधर उर्फ चांगदेव हा एक गुजराथी सामवेदी ब्राह्मण होता. त्याची तिसरी बायको गौरी हिनें प्राणत्याग केलावर त्यास विरक्ति उत्पन्न होऊन शके ११८५ च्या कार्तिक-मासीं त्यानें पैठण येथें सन्यास घेतला व स्वतंत्र पंथस्थापनेस सुरवात केली. शके ११९४ त बदरीकाश्रमीं प्रयाण केलें. बेलापूरनजीक साराटो येथील महेंद्रभट हा चक्रधराचा शिष्य होता. व चक्रधरांनीं त्यास बेलापूर येथें गीता सांगतली. महेंद्रभट हा एक सुखवस्तु व विद्वान् ब्राह्मण होता. त्याच्या पत्नीचें नांव देवबा. चक्रधराचा व त्याचा वाद होऊन चक्रधरानें त्यास जिंकलें व मानभावपंथाची दीक्षा दिली. त्यानें चक्रधराचें विस्तृत गद्यचरित्र लिहिलें आहे. त्यास लिला-चरित्र म्हणतात. याच्याप्रमाणेंच वरखेडें येथील गोपाळभट व केशवभट हे उभयता बंधु चक्रधराचें शिष्य झालें. गोपाळभटास पुढें आनेराजव्यास व केशव-भटास केशवराव सूरी हीं नांवें मिळालीं. गोपाळभटाची अशी हकीकत सांगतात कीं, हा आंधळा जन्मला व आईबापांनीं त्यास चक्रधराचे स्वाधीन केलें. चक्रधरानें त्यास दृष्टि दिली पुढें हा देवगिरी येथें रामदेव याच्या आश्रयास राहिला, व त्याची बायको कामाईदेवी इला पुराण सांगूं लागला. त्याचें पांच

सहा ग्रंथ उपलब्ध आहेत. केशवभटानेंही बरेंच ग्रंथ केले, परंतु त्यांत सिद्धांतसूत्र पाठ या ग्रंथास फार मान आहे. यांच्याप्रमाणेंच नेवासें प्रांतांतले भावेदेवव्यास हेही प्रसिद्ध महानुभाव होते, व चक्रधराच्या शिष्यसमुदायांत त्यांना अग्र-स्थानाचा मान मिळे. यांनीं चक्रधराची दिनचर्या वगैरे पांच गद्यग्रंथ केले आहेत. भावे देवव्यास हे गोदातीरीं असलेल्या डोमगांव उर्फ कमालपूर येथील असावेत असें वाटतें. त्यांचे गुरुबंधु भास्कर कविश्वरव्यास यासही त्या पंथांत श्रेष्ठत्वाचा मान आहे. त्यांनीं उत्तम काव्य केलें असून जामखेडनजीक रामदरा (रामेश्वर) येथें भागवताच्या दशम स्कंधावर टीका लिहिली. याच मंडळीपैकीं मिरी येथील रामदेव भट पाठक हे होते, त्यास दादोबा म्हणत. त्यांनीं गीतेवर एक लहान टीका केली होती. यांच्या विनंतीवरून चक्रधर मिरी येथें आले व गांवाबाहेरील वनेश्वराचे देवालयांत तीन दिवस मुक्काम करून गांवांत आले आणि महालक्ष्मीचे देवळांत वीस दिवस राहिले. महानुभाव पंथाचा प्रसार महाराष्ट्रांत फारसा झाला नाहीं तरी त्याची शिष्यशाखा–पंजाब काबूलपर्यंत पसरलेली आहे. सनातन धर्मीयांना या पंथाविषयीं फारसा आदर दिसत नाहीं.

चवदावें शतक.

ज्ञानेश्वराचा काळ म्हणजे हिंदू राज्यांचा आपत् काळ. ज्ञानेश्वरी लिहिल्यानंतर चार वर्षांतच देवगिरीच्या यादवावर अल्लाउद्दिन खिलजी यानें स्वारी केली व रामदेव यादवास, त्यास खंडणी देऊन, रवानगी करणें भाग पडलें. येथून पुढें मुसलमान दक्षिणेंत डोकावूं लागले व परधर्मीयास तोंड देण्याचा पहिलाच प्रसंग दक्षिणेंतील राज्यांवर आला. या पूर्वी राज्यकर्त्यांत जो बदल झाला त्यांत सर्वच राजे समानधर्मी असल्यानें त्याचा परिणाम समाजसंस्थेवर झाला नाहीं. ती अबाधित चालू होती परंतु परधर्मीयांच्या आगमनानें ही परिस्थिति कायम राहील ही खात्री वाटणें शक्य नव्हतें. शिवाय अनेक शतकें एका विशिष्ट वळणास चिटकून राहिल्यानें व परिस्थितिप्रमाणें जो बदल होणें अवश्य आहे, त्याकडे दुर्लक्ष झाल्यानें समाजसंस्थेस एकदेशीयत्त्व आलें होतें व तिच्यांतील तेज लोपत चाललें होतें. यामुळेंच परधर्मीयांना आपला प्रवेश करून घेणें सुलभ झालें. परंतु अशा आपत्कालांतच भावी उत्कर्षाचें बीज असतें व त्याच्या तीव्रतेची जाणीव जशजशी होते तसतसें सुधारणेच्या मार्गाकडे लक्ष वेधलें जातें आपत्कालांतच सुधारणेचें बीं रुजणें शक्य आहे. म्हणूनच समाजसंस्थेच्या या

परिस्थितींत संतांनीं आपलें कार्य सुरू केलें व परिस्थितीची जाणीव उत्पन्न करून समाजसंघटणा करण्याचा पाया घातला ,परंतु हें बीं ताबडतोब वृक्ष-रूपानें प्रगट होणें केव्हांही शक्य नसतें; त्यास कालावधि अवश्य लागतो. त्याच्या विकासावर जसजसे आघात होत जातील तसतसा त्याचा जोम वाढतच जाणार. धर्माच्या कोत्या भावना नाहींशा होणें, ऐक्याचें तत्त्व पटणें व तें रुजून मनोवृत्तींत बदल होणें या गोष्टी झटपट होत नाहींत. उलट एक-भावना पडताळून पाहण्यांत कांहीं प्रसंगही यावे लागतात. समाजसंस्थेच्या आपत्कालीं नाथपंथीयांनीं जीं भूमिका तयार केली त्यांत ज्ञानेश्वरांनीं ऐक्यभावनेचें बीज पेरलें व तें अंकुर धरूं लागतें न लागतें तोंच त्याच्यावर प्रचंड आघात येऊं लागले. परंतु त्याच्या आंगचेंच तेज असें होतें कीं, त्यामुळें समाजाचें स्वत्व वृद्धिंगत होत गेलें. यापैकीं मुख्य आघात म्हणजे मुसलमानांचें दक्षिणेंत आगमन हें होय.

देवगिरीच्या यादवाचा पूर्ण पराभव करून मुसलमानांनीं आपलें राज्य इकडे स्थापन केलें व तें चिरकाल टिकावें या उद्देशानें या प्रदेशांत मुसलमानी धर्म पसरविण्याविषयीं जबरदस्तीनें प्रयत्न सुरू केले. एक ग्रंथकार लिहितात कीं:— "मुसलमानांची सत्ता इकडे सुरू झाल्यानंतर त्यांचा धर्म, त्यांची भाषा त्यांचे रीतिरिवाज हीं त्रयी जबरीनें पसरविण्याची मुसलमानांची पद्धतच दिसते. ते जिकडे गेले, तिकडे त्यांनीं दांडगाईच केलेली आढळते. केवळ लीलेसाठीं म्हणून पृथ्वीवरील हजारों ग्रंथांचा त्यांनीं नाश केला आहे. नुसतें जानवें पाहिलें कीं, शरीर उभें दुभंगावें, देवालय, मग तें कसेंही असो व तें केवढेंही असो जाळून पाडून फस्त करावें व त्याठिकाणीं श्वेतवर्णाची मशीद उभी करावी, परधर्मी लोकांना हालहाल करून त्रास द्यावा व गांवचे गांव बायका-पोरासुद्धां बाटवून टाकावें असा ज्यांचा धर्म व अशी ज्यांची रीत; एका हातांत कुराण व एका हातांत समशेर घेऊन सर्व देश महमदी करूं पाहणाऱ्या त्या क्रूर लोकांपुढें आमची सात्त्विक मंडळी बरीच मावळली असें दिसतें. मुसलमानी अत्याचार सुरू असतां देवस्थानांचा सर्रास ते विध्वंस करीत असतां ही सात्त्विक मंडळी उर्फ संतमंडळी मावळली नसून आपलें कार्य अविश्रांत करीत होती. समाजाची देवस्थानाविषयीं जी श्रद्धा होती ती कायम राहून देवस्थानांचें धर्मांतर केल्यानें भक्तमंडळींत अनायासें धर्मांतर घडून येईल असें मुसलमानांस

चाटत असावें असें दिसतें. परंतु संतमंडळी देव देवळांतच बसून राहिली नाहीं.
" किती एक देव तुर्कानें फोडलें । परंतु अद्याप बोभातीना " असा धर्मश्रद्धेतील दोष समाजापुढें मांडून देव प्रत्येकाच्या हृदयीं आहे त्याची सेवा करणें म्हणजे आपल्या कर्तव्यनिष्ठतेची जागृति ठेवणें असा सारखा उपदेश समाजास करीत होती. संतांच्या या कार्यामुळें मुसलमानीधर्म प्रसारास आळा बसला व कर्तव्य-जागृति झाली आणि हिंदुसमाजास सुसंघटीतपणाची आवश्यकता उघडपणें दिसूं लागली.

त्या वेळीं या प्रांतांत नाथपंथाचा बराच प्रसार होता व ठिकठिकाणीं त्यांचीं स्थानें होतीं हें मागें सांगितलेंच आहे. या स्थानाविषयीं जनतेचा अतोनात प्रेमभाव असल्यानें मुसलमानांची वक्रदृष्टि विशेष कडक रीतीनें त्यांच्यावर वळली. हल्लीं या भागांत कांहीं अडचणींचीं ठिकाणें अपवादात्मक म्हणून सोडली तर बहुतेक स्थानें मुसलमानी पेहरावांत आहेत परंतु हा पेहराव गाभाऱ्यांतील मूर्ति अगर समाधिपुरताच आहे हें विशेष आहे. मूर्ति अथवा गुरुपादुका नाहींशा झाल्या व तेथें पीर बनले. तसेंच समाधीवरही पिरांची स्थापना झाली. देवालयांत थोडासा बाह्यांगीं फरक झाला. यावरून हीं स्थानें जमीनदोस्त करून तेथें मशिदी न बांधतां त्यांनाच मुसलमानी पोषाख देऊन देवालयांचे दर्गे बनविण्याचा मुसलमानांचा प्रयत्न होता व यामुळें अनायासेंच भक्तमंडळींत मुसलमानीधर्म शिरेल अशी त्याची अपेक्षा होती परंतु ती व्यर्थ ठरली. पवित्र स्थानांच्या रूपांतरामुळें हिंदु समाजास त्वेष येणें साहजिकच होतें परंतु त्यानें त्यांची या स्थळाविषयीं तिळमात्र श्रद्धा कमी झाली नाहीं, त्यांनीं पूर्ववत् आपला क्रम चालू ठेवला. धर्मांतराची कल्पनाहीं त्यांच्या मनांत शिरली नाहीं. हल्लींही याचा बराच दाखला आढळतो. देवालयाच्या स्वरूपाच्या दर्ग्यांतील पिराच्या यात्रेस जाणारे हिंदू पूर्वपरंपरा पाळत आहेत. देवांचे उत्सव मुसलमानी तारखे-प्रमाणें न होतां हिंदुमितीप्रमाणें होणें, श्रावणमासांत देवाचे छबीने निघणें, चैत्र शु॥ १ अगर एकाद्या विशिष्ट तिथीस गंगेचें पाणी देवावर घालणें श्रावण-मासांत काला करणें वगैरे हिंदूपद्धतीच्या गोष्टी या मुसलमानी रूपांतील देवस्थानांच्या ठिकाणीं अद्याप चालू आहेत. या गोष्टी जेथें आढळतात तेथील स्थानें पूर्वी हिंदूंचीं, परंतु पुढें मुसलमानांनीं भ्रष्ट केलेलीं असें; निश्चितपणें सांगतां येतें. नाथपंथीयांनीं पुढें मुसलमानी राज्य

होणार म्हणून आपल्या समाधीस मुसलमानीं पोषाख चढविण्यास सांगितलें अशी एक दंतकथा आहे. तिच्यावरून हीं स्थानें मुळचीं हिंदूंचीं होतीं हें उघड दिसतें. परंतु मुसलमानीं पेहरावाविषयीं तिच्यांतील हकीगत खरी नाहीं. ज्यानी जिवंतपणीं आपल्या देहाची पर्वा केली नाहीं, ते आपल्यामागें समाधीची पर्वा करून ती मुसलमानी रूपांत करा म्हणजे कायम राहील असें सांगतील हें म्हणणें अगदीं व्यर्थ आहे. हिंदूंचीं मनें दुखावलीं व त्याचा परिणाम जेव्हां बेदरच्या राज्यास भोगण्याची पाळी आली त्यावेळीं हिंदुमुसलमानांचा सलोखा करण्याच्या हेतूनें अशा दंतकथा पसरविण्याचा प्रयत्न झाला असला पाहिजे.

याच सुमारास महाराष्ट्रावर एक भयंकर आपत्ति आली. सतत १२ वर्षे अनावृष्टि पडल्यामुळें जो दुष्काळ पडला त्यांत अनेक गांवें उध्वस्त झालीं, प्रजाही दूरदूर प्रांताकडे गेली. या दुष्काळास दुर्गादेवीचा दुष्काळ म्हणतात. या प्रांतास हा फारच जाणवला व पुन्हां सुबत्ता झाल्यावरही स्थिरस्थावर होण्यास बराच काळ लागला. परंतु त्यांत येथील मूळच्या लोकांनीं आपलें सत्त्व बरेंच प्रगट केलें. अनेक महत्त्वाच्या जागा त्यांनीं काबीज केल्या व या लोकांशीं सख्य ठेवल्याखेरीज आपलें राज्य टिकणार नाहीं अशी मुसलमानांची खात्री पटविली. यापुढें दक्षिणेंत मुसलमानी राजांनीं हिंदू प्रजेस मुळींच त्रास दिला नाहीं व पूर्ण दिलजमाई राखली. बेदरच्या राज्याचे पांच तुकडे झाले ते सर्व हिंदु समाजास समतेनें वागविणारे निघाले. नगरची निजामशाही तर जवळ जवळ मराठ्यांचेंच राज्य होतें. धर्मांतराचा धोका व दुष्काळाची आपत्ति या दोन्हींतून पार पडल्यामुळें संतांनीं लावलेलें रोप भयंकर कसोटींतून निभावलें व त्याचा विस्तार सुरू झाला. कर्तव्यनिष्ठतेची जागृति झाली व बरीच एकी घडून आली. उलट मुसलमानांना देखील सलोखा राखणें आवश्यक झालें. त्यामुळें पुढील कार्यास सुरवात झाली. वरील आघाताच्या वेळीं देखील ज्ञानेश्वरांचें शिष्य सत्यामठनाथ व त्यांचे शिष्य जैबीनाथ यांनीं या प्रदेशांत कार्य चालू ठेवलेंच होतें. परंतु त्यांच्याविषयीं फारशी माहिती मिळत नाहीं. त्यांच्याप्रमाणेंच सुप्रसिद्ध संत नरसिंहसरस्वति यांचे आरंभीचे कांहीं दिवस इकडे गेले असावेत असा संशय येतो, परंतु त्याबद्दलही निश्चित दाखला मिळत नाहीं. नरसिंहसरस्वतीचे शिष्य जनार्दनस्वामी मात्र थोर अधिकारी होते. हे चाळीसगांव येथील वतनदार देशपांडे. तेथें त्यांचा जन्म शके १४२६ मध्यें झाला. पूर्ववयांतील कांहीं वर्षे पैठण येथें

काढल्यावर त्यांनीं निजामशाहींत नोकरी धरली व दौलताबादेस किल्लेदारी केली. यांची मुख्य कामगिरी म्हणजे यांनीं एकनाथांना सर्वांगपरिपूर्ण असें शिक्षण दिलें व तें कार्य संपल्यावर समाधि घेतली. यांची समाधि कासारखरवंडनिजीक हरिहरेश्वराच्या स्थानाजवळ आहे.

एकनाथ.

अनेक संकटांस न जुमानतां ज्ञानेश्वरांनीं लावलेलें रोप जोरानें वाढ घेत असतां एकनाथानें त्याची उत्तम जोपासना केली व त्यामुळें त्याचा प्रचंड विस्तार होऊन त्याच्या शीतल छायेखालीं महाराष्ट्र त्यावर आलेलीं स्वराज्याचीं फळें आनंदानें चाखीत बसला. एकनाथानें केलेली कामगिरी फारच महत्त्वाची आहे. त्यांनीं आपलें आयुष्य धर्मप्रसाराच्या कार्यांत घातलें व त्याबरोबर प्रत्येक गोष्ट आचरून दाखविली, व प्रपंचांत, सांपडलेल्या जनांस त्या प्रपंचांतच परमार्थ कसा साधावा हें उघडपणें वागून दाखविलें. यांचा जन्म पैठण येथें एका भगवद्भक्त घराण्यांत झाला. यांचे पणजे भानुदास हे अधिकारी संत होते. विजयनगरच्या राजानें पंढरपूर येथील श्रीविठ्ठलाची मूर्ति आपल्या राजधानींत नेली होती, ती भानुदासांनीं परत पंढरपूर येथें आणून तिची स्थापना केली. त्यांनीं कांहीं अभंग केले आहेत. भानुदासाचे चिरंजीव चक्रपाणी व त्यांचे चिरंजीव सूर्यनारायण हे एकनाथाचे वडील. आईचें नांव रुक्मिणी. एकनाथाचा जन्म शके १५४० च्या सुमारास पैठण येथें झाला. जन्मानंतर लौकरच त्याचे आईबाप वारले. पुढें आजा आजीनें त्यांचा संभाळ केला. लहानपणीं त्याची प्रकृति आजारी असतां आजाआजीनें कुलस्वामिनी एकविरादेवीस नवस केला तेव्हां प्रकृतीस आराम पडला. देवीच्या नांवावरून एका हें नांव दिलें. सहावे वर्षी मौंज झाल्यावर अध्ययनास सुरवात झाली. परंतु यांची बुद्धि फारच कुशाग्र असल्यानें यांचा अभ्यास फारच झपाट्यानें होत असे. ते रोज देवळांत पुराण ऐकावयास जात असत व अनेक शंका पुराणिकास विचारीत असत. बऱ्याच वेळां त्यांस निरुत्तर होण्याची पाळी येई एकदां पुराणाचे वेळीं दौलताबाद येथील जनार्दन स्वामींची हकीकत यांना कळली व त्यांना भेटण्याची इच्छा झाली, पुराणिकालाही दौलताबाद येथें जावयाचें होतें. त्याच्या सोबतीनें आजाआजीची परवानगी घेऊन हे जनार्दनस्वामीकडे गेले. जनार्दनस्वामींनीं त्यास शिक्षणासाठीं ठेवून घेतलें व ही गोष्ट त्यांच्या आजाआजीस कळविण्यास पुराणिकबुवास सांगितलें.

पुराणिक परत पैठण येथें जाणार तो त्यास काहीं काम लागल्यामुळें तो दुसरी कडे गेला व तेथेंच काहीं महिनें राहिला. एकनाथ परत न आल्यानें त्याच्या आजास फार काळजी वाटली व कांहींच वार्ता कळली नाहीं म्हणून ते घाबरून गेले होते. परंतु पुराणिक पैठण येथें आल्यावर त्यांस सर्व हकीकत कळून समाधान झालें, व एकनाथाचा अभ्यास निर्वेध चालू झाला. जनार्दन-स्वामीच्या शिक्षणानें एकनाथाच्या अंगभूत उज्वल गुणांचा पूर्ण विकास झाला व व्यापक कार्यास आवश्यक अशी सर्वांगीण तयारी झाली. त्यांच्या आज्ञेनें एकनाथानें ग्रंथ-लेखनास सुरवात केली व पहिला ग्रंथ चतुःश्लोकी भागवत त्यांचेसमोर संपविला. पुढें जनार्दनस्वामी यांनीं त्यांना तीर्थयात्रेस पाठविलें. उत्तर हिंदुस्तानांतील यात्रा संपवून एकनाथ पैठण येथें आले व जनार्दन-स्वामींच्या आज्ञेवरून त्यांनीं तेथेंच वास्तव्य केलें व गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला. येथून पुढें त्यांचा काळ अखंड जनसेवेंत गेला. ते दररोज दुपारीं ज्ञानेश्वरीवर पुराण सांगत असत, व रात्रीं कीर्तन करीत असत. त्यांचा उपदेश ऐकण्यास हजारों लोक नित्यशः येत असत व काहीं दूरदूच्या प्रदेशाहून-ही येत असत. एकनाथांनीं धर्मप्रसारार्थ बराच प्रवास केला व जनसमाजाच्या मनोवृत्तीस इष्ट तें वळण दिलें. त्यांच्या उपदेशांत जें रहस्य असें तें तंतोतंत त्यांच्या आचरणांत उतरलें असल्यानें त्यांच्या प्रयत्नास झपाट्यानें यश आलें. प्रपंच हा परमार्थाहून निराळा नाहीं व त्याकरतां कांहींही सोडावें लागत नाहीं, उलट जन्मामुळें प्राप्त झालेले कर्तव्यकर्म विशिष्ट भावनेनें अखंड करीत राहणें यांतच खरा आनंद आहे. हें एकनाथांनीं उपदेशांनीं व विशेषतः आचरणांनीं सर्वांस पटवून दिलें व समाजाचा दुबळेपणा दूर केला. त्यांना शांतीचे सागर म्हणतात. परंतु त्यांची शांति निर्बळ अगर एकदेशी नव्हती. प्रसंग पडेल त्या प्रमाणें वागून त्यांनीं आपली शांति ढळूं दिली नाहीं. त्यांनीं दौलताबादेस स्वतः लढाईत आघाडीस जाऊन शत्रूचा हल्ला परतविला. काशी येथें पंडितवर्गाशीं वाद-विवादांत दोन हात करून मराठी भाषेचा जयजयकार करविला. कर्मठ ब्राह्मण-वर्गाचे आघात चालू असतांही आपलें कार्य चालू ठेवलें. खुद्द मुसलमानवर्गावर ही छाप टाकली, जातिभेदाची तीव्रता ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत समानत्वानें वागून दाखवून कमी केली वगैरे गोष्टींकडे पाहिलें म्हणजे त्यांच्या कार्याची व त्यास मिळालेल्या यशाची कल्पना ताबडतोब येते.

एकनाथांनीं ज्ञानेश्वरांचा महाराष्ट्रधर्म पूर्णपणें समाजास पटवून दिला, व त्याचें स्वरूप यथार्थ समजावें म्हणून भागवताच्या एकादश स्कंधावर त्या धोरणानें सुलभ व विस्तृत अशी टिका केली आहे, त्यास एकनाथी भागवत म्हणतात. ज्ञानेश्वरीप्रमाणेंच हा ग्रंथ महाराष्ट्रास फार पूज्य वाटतो. त्याचप्रमाणें त्यानें अनेक रामायण ग्रंथांचा पूर्ण विचार करून भावार्थ रामायण हा ग्रंथ लिहिला व कर्तव्य-निष्ठतेचा मूर्तिमंत पुतळा जो श्रीरामचंद्र त्याचें ध्येय समाजापुढें ठेविलें. याशिवाय त्यांनीं दोन-तीन लहान ग्रंथ लिहिलें. परंतु त्यांच्या अभंगांत विशेष स्वारस्य भरलें आहे. प्रत्येकानें आपल्या परिस्थितींत बदल न करतां आनंदानें व उल्हासानें कर्तव्यनिष्ठ कसें होतां येईल व जनींजनार्दनसेवारूपी भजन अगर भक्ति कशी करतां येईल हें तेथें नाथांनीं पदोपदीं पटवून दिलें आहे. महाराष्ट्रांत एकनाथांनीं केलेली कामगिरी बिनमोल आहे. तिचा पगडा समजावर तावडतोब बसला व समाजांत चैतन्य खेळूं लागलें. त्याचें स्वरूप त्यांच्या समाधीचे वेळींच दिसूं लागलें होतें परंतु त्याचें पूर्ण तेज त्यानंतर तीस वर्षांतच स्वराज्याच्या रूपानें प्रगट झालें. एकनाथांनीं शके १५२१ फाल्गुन व॥ ६ स पैठण येथें समाधि घेतली.

एकनाथाच्या समाधिनंतर लवकरच शके १५३० मध्यें महाराष्ट्रांत दोन प्रमुख संत जन्मास आले. एक पुणें प्रांतीं तुकाराम व दुसरे पैठणच्या पूर्वेस पंधरा सोळा कोसांवर आंब्र येथें रामदास या दोघांच्यावर एकनाथाची पूर्ण छाप होती, हें त्यांच्या वर्तनाचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास उघड दिसून येतें. तुकारामांनीं सतत बारा वर्षें एकनाथी भागवताचा कसून अभ्यास केला व त्याचाच संस्कार त्यांच्यावर होऊन त्यांचें आयुष्य लोकसेवेंत गेलें. रामदासांचा जन्म एकनाथांनीं निर्माण केलेल्या वातावरणांतच झाला व त्याचा पूर्ण ठसा बालपणींच त्यांच्यावर उमठला. त्यांचे मामा हे एकनाथाचे शिष्य होते. व समर्थ रामदास लहानपणीं पैठण येथें जात असत, व त्यांना एकनाथांचा प्रसाद मिळाला होता, अशी गोष्ट कांहीं चरित्रकार सांगतात. नाशिक येथील पुरश्चरण संपवून त्यांनीं कीर्तनास सुरवात एकनाथाच्या समाधिपुढें केली, व समाधिपुढें सात दिवस कीर्तन केलें ही गोष्ट महत्त्वाची आहे. परंतु या संतांचें कार्यक्षेत्र या प्रांताबाहेर असल्यानें त्यांच्याविषयीं जास्त लिहिणें योग्य होणार नाहीं, परंतु तुकारामांनीं केलेली समाज-

जागृति व रामदासांनीं केलेली समाजसंघटणा यांचे मूळ एकनाथापाशींच येऊन भिडतें हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

एकनाथाचें वेळीं पैठण येथें फर्णानंद नांवाचें संत कांहीं दिवस राहात असत. यांनीं कांहीं ग्रंथ केले असून त्यांच्या शिष्यपरंपरेत बरीच ग्रंथसंपत्ति निर्माण झाली. त्यावेळीं एकनाथाचे गुरुबंधु जनींजनार्दन हे बीड येथें होते. यांचें निर्विकल्प ग्रंथ व इतर काव्यें प्रसिद्ध आहेत. यांनीं बीड येथें शके १५२३ श्रावण व॥ ७ स समाधि घेतली. तसेंच त्यावेळीं पैठण येथें कृष्णदास मुद्गल हे एक सत्पुरुष होते. यांनीं रामायणाच्या युद्धकांडावर एक ग्रंथ लिहिला असून तो एकनाथांनीं स्वतः पाहिला होता. मराठेशाहींत या रामायण ग्रंथाचीं पारायणें प्रत्येक किल्ल्यावर होत असत. सुप्रसिद्ध संत कवि मुक्तेश्वर हेही याच वेळचे. ते एकनाथांचें नातू (मुलीचे मुलगे) होते. त्यांचा जन्म पैठण येथें झाला. हे लहानपणीं मुके होते. परंतु एकनाथाच्या कृपेनें त्यांना वाचा आली व ते एकनाथाजवळच विद्या शिकले, अशी हकीकत सांगतात. त्यांचें रामायण, महाभारत वगैरे ग्रंथ महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचे आहेत. यांचे काव्य फारच मधुर आहे. यांचें संपूर्ण चरित्र मात्र अद्याप उपलब्ध नाहीं.

ज्ञानेश्वर परंपरा.

या सुमाराचा ज्ञानेश्वराच्या परंपरेंतलि कांहीं संतांचा इतिहास मिळतो. ज्ञानेश्वराचे शिष्य सत्यामलनाथ व त्यांचे शिष्य गैनीनाथ या विषयीं कांहीं माहिती सांपडत नाहीं. उलट ज्ञानेश्वरापासून गैनीनाथापर्यंत बरीच संत मंडळी या परंपरेंत असली पाहिजेत परंतु त्याचा शोध लागत नाहीं. गैनीनाथांचे शिष्य गुप्तनाथ यांची मात्र निश्चित माहिती मिळते. गुप्तनाथ हे एक सांप्रदायिक नांव असून यांत एक स्त्री संत होत्या त्यांचें नांव गंगाबाई या राशीन येथलि एका देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणाच्या कन्या, सोळाव्या वर्षींच यांनां वैधव्य आल्याभुळें त्यांनीं पुढील आयुष्य परमार्थांत घालविलें. या सर्व काल भजनांत घालवून रात्रीं ज्ञानेश्वरीवर पुराण सांगत असत. यांची प्रतिपादन शैली फारच अप्रतिम होती. श्रोतृवर्गावर त्याचा ताबडतोब परिणाम होत असे. असाच परिणाम राशीन येथील मल्हार नाईक ठिपसे यांचा मुलगा उद्धव याच्यावर झाला व तो भक्तिमार्गाकडे वळला, गंगाबाई व उद्धव काशीयात्रेस निघाले असतां वाटेंत त्यांची व गैनीनाथांची गांठ पडून त्यांनीं गंगाबाईस गुरूपदेश दिला व नाथपंथांत सामील करून त्यांचे गुप्तनाथ हें नांव

ठेवलें. गुप्तनाथांनीं पुढें उद्धवास उपदेश दिला व त्यांचे नांव उद्बोधनाथ ठेवलें. या उभयतांनीं कांहीं अभंग केलें आहेत त्या दोघांच्या समाधि राशीन येथें शेजारी आहेत उद्बोधनाथांचा समाधिकाल शके १६०९ वैशाख वद्य ९ असा आहे. त्यांचे शिष्य केशरीनाथ हे राशीन येथें मामलेदार होते, परंतु उद्बोधनाथांच्या कीर्तनानें व ज्ञानेश्वरीप्रवचनानें त्याच्या मनावर संस्कार होऊन यांनीं नोकरी सोडली व संपूर्ण काळ जनसेवेंत घातला. यांनीं सिद्धांतस्वर वगैरे ग्रंथ केलें असून शके १६४६ मार्गशीर्ष शु॥ २ स आळंदी येथें समाधि घेतली. यांस २ शिष्य होते. पहिले मल्हारीनाथ व दुसरे शिवदिननाथ पैकीं मल्हारीनाथ हे राशीन येथें राहिले. हे केसरीनाथाचे गुरु उद्बोधनाथ उर्फ उद्धव मल्हार ठिपसे यांचे पुत्र होत. त्यांची परंपराही नाशीक येथेंच राहिली. शिवदिननाथ मात्र पैठण येथें गेले. व शिवदिन केसरी या नांवानें ते प्रसिद्ध आहेत हें मूळ पैठणचेच राहणार यांच्या वडिलांचें नांव कृष्णाजीपंत होते. त्याची जोशीपणाची वृत्ति होती शिवदिन हे लहानपणीं फारच उनाड व छांदिष्ट असत. सांपडेल तो पदार्थ लांबवावा व हालवायास देऊन मिठाई घेऊन खावी असा याचा क्रम असे, यामुळें बाप कंटाळला व त्यानें त्यांना केसरीनाथांचें स्वाधीन केलें. केसरीनाथांनीं स्नान झाल्यावर खडावा पुढें ठेवण्याची कामगिरी सांगितलीं. एकदा शिवदिन ही कामगिरी चुकले असतां केसरीनाथानें त्यांना खडावा फेकून मारिलें व त्यामुळें खोंच पडून भळभळा रक्त वाहूं लागलें. परंतु येथून शिवदिनांच्या वृत्तींत मात्र फरक पडला. व त्यांचें आचरण सुधारलें. केसरीनाथानें त्यांना गुरुउपदेश केला. त्यांनीं विवेकदर्पण, ज्ञानप्रदीप वगैरे ग्रंथ व इतर बरेंच काव्य केलें. यांची शिष्यशाखाही बरीच असून मराठीशाहीचे भरभराटीचे दिवस व पानपतचा आघात हे दोन्हीही यांनीं पाहिले होते, त्यासंबंधींही त्यांचे कांहीं काव्य आहे शके १६८६ माघ व॥ १३ स यांनीं पैठण येथें समाधि घेतली. यांच्या मुलाचें नांव नरहरीनाथ यांचें काव्य उपलब्ध आहे. त्यांचा मुलगा व शिष्य लक्ष्मण हा अतिशय छांदिष्ट असे. भररस्त्यांत निर्लज्जपणें तो आपले वेडेवांकडे चाळे करीत असे. एकदां शिवदिनाच्या कन्या त्यांनीं त्याची कानउघाडणी केल्यामुळें त्यास पश्चाताप होऊन, त्यांनीं आपली चैनी वस्त्रें व वस्तु जाळून टाकल्या. व भजनमार्गाकडे वळला त्यांची समाधी आळंदी येथें आहे. नरहरीनाथांचे दुसरे शिष्य महिपति व ताहराबादचे महिपति भिन्न होत यांनीं बरेंच काव्य केलें असून त्यांचें मुळचें गांव पैठण व एकनाथाचे गुरु जनार्दनस्वामी त्यांचे हे वंशज होते. याचा

बराच काळ उत्तर हिंदुस्थानांत गेला, व शके १६४४ पौष शु॥ १२ स यांनीं ग्वाल्हेर येथें समाधि घेतली.

एकनाथानंतर

एकनाथाच्या नंतर या प्रांतीं झालेल्या संतांपैकीं समर्थपंचकांतील जयरामस्वामी हे एक होते. यांचा जन्म मांडवगण येथें शके १५२१ श्रावण व॥ ८ स झाला. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मग. आईबापांचीं नांवें कृष्णाबाई व भिकाजीपंत, उपनांव कसरे, मांडवगणचे देशपांडे, लहानपणींच वडील वारले. घरची फार गरिबी त्यामुळें काळ फार कठीण गेला, पुढें पंढरपूर येथें माधुकरी मागून त्यांनीं विद्याभ्यास केला सातारा प्रांतीं वडगांव येथें जाऊन कृष्णाचा उपदेश घेतला व तेथेंच काळ घालविला व त्यामुळें त्यांचें जयराम स्वामी वडगांवकर हें नांव पडलें. हे वेदांत विषय अगदीं सुलभपणें समजावून देत असत. त्यांचें दशम स्कंध टीका रुक्मिणी स्वयंवर वगैरे लहान मोठें ग्रंथ बरेंच असून अभंग पद्येंही अनेक आहेत. यांनीं शके १५९४ भाद्रपदमध्यें व॥ ११ स वडगांव येथें समाधि घेतली. यांच्याप्रमाणेंच देव दैठण येथील निंबराज हे एक प्रसिद्ध संत होतें हें मुरारपंत दंडवते यांचें चिरंजीव देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण यांनीं भागीरथीच्या कावडी रामेश्वरास १४ वेळां नेऊन वाहिल्या. एकनाथाचे शिष्य नरहरी ते यांचे गुरु. यांनीं ज्ञानबोध वगैरे लहान ग्रंथ व अनेक पदें व अभंग केलीं आहेत. व कांहीं संत चरित्रें ही लिहिलीं आहेत. तुकाराम, रामदास यांची व निंबराज यांची गांठ पंढरी येथें पडली होती त्यांची कीर्तनशैली फारच परिणामकारक असे. दैठण येथें शके १६०० माघ व॥ ३० स यांनीं समाधि घेतली. यांच्या वंशांतही अधिकारी मंळी झाली असून त्यास बराच मान असे. दैठणजवळ या सुमारास श्रीगोंदें येथें शेख महंमद, गोदडबुवा, राऊळबुवा व प्रल्हादबुवा हे चार संत होऊन गेले. शेख महंमद हे मुसलमान, श्रीगोंदे नजीक रुई बाहिरे येथें मुलाण्याचा धंदा करीत असत एकदां एक बकरें मारीत असतां त्याची तडफड पाहून यांस उपरती झाली व जीव तेथून एक ही भावना उपजली. त्यांनीं तो धंदा सोडून दिला व पंढरीची वारी करूं लागले. ईश्वर एकच आहे त्याचेपाशीं हिंदुमुसलमान हा भेद नाहीं असा त्यांचा उपदेश असल्यानें त्यांस कबीराचा अवतार म्हणत असत. यांच्या गुरुचे नांव चांदबोधले. एकनाथांनीं जनार्दन स्वामींबरोबर ज्या चंद्रभटाच्या येथें मुक्काम केला व ज्याच्या तोंडून चतुःश्लोकी भागवताचे प्रवचन ऐकले त्या चंद्रभटासच चांदबोधले असें

नांव होतें असें सांगतात. यांची समाधि दौलताबादे नजीक डोंगरांत आहे. शेख महंमदानें पवनविजय, ज्ञानसागर वगैरे ग्रंथ केले. त्यांत योगसंग्राम हा बराच मोठा ग्रंथ आहे, तो शके १६१८ च्या श्रावणांत पूर्ण झाला. शिवाय यांची अभंग पदेंही बरीच आहेत. यांची शिष्या रेणुका ही तेली जातीची असून तिनेंही कांहीं अभंग केलें आहेत. शेख महंमदाची समाधि श्रीगोंदे येथें आहे व त्याचा वंशही अद्याप तेथें आहे. तेथील रावळबुवाहेही शेख महंमदाचे सांप्रदायी होते. ते शिव उपासक होतें श्रीगोंदे येथें त्यांचा मठ आहे त्यावेळचे गोदडबुवा हेही श्रीगोंद्याचेंच परंतु त्यांची समाधि कर्जत येथें आहे. त्यांचे समकालीन प्रल्हादबुवा हेही श्रीगोंदें येथीलच त्यांची समाधि येथेंच असून त्यांची शिष्य शाखा बरीच दुरवर पसरली आहे, परंतु या मंडळीच्या चरित्रकाव्या विषयीं फारशी माहिती मिळत नाहीं. तुकाराम शिष्य निळोबा हेही याच भागांतले असून पिंपळनेर येथें त्यांची समाधि आहे. हे मुळचें शिरुर येथील कुलकर्णी. वडीलांचे नांव मुकुंदपंत, मुकुंदपंतानंतर कुलकर्णीपणा करीत असतां सरकारी नोकराचा त्रास झाला म्हणून त्यांनीं ताबे-दारी सोडली व पारनेर येथें आले. तेथून पंढरी, आळंदी येथें जाऊन देहूस गेले तेथें तुकारामाचे चिरंजिव नारायणबुवांची गांठ घेतली तेथें तुकारामाची भेट व्हावी म्हणून चाळीस दिवस अन्नपाणी वर्ज केल्यामुळें तुकारामानें दृष्टांत देऊन आपली माळ त्यांचे गळ्यांत घातली नंतर ते पिंपळनेर येथें राहण्यास आले यांनीं बरेच अभंग केलें असून वारकरी पंथांत यांना फार मान आहे.

भिंगार येथें या सुमारास नागेश नांवाचे एक उत्तम कवि होऊन गेले. हे एथील मुळे घराण्यांपैकीं होतें. या घराण्यांत त्यावेळीं बरीच विद्वान माणसें होतीं. नागेश उर्फ नागजोश्याच्या वडिलांचें नांव मोरजोशी व मातोश्री जानकीबाई मल्हारी व लिंबक हे त्यांचें बंधु, पैकीं लिंबक हे सुप्रसिद्ध ज्योतिर्षी होते नागजोशी. हे यशवंतराव कोकाटे नांवाच्या एका गृहस्थाच्या आश्रयास होते त्यांनीं आपल्या एका ग्रंथांत चव्हाण, राणे, शिसोदे वगैरे मराठे सरदारांची नांवें दिलीं आहेत. परंतु त्यांत भोसल्याचें नांव नाहीं हें विशेष आहे नागजोशी यांचे चंद्रावळी-अख्यान, सीतास्वयंवर वगैरे पांच ग्रंथ उपलब्ध आहेत परंतु या घराण्यांत नागेश्यापेक्षांही दिनकर हे एक प्रसिद्ध संत झाले. हे समर्थ रामदासांचें शिष्य होते. भिंगार येथें असतां बाणेश्वर, सिद्धेश्वर या देवालयांत चालत असलेली धर्म-चर्चा बायाजी (हें दिनकराचें मूळ नांव) ऐकत असतां त्यांना उपरती होऊन

ते वृद्धेश्वरास गेले व तेथें तपश्चर्या केली. शके १५७६ मध्यें समर्थ रामदास वृद्धेश्वरास आले व त्यांनीं दिनकरांस गुरुपदेश दिला. नंतर दिनकर तीसगांव येथें आले व गृहस्थाश्रम स्विकारून राहिले. त्यांचा स्वानुभव दिनकर नांवाचा ग्रंथ व अभंगपदें आहेत. परंतु हा ग्रंथ त्याचा नसून त्यांचे पुत्र रामचंद्र याचा असावा असें वाटतें, रामचंद्र हेही फार अधिकारी होते. व पितापुत्रांनीं समर्थांचें कार्य या प्रांतांत अविश्रांत चालू ठेवले होते. या उभयतांच्या समाधि तीसगांव येथें आहेत. या रामदासी मठाप्रमाणें दादेगांव येथील रामदाशी मठही बरेंच कार्य करीत होता. त्याचें संस्थापक देवदास हे होते. हे रामदासांचे शिष्य होते, देवदासांच्या वाणींतिल जोरदारपणा स्वदेशभक्तीस कार्यक्षम करणारा होता, यांचे गजेंद्रमोक्ष वगैरे काव्य आहे व त्यांत मुसलमानांचीही हजेरी घेण्यास त्यानें कंमी केले नाहीं. याची समाधि दादेगांव येथें आहे. याच सुमारास पैठण येथें कृष्णदयार्णव हे संत होऊन गेले. हे मुळचे कऱ्हाडनजीक कोपरडे येथें राहणारे. मूळ नांव नरहरी, लहानपणींच आईबाप वारले व त्यांतच औरंगजेबाच्या स्वारीची धामधूम झाली म्हणून यांना गांव सोडणें भाग पडलें व जोगाईच्या आंब्यास आले. येथें गोविंदानंद नांवाच्या गुरुचा गुरुपदेश घेऊन, मधुकरी मागून ज्ञानेश्वरी एकनाथी भागवत वगैरे ग्रंथांचा अभ्यास पुरा केला व तर्थियात्रेंस गेले. परत येतात तो तिकडे धुमश्चक्री सुरू होऊन मुसलमानी स्वारीमुळें आंब्रेजोगाई गांव उध्वस्त होऊन गेला होता. म्हणून ते कुटुंबासह पिंपळनेर येथें राहण्यास आले, तेथें कांहीं वर्षे जातात तो अंगावर महारोगाची छाया दिसूं लागली त्यामुळें सर्वकाळ हरीभजनांत घालविण्याचा निश्चय करून पैठण येथें येऊन भागवताच्या दशम स्कंधावर मराठींत टीका लिहिण्यास सुरवात केली. पूर्वार्ध संपण्यास त्यांस सहा वर्षे लागलीं. परंतु त्यापूर्वींच शरिराची व्याधी दूर झाली होती. पुढें उत्तरार्धास सुरवात करून बरेच अध्याय लिहिले, परंतु ग्रंथ पुरा होण्यापूर्वींच ते शके १६६५ मार्गशीर्ष शु॥ ५ स समाधिस्त झाले. हा ग्रंथ पुढें त्यांचे शिष्य उत्तम श्लोक यांनीं पुरा केला. या उभयतांच्या समाधि पैठणास शेजारी आहेत. कृष्ण दयार्णव हे एकनाथाच्या शिष्यपरंपरेपैकीं होते. त्यांचें एक शिष्य सनातन हे मुंगी येथें राहत असत व त्यांचा मठ व समाधि तेथेंच आहे.

पारनेर येथें हरिबुवा नांवाचे एक संत व ग्रंथकार होऊन गेले. हे नामदेव शिंपी होते. आईचें नाव बचाई व बापाचें नांव कचेश्वर असून उपनांव भोंडवे.

यांच्या पत्नीचें नांव गोडाई. यांचे गुरू रामादासस्वामींच्या परंपरेंतील शिवराम नांवाचे होते. परंतु हे विठ्ठलाचे भक्त असून नित्यनेमानें पंढरीची वारी करीत असत. यांचे ज्ञानसागर हरिबोध वगैरे ग्रंथ असून बरेच अभंग आहेत. यांनीं शके १६९९ मध्यें नारायणगांवीं समाधि घेतली. भिक्षुमुनीही याच भागांतले. त्यांची समाधि श्रीगोंदे तालुक्यांतील सुरेगांवीं आहे. यांनीं भक्ति-अनुभव हा ग्रंथ लिहिला. तो शके १६९६ माघ शु॥ १ रोजीं सुरेगांवीं पुरा झाला. त्याच्या गुरूचें नांव आत्माराम. त्यांनीं इतरही बरींच कवनें केलीं आहेत. यांस भिकाजी हें नांव होते व ते दत्तोपासक होते. निरंजनमाधव हे याचवेळचे गोदातटीं रामडोह येथील कुलकर्णी. यांचे वडील महादो बजाजी. हे विजापूरकरांच्या पदरीं होते. निरंजनांचा जन्म तिकडेच झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर ते महाराष्ट्रांत आले. व बाजीराव पेशवे यांच्या आश्रयास राहिले. ते पेशव्यांच्या कामगिरीवरच असत. त्यांनीं सांप्रदायपरिमळ, कृष्णानंदसिंधू वगैरे ग्रंथ केले आहेत. यांनीं ज्ञानेश्वरविजय नांवाचे ज्ञानेश्वरांचें चरित्र शके १६८७ मध्यें लिहिले. अनेक विषयावर यांचे ग्रंथ आहेत. यांच्या प्रमाणेंच सामराज हे कवि या प्रांतांतील कीं नाहीं हें नक्की सांगतां येत नाहीं. परंतु त्यांचें कुलदैवत अर्वी येथील मुद्गलेश्वर असून त्यांनीं त्यावर मुद्गल-आख्यान नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. येथून जवळच कर्जत तालुक्यांतील बेनवडी येथें हरिनारायण नांवाच्या संताची समाधि आहे. यांची विशेष माहिती मिळत नाहीं. परंतु त्यांच्या शवाविषयीं त्यांच्या शिष्य मंडळींत तंटा झाल्यामुळें हे उठून बसले व शिष्यांस दर्शन दिलें अशी माहिती सांगतात. यांची खरी समाधि अष्टें येथें आहे, असेंही म्हणतात. नेवासें येथील गोपाळ नांवाच्या कवीनें मुक्तेश्वराच्या पद्धतीनें समग्र भारत मराठींत लिहिलें आहे. तें शके १६९० च्या सुमारास पुरें झालें. परंतु या गोपाळविषयीं विशेष माहिती नाहीं. तीच हकिकत अनंत पंडितांची. हे पुणतांबें येथें राहात असत. यांच्य वडिलांचें नांव त्र्यंबक. यांनीं महाराष्ट्र संजीवनी व शृंगार कल्लोलिनी अस दोन ग्रंथ केलें आहेत. याशिवाय यांची जास्त माहिती नाहीं. नगर येथील बाळंभट काजळे हे मोरोपंताच्या समकालीन असून त्यांचे स्नेही होते. यांनींही आर्या केल्या. परंतु त्याविषयीं जास्त माहिती नाहीं.

महिपति.

या सर्व मंडळीपेक्षां महिपतीची प्रसिद्धी फारच आहे. हे ताहराबाद येथील राहणारे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. वडिलांचें नांव दादोपंत व मातोश्रीचें नांव गंगाबाई होतें. यांचें आडनांव कांबळे. शके १६३७ मध्यें त्यांचा जन्म झाला. ल्हानपणीं हे फारच खोडकर असत परंतु सोळावे वर्षी वडील निवर्तले व संसाराचा भार अंगावर पडला. ताहराबादेपासून सहा मैलांवर असलेल्या तांभेरेंगांवीं मोरोबा तांभेरेकर नांवाचे एक सत्पुरुष राहत असत त्यांच्याजवळ यांचा विद्याभ्यास पुरा झाला. वडील वारल्यानंतर कुळकर्ण्याचें काम करीत असतां एकदां पूजेस बसले असतांना सरकारी शिपाई बोलाविण्यास आला व पूजा सोडून जाणें भाग पडलें. परंतु परत आल्यावर दोन धन्यांची नोकरी करण्यापेक्षां एका विठ्ठलाचीच नीट नोकरी करावी अशी मनास उपरती होऊन यांनीं विठ्ठलचरणीं लेखणी अर्पण केली व कुलकर्ण्याचें काम सोडलें आणि तेव्हांपासून ग्रंथलेखनास प्रारंभ केला. यांना संतचरित्राची आवड असे व प्रत्येक संताविषयीं जितकी माहिती मिळेल तितकी जमवून यांनीं संतांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. त्याकरितां ह्यांनीं बऱ्याच ठिकाणीं प्रवास करून स्वत: माहिती मिळविली आणि भक्तविजय, संतलीलाभृत व संतविजय यांत लिहून टाकली. याशिवाय पांडुरंगमाहात्म्य वगैरे ग्रंथ यांनीं केले आहेत. यांचा पंढरीच्या वारीचा नेम असे. तसेच पैठण येथेंही ते वारीस जात असत. उतारवयांत ते एकदां पंढरीच्या वारीस निघाले असतां नांदूर येथें मुक्कामास आले. व रात्रभर राहून दुसरे दिवशीं निघाले तों वेशींत घोड्यावरून खालीं पडले आणि बेशुद्ध झाले. सावध झाल्यावर त्यांना डोलींत घालून ताहराबाद येथें आणावें लागलें. परंतु त्यामुळें त्यांची प्रकृति खालावली व वारीचा क्रम बंद पडला. म्हणून त्यांनीं पांडुरंगास एक पत्र लिहिलें. त्यावरून त्यांच्या मनोवृत्तीची यथार्थ कल्पना येते. वयाच्या ७५ राव्या वर्षी शके १७१२ श्रावण व॥ १२ स हे समाधिस्त झाले. महिपतीची भाषा प्रौढ व अत्यंत प्रेमळ आहे

वांबोरी (वाल्मिकी नगर.) येथें या सुमारास हरिदास या नांवाचे एक सत्पुरुष होऊन गेले. त्यांचें मूळनांव रघुनाथ. गुरु शांतानंद यांच्या घराण्यांत रामोपासना असे. यांनीं शके १७४५ मध्यें योगवाशिष्ठावर विस्तृत टिका लिहून संपविली. कवि या नात्यानें संगमनेरचे अनंत फंदी बरेच प्रसिद्ध आहेत. यांचे उपनांव

चोलप. सराफीचा धंदा करून असत. यांस तमाशाचा फार नाद असे, व त्याच धोरणानें त्यांनीं आर्धी कवित्व केलें. हे शीघ्र कवि होते. एकदां भिल्लांच्या तावडींत सांपडले असतां यांनीं त्यांच्यावर कविता करून आपली सुटका करून घेतली. यांच्या ह्या तमाशाच्या चाळ्यामुळें त्यांना फंदी हें नांव मिळालें. एकदां त्यांची व आहिल्याबाई होळकर यांचीं गाठ पडली असतां बाईनीं यांची चांगलीच कानउघाडणी केली, व असल्या सुधातुल्य वाणीचा तमाशाकडे उपयोग करण्याऐवजीं ईश्वरभजनाकडे करावा असा उपदेश केला. तेव्हांपासून ते तमाशा सोडून कीर्तन करूं लागले. हे शके १७४३ मध्यें समाधिस्त झाले. यांच्यामागें यांचा मुलगा श्रीपती उर्फ सवाई फंदी हाही शीघ्र कवि होता. हा गुण यांच्या वंशजांतही आहे.

येथपर्यंत अकराव्या शतकापासून अठराव्या शतकाअखेर झालेल्या या प्रांतांतील संत व कवि यांची थोडक्यांत माहिती दिली आहे. त्यांचें चरित्र दिग्दर्शन, काव्य व कार्य यांचें त्रोटक वर्णन त्यांत आलें आहे. सातआठशें वर्षे धर्मप्रसाराचें कार्य कसें चाललें होतें व काव्यगंगा कशी वाहात होती याचा यावरून बोध होईल. वर दिलेल्या संतकवीशिवाय इतरही संत, कवि या प्रांतीं होऊन गेले असतील. अशांपैकीं, कांहीं गांवीं ज्यांचा नुसता दाखला सांपडतो परंतु निश्चित माहिती मिळत नाहीं, अशांचा उल्लेख केल्यास पुढील संशोधनास मदत होणार आहे. म्हणून त्यांचा नामनिर्देश पुढें केला आहे. वांबोरी येथें जयराम बुवा नांवाच्या संतांचा मठ व समाधि आहे, व त्यास सरकारांतून उत्सवाप्रीत्यर्थ नेमणूक आहे. हे जयराम एकनाथांचे गुरुबंधु व जनार्दनस्वामींचे शिष्य होते असें सांगतात. जनार्दन स्वामींचे एक शिष्य रामा जनार्दन होते व त्यांची ज्ञानेश्वरांची आरती सर्वतोमुखीं आहे. कदाचित् रामाजनार्दन व हे जयराम एकच असण्याचा संभव आहे. वर दिलेला योगवाशिष्टकर्ता हरिदास हाही ह्या जयरामाच्या परंपरेपैकीं असावा. मालुंजे खुर्द एथें लोखंडे घराण्यांत सखाहरी नांवाचा सत्पुरुष होऊन गेला. हा दौलतराव शिंद्यांचा गुरु होता. त्याची समाधि मालुंजे येथेंच आहे. गुंडेगांव येथें मंगळवेढ्याच्या दामाजीपंतांच्या चिरंजीवाची समाधि आहे, त्यांचे नांव बुवाजीबुवा. खेडलें परमानंद येथें परमानंद या सत्पुरुषाची समाधि आहे. त्यांची परंपरा तेथेंच आहे. गोरेगांव येथें सिद्धेश्वराचें देवालय असून त्याची स्थापना गोरा कुंभार यांनीं केली असें सांगतात.

या प्रांतांत अलिकडे होऊन गेलेल्या सत्पुरुषांचा उल्लेख करणें अवश्य आहे.

बेलापूर येथें भानुदास बुवा होऊन गेले. यांना टोकें येथील गोधाजीबुवांचा उपदेश होता. भानुदासांनीं निव्रत्तिनाथांची पालखी पंढरीस नेण्याचा क्रम सुरू केला. त्याचप्रमाणें शिर्डी येथें साईबाबा नांवाचे प्रसिद्ध संत होऊन गेले. त्यांनीं आधुनिक पद्धतीनें शिकलेल्या लोकांच्याही मनांत प्रकाश पाडून त्यांना धर्माकडे वळविलें. त्यांचें संपूर्ण चरित्र कळत नाहीं. परंतु त्यांचें कार्य मात्र अखंड चालू होतें.

संतसाधुजनांनीं वेळोवेळीं प्रगट होऊन या प्रांतास आपला कृपाप्रसाद दिला. पुढें कालाच्या उदरांत काय आहे देव जाणे.

समाप्त.

I 15-3-1931 (1)

मिळण्याचें ठिकाण -- नवीन किताबखाना, पुणें.